S P E A K | R E A D | W R I T E



# माय मराठी ५
# My Marathi 5

पाठ्यपुस्तक | TEXTBOOK FOR COMMUNICATIVE MARATHI



MADHURI PURANDARE JYOTSNA BHIDE
SONALEE GUJAR ZAMEER KAMBLE

UNIVERSITY OF MUMBAI
RAJYA MARATHI VIKAS SANSTHA

माधुरी पुरंदरे / MADHURI PURANDARE
ज्योत्स्ना भिडे / JYOTSNA BHIDE
सोनाली गुजर / SONALEE GUJAR
जमीर कांबळे / ZAMEER KAMBLE

# माय मराठी ५
# My Marathi 5

पाठ्यपुस्तक / Textbook for Communicative Marathi

**संपादक / EDITORS**
विभा सुराणा / VIBHA SURANA
संजय कृष्णाजी पाटील / SANJAY KRUSHNAJI PATIL
सोनाली गुजर / SONALEE GUJAR

**संकल्पना आणि निर्मिती / CONCEPT & PRODUCTION**
जर्मन विभाग, मुंबई विद्यापीठ
Department of German, University of Mumbai

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
**RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI**

मुंबई विद्यापीठ
**UNIVERSITY OF MUMBAI**

**ISBN No.: 978-93-5407-591-9**

**FIRST EDITION**
**पहिली आवृत्ती**

**क्रिएटिव्ह कॉमन्स ॲट्रिब्यूशन – शेअरअलाईक लायसन्स (CC BY-SA 4.0) ह्याअन्वये उपलब्ध**
**Published under Creative Commons Attribution – ShareAlike License (CC BY-SA 4.0)**

- **प्रकल्प समन्वयक / PROJECT CO-ORDINATOR**
  विभा सुराणा / VIBHA SURANA

- **लेखक / AUTHORS**
  माधुरी पुरंदरे / MADHURI PURANDARE
  ज्योत्स्ना भिडे / JYOTSNA BHIDE
  सोनाली गुजर / SONALEE GUJAR
  जमीर कांबळे / ZAMEER KAMBLE

- **सहलेखक / CO-AUTHOR**
  कृत्तिका भोसले / KRUTTIKA BHOSALE

- **संपादक / EDITORS**
  विभा सुराणा / VIBHA SURANA
  संजय कृष्णाजी पाटील / SANJAY KRUSHNAJI PATIL
  सोनाली गुजर / SONALEE GUJAR

- **संपादकीय मंडळ / EDITORIAL TEAM**
  सुहास लिमये / SUHAS LIMAYE
  मेहेर भूत / MEHER BHOOT
  प्र. ना. परांजपे / P.N. PARANJAPE

- **मराठीसाठी तांत्रिक साहाय्य / TECHNICAL SUPPORT FOR MARATHI**
  वूडस्टॉक स्टुडिओ / WOODSTOCK STUDIO, कन्फ्युशिअस इन्स्टिट्यूट, मुंबई विद्यापीठ / CONFUCIUS INSTITUTE, UNIVERSITY OF MUMBAI
  गुरुनाथ कलमकर (मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ) / GURUNATH KALAMKAR (DEPARTMENT OF MARATHI, UNIVERSITY OF MUMBAI)

- **कला, मांडणी, चित्रे / छायाचित्रे / अक्षर जुळणी**
  **LAYOUT DESIGN / PHOTOS / TYPESETTING**
  नागेश सिरसाल / NAGESH SIRSAL
  प्राची जाधव / PRACHI JADHAV
  शिखा पांडे / SHIKHA PANDEY
  गिरिषा टिळक / GIRISSHA TILAK
  सुभाष गोपाळे / SUBHASH GOPALE

- **प्रकाशन / PUBLICATION**
  मुंबई विद्यापीठ / UNIVERSITY OF MUMBAI
  राज्य मराठी विकास संस्था, मुंबई / RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI

- **ई-पत्ता / E-MAIL**
  rmvs_mumbai@yahoo.com
  deptofgerman@mu.ac.in

- **संकेतस्थळ / WEBSITE ADDRESS**
  https://www.learn-marathi.com, www.mu.ac.in
  www.rmvs.marathi.gov.in

Online access link: https://mu.ac.in/mymarathi5

**TEXTBOOK, WORKBOOK AND AUDIOVISUALS ₹ 1250 | $ 25 | € 20**

# प्रस्तावना

भारतीय अन्यभाषक, त्याचप्रमाणे परदेशी तरुण आणि प्रौढ व्यक्तींना मराठी भाषा शिकण्यासाठी ‘माय मराठी’ हे पाचव्या पातळीचे पुस्तक आहे. सर्वसमावेशक सामग्रीतून संवादात्मक, कृतिशील आणि निर्मितिक्षम अशा पायाभूत आधारावर ह्या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. मराठी भाषेचे काटेकोर पण परिणामकारक अध्ययन करण्याकरता हा एक अद्ययावत पद्धतीने भाषा शिकवण्याचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांना आकलन, संवाद, वाचन तसेच लिखाण यांद्वारे मराठी भाषेचा योग्य रीतीने आणि परिणामकारक वापर कसा करावा याचे शिक्षण दिले जाते.

ह्या अभ्यासक्रमाच्या अध्यापन सामग्रीत प्रामुख्याने दोन पुस्तके आहेत, १) पाठ्यपुस्तक : पाठ, ध्वनिमुद्रित उताऱ्यांचे लिखित मजकूर, मराठी - इंग्रजी आणि हिंदी, असा शब्दसंग्रह आणि विनामूल्य दृक्श्राव्य सामग्री यांसहित आणि २) अभ्यासपुस्तक : सराव, चाचणी, आणि उत्तरसंच यांसहित.

‘माय मराठी, पातळी ५’च्या ह्या खास पाठ्यपुस्तकात विषयानुरूप छायाचित्रे, रेखाचित्रे, मजकूर, कविता आणि गाणी, म्हणी आणि वाक्प्रचार, व्याकरण, ‘करा आणि शिका’ स्वाध्याय आहेत. तसेच खेळाद्वारे शिकवणी, समर्पक अर्कचित्रे, शब्दसंपदेवरील दृष्टिक्षेप, पाठ्यपुस्तक आणि अभ्यासपुस्तक यांच्याबरोबर सराव करण्यास उपयुक्त अशा ध्वनिफिती आणि चित्रफिती, ध्वनिफितींचे अनुलिखित उतारे व शब्दसंग्रह दुव्यावर उपलब्ध आहेत. ग्लॉसरी किंवा शब्दसंग्रहात कठीण शब्दांची लिंगानुसार, वचनांनुसार आणि सामान्यरूपांनुसार विस्तृत माहिती समाविष्ट केलेली आहे. तसेच सर्वच धड्यांची रचना विद्यार्थ्यांना समजेल अशी आहे.

‘माय मराठी पातळी ५’च्या अभ्यासपुस्तकात १) पाठ्यपुस्तकातील प्रत्येक पाठावरील स्वाध्याय आहेत. त्यासोबतच २) मागील भागात या पाठावरील चाचणी, ३) प्रत्येक दोन पाठांसाठी चाचणी प्रश्नावली, शेवटी ४) संपूर्ण पातळी ५च्या अभ्यासक्रमाची एकत्रित चाचणी आणि ५) उत्तरे यांचा समावेश आहे.

संवादात्मक मराठीच्या पातळी ५चा संपूर्ण अभ्यासक्रम म्हणजे साधारणपणे १६० तासांची शिकवणी आहे. तथापि, ह्याचे अध्यापन करताना शिक्षकाला ह्यातील प्रत्येक पाठासाठी साधारणपणे १६ तासांचा अवधी लागेल. ह्या सामग्रीत सराव आणि चाचणीसाठी पुरेशी सामग्री समाविष्ट केलेली असली, तरी प्रत्यक्ष शिकवताना संबंधित शिक्षकाला अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अवांतर माहितीही द्यावी लागणार आहे. विद्यार्थ्यांसाठीही एक सूचना आहे की, योग्य तऱ्हेने मराठी बोलण्यासाठी त्यांनी एकवचन, अनेकवचन, सामान्यरूप तसेच लिंगानुसार नामांचा अभ्यास करण्याचा सराव करावा. सदर पुस्तके ही वर्गात शिक्षकांकडून समजून घेऊन शिकण्याच्या स्वरूपाची असली, तरी स्वयं-अध्ययन करणाऱ्यांना दिलेल्या सामग्रीतील विस्तृत शब्दसंग्रहाच्या आधारे ती समजून घेऊन शिकता येईल.

ह्या अध्यापन सामग्रीसोबत दृक्‌श्राव्य सामग्रीचा दुवा विनामूल्य देण्यात येत आहे, कारण हा प्रकल्प पूर्णपणे शैक्षणिक तत्त्वावर राबवला जात आहे. भाषा परिपूर्णपणे शिकण्यास मदत व्हावी ह्या हेतूने श्राव्य ध्वनिफिती तसेच निरनिराळ्या माध्यमांतून निवडलेल्या वैविध्यपूर्ण दृक्‌श्राव्य चित्रफिती समाविष्ट केल्या आहेत. शिक्षकांनी सुचवलेल्या उत्तरांसहची लेखी प्रश्नावली घेताना, तसेच इतर प्रश्नोत्तरांच्या वेळी ह्या दृक्‌श्राव्य सामग्रीची मदत घेणे अपेक्षित आहे. दृक्‌श्राव्य सामग्री आणि पूर्ण पाठ्यपुस्तक व अभ्यासपुस्तक या दुव्यावर उपलब्ध आहे.

हा अभ्यासक्रम शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी असा सल्ला आहे की, त्यांनी शिक्षकांसाठी असणाऱ्या संवादात्मक भाषा-अध्यापनाच्या प्रशिक्षण वर्गांना उपस्थित राहावे; तसेच, ह्या संदर्भात त्यांनी संपादकांशी वा राज्य मराठी विकास संस्थेशी संपर्क साधावा.

प्रकल्पातील इथवरची ही अध्यापनसामग्री तयार करण्यासाठी कष्ट घेऊन हे सारे पूर्णत्वास नेण्यास साहाय्य करणाऱ्या सर्वांचे आभार.

इंग्लिश आणि जर्मनप्रमाणे मराठीदेखील संपन्न आणि पूर्वपरंपरा असणारी इंडो-युरोपियन भाषा आहे. ह्या भाषेचे अध्ययन करून त्यात सर्वसामान्य निजभाषकाइतके प्रभुत्व येण्याकरता किमान ६ पातळ्यांची, म्हणजेच अंदाजे ८०० तासांची, आवश्यकता आहे.

या कामात बहुमोल साहाय्य करणाऱ्या राज्य मराठी विकास संस्थेचे अधिकारी आणि कर्मचारी यांचे आम्ही आभारी आहोत.

कुलगुरू सुहास पेडणेकर आणि प्र-कुलगुरू रवींद्र कुलकर्णी यांच्या नेतृत्वासह कार्यशील अशा मुंबई विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांचे, तसेच हा प्रकल्प सुरळीत चालण्यासाठी साहाय्य करणाऱ्या सर्वांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

विभा सुराणा, संजय कृष्णाजी पाटील आणि सोनाली गुजर
संपादक

# Preface

My Marathi Level 5 is a Marathi course book particularly meant for non-native teens and adults, for both Indian and foreign Marathi language learners. It is prepared using an integrated communicative, task and production-based approach. It is a modest attempt to apply latest language teaching tools to facilitate the learning of the Marathi language systematically and effectively. It teaches the learners to communicate correctly and effectively in Marathi by imparting understanding, speaking, reading as well as writing skills.

This course material consists of two books, namely 1) a textbook along with audio transcripts, a glossary and free audiovisual material and 2) a workbook with exercises, tests, and answer keys. This entire material is available on the following link – https://mu.ac.in/mymarathi5

This particular textbook of 'My Marathi Level 5' consists of units such as thematic images and illustrations, texts, poems and songs, idioms and proverbs, grammar, 'do and learn' exercises, learning games, cartoons, audio-visual and audios components with exercises and transcripts, vocabulary overview (drishtikshep) per chapter, as well as learner self-evaluation in all chapters. The glossary or shabdasangraha gives a detailed list of new words with their gender in singular and plural forms as well as their oblique forms. English and Hindi word meanings are given.

The workbook of 'My Marathi Level 5' consists of 1) exercises for each chapter as well as the following tests 2) a comprehensive test for level 4 after mageel bhagat, 3) a test after every two chapters 4) a comprehensive test for level 5 and 5) answerkeys.

The entire Communicative Marathi Level 5 course is designed for approximately 160 teaching hours. Thus, the teacher may take about 16 hours for each of the 10 chapters. Though enough exercises and tests have been given, the teacher is expected to give more exercises as and when required. The learners are advised to learn the nouns along with their gender with singular and plural forms as well as the oblique forms in order to learn to speak correct Marathi. Though the book is meant for classroom teaching, self-learners too can make use of it with the help of the glossary.

The audio-visual content available on the link comes free with the book and is meant purely for educational purpose. It consists of the audio section and a wide spectrum of audiovisual clips from the media which have been collated in accordance with the language proficiency level of the learners. The teachers are expected to use audio-visual material along with specific MCQs and other questions (written & oral).

The teachers using this book are advised to undergo rigorous teachers' training for the integrated communicative approach and may contact the editors or Rajya Marathi Vikas Sanstha for the same. We are extremely thankful to the entire team for making this level happen.

Like English and German, Marathi too is a rich Indo-European language with a long tradition and similarly requires at least 6 levels of language learning, i.e. approximately 800 hours for near native language proficiency.

We are extremely thankful to the employees of Rajya Marathi Vikas Sanstha for their valuable cooperation.

We thank the authorities of the University of Mumbai led by the Vice Chancellor Dr. Suhas Pednekar and Pro-Vice Chancellor Dr. Ravindra Kulkarni to facilitate the smooth running of this project.

Vibha Surana, Sanjay Krushnaji Patil and Sonalee Gujar
Editors

# आभार | Acknowledgement

Abhijeet Ranadive

Amit Varandekar

Ashish Sawant

Ashwini Mane

Bharati Nirgudkar

Disha Gudulkar

Gauri Brahme

Geeta Bhagwat

Gurudutt Kamath

Kamala Ganesh

Kavya Chintala

Manasi Sawant

Neha Thombare

Nishka Pradhan

Pradnya Dalvi

Priyanka Katkar

Ravindra Kulkarni

Sadhana Gore

Shrikant Pathak

Shweta Redekar

Sonal Atre

Suhas Pednekar

Sunanda Mahajan

Suparna Kulkarni

## Permission for copyrights

Amruta Subhash
(with Rajahans Prakashan, Pune)

Arun Khopkar

Chandrashekhar Kulkarni
(for V. M. Kulkarni)

Continental Prakashan
(for Kusumagraj)

D. B. Dhamnaskar

Dr. Ajit Padgaonkar
(for Mangesh Padgaonkar)

Gauri Brahme

Girish Kuber (Loksatta) /
Rajiv Khandekar

Girish Kulkarni

Hemant Jogalekar

Maharashtra Rajya Sahitya Ani
Sanskruti Mandal
(for Namadev Dhasal)

Majestic Publishing House

Manoj Rege (for P. S. Rege)

Maxine Berntsen

Meena Chandavarkar
(for Bhaskar Chandavarkar)

Mehta Publishing House
(for Tara Bhawalkar, Geeta Sapre)

Mirasdar Pratishthan
(for D. M. Mirasdar)

Mouj Prakashan

Nandatai Paithankar
(for G. A. Kulkarni)

Nivrutti Khanolkar
(for Aarati Prabhu /
C. T. Khanolkar)

Parchure Prakashan

Popular Prakashan

Pras Prakashan
(for Arun Kolatkar)

Prashant Kulkarni

Rahul Gadpale
(from Sakal newspaper for
Rajeshri Kshirsagar)

Rajendra Pai
(for Aacharya P. K. Atre)

Rajiv Naik

Ramesh Panase

S. D. Phadnis

Sandeep Khare

Shriniwas V. Kulkarni

Sumitra Madgulkar
(for G. D. Madgulkar)

Vasant Aabaji Dahake

Vasant Patankar

Vijay Prakashan

Yashawant Manohar

Disclaimer : Apart from the above names, heirs of Sadanand Rege, Shanta J. Shelke, Sopandev Chaudhari, V. D. Ghate & R. K. Joshi could not be reached in spite of many attempts. Similarly, Ashwini Gawade & N. D. Mahanor could not be contacted in spite of our best efforts. University of Mumbai, Rajya Marathi Vikas Sanstha and editors of this book have no intention of evading their copyright in any way.

# अनुक्रमणिका


| पाठ | विषय | संभाषणकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| | मागील भागात | भाषेचे सौंदर्य, शिक्षणाचे माध्यम, भाषेचे संवर्धन | काळ, धातू + आयला / ऊ / त<br>प्रयोजक व शक्य क्रियापदे<br>कर्तरी व कर्मणी प्रयोग<br>जो/जे, तो/ते, तर/तरी<br>तुलनादर्शक शब्द<br>क्रमसूचक शब्द<br>वाक्यरचना<br>क्रियापद-नाम | समरूप शब्द<br>शब्दक्षेत्र<br>काळ - वेळ<br>एकाच क्रियापदाची अनेक रूपे : करायला, करण्यापूर्वी, केल्याने...<br>वाक्प्रचार आणि म्हणी | १३ |
| १ | खेळ आणि आरोग्य | महाराष्ट्रातील विविध खेळांविषयी माहिती<br>खेळ आणि व्यायाम यांचे वाढते महत्त्व<br>खेळ आणि दुखापती<br>प्रसिद्ध खेळाडूंची माहिती | धातुसाधित क्रियाविशेषणे<br>प्रयोग – उजळणी<br>केले पाहिजे, करायला पाहिजे, करायला हवे ह्यातील फरक<br>संधी ओळखणे आणि करणे | खेळाशी संबंधित शब्द<br>मंगळागौरीचे खेळ<br>क्रियापदे - पिरगळणे, दुखावणे इ०<br>नाम + क्रियापद जोड्या | ३१ |
| २ | पेहराव आणि फॅशन | महाराष्ट्रातील पेहराव<br>काळानुरूप झालेले पेहरावातील बदल<br>महाराष्ट्रीय दागिने ओळखणे आणि सांगणे<br>बदलते ट्रेंड्स | व्याकरण : अधिविशेषण / विधिविशेषण<br>चांगला प्रकार – चांगल्या प्रकारे<br>विशेषणांचा नामासारखा वापर करणे<br>संधी ओळखणे आणि करणे | नऊवारी, सहावारी साडी, धोतर, शाल<br>प्रसिद्ध महाराष्ट्रीय दागिने<br>नाम + क्रियापद जोड्या | ५९ |

| पाठ | विषय | संभाषणकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ३ | हास्यतरंग | व्यंगचित्रे समजणे<br>विनोद - त्याची आवश्यकता व त्याचे महत्त्व<br>महाराष्ट्राला लाभलेल्या विनोदी लेखकांचे उतारे | विशेषणसाधित क्रियाविशेषणे<br>संधी ओळखणे आणि करणे | मजेदार, खट्याळ, हलकेफुलके इ.<br>'हसणे' या क्रियापदाचा वापर असलेले वाक्प्रचार<br>नाम + क्रियापद जोड्या | ८० |
| ४ | हे विश्वचि माझे घर! | सर्वसमावेशक भारतीय संस्कृती<br>संवेदनशीलता, मानवतावाद, आंतरराष्ट्रीय सहकार्य | धातुसाधित विशेषणे<br>संधी ओळखणे आणि करणे | स्थलांतर, सीमोल्लंघन, विश्वात्मक, सामूहिक जबाबदारी<br>नाम + क्रियापद जोड्या | १०४ |
| ५ | मराठी भाषा - विविध पैलू | मराठी भाषेची मूलभूत माहिती<br>मराठी भाषेतील गमतीजमती<br>मराठी भाषेच्या विविध छटा ओळखणे | एकाच शब्दाचे अनेक अर्थ<br>अनेक लिंगे असणारी नामे<br>'ऊक' जोडून होणारी नामे<br>ध्वन्यनुकारी शब्द / क्रियापदे<br>संधी ओळखणे आणि करणे | मराठी – वळवावी तशी वळते<br>कथा – कथुली, घर – घरकुल इ.<br>भरदिवसा, दिवसभर यांसारखे शब्द<br>दिसायला सारखे दिसणारे पण उच्चारात फरक असणारे शब्द<br>नाम + क्रियापद जोड्या | १२४ |

| पाठ | विषय | संभाषणकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ६ | समारंभ (हर्षोल्हास) | वेगळ्या वाटेवरचे सण माहीत करून घेणे<br>नवे उत्सव आणि समारंभ जाणून घेणे | साहचर्यवाचक शब्दयोगी अव्यये<br>नामसाधित क्रियापदे / नामधातू तयार करून वापरणे<br>संधी ओळखणे आणि करणे | मराठी महिने, ऋतू व त्यांतील विविध सण<br>नाम + क्रियापद जोड्या | १५० |
| ७ | मन मनास उमगत नाही... | विविध भावना - मानसिक स्वास्थ्य<br>आठवणींचे महत्त्व | ‘हो’ चा वापर - तू फक्त हो म्हण, हो का, हो ना, हो बरं, हो की, हो?, होच मुळी ... | समुपदेशन<br>नाम + क्रियापद जोड्या | १६९ |
| ८ | कवितेच्या प्रांतात | कवितेच्या प्रांतात फेरफटका मारणे<br>मराठी कविता आणि कवी<br>कवितेची भाषा - काव्यरचनेच्या परंपरा आणि तऱ्हा | अनिश्चित सर्वनामे (सामान्य सर्वनामे) व त्यांची विभक्तिरूपे | ‘हायकू’ हा काव्यप्रकार<br>कवितेचे रसग्रहण<br>नाम + क्रियापद जोड्या | १८४ |
| ९ | जडणघडण | संस्कारांचे महत्त्व<br>पेराल तसे उगवेल<br>निषिद्ध गोष्टी / वर्ज्य गोष्टी<br>महाराष्ट्रातील प्रमुख शहरे : कोल्हापूर, अमरावती, जळगाव | ‘हो’ चे विविध अर्थ | संस्कृतिसंगम<br>काही मराठी समजुती<br>नाम + क्रियापद जोड्या | २०७ |

| पाठ | विषय | संभाषणकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १० | पाणी | ‘पाणी’ विषयावरील साहित्यिक उतारे<br>पाण्याची समस्या | | पाण्याशी निगडीत शब्द<br>नाम + क्रियापद जोड्या | २२७ |
| | ध्वनिमुद्रित उतारे व संवाद यांचे अनुलेखन | | | | २४४ |
| | शब्दसंग्रह | | | | २५५ |

# मागील भागात









## उजळणी करू या...

- भाषा, शिक्षणाचे माध्यम, भाषेचे संवर्धन
- समरूप शब्द
- काळ, धातू + आयला / ऊ / त
- प्रयोजक व शक्य क्रियापदे
- कर्तरी व कर्मणी प्रयोग
- जो/जे, तो/ते, तर/तरी
- तुलनादर्शक शब्द
- क्रमसूचक शब्द
- वाक्यरचना
- क्रियापद-नाम

## १ वाचू या.

### मायमराठी

जागतिक मराठी दिनानिमित्त फेसबुकवर बऱ्याच पोस्ट्स वाचनात आल्या. काही मराठी भाषेची




महती सांगणाऱ्या, अभिमान दर्शविणाऱ्या, काही खोचक, काही अगदी पांचट, तर काही तळमळ व्यक्त करणाऱ्या.

मला एक गोष्ट खटकली ती अशी की, मराठीला मोठी करण्याच्या नादात इंग्रजीला कमी लेखण्याची प्रवृत्ती दिसत होती. प्रत्येक भाषेला स्वतःचं अस्तित्व आहे, शैली आहे, ढंग आहे, सौंदर्य आहे. पण म्हणून आपला तो बाळ्ळ आहे हे सिद्ध करायला दुसऱ्याचं कार्टं का करावं? मी स्वतः इंग्रजी माध्यमातून शिकले असले, तरी 'आवडता लेखक कोण?' या प्रश्नाचं पहिलं उत्तर आपसूक 'पु. ल.'च येतं. माझ्या तोंडून हेमिंग्वे किंवा शेक्सपिअर असं उत्तर येत नाही. आणि जरी आलं हेमिंग्वे, तरी त्यामुळे माझं मराठीवरचं प्रेम कमी होतं का?

ज्या भाषेतून तुम्ही विचार करता, ती तुमची खरी मातृभाषा असं म्हटलं जातं. मी बहुतांश विचार मराठीतून करते, काही वेळा इंग्रजीतून, तर काही वेळा चक्क जर्मन किंवा जपानी भाषेतून. हिंदी मला कधी फारशी आपलीशी वाटली नाही, याचं मला कधीकधी खरोखर वाईट वाटतं. माझी मुलं इंग्रजी माध्यमात शिकत असल्यामुळे कदाचित माझ्याइतकं मराठी वाचणार, बोलणार नाहीत... : पण त्यांना मराठीतून पुस्तकं वाचून दाखवणं, शक्यतो मराठीतूनच बोलणं आणि येनकेन प्रकारे त्यांना मराठी भाषेची गोडी लावणं, हे मी व माझ्या माहितीतले कित्येक पालक आपापल्या परीनं करत असतात. इंग्रजी माध्यमात शिक्षण घेणाऱ्या सर्वांना अगदी मोडीत काढून आमचा मराठीचाच झेंडा कसा उंच, हे दाखवायचा प्रयत्न हास्यास्पद वाटतो.

भाषेच्या क्षेत्रात गेली अनेक वर्षं कार्यरत असल्यामुळे एक गोष्ट सांगू शकते. आज इंग्रजीच्या प्रसारामुळे मराठीच काय, प्रत्येक प्रादेशिक भाषेवर गंडांतर आलेलं आहे. अगदी वेगानं पसरणाऱ्या जागतिकीकरणामुळे प्रसिद्ध पावलेल्या जर्मन, फ्रेंच आणि स्पॅनिश या परकीय भाषांवरसुद्धा. तिथले स्थानिक लोकही याच तक्रारी करताना मी पाहिले आहे आणि तेसुद्धा त्यांच्या परीनं स्वभाषासंवर्धनासाठी झटत आहेतच. आपण आपली मायमराठी टिकवण्यासाठी काय करू शकतो हा वेगळा मुद्दा आहे आणि तो या लेखाचा विषय नाही.

मुळात जे उत्तम आहे ते चिरकाल टिकणारच. त्यामुळेच तर संस्कृतही अजून जगाच्या कानाकोपऱ्यात टिकून आहेच. परिस्थिती वाईट आहे, हे मला शंभर टक्के मान्य आहे. पण इंग्रजीच्या नावानं सतत खडे फोडण्यापेक्षा आपणच आपल्या मायमराठीचं शक्य होईल त्या प्रकारे संवर्धन करायला काय हरकत आहे?

**- गौरी ब्रह्मे**

**क. उताऱ्यात आलेल्या पुढील शब्दांचा अर्थ सांगू या.**

| | |
|---|---|
| अ. खोचक | १. आपोआप |
| आ. पांचट | २. सगळीकडे |
| इ. आपसूक | ३. टोचेल अशी गोष्ट |
| ई. गंडांतर | ४. वाईट परिस्थिती |
| उ. कानाकोपऱ्यात | ५. रटाळ |

**ख. पुढील नाम + क्रियापद जोड्यांचा वाक्यात उपयोग करून लिहू या.**

अ. महती सांगणे    आ. अभिमान दर्शविणे    इ. तळमळ व्यक्त करणे
ई. मोडीत काढणे    उ. चिरकाल टिकणे    ऊ. खडे फोडणे

**ग. उताऱ्यात आलेल्या पुढील विधानांबद्दल गटांमध्ये चर्चा करून त्यासंबंधी एक उदाहरण देऊ या.**

अ. प्रत्येक भाषेला स्वतःचं अस्तित्व आहे, शैली आहे, ढंग आहे, सौंदर्य आहे.

आ. पण म्हणून आपला तो बाळ्ळ आहे हे सिद्ध करायला दुसऱ्याचं कार्टं का करावं?

इ. इंग्रजी माध्यमात शिक्षण घेणाऱ्या सर्वांना अगदी मोडीत काढून आमचा मराठीचाच झेंडा कसा उंच, हे दाखवायचा प्रयत्न हास्यास्पद वाटतो.

ई. पण इंग्रजीच्या नावानं सतत खडे फोडण्यापेक्षा आपणच आपल्या मायमराठीचं शक्य होईल त्या प्रकारे संवर्धन करायला काय हरकत आहे?

## २ शब्दांची गंमत

**क. पुढील प्रत्येक वाक्यामध्ये दोन मोकळ्या जागांसाठी समरूप शब्द शोधू या.**

(चव, दर, पळ, काढा, खार, पालक, ~~शिरा~~, भाव, सही)

उदा. म्हणे शिरा खाल्ल्याने शिरा आखडतात.

अ. तुम्ही असं करा, हा .................... प्या आणि एक झोप .................... . बरं वाटेल.

आ. एक .................... सारखी घरात येऊन नासधूस करते म्हणून तो तिच्यावर .................... खाऊन आहे.

इ. ....................भर थांब, मग पळायचे तिथे.................... .



ई. शाळेच्या सभेला अनेक .................... आले होते. शिक्षकांनी मुलांच्या आहारात मेथी, .................... इत्यादी पालेभाज्या वापरण्याचा सल्ला दिला.

उ. हे मॉलवाले ना, ....................वर्षी पार्किंगच्या तिकिटाचा .................... वाढवतात!

ऊ. केवढा .................... खातोस रे! आम्ही विचारायचं सोडून दिलं ना, की कळेल तुला तुझा ....................!

ए. नारळाचा .................... पिळून घेतला तर त्याला काही .................... राहत नाही.

ॲ. त्याने माझ्या ....................ची अगदी .................... नक्कल केली.

**ख. शब्दांचे नातलग**



खेळ खेळण्यास मजा येते हे खरं, पण नवीन खेळ तयार करणं तितकंच कठीण आहे. कल्पना करा, एक मोठं रिंगण आहे. रिंगणाभोवती हजारो प्रेक्षक उपस्थित आहेत. आरडाओरडा करत आहेत. आपल्या आवडत्या खेळाडूसाठी टाळ्या वाजवत आहेत. या सगळ्या उल्हसित करणाऱ्या वातावरणात रिंगणामध्ये दोन स्पर्धक साप-शिडी खेळत आहेत. कल्पना फारच विचित्र वाटते ना? मनाला पटतच नाही. याचं कारण काय आहे? तसं पाहिलं तर साप-शिडी हा लहान मुलांचा आवडता खेळ. हा खेळ आपण सगळे एका वयापर्यंत खेळतो. मग वय वाढल्यावर हा खेळ खेळणं आपण का सोडून देतो? जगात विश्व साप-शिडी अजिंक्यपद स्पर्धा का होत नाहीत? 'बुद्धिबळपटू'सारखंच 'साप-शिडीपटू' असं विशेषण का नसावं?

लाल रंगातील शब्द 'खेळ' ह्या एका शब्दाशी संबंधित आहेत, म्हणून त्यांना आपण ह्या शब्दाचे **'शब्दक्षेत्र'** म्हणतो.

१. काही एकाच शब्दापासून तयार झालेले आहेत. (उदा॰ खेळ, खेळण्यास, खेळाडू, खेळतो)
२. इतर एकाच शब्दाच्या आजूबाजूचे, त्याच्याशी जवळचा आणि लांबचाही संबंध असणारे आहेत. (उदा॰ रिंगण, प्रेक्षक, स्पर्धक, साप-शिडी, अजिंक्यपद, बुद्धिबळपटू)

**अ. पुढील उताऱ्यातील असा शब्द आणि त्याचे शब्दक्षेत्र शोधू या.**



जिथे आपण जागेपणी स्वप्नरंजन करतो अशी घरातली एक जागा म्हणजे बाथरूम. आपल्यातल्या सुप्त कलागुणांनाही या जागेत वाव मिळतो. हक्काचा एकांत मिळवून देणारी ही घरातली छोटीशी जागा. जिच्याशिवाय दिवस सुरू होत नाही, जिच्यातून कधी आपण दहाच मिनिटात काम आटोपून बाहेर पडतो, तर कधी तिथे अर्धा ताससुद्धा कमी वाटतो, अशा अत्यंत महत्त्वाच्या खोलीचं नियोजन आणि रचना किती कटाक्षाने केली पाहिजे! पूर्वी घरातल्या सगळ्यांसाठी एकच बाथरूम असायची. ती बेडरूमशी जोडलेली नसल्यामुळे, शौचालय, न्हाणीघर आणि तोंड धुवायला बेसिन अशा तीन स्वतंत्र जागा होत्या. आता मात्र कमी जागेत सगळेच प्रातर्विधी करण्यायोग्य अशी एकच बहुपयोगी जागा प्रत्येक बेडरूमला जोडली जाते; पण तिला म्हणतात बाथरूमच. आधुनिक मराठीत 'स्वच्छतागृह'.

बाथरूमचे, त्यातल्या क्रियांनुसार आजकाल दोन मुख्य भाग केले जातात. कोरडा भाग आणि ओला भाग. अर्थातच यांचा संबंध त्या भागात होत असलेल्या क्रियांमुळे, जमिनीशी

येणाऱ्या पाण्याच्या संपर्कावरून ठरवला आहे. म्हणजेच, दात घासणं, तोंड धुणं, दाढी करणं या क्रिया बेसिनपाशी होतात आणि शौचासाठी भारतीय संडास किंवा पाश्चात्त्य पद्धतीचा कमोड वापरला जातो. या क्रियांमध्ये जमीन पूर्ण ओली होत नाही म्हणून हा बाथरूमचा कोरडा भाग. याउलट आंघोळ करणं, कपडे धुणं या गोष्टींमुळे संपूर्ण जमीन ओली होते म्हणून हा ओला भाग. बाथरूमची कोरडी आणि ओली अशी विभागणी करणं, स्वच्छतेच्या आणि वापराच्या दृष्टीने फार गरजेचं आहे.

**ग. पुढील उताऱ्यातील चुका शोधू या आणि त्या दुरुस्त करून उतारा पुन्हा लिहू या.**



मराठित सर्वत जास्त पहिली जाणारी वहिनी म्हणजे झी मराठी! त्या खालो खाल कलर्स मराठी, स्टार प्रवह इत्यादि वहिन्यांचा नंबर लगतो. पन झी मराठि वरदा खवल्या जाणाऱ्या मालीका हा आज घराघरात आर्कषणाचा विशय आहे.

संध्या काळी सात च्यानंतर एकमागोमाग एक या मालीका प्रकशेपित केल्या जातात आणी हातातलि कामे सोडुन मजेने पहिल्याही जातात. यासर्व मराठि मालीकांचे ठरलेले विशय आहेत. त्या विशयांच्या पलिकडे त्या सहसा जाताना दिसत नाहीत.

लग्न, लग्नानंतरचे किंवा लग्ना आधीचे संबंध या अशाच विशयांच्या भोवति मालिकांचे कथनाक फिरत राहते. त्यात या मालिकांमध्ये दाखवली जाणारी पत्रे, जागा, त्यांची राहन्याची ठिकाणे याचाहि एक ठरावीक बाज आहे. आणी विरोधाभास असा, की हा बाज प्रेकशकांच्या राहनीमानापेक्षा वेगळा, त्याच्याशी संबंध नसणारा आहे.

**घ. पुढील मजकुरातून अनुस्वार गायब झाले आहेत. मजकूर दुरुस्त करू या.**

१. बाबूच्या काड्या आणि रगीत कागद वापरून तयार केलेला आकाशकदील अमनने खाबावरच्या खिळ्याला टागला.

२. प्रवाशाना स्वस्त आणि सुरक्षित प्रवासी सेवा देणाऱ्या राज्य मार्ग परिवहन महामडळाच्या गाड्याना गेल्या सहा वर्षात अनेक अपघात झाले आहेत.

३. केद्रीय वन आणि पर्यावरण मत्रालयाच्या दिरगाईमुळे एनजीटीच्या सर्व विभागीय खडपीठामध्ये गेल्या दीड वर्षापासून न्यायाधीश आणि तज्ज्ञाची नियुक्ती रखडली आहे.

४. "समाजाकडे सवेदनशील दृष्टिकोनातून पाहणारी, कमालीची कुटुबवत्सल असूनही ऑफिसच्या खुर्चीवर बसताच आत्मविश्वासाने निर्णय घेणारी, मुलासाठी हळवी होणारी, सकटाला सामोरी गेल्यानतर रणरागिणीची भूमिका घेणारी... साधारणपणे अशाच प्रकारे स्त्रियाचे वर्णन केले जाते, नाही?"

५. सगळ्या सहभागीची नावनोदणी झाल्यानतर सायकल रॅली सुरू होणार असून ती सध्याकाळी ६.३० पर्यत चालणार आहे.

## ३ क्रियापद

**क. वाक्यांच्या अर्थाप्रमाणे चौकटीतील क्रियापदांची रूपे आणि काळ ठरवू या आणि वाक्ये पूर्ण करू या.**

**अ. मन**

शकणे, लागणे, ~~इच्छिणे~~, पाहणे, देणे, धजणे, घेणे



आज मी आपणास आपल्या मनाबद्दल काही सांगू इच्छितो. कधी कधी आपण काहीही विचार न करता बोलतो. आपल्या बोलण्यानं आपण समोरच्याला दुखावू .................... हे आपल्या लक्षातच येत नाही. एकदा आपण स्वतःला हे सांगूनही ...................., पण आपलं मन उलट आपल्यालाच रागवायला ..................... आपण म्हणतो त्याला, “माझं आधी सविस्तर ऐकून तर ....................!”, पण ते काही आपल्याला पुढे बोलूच .................... नाही. म्हणून मग आपण आपल्या मनाला काहीही सांगायला .................... नाही.

**आ. धातू + आयला**

ठेवणे, ~~ओलांडणे~~, खाणे, दाखवणे, आवरणे, जेवणे

उदा. अतुल उडी मारून ओढा ओलांडायला गेला आणि पडला.

१. बहिणीचे लग्न होते म्हणून आईने घर .................... काढले.

२. कदमसाहेबांनी दात्यांना फायली टेबलावर .................... सांगितले.

३. “हे काय? मी एवढी चांगली पार्टी सोडून तुझ्याकडे .................... आले आणि तू .................... काय बनवलंस, तर कारलं!”

४. मी येणार नाही लग्नाबिग्नाला. सगळे सारखे मला नकला करून .................... सांगतात.

**इ. धातू + ऊ**

| झोपणे, देणे, ठेवणे, चालणे, जाणे | लागणे, येणे, देणे, शकणे, देणे |
|---|---|

उदा. मुलगी काही तरी वेगळे करण्याची धडपड करत असेल, तर तिला ते करू द्या.

१. “मी माझी सूटकेस इथं .................... .................... का? ट्रेनमध्ये अजून सामान आहे, ते बाहेर काढायचं आहे.”

२. “अरे किती दंगा करताय! मला थोडा वेळ शांतपणे .................... .................... का?”

३. “मला माहीत आहे, रुग्णांना भेटायची वेळ संपली आहे; पण मी फक्त हा डबा .................... ...................., .................... .................... ना मला, प्लीज.”

४. “हे बघ, मुकाट्याने .................... ...................., नाही तर मी पोलिसांना बोलावीन.”

**ई. धातू + त**

| ओरडणे, ~~धावणे~~, लोळणे, सोडवणे | जाणे, ~~सुटणे~~, पडणे, राहणे |
|---|---|

उदा. आजही मुलांना पावसात खेळायला आवडतं. पाऊस आला की ती नुसती धावत सुटतात.

१. शांत डोक्याने तुम्ही एकेक गुंता ---------- ----------, म्हणजे तुम्हाला तुमचं उत्तर नक्की सापडेल.

२. “देऊन टाका वर्गणी. मुलं चिवट आहेत. वर्गणी देईपर्यंत ती ---------- ----------.”

३. “अरे, तू अजून काय ---------- ---------- असा? आपण सिनेमाला जाणार होतो ना?”

**ख. दिलेल्या क्रियापदाचे योग्य काळातील रूप वापरून रिकाम्या जागा भरू या.**

देणे + म्हणणे, तोडणे + लागणे, ~~आणणे + लागणे~~, घेणे + लागणे,
देणे + लागणे, काढणे + लागणे, करणे + लागणे, करणे + लागणे

उदा. सुमित्राला प्यायचे पाणी दीड मैलावरून आणावे लागते.

अ. कधी कधी नियमांना बगल देऊनही कामं ---------- ----------, असा अप्रत्यक्ष टोला विरोधी पक्षाने मुख्यमंत्र्यांना दिला.

आ. विद्यापीठातील काही अभ्यासक्रमांसाठी अगोदर प्रवेश परीक्षा ---------- ----------.

इ. “एवढं मोठं कपाट आत आणायचं, तर दरवाजा ---------- ----------.”

ई. सिनेमा हाउसफुल असतो. तेव्हा तिकिटे आधीच ---------- ---------- आणि ज्ञानाला तसा फोन ---------- ----------.

उ. “यंदा घराला रंग ---------- ----------. फार खराब झालं आहे. पण त्यासाठी पंधरा दिवसांची रजा ---------- ----------. नकोच ते.”

**ग. क्रियापद-नाम + त (बोलणे + त = बोलण्यात)**

**अ. दिग्दर्शक**

(कमावणे, जाणे, सांगणे, वठवणे, बनवणे, करणे)



मला केवळ वास्तववादी चित्रपट ---------- रस आहे. आपल्या रोजच्या आयुष्याशी संबध नसलेल्या कल्पित घटनांवर आधारित कथा ---------- काय मजा आहे? मला विनोदी चित्रपट आवडतात, परंतु केवळ प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठी फालतू विनोद निर्मिती ---------- मला रस नाही. हल्लीचे कलाकारही नुसते पैसे ---------- स्वतःचा वेळ आणि स्वतःचे कौशल्य वाया घालवतात. कित्येकांना तर साधी सोपी भूमिका ---------- ही गती नसते. केवळ ते दिसायला ‘सुंदर’ आहेत म्हणून त्यांना सिनेमात घेतलं जातं. अशा कलाकारांचा माज तर अजूनच त्रासदायक असतो. आपल्यासारख्या दिग्दर्शकांनी अशा कलाकारांच्या वाटेला न ----------च शहाणपणा आहे.

**आ. वरील उताऱ्यासारखे आणखी उतारे लिहू या. खालील शब्दसमूहांचा वाक्यांत वापर करता येईल.**

रस असणे / नसणे – वेळ घालवणे / न घालवणे – मजा येणे / न येणे –
अर्थ असणे / नसणे – फायदा / शहाणपणा / मजा ... असणे - ...



१. रोहित शर्मा उत्तम अभिनेता आहे. पण फालतू चित्रपटांत काम करण्याचा त्याला आता कंटाळा आलाय. ...

(निरनिराळ्या छटा असलेल्या भूमिका वठवणे – नुसते पैसे कमावणे – नाव कमवणे – चांगल्या दिग्दर्शकांच्या हाताखाली काम करणे)

---



२. ए॰ कुट्टी एक चांगली खेळाडू आहे. अनेक राष्ट्रीय चषक तिने पटकावले आहेत. आता तिला खेळण्यात रस नाही. ...

(खेळ शिकवणे – मुख्यतः मुलींना उत्तम खेळाडू बनवणे – खास मुलींसाठी एक उत्तम स्पोर्ट्सक्लब उघडणे)

---



३. ते एक हुशार शिक्षक आहेत. निवृत्तीनंतर ...

(जगभर प्रवास करणे – चित्र काढणे – समाजकार्य करणे)

---



४. तिला राजकारणाची चांगली समज आहे, म्हणून आता ...

(नोकरी करणे – राजकारणात उतरणे – निवडणूक लढवणे – समाजासाठी चांगले काम करणे)

---

५. माझी सगळी पुस्तकं वाचून झाली. आता ...

(तुझ्याकडची पुस्तकं वाचणे – स्वतःचं एक पुस्तक लिहिणे – चांगला लेखक म्हणून नाव कमवणे)



---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

**घ. योग्य क्रियापदाचे प्रयोजक क्रियापद किंवा शक्य क्रियापद करून रिकाम्या जागा भरू या.**

(हसणे – बसणे – ~~पडणे~~ – ऐकणे – फेकणे – बघणे – राहणे – ~~सोडणे~~ – वठणे)

उदा. कित्येक वर्षांनी गावात आलो होतो, म्हणून मला काही केल्या गाव सोडवत नव्हते.

उदा. खुद्द आमदारानेच जवळ जवळ संपत आलेले पुलाचे काम बंद पाडले.

अ. "तू का मला ---------------- उगीच. मी चिडलोय खूप. शांत बस जरा."

आ. "केवढं वाईट गात होत्या त्या बाई! मला थोडा वेळही ---------------- नव्हतं तिथे, म्हणून निघून आलो."

इ. "प्रमुख पाहुणे आले की त्यांना आत घेऊन ये आणि त्यांना समोरच्या रांगेतच ----------------, कळलं?"

ई. किती पसारा झालाय! मला अगदी ---------------- नाही.

उ. कमल हासनने 'हिंदुस्तानी' सिनेमात म्हाताऱ्याची भूमिका ---------------- होती.

ऊ. "मी तुला तो काचेचा ग्लास फेक म्हणून सांगितलं होतं ना? मला तो ग्लास पुन्हा पाहायचा नाहीये या घरात. माझ्याच्यानं ---------------- नाही तो, म्हणून तुला सांगितलं होतं ना?

ए. तुझा प्रतिसाद ऐकून मी त्यांचं यू-ट्यूबवरचं भाषण ऐकावं म्हटलं, पण मला काही ---------------- नाही ते. केवढी भयंकर मतं आहेत त्यांची!

## ४ लेखन-प्रक्रिया

**क. खालील वाक्यांतील क्रियापद कसे चालते (कर्त्याप्रमाणे की कर्माप्रमाणे) ते लिहू या.**



(अ) आपल्या सर्वांना माहीतच आहे की, कोणतंही सर्जनशील लेखन 'लिही' म्हणून होत नसतं. (आ) प्रख्यात लेखक आणि नाटककार विजय तेंडुलकर यांच्याबद्दल एक किस्सा सांगितला जातो. (इ) तेंडुलकर रोज नोकरीवरून थकून-भागून घरी येत आणि डोक्यावरचं ओझं कमी करायला कागद-पेन घेऊन बसत. चार पानं खरडत. (ई) त्यांचे मित्र आणि दिग्दर्शक अरविंद देशपांडे यांना ती दाखवत. (उ) एकदा असंच त्यांनी लिहिलेलं अपूर्ण नाटक वाचल्यावर देशपांडेंनी विचारलं, "पुढे काय होतं?" तेंडुलकर म्हणाले, "मलाच माहीत नाही."

(ऊ) दिवसामागून दिवस गेले. (ए) मग एक शुभदिन उगवला. (ॲ) विलेपार्ले स्थानकावरून घरी परतताना एका ओळखीच्या गृहस्थाने तेंडुलकरांना तिथल्या एका हॉलचा पत्ता विचारला.

(ऐ) ते आणि त्यांच्याबरोबरची माणसे त्या हॉलमध्ये अभिरूप न्यायसभेचा खेळ खेळणार होते. (ओ) बस्स! तापलेल्या जमिनीत नाटकाचं बीज पडलं. आता त्याला फक्त खत-पाणी घातलं की नाटक उगवणार. (ऑ) आणि अशा तऱ्हेने पहिला अंक लिहून झाला. (औ) 'शांतता कोर्ट चालू आहे!' या नावाचं हे नाटक जगप्रसिद्ध आहे.

अ. ..............................

आ. ..............................

इ. ..............................

ई. ..............................

उ. ..............................

ऊ. ..............................

ए. ..............................

ॲ. ..............................

ऐ. ..............................

ओ. ..............................

ऑ. ..............................

औ. ..............................

**ख. पुढे दिलेल्या वाक्यांपैकी काही वाक्ये अपुरी वाटतात, कारण त्यांच्या क्रियापदांना कर्माची गरज आहे. अशी वाक्ये शोधू या. खाली दिलेल्या शब्दांमध्ये वापरण्याजोगे कर्म सापडले, तर त्याचा उपयोग करून ती वाक्ये पूर्ण करू या आणि मोकळ्या जागेत लिहू या.**

फारसे काही पावती मेंदी
काय आई रांगोळी कॉफी





अ. श्रुती परदेशात रोज आठवण काढते. ..............................

आ. ही गाडी सौरऊर्जेवर चालते. ..............................

इ. काल पाटणा एक्स्प्रेस रुळावरून घसरली. ..............................

ई. आज मी चहा नाही, पिणार आहे. ..............................

उ. शेख यांची मांजर रात्रभर ओरडत होती. ..............................

ऊ. लोक म्हणतील हे त्यांना कळत नव्हते. ..............................

ए. "काही तरी झालं असणार. तो आला आणि न बोलताच गेला." ..............................

ॲ. दिशाने इतकी सुंदर काढली! ..............................

ऐ. बडवेकाकूंनी स्वतः केसांना लावली. ..............................

ओ. "हे काय? तुम्ही मला मी भरलेल्या पैशांची दिलीच नाही! ..............................

**ग. पुढे एक कर्म आणि त्याखाली दोन वाक्ये दिली आहेत. दोनपैकी एकाच वाक्यात ते कर्म वापरता येईल. त्याचा योग्य वाक्यात उपयोग करून ते वाक्य रिकाम्या जागेत लिहू या.**

**अ. फरश्या**

१. बिल्डरने काही चांगले काम केलेले नाही सोसायटीचे. हे बघा, कुत्र्यांनी कशा उखडल्या आहेत ते!

२. एवढं काय हो रागावलात मुलींना? बघा, मुली कशा उखडल्या आहेत.

------------------------------------------------------------



**आ. दिवा**

१. काय प्रेमात पडलास की काय? चेहरा चांगलाच उजळलाय तो!

२. अंधार पडू लागताच मधुरा सगळे उजळते.

------------------------------------------------------------



**इ. जीभ**

१. ती मांजर फार चमत्कारिक आहे. काल मी तिच्याजवळ गेलो तर उगीच फिस्कारली आणि मला चावली.

२. आपण केलेल्या भ्रष्टाचारांची यादी ऐकून त्या नेत्याने पत्रकारांसमोर चावली.

------------------------------------------------------------



**ई. पुस्तकाची पाने**

१. लक्ष्मण घाईघाईने उलटतो.

२. कोर्टात साक्ष देताना ऐन वेळी श्रीधर उलटतो.

------------------------------------------------------------



**उ. पान**

१. एक राजा असतो. तो रोज एका रोपट्याला पाणी घालतो. थोड्याच दिवसांत ते रोपटे चांगलेच वाढते.

२. वैभवचं काम एक वाजता सुरू होतं, म्हणून त्याची बायको बारा वाजताच त्याचं वाढते.

------------------------------------------------------------



**ऊ. पापड**

१. त्या अपघातात मी वीस टक्के भाजले होते.

२. मी चांगले टोपलीभर भाजले होते.

------------------------------------------------------------



**ए. पुस्तक**



१. मी वेळेवर मदतीला धावले म्हणून तुमचे मित्र वाचले हे ध्यानात ठेवा.
२. हो, बघ ना! एका दिवसात त्याने पूर्ण वाचले!

---------------------------------------------------------------

**ॲ. डबा**



१. तिचं लक्ष कुठं असतं काय की! शाळेत नेहमी हरवते.
२. तिचं लक्ष कुठं असतं काय की! शाळेत वर्ग चालू असताना नेहमी हरवते.

---------------------------------------------------------------

## ५ जो / जे, तो / ते...

**क. पुढे दिलेल्या वाक्यांत काही अधोरेखित पर्याय दिले आहेत. अर्थाच्या दृष्टीने एकच पर्याय अचूक आहे. तो पर्याय रिकाम्या जागेत लिहू या.**

उदा॰ गाळसुळकर यांच्या घरात रोज खूप अन्न उरतं. जरी त्यातलं निम्मं रोज गरजूंना वाटलं / त्यातलं निम्मं रोज जरी गरजूंना वाटलं / त्यातलं निम्मं जरी रोज गरजूंना वाटलं / त्यातलं जरी निम्मं रोज गरजूंना वाटलं, तरी दुसऱ्या दिवशी त्यांना स्वयंपाक करावा लागणार नाही.
उत्तर : त्यातलं निम्मं जरी रोज गरजूंना वाटलं,...

अ. अनुष्का एकंदरीत वेळेची फार पक्की आहे. कोणाला किंचित यायला उशीर जरी झाला / कोणाला यायला जरी उशीर किंचित झाला / कोणाला यायला किंचित जरी उशीर झाला, तरी तिचा पारा जाम चढतो.

---------------------------------------------------------------

आ. आमचं घर तसं लहान आहे. एखादा कार्यक्रम असला आणि नेहमीपेक्षा थोडे जरी जास्त पाहुणे आले / जरी थोडे जास्त नेहमीपेक्षा पाहुणे आले, तरी जागा अपुरी पडते.

---------------------------------------------------------------

इ. या सिनेमात गाण्यांची गर्दी अंमळ जास्तच आहे. आणखी जरी गाणं एक वाढवलं / एक आणखी जरी गाणं वाढवलं / आणखी एक जरी गाणं वाढवलं, तरी मुख्य कथानकासाठी जागाच शिल्लक राहणार नाही.

---------------------------------------------------------------

ई. या भाजीमध्ये लिंबाचा रस घालण्याची पद्धत आहे. थोडा त्याऐवजी जरी चिंचेचा कोळ घातला / जरी थोडा चिंचेचा त्याऐवजी कोळ घातला / त्याऐवजी थोडा चिंचेचा कोळ जरी घातला, तरी चांगली चव येते.

---------------------------------------------------------------

उ. नाटकाचं सगळं नेपथ्य सतीशला एकट्यानंच करायला आवडतं. एखादी कोणी जरी कल्पना चुकून सुचवली / कोणी चुकून कल्पना जरी एखादी सुचवली / कोणी चुकून एखादी जरी कल्पना सुचवली, तरी त्याला आवडत नाही.

-----------------------------------------------------------------------

ऊ. बसमध्ये आता नुसतं उभं राहायलाही जागाच उरलेली नाही. जरी एक आता माणूस आला / एक आता माणूस आला जरी / आता एक जरी माणूस आला, तरी बस एका बाजूला कलंडेल.



-----------------------------------------------------------------------

**ख. 'तर' आणि 'तरी' ह्या शब्दांचा योग्य अर्थाने उपयोग करून पुढील उतारे पूर्ण करू या.**

१. **फी-वाढ**

फी-वाढीच्या मुद्द्यावरून एवढे रामायण झाले, ---------- सरकारला जाग येण्याची चिन्हे नाहीत. ---------- बरे, कोणत्याही राजकीय पक्षाने अद्याप ---------- ह्या आंदोलनात शिरकाव केलेला नाही. उद्या तसे झाले, ---------- सरकारला पळता भुई थोडी होईल. विद्यार्थी अवाजवी मागण्या ---------- करत नाहीत ना? मग किमान चर्चा करण्याचा समजूतदारपणा ---------- सरकारने दाखवावा. इतर बलवान संघटना जेव्हा आक्रमक होतात, तेव्हा त्यांनी संपाची नुसती धमकी दिली ---------- सरकारची तारांबळ उडते. विद्यार्थ्यांनी चिडून ह्या संघटनांकडे धाव घेतली, ---------- सरकारला ते केवढ्याला पडेल?

२. **आजी-आजोबा**



**आजोबा** : काय गं, आज ---------- येणार आहे का नयन मदतीला?

**आजी** : कोणास ठाऊक! येते असं म्हणाली ---------- आहे. पण तुला माहितीय ना तिचा स्वभाव! खरंच, आज आली ---------- बरं होईल. हाताशी मदतीला कोणी नाही; आणि असलं, ---------- दुसऱ्याला त्रास का म्हणून द्यायचा?

**आजोबा** : ---------- मी म्हणत होतो तुला, कशाला उगीच सगळ्या कामाची जबाबदारी घेतलीस? काही वेडंवाकडं झालं तब्येतीचं, ---------- कोण निस्तरणार आहे? माझं ---------- वय राहिलंय का धावाधाव करण्याचं? पण माझं ऐकशील ---------- ना!

३. **राजा आणि मंत्री**

राज्याच्या अनेक मंत्र्यांनी नियमांची पायमल्ली करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांना अभय दिलं आहे, असा ठपका उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने ठेवला आहे. ---------- ही राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी अद्याप ह्या मंत्र्यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी केलेली नाही. या सरकारला जनाची नाही ---------- मनाची ---------- लाज वाटते का, असा परखड सवाल करून त्या मंत्र्यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्याची मागणी विरोधी पक्षनेत्यांनी केली आहे.

## ६ तुलना

**क. रिकाम्या जागी योग्य तुलनादर्शक शब्द लिहू या.**

(त्याच्याइतकी, जणू, एकाच, इतके, तसाच, जसा, तसतशी, जशा, तस्साच, ज्याप्रमाणे, त्या प्रकारे)

अ. मी आणि माझी चुलतबहीण .................... वयाचे आहोत.

आ. हा शिरा आजी .................... करते ना, तसा दुसऱ्या कोणालाही करता येत नाही.

इ. “मी सांगितलेल्या सूचना नीट लक्षात ठेव आणि .................... पेपर सोडव. कळलं?”

ई. हल्ली सिनेमात .................... नायक नायिकेचा अनादर करतो, त्याचप्रमाणे तरुण मुले मुलींचा अनादर करू लागली आहेत.

उ. आरती ज्या प्रकारे ही कविता समजावून सांगते, .................... दुसऱ्या कोणालाही सांगता येणार नाही.

ऊ. माझा भाऊ फार सुंदर रांगोळी काढतो. आमच्या अख्ख्या कुटुंबात .................... सुंदर रांगोळी कोणीच काढू शकत नाही.

ए. मुहूर्त जसजसा जवळ येऊ लागला .................... पाहुण्यांची गर्दी वाढू लागली.

ॲ. मन्या जेवणावर असा तुटून पडतो, .................... उद्याचा दिवस उगवणारच नाही आहे.

ऐ. .................... शासनाच्या जबाबदाऱ्या आहेत, तशा नागरिकांच्याही काही जबाबदाऱ्या असतात.

ओ. उन्हाळ्यात गच्चीवर झोपण्या.................... सुख कशात नसते.

ऑ. इतक्या वर्षांनंतरही बाबीचा विनोदी स्वभाव अगदी .................... आहे.

## ७ क्रमसूचक शब्द

**पुढे काही आकडे दिले आहेत. उदाहरणाप्रमाणे रिकाम्या जागा भरू या.**

उदा. **आकडा – १**

नोकरीसाठी केवळ परीक्षेत पहिला क्रमांक मिळून उपयोग नसतो. हल्ली काही कंपन्या नोकरी देण्याआधी तुम्हाला काही गेम्स खेळायला लावतात. त्यात ते प्रथम हे पाहतात की, तुमच्याकडे खिलाडू वृत्ती आहे की नाही? मग तुमच्या पहिल्या आणि तीन तासांनंतरच्या प्रतिसादांवरून तुमच्या वर्तणुकीत काही नकारात्मक बदल झाले का ह्याचा अंदाज घेतात.

१

**क. आकडा – २०**

आज त्यांच्या मैत्रीला एकूण .................... वर्षे झालीयेत. गंमत म्हणजे वयाच्या .................... वर्षीच त्यांची प्रथम भेट झाली होती. त्यांच्या मैत्रीच्या ह्या .................... वाढदिवशी इतर .................... मित्र-मैत्रिणींना घेऊन एखाद्या मस्त ठिकाणी फिरायला जाण्याचा बेत आखलाय.

२०

**ख. आकडा – ५०**

उद्या ह्या शाळेला .................... वर्षे पूर्ण होतील. आणि कमाल बघ, .................... वर्षाची विद्यार्थ्यांची .................... तुकडीसुद्धा नेमकी .................... विद्यार्थ्यांची!

५०

**ग. आकडा – ५**

हे बघ, एकूण .................... खुर्च्या रिकाम्या सोडायच्या आहेत. .................... रांगेतली डावीकडून .................... खुर्ची आहे ना, त्या .................... खुर्चीनंतरच्या खुर्च्या रिकाम्या सोडायच्या आहेत. नाटकातला .................... प्रवेश आम्ही तिथूनच करणार आहोत.

५

## ८ वाक्यरचना



पिंट्या नेहमी दात घासतो तेव्हा ब्रश तोंडात ठेवतो आणि घरभर फिरत राहतो. हे त्याच्या आईला मुळीच आवडत नाही. ती म्हणते, बेसिनसमोरच दात घासावेत. तेव्हाच हलायचं कशाला? जिवाची एवढी कसली चुळबुळ! पिंट्याला मात्र सकाळी सकाळी बेसिनवरच्या आरशात स्वतःचा चेहरा दिसतो, ते आवडत नाही. एकूणच स्वतःचा कुरूप चेहरा पाहायचा कशाला? शक्यतो नकोच! म्हणून तो फोटोसाठी उभं राहणंही शक्यतो टाळतो.

**हाच उतारा असाही लिहिता येईल :**

पिंट्याचं नेहमी दात घासताना ब्रश तोंडात ठेवून घरभर फिरणं त्याच्या आईला मुळीच आवडत नाही. ती म्हणते, बेसिनसमोर दात घासताना हलायचं कशाला? जिवाची एवढी कसली चुळबूळ! पिंट्याला मात्र एकूणच सकाळी सकाळी बेसिनवरच्या आरशात स्वतःचा कुरूप चेहरा पाहणं आवडत नाही. म्हणून कोणी फोटो काढतानासुद्धा तो उभं राहणं शक्यतो टाळतो.

**आता आपण एकेक उदाहरण घेऊन पाहू या :**

काल तुम्हाला एक फोन आला. तो फोन माझा होता.

**ही दोन्ही वाक्ये अशा प्रकारे जोडता येऊ शकतील :**

काल तुम्हाला जो फोन आला, तो माझा होता. / काल तुम्हाला आलेला फोन माझा होता. / काल तुम्हाला माझाच फोन आला होता.

वाक्ये लहानलहान, सोपी असतात; त्याचप्रमाणे लहान वाक्ये एकमेकांशी जोडून तयार झालेली लांब, गुंतागुंतीची, अगदी पल्लेदार वाक्येही असतात. अशीच वाक्ये अधिक चांगली आणि तशी वाक्ये कमी चांगली, असे काही नसते. दोन्हींचे आपापले सौंदर्य असते, छानपणा असतो आणि तो लिहिणाऱ्यावर अवलंबून असतो. एखाद्याला सोपी शैली चांगल्या रीतीने हाताळता येते, तर दुसऱ्याला गुंतागुंतीच्या, वजनदार रचना जास्त कौशल्याने पेलता येतात. आपण दोन्ही प्रकारांची ओळख करून घ्यावी, म्हणजे आपल्याला वाचनातील आनंद मिळेल आणि लिहिण्यातील आपली शैली कोणती ते ठरवता येईल.

वरील दोन उताऱ्यांपैकी पहिल्यातील वाक्ये लहान आणि सुटी आहेत. दुसऱ्या उताऱ्यात तीच वाक्ये एकमेकांशी जोडलेली आहेत. ती कशा प्रकारे जोडली आहेत ते ठळक करून दाखवले आहे. हे करताना काही वेळा वाक्ये पुढेमागेही केली आहेत.

एरवी बायकोला वचकून असतो सागर. आज मात्र तो तितकासा धास्तावलेला नव्हता.

**ही दोन्ही वाक्ये अशा प्रकारे जोडता येऊ शकतील :**

एरवी बायकोला वचकून असलेला सागर आज मात्र तितकासा धास्तावलेला नव्हता.

**क. पुढे दिलेली वाक्ये जितक्या प्रकारे जोडता येतील तितक्या प्रकारे जोडू या. 'आणि', 'व' अशी उभयान्वयी अव्यये वापरण्याची परवानगी नाही.**

अ. **दासवानी** सोसायटीचा सेक्रेटरी आहे. **त्याच्या** घरासमोर गेले काही दिवस कोणी तरी शेण टाकतोय. आज **त्याबाबत** मीटिंग आहे.

आ. तिच्या वडिलांचा भाऊ शोभेल **तो चोर. त्याच्याशी** तिचा काहीच संबंध नव्हता.

इ. **तो रस्ता** सांगलीला जातो. **तो रस्ता** टोल-नाक्याच्या अलीकडे आहे.




ई. आपल्याला **एखादी आठवण** नको असते. **ती** मनातून पूर्णपणे **पुसून टाकावी, अशी इच्छा** होतेच.

उ. साधं झुरळ मारायचं म्हटलं, तरी **संतोषच्या** जिवावर येतं. **असा हा संतोष** आज चक्क गुंडांशी भिडला?

**ख. पुढे दिलेली वाक्ये जोडलेलीच आहेत. ती सुटी करून वेगवेगळी लिहू या. एखाद्या वाक्याची दोनपेक्षा अधिक वाक्येही होतील.**

अ. ज्याने ह्या लेखात माझ्यावर खोटी टीका केली आहे, त्या पत्रकाराचा नंबर मला ताबडतोब हवा आहे.

आ. ज्यांना सहलीला जायचे आहे आणि ज्यांनी अजून पैसे भरलेले नाहीत, त्या विद्यार्थ्यांनी त्वरित संपर्क साधावा.

इ. जो सुती कुर्ता छत्तीसगडचा आहे, तो वीस वर्षे वापरूनही तसाच टवटवीत आहे.

ई. मी ज्यांच्याबद्दल बोललो होतो, ते हेच लेखक आहेत.

उ. ब्रह्मेंना जिथे जायचे होते, त्या गावात एक सुंदर नदी होती.

ऊ. ज्या टेबलावर निळ्या रंगाचा दिवा आहे, त्यावर मी तुझी पुस्तकं ठेवली आहेत.



ए. पुढच्या आठवड्यात होणार असलेलं व्याख्यान आता उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर होईल.

ॲ. ज्याच्यामुळे आमचा मुलगा बिघडला आहे, तो राघवेंद्र तुमचा भाचा आहे.

ऐ. मी काश्मीरला जाईन, तेव्हा तिथून तुझ्यासाठी मऊ रजई घेऊन येईन.



## ९ क्रियापद-नाम

**क. नामाऐवजी क्रियापद वापरून वाक्ये परत लिहू या.**

उदा. पर्यावरणाचा विचार न करता बेजबाबदार लोक ह्या जंगलांची तोड करत आहेत.
पर्यावरणाचा विचार न करता बेजबाबदार लोक ही जंगले तोडत आहेत.



अ. पीक तयार झाले की कापणीच्या वेळी बऱ्याच मजुरांची गरज पडेल.

आ. योग्य वेळी औषधांची फवारणी झाली असती, तर पिकावर कीड पडली नसती.

इ. पेरणीसाठी चांगल्या प्रतीचे बियाणे वापरले तर पीकही चांगलेच येते.

ई. पिकाची चांगली वाढ झाली, की होणारा आनंद वेगळाच असतो.



उ. चांगली वाढ झालेले पीक शेतकरी जिवापाड जपतो.

ऊ. वर्षभर केवळ शेतीकाम करून शेतकऱ्यांनाही कंटाळा येत असेल ना?

ए. तयार पिकाची मळणी आणि झोडणी करण्यासाठी आता यंत्रांचा वापर करतात.

---

ॲ. शेताची नांगरणी करायला तू नांगर वापरतोस की ट्रॅक्टर?

---



**ख. क्रियापदाऐवजी नाम + क्रियापद जोडी वापरून वाक्ये परत लिहू या.**

(ठराव होणे, झगडा देणे, स्थापना करणे, संताप येणे, वेढा घालणे, ~~रचना करणे~~, टिकाव धरणे)

उदा० हे सुंदर काव्य कोणी रचले आहे, हे माहीत आहे का तुला?
ह्या सुंदर काव्याची रचना कोणी केली आहे, हे माहीत आहे का तुला?

अ. दीडशे वर्षांपूर्वी इथल्या त्या वेळच्या राजाने ही शाळा स्थापन केली.

---

आ. गेल्या दीडशे वर्षांत आलेल्या अनेक नैसर्गिक आपत्तींना तोंड देत ही इमारत अजूनही टिकली आहे.

---

इ. आजूबाजूच्या अनेक उंच इमारतींनी ह्या बैठ्या इमारतीला वेढले आहे.

---

ई. ही जुनी इमारत पाडण्याचा प्रस्ताव येताच गावकरी खूपच संतापले.

---

उ. ह्या प्रस्तावाच्या विरोधात गावकरी खूप झगडले.

---

ऊ. शेवटी ही इमारत तशीच ठेवायचे ठरले.

---

**ग. क्रियापद आणि नाम**

**दोन विद्यार्थी पुढे येतील. एका विद्यार्थ्याने चिठ्ठीत मिळालेल्या नामासाठी दोन ते तीन क्रियापदे द्यायची; दुसऱ्या विद्यार्थ्याने त्या क्रियापदांशी सुसंगत असे एक नाम सांगायचे.**



उदा० चिठ्ठीतला शब्द : डोळे
विद्यार्थी १ : बघणे, दिसणे, पाहणे
विद्यार्थी २ : डोळे, चष्मा...

**चिठ्ठीतले इतर शब्द :** शिक्षक, विद्यार्थी, नायक, नायिका, पुस्तक, पाय, नाक, स्वयंपाक, झाड, फूल, दूध, पाऊस, वारा, सूर्य, राग, आनंद, झोप, वेड ...

# खेळ आणि आरोग्य

१



## चला, शिकू या ...

- खेळाशी संबंधित शब्द जाणून घेणे
- व्याकरण : धातुसाधित क्रियाविशेषणे समजून घेणे - उदा॰ उठल्याबसल्या, पडल्या पडल्या
- प्रयोग - उजळणी करणे
- महाराष्ट्रातील विविध खेळांविषयी माहिती घेणे
- खेळ, व्यायाम आणि योगासने ह्यांचे वाढते महत्त्व जाणून घेणे
- केले पाहिजे, करायला पाहिजे, करायला हवे ह्यातील फरक समजून घेणे
- खेळ आणि दुखापतींबद्दल बोलणे
- संधी ओळखणे आणि करणे
- प्रसिद्ध खेळाडूंची माहिती घेणे

## १ चला खेळू या.




वर्गातील एक विद्यार्थी किंवा विद्यार्थिनी मनात कोणताही एक प्रसिद्ध खेळ धरेल. वर्गातील इतर विद्यार्थ्यांनी तिला / त्याला हो किंवा नाही असे उत्तर देता येईल असेच प्रश्न विचारायचे आहेत आणि उत्तरांवरून खेळ ओळखायचा आहे. सर्व विद्यार्थी मिळून जास्तीत जास्त आठ प्रश्न विचारू शकतील.

उदा० हा मैदानी खेळ आहे का? ह्यात बरेच खेळाडू एका वेळी मैदानात असतात का? हा खेळ फक्त दिवसाच खेळतात का? वगैरे.

## २ दोन घडीचा डाव, याला जीवन ऐसे नाव ...

तशी ही गोष्ट जुनी नाही आहे, पण थोड्याच अवधीमध्ये तिची मुळे खोल रुजलेली दिसत आहेत. ती गोष्ट म्हणजे 'खेळ' ह्या नैसर्गिक आणि जीवनावश्यक व्यवहाराची भारतीय समाजाने घेतलेली धास्ती. 'वेळ ही फार किमती गोष्ट असते. ती माणसाने – विशेषतः शहाण्या, विचारी, गंभीर प्रकृतीच्या माणसाने – सतत सत्कारणी लावली पाहिजे. ह्या उदात्त कार्यामध्ये बाधा आणणारी प्रत्येक गोष्ट दहा हात दूर ठेवली पाहिजे. तसे वळण मुलांना लहान वयापासूनच लावले पाहिजे. खेळ खेळणे ही अशीच एक बाधक गोष्ट आहे; खेळण्यात वेळ वाया जातो; मग समाजाचे आणि राष्ट्राचेही नुकसान होते,' हा समज भारतीय समाजाने नक्की कधीपासून करून घेतला असावा, हे सांगणे कठीण आहे.

वास्तविक, खेळाकडे फार व्यापक दृष्टीने पाहण्याची आमची परंपरा आहे. ह्या अफाट विश्वाचा पसारा म्हणजे विश्वाच्या निर्मात्याने मांडलेला भव्य खेळ आहे, असे ही परंपरा मानते. जन्म आणि



मृत्यू ह्या घटनांदरम्यान आयुष्य नावाचे जे काही असते, तोही एक खेळच असतो. त्या खेळाची सारी सूत्रे त्या निर्मात्याच्याच हाती असतात, म्हणून त्याला 'खेळिया' म्हटले जाते. हा खेळिया हातातील सूत्रे जशी हलवेल, तसे मानवासह सर्व सजीवांचे आयुष्य घडत-बिघडत जाते; वेगवेगळी वळणे घेत जाते; आणि कुठल्या तरी क्षणी प्रत्येक सजीवाचा डाव संपतो. आयुष्याच्या क्रीडांगणावरून तो बाहेर होतो. बाद! इथे कुणीच नाबाद राहत नाही. कुणाची खेळी छोटी असते, कुणाची मोठी; पण बाद होणे कुणालाच टाळता येत नाही. तरीही, खेळावे हे लागतेच. त्यातून सुटता येत नाही.

**क. जोड्या लावू या**

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | तो डाव | १ | आऊट होणे |
| आ. | ते आयुष्य | २ | ती अडचण |
| इ. | ती बाधा | ३ | ते जीवन |
| ई. | ती धास्ती | ४ | ते नुकसान |
| उ. | तो तोटा | ५ | ती पाळी / ते राज्य |
| ऊ. | बाद होणे | ६ | ते दडपण |



कल्पनेचे खेळ खेळून मानवानेच निर्माण केलेले पुराणांमधील देवही खेळ खेळणारे असतात. शंकर हा देवांचा देव, महादेव. रागीट पण भोळा. तो निर्मिती करतो तसाच विनाशही करतो. त्यातून वेळ काढून पत्नीबरोबर सारीपाट खेळण्यात रमतो आणि खेळता खेळता साऱ्या विश्वाचा कारभार बघतो. रसिक आणि खट्याळ श्रीकृष्ण आपल्या खेळगड्यांना जमवून दहीहंडी, रंगपंचमी, झिम्मा-फुगडी, चेंडूफळीपासून रासलीलेपर्यंत तऱ्हेतऱ्हेचे खेळ खेळण्यात दंग असतो.

खुळखुळ येळंबाची जाळी । कृष्ण खेळे चेंडूफळी<br>
तिथनं चेंडू झुगारिला । गेला राहीच्या वाड्याला<br>
अगं अगं राही । गवळ्याचे बाई<br>
कृष्णाची चेंडूफळी । दे गं बाई



देवालाही असे खेळात रमताना आणि चेंडूमागे धावताना पाहून आपल्या आयुष्याकडे खेळकरपणे पाहण्याचे बळ माणसाला मिळत असावे. जगण्यासाठी श्रमणाऱ्या जनमनाची करमणूक करणारे सगळे 'खेळ'च असतात आणि तो खेळ दाखवणारे 'खेळकरी' असतात. नाटक, तमाशा, बहुरूपी, दशावतार, अगदी चित्रपटही 'खेळ' असतो. 'आजचा खेळ हाऊसफुल्ल' अशी पाटी झळकलेली पाहण्यासाठी प्रत्येक नाटक-चित्रपटवाला खेळकरी आसुसलेला असतो. इथे राजकारण बुद्धिबळाच्या खेळासारखे 'खेळले' जाते; इतकेच नव्हे, तर युद्धसुद्धा 'खेळायचे' असते. त्यामुळे घरकाम करणाऱ्या एखाद्या बाईंच्या तोंडून 'रोज सकाळच्या च्यावरनं सासू माज्यासंगं भांडण खेळते', असे वाक्य सहज येते.

एवढे सगळे सांगण्यामागील उद्देश असा, की मोकळ्या हवेतील मैदानी खेळ असोत की एका जागी बसून खेळण्याचे बैठे खेळ असोत; खेळणे, खेळवणे, खेळी करणे, डाव उलटवणे, डाव फिरवणे, डावपेच आखणे हे सारे भारतीय समाजाला अजिबात नवे नाही. जिथे स्पर्धा आणि हार-जीत असते, डाव-प्रतिडाव असतात, अटीतटी आणि ईर्ष्या असते, मनसोक्त आनंद, उल्हास आणि जगण्यावरचे प्रेम असते, तिथे खेळ असतोच.
पण मग ह्या सगळ्याची धास्ती का वाटावी?

**ख. वर्तुळातील योग्य प्रतिशब्द शोधून डावीकडील रकान्यात लिहू या.**

| | |
|---|---|
| | कोपिष्ट / संतापी |
| | फेकणे |
| | रमणे |
| | तो नाश |
| | एखाद्याची खेळी वापरून त्याच्यावरच मात करणे |
| | भाबडा |
| | उत्सुक असणे |
| | हरत असताना अचानक जिंकण्याच्या स्थितीत येणे |

रागीट, भोळा, तो विध्वंस, दंग असणे, झुगारणे, आसुसलेला असणे, डाव उलटवणे, डाव फिरवणे

**ग. नाम-क्रियापद जोडी आणि त्यांचे अर्थ ह्यांच्या जोड्या लावू या.**

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | मुळे रुजणे | १ | चांगली सवय आणि शिस्त लावणे |
| आ. | सत्कारणी लावणे | २ | दिशा बदलणे; वेगळ्या दिशेने जाणे |
| इ. | बाधा आणणे | ३ | खूप कामात असतानाही एखाद्या गोष्टीसाठी मुद्दाम सवड काढणे |
| ई. | वळण लावणे | ४ | परक्या ठिकाणी जाऊन हळूहळू तिथलेच होऊन राहणे; नव्या वातावरणाशी जुळवून घेत टिकून राहणे |
| ए. | वळण घेणे | ५ | चांगल्या कामासाठी आणि चांगल्या प्रकारे उपयोग करणे |
| ॲ. | खेळ मांडणे | ६ | नियोजनपूर्वक कामे करून घेणे |
| ऐ. | सूत्रे हलवणे | ७ | खेळ, नाटक अशासारख्या गोष्टीचे आयोजन करणे |
| ओ. | बाद होणे | ८ | संस्थेचे काम चालवणे; व्यवस्थापन करणे |
| ऑ. | वेळ काढणे | ९ | अडथळा निर्माण करणे; एखादे काम नीट होऊ न देणे |
| औ. | कारभार बघणे | १० | खेळाडूला खेळातून बाहेर जावे लागणे |

शब्दसंपदा

**घ. वरीलपैकी योग्य ती नाम-क्रियापद जोडी वापरून वाक्ये पूर्ण करू या.**

अ. ब्रिटिश राजवटीमध्ये अनेक परदेशी खेळांची भारतात आयात झाली. पण इथल्या मातीत खोल मुळे रुजली ती क्रिकेटचीच.

आ. आम्हाला लहान वयातच घरच्यांनी व्यायामाचे .................... .................... असते, तर पुढे आरोग्याचे अनेक प्रश्न टाळता आले असते.

इ. परमजितने जपानला जाऊन टेनिसचे प्रशिक्षण घेतले आणि मिळालेली शिष्यवृत्ती .................... .....................



ई. केदार गंमत म्हणून फुटबॉल खेळायचा. पण एकदा मित्रांच्या आग्रहामुळे एका महत्त्वाच्या सामन्यात तो खेळला आणि त्याच्या आयुष्याने वेगळेच .................... .....................

उ. क्रीडा अकादमीच्या संचालकांनी राजीनामा दिल्यामुळे सध्या उपसंचालकच अकादमीचा .................... .................... .....................

ऊ. खांदा दुखावल्यामुळे कर्णधार तंबूत परतला, पण तिथूनच त्याने सामन्याची .................... .....................

ए. अंतिम फेरीत पोहोचण्याची स्वप्ने पाहणारा गेल्या वर्षीचा विजेता संघ पहिल्या फेरीतच .................... .....................

ॲ. सामन्यांच्या भरगच्च वेळापत्रकातूनही हे खेळाडू जाहिराती करण्यासाठी .................... ...................., म्हणजे कमाल आहे.

ऐ. एक विलासी आणि क्रीडाप्रेमी बादशहा खरेखुरे हत्ती, घोडे, उंट, सैनिक घेऊन मैदानात बुद्धिबळाचा .................... .................... .....................



ओ. सायरा मल्लखांबाचा अगदी नियमित सराव करते. त्यात .................... .................... कोणतेही उद्योग तिचे अब्बा तिला करू देत नाहीत.

## ३ खेळाची धास्ती? कशामुळे?



समाजस्थितीमध्ये सुधारणा करण्याकरता ज्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले, अशा व्यक्तींमध्ये गोपाळ गणेश आगरकर ह्यांचे नाव आजही आवर्जून घेतले जाते. १८९३ साली लिहिलेल्या एका लेखामध्ये त्यांनी भारतात 'खेळ' ह्या विषयाकडे होत असलेल्या दुर्लक्षाबद्दल चिंता व्यक्त केली आहे. त्यात मांडलेले काही मुख्य मुद्दे असे :

- कोणत्याही देशातील लोकांना शरीराला व्यायाम होईल असे खेळ खेळण्याची जर हौस असेल आणि तसे खेळ खेळणाऱ्यांची संख्या जर मोठी असेल, तर त्या देशाची एकूण स्थिती चांगली आहे असा त्याचा अर्थ होतो. कारण रोजच्या जेवणाची चिंता ज्याला नसते,

अशा सुखवस्तू माणसालाच व्यायामासाठी खेळण्याची हौस वाटते. अनेक शतकांच्या पारतंत्र्यामुळे भारतीयांची शक्ती कमी झालेली आहे. त्यांच्यातील मैदानी खेळांची आवड आणि आवश्यकता नाहीशी झाली आहेच, पण बैठ्या खेळांमधील उत्साहसुद्धा विरळ होत आहे ह्याचे फार वाईट वाटते. इंग्रजी राज्य आणि पाश्चिमात्य विद्या ह्यांचे जे काही वाईट परिणाम आमच्या देशावर झाले आहेत, त्यांपैकी हा एक आहे असे म्हणावे लागेल.

- परंतु आजचे सरकार आपल्याला त्यांची विद्या, कला, राज्यकारभार वगैरे शिकवतही आहे. त्याचा आपण उपयोग करून घेतला पाहिजे. आपली कमकुवत मानसिक आणि शारीरिक स्थिती सुधारेल असे आपले वागणे असले पाहिजे. ह्याचा अर्थ मरेमरेपर्यंत शारीरिक व मानसिक कष्ट करावेत असा नव्हे. मनाला उल्हास वाटेल, शरीर अधिक कार्यक्षम होईल असे वागले पाहिजे. नाना प्रकारचे खेळ खेळले पाहिजेत. सण-समारंभ उत्साहाने साजरे केले पाहिजेत.
- पण आजकाल बघावे तो गृहस्थ वेदान्ती झाला आहे. 'हे पोरकटपणाचे आहे', 'ते आचरटपणाचे आहे,' 'हे शिकलेल्या लोकांसाठी उपयोगी नाही' असे तो म्हणत असतो. त्यामुळे सोंगट्या, फासे, बुद्धिबळ, गंजिफा वगैरे बैठ्या खेळांचाही लोप झाला आहे. जो तो 'अभ्यास-अभ्यास, बुक-बुक व काम-काम' करू लागला आहे. अशा प्रकारे केवळ कामात गुंतणे अपायकारक असते आणि त्याने आयुष्य क्षीण होते.

('खेळांचा व सणांचा ऱ्हास' – १८९३ ह्या लेखावर आधारित)



आगरकरांचे हे कळकळीचे सांगणे लोकांना ऐकू जाण्यासाठी दीडशे वर्षे लागली. ह्या काळातील सर्व पिढ्यांनी 'खेळण्यात वेळ वाया घालवू नये; अभ्यास करावा, परीक्षा द्याव्यात आणि उत्तीर्ण व्हावे' हाच मंत्र घोकला. खेळाची धास्ती मुलांपेक्षा मोठ्यांनीच घेतली होती. मुले त्याचे परिणाम भोगत मोठी होत होती. म्हणजे ती खेळतच नव्हती असे नव्हे; पण तो सगळा व्यवहार मोठ्या माणसांची नजर चुकवून, चोरून होत होता; मोकळ्या आनंदाचा, तणावमुक्त नव्हता.

तरीही, त्यात एक बरी गोष्ट होती, ती म्हणजे, तेव्हा खेळाशी पैशाचा संबंध नव्हता. एक दमडीही खर्च न करता खेळता येतील असे किती तरी खेळ होते. साधा चेंडू मिळाला तरी स्वर्ग मिळाल्यासारखे वाटे. नाही मिळाला, तर कागदाचा बोळाही चेंडू म्हणून चालत असे, पण खेळ अडून राहत नसे.

आज परिस्थिती बदलली आहे. खेळांना प्रतिष्ठा मिळते आहे; पण कोणत्या खेळांना? ज्यांच्या साहित्यावर, पोशाखावर, प्रशिक्षकांवर भरमसाट पैसा खर्च करावा लागतो त्या खेळांना. पैसा आणि प्रसिद्धीचा झगमगाट नसलेले अनेक देशी खेळ हरवत चालले आहेत. कबड्डीसारख्या काही मोजक्या खेळांची परिस्थिती बदलते आहे, पण तीही बाजारपेठेच्याच बळावर. पालकांचा ओढा अशाच झगमगाटी खेळांकडे आहे.

आगरकरांना असे चित्र अपेक्षित नसावे.

**क. उजव्या रकान्यात दिलेले शब्दसमूह, वाक्प्रचार वापरून डाव्या रकान्यातील वाक्ये पूर्ण करू या.**

| | |
|---|---|
| अ. ............................ .......... कसा असतो पाहा. परवापर्यंत पैशाच्या राशीत लोळणारा सदाशिव आज नोकरीसाठी वणवण करतो आहे. | १ पोरखेळ वाटतो का? |
| आ. लग्न म्हणजे .............................. ............ नव्हे, बाबा! जन्माच्या गाठी असतात त्या. | २ खेळवले आहे |
| इ. हा 'पीएच.डी.'चा प्रबंध? पन्नास पानांचा? तुम्हाला हा सगळा ............................ .......... ............................? | ३ भातुकलीचा खेळ |
| ई. दादाने शेजारून वाहणाऱ्या कालव्याचे पाणी शेतात ............................ .......... . | ४ वारे खेळायचे |
| उ. जुन्या घरात सगळ्या खोल्यांमध्ये छान ....... ............... . आता प्रत्येक खोलीत पंखा किंवा कूलर असतो. | ५ नशिबाचा खेळ |

**ख. उजव्या रकान्यात दिलेले शब्दसमूह, वाक्प्रचार वापरून डाव्या रकान्यातील वाक्ये पूर्ण करू या.**

| | |
|---|---|
| अ. स्थानिक स्पर्धेत अनुभवी ................................... तरुण .............. ..............., तर त्यांना चांगला अनुभव मिळेल. | १ डावपेचही वेगानेच |
| आ. सरकार खाली खेचण्यासाठी विरोधक विचारपूर्वक ही ................... ................... होते; पण गृहमंत्र्यांनी योग्य संधी शोधून विरोधकांवरच .................. ................... . | २ संसाराचा सारीपाट मांडला |
| इ. कबड्डी हा ...................... ...................... आहे. त्यात शरीराप्रमाणेच बुद्धीही चपळ असावी लागते आणि खेळताना .................... .................. खेळावे लागतात. | ३ वेगवान खेळ |
| ई. पत्ते खेळताना शकू माझा .................... असे. पत्ते तिने .................... आणि मी वाटायचे हे ठरलेलेच असे. | ४ खेळाडूंऐवजी |
| उ. मोठ्या उमेदीने राघव आणि मीनाक्षीने ................... .............. .............. होता. .............. होता. एक गोंडस मूल घरात रांगू लागले होते. एकाएकी राघव ............ ............ ............ निघून गेला. त्यातच मूल कर्णबधिर असल्याचे लक्षात आले. त्याच्यासाठी मीनाक्षीला नोकरी सोडावी लागली. सगळीच ............ ............ ............ गेली. | ५ डाव अर्ध्यात सोडून |
| | ६ भिडू |
| | ७ पिसायचे |
| | ८ डाव उलटवला |
| | ९ दाने उलटी पडत |
| | १० खेळाडूंना खेळवले |
| | ११ खेळ रंगत चालला |
| | १२ खेळी खेळले |

शब्दसंपदा

**ग. चित्र, शब्द आणि व्याख्या ह्यांच्या जोड्या लावू या.**

| | | |
|---|---|---|
| अ  | १. गंजिफा | त. ------------------- म्हणजे एक छोटासा चौरस ठोकळा. या ठोकळ्याच्या सहा बाजूंवर एक, दोन अशा क्रमाने ठिपके काढलेले असतात. |
| आ  | २. बुद्धिबळ | थ. ---------- हा एक वेगळ्याच प्रकारच्या पत्त्यांचा खेळ आहे. इराण, पर्शिया, भारत ह्या भागांत हा खेळ सुमारे ६०० वर्षांपूर्वी खेळत असत. |
| इ  | ३. फासा | द. सारीपाटासारख्या बैठ्या खेळांत प्रत्येक खेळाडूकडे काही ----------------- असतात. चाल करताना प्रत्येक खेळाडू पटावर त्या हलवतो. |
| ई  | ४. सोंगटी | ध. ---------------- हा दोन खेळाडूंनी समोरासमोर बसून खेळायचा बैठा खेळ आहे. ह्या खेळाचा उगम भारतात झाला. |

**घ. खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांच्या जागी कंसातील योग्य शब्द वापरून वाक्ये परत लिहू या.**

(कमकुवत, मरेमरेपर्यंत, वेदान्ती, आचरटपणा, अपायकारक, कळकळीचे, भरमसाट, तुरळक, ओढा)

अ. आपल्या घरात सध्या प्रत्येक जणच स्वतःला विद्वान / ------------ समजू लागला आहे. प्रत्येक जण दुसऱ्याला सल्ले देतोय.

आ. सामना जिंकायचा असेल तर मन दुबळं / ------------------ असून चालत नाही.

इ. तो खाणमालक मजुरांकडून अंगतोड / ------------------ मेहेनत करून घेतो. मजुरी मात्र वेळेवर देत नाही.

ई. मयांकने जरी शास्त्रशाखा निवडली असली, तरी त्याचा खरा कल / ------------------ कलाशाखेकडेच आहे.

उ. त्या वक्त्याचे तळमळीचे / ------------------ बोल ऐकून बरेच श्रोते प्रभावित झाले.

ऊ. "तंबाखू तुमच्या प्रकृतीसाठी हानिकारक / ------------------ आहे," डॉक्टर आबांना परत परत सांगत होते.

ए. भररस्त्यात दुचाकीवर वेड्यावाकड्या कसरती करणं वाह्यातपणाचं / ------------------ आहे.

ॲ. शहराचा हा भाग नवीनच आहे आणि इथे लोकवस्तीही विरळ / ------------------ आहे.

ऐ. तू जेवायला ढीगभर / ------------------ पदार्थ केलेयस. खाणारी मंडळी मोजून चारच आहेत, हे लक्षात आहे ना?

## ४ भोज्या

"परत माझ्यावरच राज्य आलंय आणि कोणी आऊटच होत नाहीये!" मोठ्यानं भोकाड पसरून मंजू घरात येत म्हणाली.



मंजूचा कारभार आरामात चालायचा. सुट्टी म्हणून उशिरा उठायचं, चेंगटपणा करत सावकाश सगळं आवरायचं आणि आरामात खेळायला खाली अंगणात जायचं. तोवर सगळ्या मुलांचा खेळ रंगात आलेला असे. ती दिसल्या दिसल्या मुलं गोंगाट करायची, 'नवा गडी नवा राज!' आणि खेळायला गेल्या गेल्या राज्य घ्यायची वेळ मंजूवर यायची. बरं, मंजू खेळातही इतकी संथ होती, की सकाळी आलेलं राज्य संध्याकाळ झाली तरी जायचंच नाही. तिला पिदवायला मुलांना फार आवडायचं. आजही तिला पाहिल्या पाहिल्या लपंडाव खेळणाऱ्या मुलांनी एकच कल्ला केला : 'नवा गडी नवा राज!'. मोठ्या धीरानं मंजूनं राज्य घेतलं खरं, पण तीन चार डाव झाले तरी कोणालाही बाद करणं



तिला जमलंच नाही. मंजूची पाठ फिरल्या फिरल्या सगळे जण एकामागून एक भोज्या करायचे आणि राज्य परत मंजूवरच यायचं. पाचव्यांदा राज्य आल्यावर मात्र मंजूचा सगळा धीर सुटला आणि तिनं मोठ्याने गळा काढला : 'आई गं ऽऽ ...'.

**क. जोड्या लावू या.**

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | संथ | १. | डाव येणे / घेणे |
| आ. | कल्ला करणे | २. | अगदी रमतगमत काम करणे |
| इ. | भोकाड पसरणे | ३. | गोंगाट करणे |
| ई. | चेंगटपणा करणे | ४. | आऊट करणे |
| उ. | राज्य येणे / घेणे | ५. | गळा काढणे |
| ऊ. | बाद करणे | ६. | सावकाश |

**ख. वरील उताऱ्यात अधोरेखित केलेले शब्द (धातुसाधित) कसे तयार झाले ते खालील तक्त्यात पाहून समजून घेऊ या आणि तक्ता पूर्ण करू या.**

| | क्रियापद | क्रियापदाचे भूतकाळाचे रूप + या | झालेल्या रूपाची द्विरुक्ती | अर्थ |
|---|---|---|---|---|
| अ. | दिसणे | दिसला + या = दिसल्या | दिसल्या दिसल्या | दिसल्यावर लगेच |
| आ. | येणे | आला + या = आल्या | आल्या आल्या | आल्यावर लगेच |
| इ. | शिरणे | | | |

व्याकरण

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ई. | बसणे | | | |
| उ. | करणे | | | |
| ऊ. | जाणे | | | |

**ग. वरील उतारा परत वाचू या आणि दिलेल्या उदाहरणाप्रमाणे वाक्ये बनवू या.**

अ. उदा॰ (दिसणे) मंजू दिसल्या दिसल्या मुलांनी एकच कल्ला केला : ‘नवा गडी नवा राज!’.

आ. (पाहणे) ------------------------------------------------------------ .

इ. (जाणे) ------------------------------------------------------------ .

ई. (फिरणे) ------------------------------------------------------------ .

टीप : एकाच क्रियापदाचे वरीलप्रमाणे तयार झालेले धातुसाधित वाक्यात जेव्हा पाठोपाठ दोनदा वापरले जाते, तेव्हा ते जोडून लिहीत नाहीत. उदा॰ मला घरी आल्या आल्या चहा लागतो.

टीप : १. बसल्या बसल्या = बसल्यावर लगेच, बसल्याक्षणी
२. बसल्या बसल्या = बसलेल्या स्थितीत, बसून
ह्याचप्रमाणे – पडल्या पडल्या, झोपल्या झोपल्या

**घ. कंसात दिलेल्या क्रियापदांपैकी योग्य त्या क्रियापदाचे वरीलप्रमाणे धातुसाधित क्रियाविशेषण बनवून वाक्ये पूर्ण करू या.**

(देणे, जाणे, दिसणे, उठणे, खाणे, उघडणे, जेवणे, होणे, करणे, पडणे)

अ. जेवण ---------- ---------- तो घरातून बाहेर पडला.

आ. घरी ---------- ---------- आधी मी चार्जिंगला लावलेला माझा मोबाईल ताब्यात घेतला.

इ. त्याच्या हातात केक ---------- ---------- त्याने तो तोंडात कोंबला.

ई. चंद्र ---------- ----------ईदची घोषणा करण्यात आली.

उ. सकाळी बँक ---------- ---------- आधी मी हा चेक भरणार आहे.

ऊ. सकाळी ---------- ---------- दात घासावेत.

ए. ---------- ---------- व्यायाम करू नये.

ॲ. ---------- ---------- आंघोळ करणे चांगले नाही.

ऐ. गादीवर ---------- ---------- झोप लागते तिला.

ओ. व्यायाम ---------- ---------- वजन कमी होत नसतं.

**टीप : दोन वेगवेगळ्या किंवा विरुद्ध अर्थाच्या क्रियापदांपासून तयार होणारी धातुसाधिते क्रियाविशेषण, विशेषण किंवा नाम यांसारखीही वापरता येतात.**
**उदा॰ आल्यागेल्याची बातमी, जगल्यावाचलेल्यांनी**

**च. हे खेळ तुम्हाला ओळखता येतील का? चित्रे पाहून त्याखाली त्या खेळाचे नाव लिहू या.**


अ. ------------------------------


आ. ------------------------------



इ. ------------------------------


ई. ------------------------------


उ. ------------------------------


ऊ. ------------------------------


ए. ------------------------------


ॲ. ------------------------------

**छ. खालचा संवाद वाचू या, त्यातील अधोरेखित केलेली धातुसाधिते समजून घेऊन त्याखालील तक्ता पूर्ण करू या.**

**नीलिमा** : ताई, मी आल्यापासून बघतेय, जिगीषा दिसत नाही घरात. ती आहे तरी कुठे?

**स्मिता** : ती गेलीय त्या विदुलाकडे खेळायला.



**नीलिमा** : अगं, मी सकाळी फोन केला तेव्हापण तू हेच सांगितलंस.

**स्मिता** : ती उठल्यासुटल्या त्या विदुलाकडे जात असते. त्यांच्याकडे मोठं अंगण आहे, आणि बऱ्याच मित्र-मैत्रिणी तिथेच जमतात खेळायला. पण एकदा एकत्र आले ना सगळे, की त्यांना इतर काहीच सुचत नाही. सारखं खेळ, खेळ आणि खेळ.

**नीलिमा** : कित्ती छान! पण खेळतात तरी काय एवढं?

**स्मिता** : काय आणि किती सांगू! विटीदांडू, लगोरी, गोट्या, ठिक्कर, भोवरा, आंधळी कोशिंबीर, सागरगोटे, सूरपारंब्या. एकामागून एक खेळ चालूच. ना आल्यागेल्याची खबर, ना खाल्ल्याप्यायल्याचं भान. तहानभूक विसरूनच जातात जणू!

**नीलिमा** : पण मग आता ही येणार कधी घरी परत?

**स्मिता** : काय सांगू? खेळून खेळून मुलं दमली तरी घरी जायचं नावच घेत नाहीत. नंतर पारावर बसून भेंड्यांचा खेळ सुरू होतो. मग शेवटी विदुलाची आईच ओरडते : 'खेळून दमला नाहीत का अजून? जा आता घरी आणि उद्या या परत. थकल्याभागल्यावर जरा विश्रांती घ्यावी रे, बाळांनो!' मग तोंडं वाकडी करत एकेक जण जड पावलांनी घराकडे परततो. येईल आता, ओरडा खाऊन झाला की घरी परत.



| | क्रियापदे | क्रियापदांचे भूतकाळातील रूप + या | तयार झालेले धातुसाधित रूप | वाक्य | धातुसाधिताचा ह्या वाक्यातील उपयोग |
|---|---|---|---|---|---|
| अ. | उठणे, सुटणे | उठला + या = उठल्या<br>सुटला + या = सुटल्या | उठल्यासुटल्या | उठल्यासुटल्या त्याच त्याच विषयावर काय बोलायचं? | क्रियाविशेषण |
| आ. | येणे, जाणे | | | | |
| इ. | खाणे, पिणे | | | | |
| ई. | थकणे, भागणे | | | | |



**टीप :** दोन वेगवेगळे पण एकाच अर्थाचे शब्द किंवा दोन विरुद्ध अर्थाचे शब्द लिहिताना जोडून लिहिले जातात.

उदा॰ डावंउजवं, पुढंमागं, खालीवर, उठताबसता, थकल्याभागल्या इत्यादी.
काही जोडशब्दांमधील एक शब्द स्वतंत्रपणे वापरला जात नाही.

उदा॰ अधूनमधून = मधील 'अधून'. 'मी अधून मुंबईला जाते' असे आपण म्हणत नाही.
ह्याचप्रमाणे – आजूबाजूला, करूनसवरून इत्यादी

**ज. उदाहरणाप्रमाणे रिकाम्या जागा भरू या.**

उदा॰ (होणे, जाणे) झाल्यागेल्या गोष्टी परत परत उगाळण्यात काय अर्थ आहे?

अ. (देणे, घेणे) .................... चा उल्लेख मी यापुढे करणार नाही. ....................

आ. त्या भयंकर आपत्तीतून (जगणे, वाचणे) .................... लोकांनीच शेवटी एकमेकांना मदत केली. ....................

इ. (मारणे, झोडणे) .................... शिवाय बाबूच्या काही लक्षातच येत नसे. ....................

ई. (राहणे, जाणे) .................... आठवणी काढतच यापुढील आयुष्य काढायचंय. ....................



## करा आणि शिका

क. दोन किंवा तीन जणांचे गट करू या. आपल्या मित्रांकडून किंवा आंतरजालावरून वरीलपैकी एका किंवा दोन खेळांची माहिती मिळवून वर्गात सादर करू या.

ख. ह्यांपैकी कोणते खेळ तुमच्या प्रांतात राज्यात किंवा देशात अशाच किंवा जरा वेगळ्या स्वरूपात खेळले जातात? वर्गात त्याची माहिती देऊ या.

## ५ प्रयोग

**क. अधोरेखित केलेल्या वाक्यातील कर्ता, कर्म आणि क्रियापद खालील तक्त्यात भरू या आणि क्रियापद कशाप्रमाणे चालले ते पाहू या.**

अ. चिंटू एकही धाव न काढता बाद झाला. रागारागाने त्याने हातातली बॅट तिथेच टाकली आणि तो परत आला. नंतर त्याच्या मित्रांनी त्याची टिंगल केली आणि त्याला खूप रडवले.

आ. कबड्डीच्या मैदानावर अचानक कुठून तरी एक पिसाळलेले कुत्रे घुसले, पण एका प्रेक्षकाने त्याला हाकलले.

इ. स्वप्ना सामना जिंकली. मुख्याध्यापकांनी तिच्या गळ्यात पदक घातले. तिचे अभिनंदन करण्यासाठी धावत आलेल्या तिच्या मित्रांना मात्र सुरक्षारक्षकांनी अडवले.

ई. कुस्तीचा फड लागला होता. जगनने पहिल्याच फेरीत प्रतिस्पर्ध्याला लोळवले.

उ. मुष्टियुद्धाच्या खेळात सलीमने आपल्या प्रतिस्पर्ध्याला एका ठोशातच नमवले.



| | कर्ता | कर्म | क्रियापद | क्रियापद कशाप्रमाणे चालले? |
|---|---|---|---|---|
| १. | चिंटू | -- | झाला | कर्त्याप्रमाणे |
| २. | त्याने | बॅट | टाकली | कर्माप्रमाणे |
| ३. | मित्रांनी | त्याला | रडवले | दोन्हीप्रमाणे नाही. |
| ४. | | | | |
| ५. | | | | |
| ६. | | | | |
| ७. | | | | |
| ८. | | | | |
| ९. | | | | |
| १०. | | | | |

**क. योग्य क्रियापदाचे योग्य रूप करून वाक्ये पूर्ण करू या.**

(ओढणे, वळणे, पिरगळणे, सोडणे, पडणे, उठवणे, कळवळणे, मारणे, खरचटणे, पोहोचवणे, ढकलणे, चिडवणे, पाडणे)



लपंडावाच्या खेळाचा शेवट मात्र जोरदार मारामारीने झाला. जयेशनं मनीषला 'हरला हरला' म्हणून (अ)................... मग मनीषने जयेशला जोरात ढकलले आणि खाली (आ)................... तो त्याला जोरात ठोसा मारणार, एवढ्यात तनुजाने त्याला मागून (इ)................... आणि त्याचा हात (ई)................... मनीष (उ)................... आणि त्याने जयेशला

(ऊ) ---------------------. तो (ए)--------------- आणि त्याने तनुजाला एक गुद्दा (ॲ) ----------------. तनुजाचा तोल गेला, ती खाली (ऐ) ------------- आणि तिच्या दोन्ही गुडघ्यांना (ओ)----------------. रडणाऱ्या तनुजाला जयेशने (ऑ) --------------- आणि हात धरून घरी (औ) ------------------.



**ख. आता आपण तयार केलेली क्रियापदाची रूपे कशाप्रमाणे चालली ते पाहू या – कर्त्याप्रमाणे, कर्माप्रमाणे की दोन्हीप्रमाणे नाही? वर्गात चर्चा करू या आणि शिक्षकाच्या मदतीने दुरुस्त्या करू या.**

## ६ महाराष्ट्रातील लोकप्रिय खेळ

एकेकाळी हॉकी हा खेळ भारताचा राष्ट्रीय खेळ मानला जायचा. आज सर्वाधिक लोकप्रियता क्रिकेट ह्या खेळानं कमावली आहे. क्रिकेटची बॅट आणि बॉल घरात नाहीत, असं मुलाबाळांचं घर सापडणं मुश्कीलच ठरेल. हॉकीची आणि क्रिकेटची लाट येण्याआधीच्या अनेक पिढ्या मात्र अस्सल मराठमोळे खेळ खेळतच लहानाच्या मोठ्या झाल्या. अजूनही हे खेळ खूप आवडीनं खेळले जातात, ह्याला कारण ते कुठेही सहज खेळता येतात. थोडीशी मोकळी जागा मिळाली, की दोन गट पाडून मुलं खेळायला तयार होतात. ना त्यांना कोणतीही महागडी साधनसामग्री लागत, ना खास तयार केलेली मैदानं. खेळाचा भरपूर आनंद मिळवून देणारे हे खास देशी खेळ. ह्यांतील काही खेळांची माहिती खाली दिली आहे, ती वाचू या.

### १. खो खो

**एक वेगवान आणि लोकप्रिय भारतीय खेळ.**



नऊ खेळाडूंच्या दोन संघांत हे सामने होतात. एका सरळ रेषेत दर ८ फूट (२.४३ मीटर) अंतरावर एक खेळाडू, असे आठ खेळाडू एकाआड एक एकमेकांच्या विरुद्ध बाजूकडे तोंडे करून बसतात. रेषेच्या दोन्ही टोकांना छोटे लाकडी खांब, म्हणजेच 'खुंट', रोवलेले असतात. नववा खेळाडू एका खुंटाजवळ उभा राहतो. विरुद्ध संघातील तीन खेळाडूच सुरुवातीला क्रीडांगणात असतात. बसलेल्या खेळाडूंनी त्या तीन खेळाडूंना स्पर्श करून बाद करायचे असते. ते बाद झाल्यानंतर दुसरे तीन खेळाडू मैदानात उतरतात. अशा प्रकारे सर्व खेळाडू बाद झाले की 'लोण झाला' असे म्हणतात व डावाचा वेळ शिल्लक असल्यास पुन्हा पहिले तीन खेळाडू पळतीसाठी मैदानात उतरतात. प्रत्येक संघात दोन राखीव खेळाडू असतात.

खाली बसलेल्या खेळाडूला पाठलाग करणारा खेळाडू मागून स्पर्श करून 'खो' देतो आणि त्याला पाठलाग करायला पाठवून स्वतः त्याची जागा घेतो. खो मिळाल्याशिवाय खेळाडूने उठायचे नसते. पाठलाग करणाऱ्याला दिशा बदलता येत नाही. त्याला बसलेल्या खेळाडूंच्या मधून किंवा खुंटांमधून जाता येत नाही. खुंटाला वळसाच घालावा लागतो किंवा खांबाजवळील रेषेला स्पर्श करून पुन्हा परतता येते. दोन रेषांमधील जागेत मात्र त्याला कसेही फिरता येते.
खेळणाऱ्याने सीमारेषांत राहूनच खेळायचे असते. बसलेल्या खेळाडूंना त्याने स्पर्श केल्यास तो

बाद होतो. प्रत्येक डाव लहान वयाच्या स्पर्धकांसाठी ५ मिनिटांचा आणि मोठ्यांसाठी ७ मिनिटांचा असतो. प्रत्येक डावानंतर अडीच मिनिटे आणि दोन डावांनंतर पाच मिनिटे विश्रांती असते. एका डावात जितके खेळाडू बाद होतील, तितके गुण विरुद्ध संघाला मिळतात. एखाद्या संघाचे गुण प्रतिस्पर्धी संघापेक्षा १२ गुणांनी जास्त असल्यास हा आघाडीवर असलेला संघ दुसऱ्या संघास पुन्हा बसण्यास म्हणजे पाठलाग करण्यास सांगू शकतो. एका सामन्यात प्रत्येक संघाला दोन वेळा खेळावे लागते.

**क. वरील उतारा वाचू या आणि पुढील योग्य त्या पर्यायावर ✓ खूण करू या.**



अ. ह्या खेळात पाठलाग करणाऱ्या संघातील ---------- खेळाडू खाली बसतात.
१. नऊ २. आठ ३. अकरा

आ. खेळाडू ज्या सरळ रेषेवर खाली बसतात तिच्या दोन्ही टोकांना रोवलेल्या लाकडी खांबांना ---------- म्हणतात.
१. दांडा २. लोण ३. खुंट

इ. राखीव खेळाडू धरून प्रत्येक संघात एकूण ---------- खेळाडू असतात.
१. अकरा २. दहा ३. नऊ

ई. पाठलाग करणारा खेळाडू बसलेल्या खेळाडूला ---------- स्पर्श करून खो देतो.
१. पुढून २. बाजूने ३. मागून

उ. पाठलाग करणाऱ्या खेळाडूला ----------------------------------------
१. दिशा बदलता येत नाही
२. खुंटाला वळसा घालून जाता येत नाही
३. खो देता येत नाही

ऊ. मोठ्या वयाच्या खेळाडूंसाठी डाव ---------- मिनिटांचा असतो.
१. पाच २. आठ ३. सात

ए. एका सामन्यात प्रत्येक संघाला ---------- खेळावे लागते.
१. एकदा २. दोनदा ३. तीनदा

**ख. ह्या खेळावरील एक चित्रफीत पाहून, त्यावर तीन प्रश्न लिहून वर्गात चर्चा करू या.**

संभाषण

## २. कबड्डी



कबड्डी हा खेळ मूळ दक्षिण आशियातला, मात्र आता आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळला जाणारा सांघिक मैदानी खेळ आहे. हा खेळ भारतात जितका लोकप्रिय आहे, तितकाच नेपाळ, बांग्लादेश, श्रीलंका आणि पाकिस्तान ह्या शेजारी देशांतही लोकप्रिय आहे. मागील तीन आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये जपान आणि कोरियाही सहभागी झाले होते. या खेळात पुरुषांसाठी आणि महिलांसाठी वेगवेगळ्या

आकाराची मैदाने असतात. पुरुषांसाठी १२.५० मीटर बाय १० मीटर, तर महिलांसाठी ११ मीटर बाय ८ मीटर असे आयताकृती क्रीडांगण तयार करतात. मध्यरेषा आखून मैदानाचे दोन भाग करतात. दोन प्रतिस्पर्धी संघ एकेक भाग स्वतःकडे घेतात आणि प्रतिस्पर्धी संघावर चढाया करायला आळीपाळीने एक खेळाडू प्रतिस्पर्धी संघाच्या हद्दीत पाठवतात. मधली रेष ओलांडून चढाई करण्यास गेलेला खेळाडू एका श्वासात 'कबड्डी कबड्डी' असे न थांबता म्हणत विरुद्ध संघाच्या जास्तीत जास्त खेळाडूंना स्पर्श करतो. विरुद्ध पक्षातले खेळाडू त्याला त्याचा श्वास सुटेपर्यंत मध्यरेषेच्या अलीकडे धरून ठेवण्याचा प्रयत्न करतात. जर श्वास राखून खेळाडू आपल्या बाजूस परत आला, तर त्याचा स्पर्श झालेले सर्व खेळाडू बाद होतात. प्रत्येक संघात खेळणारे सात आणि राखीव पाच असे बारा खेळाडू असतात. पुरुषांसाठी वीस मिनिटांचे, तर महिलांसाठी पंधरा मिनिटांचे दोन डाव खेळवले जातात. संपूर्ण सामन्यात बरोबरी झाल्यास पुन्हा पाच मिनिटांचे दोन डाव खेळवतात.

महाराष्ट्र व मध्य प्रदेश या राज्यांत हुतुतू, कर्नाटक व तामिळनाडू या राज्यांत चाडू-गुडू, केरळमध्ये वंदिकली, पंजाबमध्ये झबर गगने, तर बंगालमध्ये दो-दो या नावाने हा खेळ खेळला जातो. इ.स. १९३४मध्ये या खेळाचे नियम तयार झाले. इ.स. १९३६मध्ये अमरावतीच्या हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ या संस्थेने या खेळाच्या प्रसारासाठी बर्लिन ऑलिंपिकमध्ये प्रदर्शनीय सामना खेळून दाखवला. इ.स. १९३८पासून हा खेळ भारतात राष्ट्रीय स्तरावर खेळला जाऊ लागला.
पूर्वी फक्त खुल्या मैदानावर होणारा हा खेळ आता बंदिस्त जागेत व मॅटवरही खेळवला जायला लागला आहे. ह्या जोशपूर्ण खेळाच्या सामन्यांमधील चुरस बघताना मजा येते.

**क. वरील उतारा वाचू या आणि प्रश्नांची हो किंवा नाही अशी उत्तरे देऊ या.**

| | | |
|---|---|---|
| अ. | कबड्डी हा खेळ भारताच्या शेजारी देशांतही लोकप्रिय आहे. | [हो] [नाही] |
| आ. | हा खेळ अजून आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळला जात नाही. | [हो] [नाही] |
| इ. | ह्या खेळात एका वेळी प्रतिस्पर्धी संघाचा एकच खेळाडू बाद होतो. | [हो] [नाही] |
| ई. | ह्या खेळात खेळाडूने स्वतःच्या श्वासावर नियंत्रण ठेवणे महत्त्वाचे आहे. | [हो] [नाही] |
| उ. | ह्या खेळात पुरुषांसाठी आणि महिलांसाठी खेळण्याचा वेळ वेगवेगळा आहे. | [हो] [नाही] |
| ऊ. | वेगवेगळ्या राज्यांत ह्या खेळाला वेगवेगळी नावे आहेत. | [हो] [नाही] |
| ए. | हा खेळ पुरुष आणि महिला सारख्याच आकाराच्या मैदानात खेळतात. | [हो] [नाही] |
| ॲ. | हा खेळ फक्त खुल्या मैदानातच खेळला जातो. | [हो] [नाही] |

**ख. ह्या खेळावरील एक चित्रफीत पाहून, त्यावर तीन प्रश्न लिहून वर्गात चर्चा करू या.**

संभाषण

### ३. लंगडी



लंगडी हा खास मराठमोळा क्रीडाप्रकार आहे. लंगडी हे नावच मुळात 'लंगडणे' ह्या क्रियापदावरून आले आहे. हा खेळ दोन संघांमध्ये खेळला जातो. एका संघाचे नऊ खेळाडू मैदानात असतात आणि दुसऱ्या संघाचा एक खेळाडू एका पायावर उड्या मारत, म्हणजेच लंगडी घालत त्यांना स्पर्श करून बाद करतो. त्याने दुसरा पाय जमिनीवर टेकल्यास तो बाहेर जातो आणि त्या संघातला दुसरा खेळाडू त्याची

जागा घेतो. हा खेळ आता केवळ भारतापुरता मर्यादित राहिलेला नाही. लंगडीचा प्रसार अन्य देशांमध्येही व्हावा यासाठी महाराष्ट्र लंगडी संघटना व भारतीय लंगडी महासंघ ह्यांनी खूप मेहनत घेतली आहे आणि त्याचे चांगले परिणाम आता दिसू लागले आहेत. भारताबाहेर नेपाळ, म्यानमार, थायलंड, पाकिस्तान, भूतान ह्या देशांमध्येही ह्या खेळाचा प्रसार झाला आहे. आशियाई स्तरावर वरिष्ठ गटाबरोबरच कनिष्ठ गटाचेही सामने सुरू झाले आहेत.

क्रीडांगण - लांबी- १२.१९ मीटर, रुंदी- १२.१९ मीटर, कर्ण- १७.२४ मीटर

खेळाडू - दोन संघांचे प्रत्येकी १२ खेळाडू; खेळणारे ९, राखीव ३ खेळाडू असतात.

वेळ - प्रत्येकी ५ ते ७ मिनिटांचे ४ डाव. दोन लंगडीचे व दोन पळतीचे.

नियम - लंगडी घालणाऱ्याने पळणाऱ्यास बाद केल्यावर त्याला १ गुण दिला जातो. फक्त हातानेच गडी बाद करावा. लंगडी घालणाऱ्याचा हात अथवा वर धरलेला पाय जमिनीला टेकल्यास तो बाद होईल. बाद गडी मैदानाबाहेर गेल्याशिवाय पुढच्या खेळाडूने प्रवेश करू नये. पळतीचे सर्व गडी बाद झाल्यावर वेळ शिल्लक असल्यास बाद झाल्याच्या क्रमाने पळतीचे खेळाडू परत पळतील. धावणाऱ्याला लंगडी घालणाऱ्याने स्पर्श केला, तसेच धावणारा मैदानाबाहेर गेला, तर तो बाद होतो. जास्त गुण मिळवणारा संघ विजयी ठरतो.

**क. वरील उतारा वाचू या आणि पुढील वाक्ये पूर्ण करू या.**

अ. भारतातील ---------------------------- ह्या राज्यात ह्या खेळाचा उगम झाला.

आ. सुरुवातीला दोन्ही संघांचे मिळून ---------------------------- खेळाडू मैदानात उतरतात.

इ. लंगडी घालणाऱ्याने ---------------------------- तो मैदानातून बाहेर जातो.

ई. लंगडी घालणाऱ्याने ---------------------------- धावणारा खेळाडू बाद होतो.

**ख. ह्या खेळावरील एक चित्रफीत पाहून, त्यावर तीन प्रश्न लिहून वर्गात चर्चा करू या.**

**ग. खेळाच्या नावापुढे वर्तुळात दिलेल्या क्रियांपैकी योग्य त्या क्रिया लिहू या.**

अ. कबड्डी = ----------------------------------------------

आ. खो खो = ----------------------------------------------

इ. लपंडाव = ----------------------------------------------

ई. गोट्या = ----------------------------------------------



पकडणे, बाद करणे, चढाई करणे, गल भरणे,
नेम धरणे, लपणे, शोधणे, खो देणे, गोटी मारणे, श्वास धरणे, स्पर्श करणे,
पाठलाग करणे, गल खणणे, भोज्या करणे,

संभाषण

शब्दसंपदा

**घ. चला, गप्पा मारू या.**

अ. इतिहास घडवणे



**पहिला विद्यार्थी :** मला अंजली भागवतचा फार अभिमान वाटतो.
**दुसरा विद्यार्थी :** का रे?
**पहिला विद्यार्थी :** अरे, माहीत नाही का तुला? अंजलीनं फार मोठा इतिहास घडवलाय!
**दुसरा विद्यार्थी :** इतिहास घडवलाय? कशात?
**तिसरा विद्यार्थी :** मला माहितेय, नेमबाजीत.
**दुसरा विद्यार्थी :** काय सांगतोस? नेमबाजीत इतिहास घडवलाय?
**तिसरा विद्यार्थी :** हो, हो! तिनं आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये नेमबाजीत १३ नवे विक्रम केले.
**दुसरा विद्यार्थी :** काय? तेरा नवे विक्रम?
**तिसरा विद्यार्थी :** हो, आणि नवा इतिहास घडवला.
**सर्व विद्यार्थी :** हो, आपल्याला सर्वांनाच तिचा अभिमान वाटला पाहिजे!

ह्याचप्रमाणे –
वीरधवल खाडे, जलतरण, २००६ मधील आशियाई क्रीडा स्पर्धा, तीन नवीन विक्रम, सहा सुवर्णपदके

स्मृती मानधना - महिला क्रिकेटपटू, तिला आयसीसीने २०१८ या वर्षाचा सर्वोत्तम महिला क्रिकेटपटूचा पुरस्कार जाहीर केलाय.

## ७ मंगळागौर

**क. माझीपण मंगळागौर.**

**ख. मंगळागौरीचे खेळ**

**ग. वादविवाद करू या.**

मंगळागौरीचे खेळ पाहून मानसीच्या काही मैत्रिणी जाम खुश झाल्यायत. त्यातल्या काही तर आपली आधुनिक व्यायामशाळा सोडून घरच्याघरी असेच सर्वांगाला व्यायाम देणारे, इतर काही साहित्य न लागणारे व्यायामच करावेत असं म्हणायला लागल्या आहेत; तर इतर काही जणी मंगळागौरीच्या खेळांत काही आधुनिक खेळ समाविष्ट करावेत असं म्हणतायत. वर्गात दोन गट करून ह्या विषयावर वादविवाद करू या. गट 'अ' ही प्रथा आणि हे खेळ असेच राहावेत ह्या मताचा पुरस्कार करेल, तर गट 'ब' ह्या प्रथेचं स्वरूप बदलण्याच्या पक्षात असेल. पुढील काही प्रश्न तुम्हाला मदत करतील : आजच्या काळातही हेच खेळ खेळले जावेत का? त्यांचं औचित्य काय? काही वेगळे खेळ इथे सुचवता येतील का? कोणते? त्यांचं प्रयोजन काय असेल? इत्यादी.



## ८ खेळ आणि व्यायाम यांचे वाढते महत्त्व.

**क. खेळा आणि आरोग्यपूर्ण जीवन जगा.**



आजकालच्या आपल्या बैठ्या जीवनशैलीमुळे लठ्ठपणा, उच्च रक्तदाब, मधुमेह यांसारखे 'लाईफस्टाईल डिसिजेस' होण्याचे प्रमाण वाढीला लागले आहे. सुदैवाने आता याबद्दल समाजामध्ये जागरुकता यायला लागली आहे. हे विकार टाळण्यासाठी लोक आपल्या आहारावर नियंत्रण ठेवत आहेत, तसेच व्यायामाची सवयही आत्मसात करीत आहेत. लहान मुलांपासून ते अगदी सत्तर-ऐंशीच्या घरातील वृद्धांपर्यंत सर्वच जण आता आपल्या जीवनशैलीचा काळजीपूर्वक विचार करताना दिसत आहेत. सुदृढ राहण्याच्या दृष्टीने आहारावर नियंत्रण ठेवतानाच, निरनिराळ्या व्यायाम-पद्धतींचा अवलंब लोक करताना दिसत आहेत. कोणी रनिंग, जॉगिंग, सायकलिंग, तर कोणी योगासने, एरोबिक्स, पोहणे, चालणे असे तऱ्हेतऱ्हेचे व्यायाम करत असतात.



एखादा खेळ खेळणे हादेखील उत्तम व्यायामप्रकार असून, त्याकडेही लोकांचा कल वाढताना दिसत आहे. मग तो फुटबॉल असो किंवा बॅडमिंटन, आपल्या आवडत्या खेळाकडे लोक आता व्यायामाचा उत्तम पर्याय म्हणून पाहायला लागले आहेत. आपला आवडता खेळ खेळण्याचा समावेश जर तुम्ही तुमच्या दैनंदिन आयुष्यामध्ये केलात, तर तुम्ही शारीरिकदृष्ट्या सक्रिय राहालच, पण त्याशिवाय तुमच्या हृदयाचे आणि शरीरातील स्नायूंचे आरोग्यही उत्तम राहील. पचनशक्ती सुधारेल आणि रात्री झोपही चांगली लागेल. रात्री झोप चांगली लागल्याने दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यानंतर तुम्ही एकदम ताजेतवाने झालेले असाल. त्यामुळे दिवसभर शरीरामध्ये उत्साह टिकून राहील व मनही तणावमुक्त होऊन मनामध्ये नकारात्मक विचार येणार नाहीत.



जसजसे आपले वय वाढत जाते, तसतसे आपल्या शरीरातील मांस-पेशी, स्नायू आणि हाडे कमकुवत होण्यास सुरुवात होते. अशा वेळी खेळण्यामुळे होत असलेली शारीरिक हालचाल हाडे आणि सांधे ह्यांना बळकट होण्यास मदत करते. त्यामुळे आपला आवडता खेळ टीव्हीवर पाहण्याऐवजी आपल्या दैनंदिन आयुष्यामध्ये या खेळाचा सक्रिय समावेश करा.

अलीकडील संशोधन असेही सांगते, की कोणत्याही खेळाचा अवलंब व्यायाम म्हणून केल्यास निरनिराळ्या कर्करोगांपासून बचाव होण्याची शक्यता तीनशे टक्क्यांनी वाढते. ज्या महिला दर दिवशी किमान एक तास एखादा खेळ खेळतात, त्यांना स्तनाचा आणि फुप्फुसाचा कर्करोग होण्याची शक्यता अगदी नगण्य असते. त्यामुळे महिलांनी खेळांचा समावेश आपल्या दैनंदिन आयुष्यात करायला हवा. सायकलिंग, स्विमिंग हे खेळ त्यासाठी उत्तम पर्याय आहेत.



म्हणूनच, खेळा आणि आरोग्यपूर्ण जीवन जगा!

**ख. अधोरेखित केलेले वाक्यांश बदलून ते स्वतःच्या शब्दांत पुन्हा लिहू या.**

अ. बैठ्या जीवनशैलीमुळे होणाऱ्या आजारांबाबत सुदैवाने <u>समाजात जागरूकता यायला लागली आहे.</u>

--------------------------------------------------------------------------------

आ. सुदृढ राहण्याच्या दृष्टीने आहारावर नियंत्रण ठेवतानाच, लोक निरनिराळ्या <u>व्यायाम-पद्धतींचा अवलंब करताना दिसत आहेत.</u>

--------------------------------------------------------------------------------.

इ. आपल्या दैनंदिन आयुष्यामध्ये या <u>खेळांचा सक्रिय समावेश करा.</u>

--------------------------------------------------------------------------------.

ई. आपल्या आवडत्या खेळाकडे लोक आता <u>व्यायामाचा उत्तम पर्याय</u> म्हणून पाहायला लागले आहेत.

--------------------------------------------------------------------------------.

उ. नियमित व्यायाम करणाऱ्या स्त्रियांना स्तनाचा आणि फुफ्फुसाचा <u>कर्करोग होण्याची शक्यता अगदी नगण्य असते.</u>

--------------------------------------------------------------------------------.

**ग. थोडक्यात लिहू या.**

अ. बैठ्या जीवनशैलीमुळे प्रकृतीवर होणारे वाईट परिणाम.

१. ---------------- २. ---------------- ३. ----------------

आ. हे वाईट परिणाम टाळण्यासाठी काय करावे?

१. ---------------- २. ----------------



इ. व्यायामाला पर्याय

१. ----------------

ई. व्यायाम आणि खेळांचे चांगले परिणाम

१. ---------------- २. ---------------- ३. ---------------- ४. ----------------

उ. स्त्रियांना होणारा फायदा

१. ----------------

**घ. केलं पाहिजे, करायला पाहिजे, करायला हवं!**

वरील तिन्ही शब्दप्रयोग एकाच अर्थाचे आहेत. एखादी गोष्ट करण्याची जास्तच निकड वाटली, तर आपण त्यांना 'च' प्रत्यय लावतो. उदा. 'करायला<u>च</u> पाहिजे, केला<u>च</u> पाहिजे, करायला<u>च</u> हवं'. वरील उताऱ्यात अशी निकड असलेल्या गोष्टी आपल्याला सापडतील. त्यांची एक यादी आपण वरील तीन शब्दप्रयोग दोन्ही प्रकारे वापरून तयार करू या. त्यासाठी खालील प्रश्न आपल्याला मदत करतील.

अ. बदलत्या जीवनशैलीमुळे होणारे आजार टाळण्यासाठी काय करायला हवं?
आ. मन तणावमुक्त राहण्यासाठी काय करायला पाहिजे?
इ. वाढत्या वयात होणारे आजार टाळण्यासाठी काय केलं पाहिजे?

| प्रकार एक | प्रकार दोन |
|---|---|
| करायला हवं, करायला पाहिजे, केलं पाहिजे | करायलाच हवं, करायलाच पाहिजे, केलंच पाहिजे |
| उदा॰ आहारावर नियंत्रण ठेवलं पाहिजे. | उदा॰ आहारावर नियंत्रण ठेवलंच पाहिजे. |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

### च. मैदानी खेळ आणि आरोग्य

लहान असल्यापासूनच व्यायाम केला आणि मैदानी खेळ खेळले, तर त्याचा खूप फायदा होतो. शाळकरी मुलांशी ह्या विषयावर बोलणारे त्यांचे शिक्षक त्यांना कोणत्या सूचना आणि सल्ले देत आहेत ते पाहू या आणि वाक्ये पूर्ण करू या.



अ. चांगलं आरोग्य असेल तर .................................................... .

आ. चांगलं आरोग्य म्हणजे .................................................... .

इ. रोज व्यायाम करायचा कंटाळा येतो. त्याला पर्याय म्हणजे ...................................... .

ई. रोजच्या खेळामुळे शरीरातील इतर अवयवांबरोबरच .............................. फायदा होतो.

उ. त्याखेरीज ......................, ......................, ...................... ह्यासारख्या अंतर्गत क्रियाही घडून येतात.

ऊ. दिवसातील काही तास रोज .................................................... .

ए. .............................. आणि .............................. स्पर्श झाल्याने .............................. वाढते.

ॲ. शरीराबरोबरच ...................... ...................... मैदानी खेळ महत्त्वाची भूमिका बजावतात.

ऐ. ...................... आणि ...................... दोन्ही पचवता आली पाहिजेत.

ओ. ...................... आणि संघभावना ह्या गुणांना मैदानापलीकडे दैनंदिन आयुष्यातही खूप महत्त्व आहे.

## ९ खेळ आणि दुखापती

**आई-बाबा म्हणतात :**



खेळताना पडणं, लागणं, जखमा होणं साहजिकच आहे. आम्ही लहान असताना अंगणात खेळायचो त्यावेळी गुडघ्यांना खरचटणं, पाय मुरगळणं, कुठे तरी लचक भरणं ह्या गोष्टी रोजच्याच होत्या. खूपच मोठी जखम म्हणजे डोक्याला खोक पडणं. पण त्याकाळी पडल्याझडल्याचं विशेष कौतुक होत नसे. प्रत्येक घरात प्रथमोपचाराची पेटी असायचीच. जखम स्वच्छ धुतली, त्यावर हळद दडपली, किंवा कोणतं तरी मलम किंवा औषध लावलं की झालं. फार फार तर एक बँड-एड लावायचं त्याच्यावर. एखाद्या पदकासारखं ते बँड-एड मिरवायचो मग आम्ही.

**आम्हा तरुणांना वाटतं :**



जसजसे खेळांचे नवनवीन प्रकार प्रचलित होऊ लागले, तसतसे दुखापतींचे वेगवेगळे प्रकारही लक्षात यायला लागले. आम्ही आता बरेच नवे खेळ खेळतो. जिममध्येही जातो. काही विशिष्ट खेळांत विशिष्ट प्रकारच्या दुखापती होतात. जसं, क्रिकेटची बॅट चुकीच्या पद्धतीनं पकडली तर मनगट दुखावतं. टेनिस एल्बो म्हणजे कोपराला होणारी दुखापत. जिमनॅस्टिक्समध्ये हात-पाय मुरगळणं, पाठीत किंवा कमरेत लचक भरणं हे नित्याचंच. मुका मार म्हणजे न दिसणारी दुखापत. खूप वेदना होणं आणि सूज येणं हे त्याचंच लक्षण. कबड्डी, खो खो सारख्या मैदानी खेळांत जखमा जास्त होतात. खेरीज, हाड मोडू नये याचीही काळजी घ्यावी लागते.

**'स्पोर्ट्स मेडिसिन' चे व्यावसायिक म्हणतात :**



पूर्वी लोक आनंदासाठी, मनोरंजनासाठी, व्यायामासाठी खेळत असत. आता बरेचदा पैशांसाठीही खेळ खेळला जातो. एक व्यवसाय म्हणून खेळांचं महत्त्व जसं वाढलं, तसं 'स्पोर्ट्स मेडिसिन' ह्या नवीन व्यवसायाचा आरंभपण झाला. दुखापत जवळपास प्रत्येक खेळात होतेच. पण त्या होऊच नयेत म्हणून प्रशिक्षण शिबिरेही आयोजित करण्यात येऊ लागली. अशा शिबिरात दुखापती टाळण्यासाठी काही उपाय सांगतात. जसं - सर्वप्रथम तुमचा फिटनेस चांगला राखा, योग्य आहार घ्या, स्नायू बळकट करण्यासाठी जिममध्ये व्यायाम करा, शरीराचं वजन योग्य प्रमाणात ठेवा. जादा वजनामुळे दुखापतींचं प्रमाण वाढू शकतं. कोणताही खेळ असो, तो तंत्रशुद्ध पद्धतीने खेळण्यावरच भर असायला पाहिजे. चांगल्या प्रशिक्षकाने दिलेल्या सल्ल्यांमुळे दुखापतींचा धोका कमी होतो. खेळाडूंनी खेळण्यापूर्वी वॉर्म-अप आणि स्ट्रेचिंगचे पूरक व्यायाम करायला विसरू नये.

**क्रीडा प्रशिक्षणासाठी पारंपरिक पद्धतींचा पुरस्कार करणारे क्रीडा प्रशिक्षक म्हणतात :**



शरीर लवचीक, तंदुरुस्त आणि कार्यक्षम राहावे यासाठी भारतीय योगासनांचा प्रामुख्याने विचार व्हायला लागला आहे. वेगवेगळी योगासने आणि प्राणायाम हे अलीकडे खेळाडूंच्या दिवसाच्या वेळापत्रकात नक्कीच दिसून येतात. माणसाच्या पाठीच्या हालचाली तीन प्रकारच्या असतात. वरच्या दिशेनं ताणले जाणे, डाव्या किंवा उजव्या बाजूला पीळ देणे आणि पुढे किंवा मागे झुकणे. योगासनांचा नियमित सराव केल्याने पाठीच्या हालचालींना उपयोगी पडणारे स्नायू सक्षम होतात. योगासने आणि प्राणायाम ह्यांमुळे शरीर प्रमाणबद्ध राहायला मदत होते. स्नायू मजबूत होतात, शरीर लवचीक होते.

प्राणायाम म्हणजे आपल्या श्वासोच्छ्वासाचे नियंत्रण आणि श्वास रोखून धरण्याची क्षमता वाढवणे. श्वासोच्छ्वासाच्या योग्य तंत्रांचा सराव केल्यास रक्तामधील आणि मेंदूला होणारा प्राणवायूचा पुरवठा वाढतो. एकाग्रता वाढायला मदत होते. ह्याचा अतिशय चांगला परिणाम खेळाडूंच्या कार्यक्षमतेवर दिसून येतो. प्राणायाम आणि योगासने एकमेकांस पूरक आहेत.

**क. ह्या नव्वदी ओलांडलेल्या नानाम्मल आजी बघा, योगासनं करून स्वतःची तब्बेत राखून आहेत.**

**ख. कोणत्या अवयवांना कोणत्या दुखापती होऊ शकतात? अवयवाच्या नावापुढे क्रियापदे लिहू या.**

मुरगळणे, सुजणे, दुखणे, मोडणे, लचकणे, खरचटणे, खोक पडणे, लाल होणे

| अवयव | दुखापती |
|---|---|
| गुडघे | खरचटणे, दुखणे |
| कंबर | |
| डोके | |
| मान | |
| पाठ | |
| हात | |
| डोळे | |
| कान | |
| पोट | |
| मनगट | |
| पाय | |
| कोपर | |

**ग. योग्य त्या क्रियापदाचे बरोबर रूप वापरून रिकाम्या जागा भरू या.**

(मुरगळणे, सुजणे, मोडणे, दुखणे, लचकणे, ठेच लागणे)

अ. मेधा उंच उडी मारताना पडली आणि तिचा हात ------------------------------.

आ. बूट न घालता धावल्यामुळे अजितच्या अंगठ्याला ------------------------------.

इ. मैदानावर एक बारीक खड्डा होता. त्यात महेशचा पाय गेला आणि ------------------------------.

ई. एकदम खाली वाकल्यामुळे सानियाची कंबर चांगलीच ------------------------------.

उ. अजितच्या कानाजवळ बॉल बसला आणि त्याचा गाल चांगलाच ------------------------------.

ऊ. खेळताना पोटाला मुका मार लागल्याचे महिपच्या लक्षात आले नाही. पण मग रात्रभर पोट ------------------------------.

## १० संधी

आपण बोलत असताना अनेक शब्द एकापुढे एक असे उच्चारतो. त्यावेळी एकमेकांशेजारी येणारे दोन वर्ण एकमेकांमध्ये मिसळतात व त्यांचा एक जोडशब्द तयार होतो. उदा॰ आपण 'सूर्य उदय' झाला असे न म्हणता 'सूर्योदय' झाला असे म्हणतो. अशा प्रकारचे जोडशब्द तयार करताना पहिल्या शब्दातील शेवटचा वर्ण व दुसऱ्या शब्दातील पहिला वर्ण हे एकमेकांमध्ये मिसळतात व त्या दोन्हीपासून एक वर्ण तयार होतो. वर्णांच्या अशा एकत्र होण्याच्या प्रकाराला संधी असे म्हणतात.

**क. वाचू या.**



<u>सूर्यास्त</u> होत आला होता. पश्चिमेच्या क्षितिजावरचा लालबुंद <u>गोलाकार</u> सूर्य मनाला भुरळ पाडत होता. <u>हिमालया</u>च्या कुशीत वसलेल्या त्या <u>छोट्याशा</u> गावात सगळं शांत शांत होत चाललं होतं. <u>देवालया</u>तली घंटा वाजू लागली आणि त्या शांततेचा भंग झाला. पुढच्याच क्षणी प्रार्थनेचे सूर त्या शांत वातावरणात घुमू लागले.

**ख. वरील उताऱ्यात अधोरेखित केलेले शब्द संधी होऊन तयार झालेले आहेत.**

| | | |
|---|---|---|
| सूर्यास्त | सूर्य + अस्त | अ + अ → आ |
| गोलाकार | गोल + आकार | अ + आ → आ |
| हिमालय | हिम + आलय | अ + आ → आ |
| छोट्याशा | छोट्या + अशा | आ + आ → आ |

**ग. याचप्रमाणे पुढील तक्त्यातील रिकाम्या जागा भरू या.**

| | | |
|---|---|---|
| देवालय | | अ + आ → आ |
| | इवला + असा | |
| | भाषा + अंतर | आ + अं → आं |
| राजाज्ञा | | |
| | विद्या + अमृत | आ + अ → आ |

## ११ काही नामवंत मराठी खेळाडू



**क. खाशाबा जाधव** : (जानेवारी १५, १९२६ - ऑगस्ट १४, १९८४) हे ऑलिंपिक पदक विजेते भारतीय कुस्तीगीर होते. १९५२ सालातल्या ऑलिंपिकमध्ये त्यांनी जिंकलेले फ्रीस्टाइल कुस्तीतले कांस्यपदक हे भारतासाठी स्वातंत्र्योत्तर काळातले पहिले वैयक्तिक पदक होते.



**ख. अंजली भागवत** : (डिसेंबर ५, १९६९- ) ही एक व्यावसायिक भारतीय नेमबाज आहे. अंजलीला नेमबाजीच्या क्षेत्रामधे मानाचा समजला जाणारा ISSFचा चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्स हा पुरस्कार २००२ साली म्युनिक येथे मिळाला. २००३मध्ये मिलान येथे तिने पहिला विश्वचषक जिंकला. तिने सलग तीन ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. सन २००० मध्ये सिडनी येथे झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत ती अंतिम फेरीपर्यंत पोचली होती. कॉमनवेल्थ खेळामध्ये तिने १२ सुवर्ण व ४ रौप्यपदके जिंकली आहेत. २००३ मधील आफ्रो-आशियाई खेळांमध्ये अंजली भागवतने सुवर्ण आणि रौप्यपदक मिळविणारी पहिली भारतीय महिला नेमबाज बनून इतिहास घडवला. अंजली भागवत हिने आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये १३ नवे विक्रम प्रस्थापित केले आणि ५५ सुवर्ण, ३५ रौप्य व १६ कांस्यपदके जिंकली. भारतातील राष्ट्रीय स्पर्धांमध्ये तिच्या नावावर ८ नवे विक्रम नोंदले गेले.



**ग. स्मृती मानधना** : (जुलै १८, १९९६- ) आयसीसीने २०१८ ह्या वर्षी महिला क्रिकेटपटूंचे पुरस्कार जाहीर केले. यामध्ये भारताची स्टार सलामीवीर फलंदाज स्मृती मानधना हिला २०१८ या वर्षाचा सर्वोत्तम महिला क्रिकेटपटूचा 'रचल हेहो फ्लिंट' हा पुरस्कार आणि 'सर्वोत्तम महिला वन-डे क्रिकेटपटू' ह्या दोन्ही पुरस्कारांनी सन्मानित केले.



**घ. शीतल महाजन** : (सप्टेंबर १९, १९८२- ) ही एक भारतीय प्रोफेशनल स्कायडायव्हर / पॅराशुट जम्पर आहे. २००४ पासून ही स्कायडायव्हिंग (पॅराशुट जंम्पिंग) या खेळात जागतिक स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत आहे. शीतल महाजन हिचा जन्म पुण्यात झाला असून, मूळचे गाव जळगाव

असलेली शीतल ही बहिणाबाई चौधरी यांची पणती आहे. बालपणापासूनच शीतलला काहीतरी नवे करण्याचा ध्यास होता. यातच तिच्यामध्ये पॅराशूट जम्पिंगची आवड निर्माण झाली. शीतलने १७ राष्ट्रीय आणि ६ जागतिक विक्रम केले आहेत.



**च. राही सरनौबत :** (ऑक्टोबर ३०, १९९०- ) राहीला जकार्ता येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेमध्ये २५ मी. पिस्तूल प्रकारामध्ये सुवर्णपदक मिळाले. हे पदक मिळवणारी ती पहिली भारतीय महिला नेमबाज ठरली आहे. राहीचे हे आशियाई क्रीडा स्पर्धेतील पहिले सुवर्णपदक आहे.



**छ. वीरधवल खाडे :** (ऑगस्ट २९, १९९१- ) ऑलिम्पिक स्पर्धेसाठी भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा मान मिळवणारा पहिला आंतरराष्ट्रीय जलतरणपटू वीरधवल खाडे. २००६मधील आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये खाडेने तीन नवीन विक्रम नोंदवीत सहा सुवर्णपदके जिंकली. खाडेला २०१० मध्ये अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

ह्याखेरीज क्रिकेट जगतात **देवधर, गावसकर, वाडेकर** असे अनेक खेळाडू ह्या मराठी मातीने देशाला दिले आहेत. मात्र सर्वांच्या गळ्यातील ताईत होण्याचा मान क्रिकेटवीर **सचिन तेंडुलकरनेच** मिळवला आहे. सर्वांच्याच लाडक्या सचिनची घेऊ या एक छोटीशी भेट.



## करा आणि शिका

**क. दोन चित्रफिती पाहू या आणि कोणत्या वर्षात सचिन तेंडुलकरच्या आयुष्यात कोणत्या महत्त्वाच्या घटना घडल्या ते थोडक्यात सांगू या.**

| चित्रफीत भाग १ | चित्रफीत भाग २ |
| --- | --- |
| १९७३ = मुंबईत जन्म | १९९९ = पद्मश्री पुरस्काराने सन्मानित |
| १९८८ = ---------- | २००३ = ---------- |
| १९८९ = ---------- | २००८ = ---------- |
| १९९२ = ---------- | २०१२ = ---------- |
| १९९४ = ---------- | २०१३ = ---------- |
| १९९८ = ---------- | २०१४ = ---------- |

**ख. तुमचा आवडता / तुमची आवडती खेळाडू कोण? त्याच्या / तिच्या नावावर असलेले विक्रम, त्याने / तिने मिळवलेली पदके, सन्मान ह्याविषयी थोडक्यात माहिती लिहून ती वर्गात सर्वांना सांगू या.**

----------

----------

----------

## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो खेळिया, ते खेळिये | ती खेळी, त्या खेळ्या | ते पुराण, ती पुराणे / पुराणं |
| तो खेळकरी, ते - | ती दमडी, त्या दमड्या | ते जनमन, ती जनमने / जनमनं |
| तो डावपेच, ते - | ती पळती | ते जागरण, ती जागरणे / जागरणं |
| तो उल्हास | ती चुरस, त्या चुरशी | ते भोकाड, ती भोकाडे / भोकाडं |
| तो लोण, ते - | ती खोक, त्या खोका | ते औचित्य, ती औचित्ये / औचित्यं |
| तो अवधी | | |
| तो खेळगडी, ते | | |
| तो भोज्या, ते भोज्ये | | |
| तो गोंगाट | | |
| तो कल्ला | | |
| तो खुंट, ते - | | |
| तो धबडगा, ते धबडगे | | |
| तो कुस्तीगीर, ते | | |
| तो ताईत, ते - | | |
| तो आचरटपणा | | |

## क्रियापद

भोगणे, नमवणे, लोळवणे, पिरगळणे, कळवळणे, श्रमणे, झुगारणे, दुखावणे, पिसणे, पिदवणे

## विशेषण

खट्याळ, भरमसाट, जोशपूर्ण, बाधक, विलासी



## क्रियाविशेषण

आवर्जून, अवलंबून, लक्षपूर्वक, नगण्य

## वाक्प्रचार आणि म्हणी

| | |
|---|---|
| वेगळे वळण घेणे | संसाराचा सारीपाट मांडणे |
| नशिबाचा खेळ असणे | डाव अर्ध्यात सोडून जाणे |
| दान उलटे पडणे | डावपेच आखणे |

## नाम / इतर शब्द + क्रियापद

खेळी करणे, डाव उलटवणे, डाव फिरवणे, मुळे रुजणे, सत्कारणी लावणे, बाधा आणणे, वळण लावणे, वळण घेणे, सूत्रे हलवणे, बाद होणे, वेळ काढणे, गळा काढणे, कारभार बघणे, भोज्या देणे, गोष्टी परत परत उगाळणे, मैदानात उतरणे, बरोबरी होणे, पुरस्कार करणे, समावेश करणे, लचक भरणे, इतिहास रचणे, परिणाम भोगणे

## आता मला हे येतं...

**खेळाशी संबंधित शब्द जाणून घेणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**व्याकरण : धातुसाधित क्रियाविशेषणे समजून घेणे – उदा॰ उठल्याबसल्या, पडल्या पडल्या**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**प्रयोग – उजळणी करणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**महाराष्ट्रातील विविध खेळांविषयी माहिती घेणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**खेळ, व्यायाम आणि योगासने ह्यांचे वाढते महत्त्व जाणून घेणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**केले पाहिजे, करायला पाहिजे, करायला हवे ह्यातील फरक समजून घेणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**खेळ आणि दुखापतींबद्दल बोलणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**संधी ओळखणे आणि करणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**प्रसिद्ध खेळाडूंची माहिती घेणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# पेहेराव आणि फॅशन

## २



### चला, शिकू या ...

- महाराष्ट्रातील पेहेराव ओळखणे
- काळानुरूप झालेले पेहेरावातील बदल समजून घेणे
- व्याकरण : अधिविशेषण (पूर्वविशेषण) / विधिविशेषण (उत्तरविशेषण)
- ‘चांगला प्रकार – चांगल्या प्रकारे’ अशा शब्दसमूहांचा योग्य वापर करणे
- महाराष्ट्रीय दागिने ओळखणे आणि सांगणे
- विशेषणांचा नामासारखा वापर करणे
- बदलते ट्रेंड्स जाणणे
- संधी ओळखणे आणि करणे

## १ महाराष्ट्रातील पेहेराव


१


२


३


४


५


६


७


८


९


१०

संभाषण

**क. महाराष्ट्रीय लोकांची वेशभूषा, त्यांच्या पेहेराव आणि दागदागिन्यांविषयीच्या आवडीनिवडी इत्यादींबद्दल एव्हाना तुम्हाला बरीच माहिती पाठ्यपुस्तकातून किंवा तुमच्या मित्रमंडळींकडून मिळाली असेल.**

अ. वरील चित्रे पाहून ती पुढीलपैकी कोणत्या काळातील असतील ह्याचा अंदाज बांधू या.

आ. त्यासाठी पुढील गोष्टी विचारात घेऊ या.

१. पेहेराव

२. शिरोभूषण

३. दागदागिने

४. शरीरबोली

एकोणिसावे शतक, पूर्वार्ध = चित्र क्रमांक - ८, उत्तरार्ध = चित्र क्रमांक - ..................

विसावे शतक, पूर्वार्ध = चित्र क्रमांक - ४, उत्तरार्ध = चित्र क्रमांक - ..................

**ख. आपला अंदाज वर्गात इतरांना सांगू या आणि आपण हा अंदाज का बांधला तेही सांगू या. इतरांचे केलेले अंदाजही ऐकू या आणि एकत्र चर्चा करू या.**

ग. खाली कंसात दिलेल्या कपड्यांची आणि आभूषणांची नावे योग्य त्या चित्राखाली लिहू या. (ओढणी, पगडी, सलवार, नऊवारी साडी, फेटा, ठुशी, धोतर, नथ)

घ. ह्यांपैकी कोणत्या वस्तू महाराष्ट्रीय पेहेरावाचा भाग असतात? (योग्य उत्तरापुढे ✓ अशी खूण करू या.)





ओढणी



------------------------



------------------------



------------------------



------------------------ ✓



------------------------



------------------------



------------------------

**च. महाराष्ट्रीय पेहेराव**

**खालीलपैकी कोणता पेहेराव खास महाराष्ट्रीय आहे हे तुम्ही ओळखू शकाल? योग्य उत्तरापुढे ✓ अशी खूण करू या.**


अ


आ


इ


ई

## २ महाराष्ट्रातील पेहेराव – भाग १

देशाच्या इतर भागांतल्या लोकांच्या दृष्टीने अर्वाचीन महाराष्ट्र हा जरा खडबडीतच प्रदेश आहे. कवी गोविंदाग्रजांनी त्याचे वर्णन करताना म्हटल्याप्रमाणे 'राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा' वगैरे तो आहेच; पण हे त्याचे केवळ भौगोलिक वर्णन नव्हे. इथला माणूसही तसाच आहे, खडबडीत. अनेक शतकांपासून उत्तरेकडून येणाऱ्या आक्रमकांच्या लाटा अंगावर घेतल्यामुळे असेल; तो राकट आहे, टणक आहे, 'मोडेन पण वाकणार नाही' अशा बाण्याचा लढवय्या आहे. त्याच्या अंगात रगेलपणा आहे, पण रंगेलपणा बेताचाच. जीवनाचा सर्वांगाने रसरसून उपभोग घेण्याची विलासी वृत्ती एकंदरीत कमीच. ती जोपासण्यासाठी आवश्यक असते तेवढी फुरसत त्याला मिळाली नसावी; आणि जरी मिळाली असती, तरी तो विलास परवडायला हवा ना! स्वातंत्र्य गमावलेल्या, परक्या सत्तेखाली दबलेल्या समाजामध्ये तशी स्वप्नेही पाहण्याचे त्राण उरलेले नसते.

त्यातच, सरत्या एकोणिसाव्या शतकात संपूर्ण देशात स्वातंत्र्याच्या चळवळीने जोर धरला. सुखवस्तू कुटुंबांमधली माणसेही घरादारावर तुळशीपत्र ठेवून स्वातंत्र्यलढ्यात उतरत होती. स्वार्थत्याग, साधेपणा, काटकसर वगैरे मूल्यांना भलतेच महत्त्व आले होते. तेव्हाच्या पिढ्या रांगत्या वयापासूनच 'साधी राहणी, उच्च विचारसरणी', 'धट्टीकट्टी गरिबी, लुळीपांगळी श्रीमंती', 'पैसा हे विष आहे', 'संपत्ती माणसाला बिघडवते' वगैरे सुभाषिते घोकतच मोठ्या होत होत्या. साहजिकच, ह्या सगळ्याचे प्रतिबिंब त्यांच्या राहणीमध्ये, सवयींमध्ये, पेहेरावामध्ये उमटत होते. प्रसिद्ध लेखक प्रल्हाद केशव अत्रे १९०८च्या सुमारास पुण्यात राहायला आले. तेव्हाच्या पुण्याबद्दल ते लिहितात :



पुणे हे त्यावेळी दोन गोष्टींसाठी प्रसिद्ध असे : पुणेरी पगडी आणि जोडे. एक डोक्यावर वापरायची गोष्ट आणि दुसरी पायांत घालायची

वस्तू. दोहींचाही रंग लालभडक असे. डोक्यावर लाल ऐटबाज पगडी ठेवून आणि पायात सुबक रंगीत जोडा घालून हातांत मोतियाचा गजरा खेळवीत एखादा हौशी पुणेकर बुधवार चौकातून बेलबागेच्या रोखाने जाऊ लागला म्हणजे ते एक बघण्यासारखे दृश्य असे. पुणेरी जोड्याचे मात्र एक वैशिष्ट्य असे : तो कोरा असेपर्यंतच त्याची खरी शोभा आणि दिवाणखान्यात न्यायची त्याची लायकी. तो जुना झाला की काही लोक त्याला ठिगळे लावून आणि गोठ घालून वापरीत; पण तो अतिशयच हास्यास्पद दिसे. पावसाळ्याच्या दिवसांत पुणेरी जोडे घालणाऱ्या पुणेकरांची मात्र खूपच फजिती उडत असे. चालताना त्यांच्या टाचेखालचा चिखल मागे कोटावर उडू लागे आणि थोड्या वेळातच कोटाच्या पाठीवर उभे गंध लावल्यासारख्या चिखलाच्या दोन जाड रेषा उमटलेल्या दिसू लागत. वहाणा आणि चपला येऊ लागल्यापासून मात्र हा पुणेरी जोडा हलके हलके नाहीसा होऊ लागला. त्या काळी पुण्यात पोशाखाची 'फॅशन' अशी मुळीच नव्हती असे म्हटले तरी चालेल. वेशभूषेचा नीटनेटकेपणा आणि व्यवस्थितपणा फारच क्वचित् आढळून येई. बहुतेकांच्या दाढ्या बोट बोट वाढलेल्या असत, आणि निम्म्याहून अधिक लोक रस्त्याने अनवाणीच जात. शाळा-कॉलेजातली मुले डोक्यावर हंगेरियन टोप्या घालीत आणि पुस्तकांची पिशवी पोस्टमनाप्रमाणे गळ्यामध्ये आडवी घालून अन् धोतराचा घट्ट काचा मारून रस्त्याने जात.



बायकांच्या किंवा मुलींच्या पोशाखांत त्यावेळी काहीच आकर्षण नव्हते असे म्हटले तरी चालेल. रंगीबेरंगी पातळांचा शोध त्यावेळी लागलेला नव्हता. घरी धुतलेली विटक्या रंगाची सुती लुगडी नेसूनच स्त्रीवर्ग घराबाहेर वावरायचा. संसारी स्त्रियांची वेशभूषा त्या वेळी जुनाट तऱ्हेची होती.(...)

पायापासून डोक्यापर्यंत इंग्रजी पद्धतीचा पोषाख केलेले पुरुष त्यावेळी गावामध्ये मुळीच दिसत नसत. काही सुशिक्षित माणसे पायात नुसते पायमोजे आणि बूट घालीत, तर काही सदऱ्यावर नुसत्या कडक कॉलरी घालत. आणि एखादा फारच फॅशनेबल माणूस धोतर नेसून वर गळ्याभोवती 'नेकटाय' बांधून ऐटीने रस्त्यातून चाले. सायकलवरून जाणारा एखादादुसरा माणूस डोक्याला तरटाची साहेबी टोपी घाली, तर तेवढ्यामुळे त्याला केवढा गर्व चढलेला दिसे! काळी मखमलीची 'गंधर्व टोपी' ही पुण्यातील पोषाखामधली मला आठवत असलेली पहिली क्रांती होय. या टोपीचा प्रसार त्या काळात झपाट्याने झाला आणि तिने लवकरच बाकीच्या सर्व टोप्यांचे उच्चाटन करून टाकले.



**- प्रल्हाद केशव अत्रे**

('मी कसा झालो' ह्या लेखातील संपादित अंश)

**क. वरील उताऱ्यात आपण सरत्या एकोणिसाव्या शतकात आणि विसाव्या शतकाच्या सुरवातीस दिसणारे महाराष्ट्राचे आणि मराठी माणसाचे चित्र पाहिले. जोड्या जुळवून ते समजावून घेऊ या.**

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | खडबडीत प्रदेश | १. | बोट बोट वाढलेल्या दाढ्या, रस्त्याने अनवाणी चालणारे लोक |
| आ. | संसारी स्त्रिया | २. | रंगेलपणा आणि विलासी वृत्तीची कमतरता |
| इ. | विटक्या रंगाचे कपडे | ३. | गंधर्व टोपी |
| ई. | मराठी माणूस | ४. | अनाकर्षक पोषाख |
| उ. | मराठी माणसातील उणीव | ५. | साधी राहणी उच्च विचारसरणी, 'धट्टीकट्टी गरिबी- दुबळी श्रीमंती, पैसा हे विष आहे, संपत्ती माणसाला बिघडवते. |
| ऊ. | त्या काळातील पुण्याचे वैशिष्ट्य | ६. | मळखाऊ आणि जुनाट वेशभूषा |
| ए. | साधेपणा, गरिबी वगैरेंना गौरवणाऱ्या म्हणी / वाक्प्रचार / सुभाषिते | ७. | धोतर नेसून वर गळ्याभोवती 'नेकटाय' बांधणे, सदऱ्यावर नुसत्या कडक कॉलरी घालणे |
| ॲ. | इंग्रजी पद्धतीच्या पोषाखाचे अनुकरण करण्याची सुरुवात | ८. | राकट, कणखर, दगडांचा देश |
| ऐ. | पुण्यातील पोषाखामधली पहिली क्रांती | ९. | टणक, रगेल, राकट, लढवैय्या |
| ओ. | वेशभूषेत नीटनेटकेपणाचा आणि व्यवस्थितपणाचा अभाव | १०. | पुणेरी पगडी आणि जोडे |

## ३ महाराष्ट्रातील पेहेराव – भाग २



त्या काळात पोषाखाबाबत पुण्याचे हे असे, तर इतर लहानमोठ्या शहरांमधील दृश्य निराळे असण्याची शक्यता जवळपास नव्हतीच. एवढेच कशाला, मुंबईसारख्या राजधानीतही धनिकांची वस्ती असलेले काही मोजके भाग सोडले, तर बाकीच्या मुंबईचे चित्र थोडेफार तसेच होते.

रंगभूमीवरील गंधर्वांनी पोशाखामध्ये केलेली क्रांती टोपीपुरती मर्यादित नव्हती. स्त्री-भूमिका पुरुषांनीच करण्याची तेव्हा पद्धत होती. तिच्यानुसार गायक-अभिनेता नारायणराव राजहंस उर्फ बालगंधर्व संगीत नाटकांमध्ये नायिकेच्या भूमिका करत असत. बऱ्याच नाटकांची कथानके पौराणिक असूनही समकालीन समाजातील स्त्रियांप्रमाणे बालगंधर्वही नऊवारी लुगडेच नेसत. नेसण्याची त्यांची विशिष्ट आणि आकर्षक पद्धत होती. त्याच काळातील लोकप्रिय चित्रकार राजा रविवर्माही आपल्या रंगचित्रांमधल्या

स्त्रियांना नऊवारी लुगडेच नेसवत. ह्या दोघांनी रंगवलेल्या पात्रांच्या नेसण्याच्या लफ्फेदार आणि कलात्मक शैलीची भुरळ मराठी स्त्रियांना पडली. त्याअगोदर लुगडे अंगाभोवती केवळ गुंडाळले जायचे. आता सधन घरातल्या आणि शिकलेल्या स्त्रिया ते गंधर्वांच्या पद्धतीने नेसून त्याचा टाचेपर्यंत येणारा घोळ पावलांनी सावरत डौलात चालण्याची खटपट करू लागल्या. 'फॅशन' हा इंग्रजी शब्द तेव्हा कुणाच्या परिचयाचा नसेल; पण अशा नव्या चालीरिती येऊ लागल्या होत्या, सनातनी मंडळी त्यावर टीका करत होती तरीही त्या रुळत होत्या, आणि समाजमन आतून अजूनही जिवंत असल्याची ग्वाही देत होत्या.

**क. वरील उतारा पुन्हा नीट वाचू या आणि पुढील वाक्ये पूर्ण करू या.**

अ. ------------ हे त्या काळातील अतिशय लोकप्रिय ------------ होते.

आ. ------------ त्या काळी ------------ ------------मध्ये नायिकेच्या भूमिका करत.

इ. त्या काळातील ------------ ------------ ------------ महिला ह्या गोष्टीत बालगंधर्वांचे अनुकरण करू लागल्या.

ई. ------------ ह्यांनी रंगभूमीवर आणि ------------ ह्यांनी चित्रातून दाखवलेल्या ------------ आणि ------------ ------------ लोकांना भुरळ पडली आणि त्याचा परिणाम त्यांच्या ------------ होऊ लागला.

उ. काही ------------ ------------ ह्या नव्या ------------ टीका करू लागली.

ऊ. ------------ आतून जिवंत असल्याची ------------ ह्या रुळणाऱ्या नव्या चालीरिती देत होत्या.

**ख. वरील उताऱ्यात काही विशेषण + नाम अशा जोड्या अधोरेखित केल्या आहेत. त्यांच्यापासून आधी पूर्ण वाक्ये लिहू या आणि नंतर खाली दिलेल्या उदाहरणाप्रमाणे ती वाक्ये वेगळ्या पद्धतीने परत लिहू या. नाम आणि विशेषण ह्यांच्या जागांकडे विशेष लक्ष देऊ या.**

उदा. नऊवारी साडी नेसण्याची बालगंधर्वांची विशिष्ट आणि आकर्षक पद्धत होती.
नऊवारी साडी नेसण्याची बालगंधर्वांची पद्धत विशिष्ट आणि आकर्षक होती.

अ. राजा रविवर्मा हे त्या काळातील लोकप्रिय चित्रकार होते.
त्या काळात राजा रविवर्मा हे ------------ ------------ होते.

आ. ------------------------------------------------
------------------------------------------------

इ. ------------------------------------------------
------------------------------------------------

ई. ------------------------------------------------
------------------------------------------------

उ. ------------------------------------------------
------------------------------------------------

व्याकरण

टीप :
विशेषण हे सामान्यतः नामाच्या आधी येते. उदा. तो चांगला मुलगा आहे.
पण ते कधी कधी नंतरही येते. जसे : तो मुलगा चांगला आहे.
नामाच्या आधी येणाऱ्या विशेषणाला आपण अधिविशेषण (पूर्वविशेषण) म्हणतो आणि नामाच्या नंतर येणाऱ्या विशेषणाला विधिविशेषण (उत्तरविशेषण) म्हणतो.

## ४ अधिविशेषण आणि विधिविशेषण

**क. पुढील वाक्यांतील अधिविशेषण किंवा विधिविशेषण यांच्या जागांची अदलाबदल करू या. असे बदल करताना त्या वाक्यांत काही बदल करावे लागतील, त्याकडेही लक्ष देऊ या.**

उदा. हे आंबटगोड सरबत पिऊन मला खोकला झाला तर?
हे सरबत आंबटगोड आहे, ते पिऊन मला खोकला झाला तर?

अ. स्त्री कमावती असेल तर कुटुंबाची जबाबदारी उचलू शकेल.
------------------------------------------------------------ .

आ. मनमिळाऊ स्वभाव असला, की माणसाला मित्रांची कमतरता भासत नाही.
------------------------------------------------------------ .

इ. आमचे शिक्षक प्रेमळ होते. ते सहसा कोणावरच ओरडत नसत.
------------------------------------------------------------ .

ई. त्या जुनाट आणि भयाण वाड्यात राहायला जाण्याची कल्पना तरी कशी करवते तुला?
------------------------------------------------------------ .

उ. ती घटना दुर्दैवी होती. त्यानंतर मनाने निराश आणि दुःखी होऊन शीतल घराकडे परतली.
------------------------------------------------------------ .

**ख. चला, खेळू या!**

वर्गातील विद्यार्थ्यांचे अ आणि ब असे दोन गट करू या. खालील चौकटीतील एक एक वाक्यसंच प्रतिस्पर्धी गटांनी आळीपाळीने एकमेकांना द्यायचा आहे. त्या गटाने त्या वाक्यांपासून एकच वाक्य बनवायचे आहे आणि असे करताना विधिविशेषणाऐवजी अधिविशेषण वापरायचे आहे. जो गट जास्तीत जास्त वाक्ये बरोबर करेल, तो विजेता ठरेल.





उदा. ती मुलगी खट्याळ आहे. ती खात असलेले आवळे आंबट आहेत.
ती खट्याळ मुलगी आंबट आवळे खात आहे.

अ. त्या खुर्चीवर बसलेला माणूस उंच आहे. तो मला दिसतोय. ती खुर्ची लोखंडी आहे.
आ. माझी ही मैत्रीण बरीच जुनी आहे. तिनं मला कालच एक भेटवस्तू दिली. ती भेटवस्तू महाग आहे.
इ. निबंधाचा हा विषय फार अवघड आहे. त्याऐवजी विषय जर सोपा असेल तर निबंध पटकन लिहून होईल.
ई. अरे वा! बटाटेवडे अगदी गरमगरम आहेत. त्यांच्याबरोबरची चटणी जर झणझणीत असेल तर खायला काय मजा येईल!
उ. शेतकऱ्यानं काड्या जमवून शेकोटी केली. त्या काड्या वाळक्या होत्या. त्यातून निघणारा धूर चावरा होता. त्यानं आमचे डोळे चुरचुरू लागले.
ऊ. ती फुलदाणी काचेची आहे. तिच्यात ठेवलेली फुले लाल आहेत. म्हणून ती जास्त उठून दिसत आहे.

## ५ मराठी माणूस

**क. उजव्या रकान्यातील योग्य शब्द भरून डाव्या रकान्यातील उतारा पूर्ण करू या.**



अण्णा भारदे हे आमच्या गावातलं एक मोठं नाव. प्रसिद्ध पहिलवान आणि नामवंत क्रीडातज्ज्ञ. त्यांचा सत्कार करायचं ठरवलं होतं गावानं आणि आज त्याचंच आमंत्रण द्यायला मी आलो होतो त्यांच्याकडे.

एकेकाळी तालुक्यातील प्रसिद्ध पहिलवान असलेला हा उमदा, -------------- आणि --------------गडी त्याच्या रसिकतेसाठी आणि --------------------साठीही तितकाच प्रसिद्ध होता. नाटक, सिनेमा आणि संगीत मैफिलीत अण्णांची हजेरी कायम असे. अण्णांची उमेदीची वर्षे संपली आणि वय उताराला लागलं. त्यांच्या व्यावसायिक जीवनातील त्या ------------ काळातही पायातील ------------ करकर वाजवत, धोतराचा ------------- हाताने सावरत अण्णा रस्त्यातून निघाले, की त्यांचा रुबाब पाहण्यासारखा असे. त्यांच्या चालीतला ------------- त्या वयातही कायम होता, आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची लोकांवर असलेली ------------- तेव्हाही टिकून होती.

अण्णांचं वय आता बरंच जास्त होतं. आवाज चढवून मोठ्यानं बोलण्याचं ------------- आता त्यांच्यात राहिलं नव्हतं. अगदी खालच्या पण ------------- आवाजात त्यांनी दोन्ही हात जोडून आमच्या निमंत्रणाचा स्वीकार केला आणि मी आनंदाने गदगदलो.

राकट
धारदार
रगेल
रंगेलपणा
त्राण
सरत्या
वहाणा
भुरळ
डौल
घोळ

**ख. उजव्या रकान्यातील योग्य शब्द भरून डाव्या रकान्यातील उतारा पूर्ण करू या.**

आमचं आजोळ कोकणात. अगदी छोटंसं गाव होतं ते. घरची काही गरिबी नव्हती, पण तरीही राहणी कमालीची साधी. लहानपणी आम्ही गावी गेलो, की आमचे शहरी कपडे बाजूला ठेवून गावच्या लाल मातीत वावरायला योग्य असे .................... कपडे घालत असू. गावातल्या .................... रस्त्यांवरून बिनधास्त .................... चालायचो आम्ही. आमच्या नाजूक शहरी .................... तशाही इथे काही उपयोगाच्या नव्हत्या. हातशिलाईने आणि ठोकून ठोकून गावच्या चांभाराने बनवलेल्या .................... इथे चालल्या असत्या. पण गावच्या पंधरा-वीस दिवसांच्या मुक्कामासाठी त्या कोण बनवणार? नाही तरी इथे शहरी नीटनेटकेपणा नकोच होता. आमची आजी तर कायम जुनाट, .................... लुगड्यात वावरत असे. .................... फाटलं, तर ते .................... लावून नेसायलाही तिला काही वाटत नसे. कोणी येणार असेल, किंवा कुठे जायचं असेल, तरच ती जरा बरे कपडे घाली. आईही मुंबईची फॅशन असणारी छान छान .................... इथे नेसत नसे. इथे आल्यावर ती साधी .................... नेसायची. जेवायलाही सगळे खाली जमिनीवरच बसायचे. आमच्याबरोबर आमच्या मामेभावंडांनाही बसायला मामा .................... अंथरायचा, त्याची केवढी अपूर्वाई वाटायची त्यांना!

जुनाट
चपला
ठिगळ
अनवाणी
विटक्या
पातळं
खडबडीत
तरट
लुगडीच
लुगडं
वहाणाच

## ६ दोन इंचांचा फरक

**दोन मैत्रिणींमधील संवाद ऐकू या.**

**क. खालीलपैकी बरोबर पर्यायावर ✓ खूण करू या.**

अ. आरती घामाघूम का झाली आहे?
 १. जिने चढली म्हणून
 २. धावत आली म्हणून
 ३. काहीतरी अघटित पाहिलं म्हणून

आ. स्वराने केस का कापले आहेत?
 १. आजार झालाय म्हणून
 २. फॅशन म्हणून
 ३. उकाड्याने डोक्याला घाम येतो म्हणून



इ. स्वराचे केस कोणी आणि का कापले?
 १. स्वराच्या आईनं जबरदस्तीनं
 २. आईनं स्वराच्या इच्छेनुसार
 ३. आजीनं स्वराच्या इच्छेनुसार

ई. केशरचनेचे कोणते प्रकार ह्या श्राव्य उताऱ्यात ऐकू आले? किमान तीन नावे लिहू या.

१. ----------------------------------

२. ----------------------------------

३. ----------------------------------

उ. अलकाचे केस तिच्या लहानपणी कसे होते?

१. लांब केस

२. आखूड केस

३. दोन इंच लांब केस



ऊ. आरतीचे केस किती लांब आहेत असं अलका म्हणते?

१. दोन इंच

२. तीन इंच

३. स्वराच्या केसांपेक्षा आखूड

## ७ चांगला प्रकार – चांगल्या प्रकारे



आमचा कुत्रा जिमी चावरा आहे हे सगळ्यांनाच माहीत आहे. त्यामुळे आमच्याकडे येण्याआधीच सगळे आम्हाला फोन करून 'तुमच्या चावऱ्या कुत्र्याला बांधून ठेवा' असं सांगतात. ठीक आहे, मला ह्याचं वाईट नाही वाटत. पण जिमीला सगळे ज्या प्रकारे कुत्रा - कुत्रा - कुत्रा असं करतात तो काही बोलण्याचा चांगला प्रकार नाही, इतकंच. आता आपण माणसाला जे नाव ठेवतो, त्याच नावानं हाक मारतो ना? मग माझ्या जिमीलाही जरा चांगल्या प्रकारे 'तुझ्या जिमीला बांधून ठेव' असं का म्हणत नाहीत हे लोक? कुत्राच काय, कोणताही प्राणी संवेदनशील असतो. तुम्ही त्याला ज्या प्रकारे वागवाल, त्याच प्रकारे तो तुमच्याशी वागतो. तुमची वागणूक चांगली असेल तर त्या चांगल्या वागणुकीचा चांगला परिणाम तुम्हाला लगेच दिसेल. तुम्ही प्राण्यांशी प्रेमाने वागा, प्राणीही तुमच्याशी प्रेमाने वागतील.

**क. वरील उतारा परत वाचू या. वाचताना अधोरेखित नाम-विशेषण जोड्यांकडे अधिक लक्ष देऊ या, आणि त्यांत होणारे बदल केव्हा आणि कसे होत आहेत ते समजून घेण्याचा प्रयत्न करू या.**

अ. चावरा कुत्रा – चावऱ्या कुत्र्याला

आ. ------------------------------ ---------------------------

इ. ------------------------------ ---------------------------

टीप :
नामाला विभक्तिप्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय जोडताना त्याच्या विशेषणाला नेहमी 'या' हेच अक्षर जोडले जाते.

व्याकरण

**ख. कंसात दिलेल्या विशेषणांची योग्य रूपे वापरून वाक्ये पूर्ण करू या.**



अ. निशांत, ---------------------------- (पांढरा) शर्ट घालून पावसात बाहेर जाऊ नकोस. -------------------- शर्टावर चिखलाचे डाग पडतील आणि जाता जाणार नाहीत.

आ. नेहानं पोपटाचं -------------------- (छोटं) पिल्लू घरी आणलं. भाऊ त्या ------------- (छोटं) पिल्लाला पिंजऱ्यात डांबण्याच्या सक्त विरोधात होते.

इ. ---------------- (ओला) हातानं मिठाचा डबा उघडू नकोस, ------------- (सगळं) मिठाला पाणी सुटेल.

ई. ---------------------- (थोडा) वेळानं आलास तर तुझी आणि माझ्या ------------------ (जवळचा) मित्राची भेट होईल.

उ. ----------------------- (पांढरा) रंगाच्या साडीवर ------------------ (निळा) रंगाचं पोलकं कसं दिसेल?

ऊ. "त्या ------------------ (पडका) वाड्यामागे एक ---------------- (वठलेलं) झाड आहे. त्या ---------------------- (वठलेलं) झाडावर एक भयानक भूत राहतं," मन्या चिंटूला भीती दाखवत म्हणाला.

## ८ मावशीचे दागिने

तारामावशी ही काही मंजिरीची सख्खी मावशी नव्हे. तिच्या आईची शाळेपासूनची मैत्रीण म्हणून ती मावशी. दोघींचे छान जमते, म्हणून बघणाऱ्याला त्या सख्ख्या वाटतात. मावशीचा नवरा काही वर्षांपूर्वी अचानक वारला. तेव्हापासून ती त्यांच्या महाबळेश्वरच्या जुन्या कौलारू घरात एकटीच राहते. दरवर्षी दिवाळीअगोदर मंजिरीला फोन येतो : "दिवाळी आली, मंजे, कधी येतेस? वाट पाहते."



ठरवलेल्या दिवशी मंजिरी जाते. ब्रिटिशांच्या काळात बांधलेल्या त्या प्रशस्त घरात स्वयंपाकघराला लागून कोठीची खोली आहे. तिचे आता अडगळीच्या खोलीत रूपांतर झाले आहे. मावशीशिवाय फक्त मंजिरीलाच तिथे प्रवेश असतो. वर्षभरात जमलेल्या नाना प्रकारच्या वस्तूंचा छताला टेकेल एवढा ढीग कमी करायचा आणि शक्य तितकी स्वच्छता करायची, हे मंजिरीचे वार्षिक काम असते.

त्या ढिगाच्या तळाशी एक मोठा लोखंडी पेटारा आहे; जुना, काळा पडलेला. त्याच्या पुढ्यातली जागा स्वच्छ करून मावशी तिथे चटई अंथरते. मग पेटाऱ्याचे जाडजूड कुलूप उघडून झाकण वर उचलते. पेटारा काठोकाठ भरलेला असतो. आदल्या वर्षी मंजिरीनेच साधे पांढरे मांजरपाट ताणून बसवलेले असते, ते ती अलगद काढते आणि नीट घडी करून बाजूला ठेवते. त्याच्या खाली असतात जरीच्या खानदानी भारदस्त साड्यांच्या आणि लुगड्यांच्या घड्या. काही मावशीच्या, काही तिच्या सासूबाईंच्या, काही तिच्या

आजेसासूबाईंच्याही. किमान सत्तर-ऐंशी वर्षे जुन्या. पण काय त्यांचे रंग! अंजिरी, बैंगणी, गुलबक्षी, आकाशी, मोतिया, हळदी. साड्यांचे प्रकारही किती! पैठणी, नारायणपेठी, कांजीवरम, इंदुरी, चंदेरी, महेश्वरी, ढाका, जरीकाठी बांधणी, नागपुरी कोशा, काही रेशमी, काही गर्भरेशमी, काही बुट्टेदार... मंजिरीची नजर त्यांच्यावरून हलत नाही.



मग पेटाऱ्याच्या तळाशी ठेवलेले दागिन्यांचे डबे बाहेर येतात. एकेक दागिना काढून मावशी एकेका साडीवर ठेवते आणि प्रत्येक वेळी पहिल्यांदाच सांगत असल्यासारखे सांगते : "ही मोहनमाळ आजेसासूबाईंची... हा तन्मणी माझा. सासूबाईंची चिंचपेटी, हा कंठा, ही एकदाणी... हा मोत्यांचा गजरा माझ्या लग्नात केलेला... ." बांगड्या, तोडे, वाक्या, बिंद्या, चांदीचा कमरपट्टा, तोरड्या.

"आणि नथ?" मंजिरी म्हणते.

मावशी हसते आणि पेटाऱ्यातून गर्द निळ्या मखमलीची डबी काढते; उघडून मंजिरीच्या हातावर ठेवते.

"मावशी, घालून दाखव नं, प्लीज!"

"नाही गं बाई! जाणारच नाही ती माझ्या नाकात आता. नकोच."

"मग फोटो दाखव आणि त्यामागे लिहिलेलंही वाचून दाखव."



"हट्टी आहेस अगदी," मावशी लटक्या रागाने म्हणते, पण पेटाऱ्यातून एक कागदी लखोटा काढते, त्यातून एक मोठासा फोटो काढते. नथ घातलेला तिचाच अतिशय देखणा फोटो. मागच्या बाजूला लिहिलेल्या कुठल्याशा जुन्या गाण्याच्या ओळी कापऱ्या आवाजात वाचून दाखवते :

नाकात वाकडा नथीचा आकडा
मोत्याचं कुलूप ओठांच्या कवाडा
बंदोबस्त का गं केला एवढा...

मंजिरी खदखदून हसते आणि प्रेमाने मावशीचा गालगुच्चा घेते.

मावशीने सकाळीच चिंच भिजवून ठेवलेली असते. त्या पाण्यात ती दागिने थोडा वेळ बुडवून ठेवते. मग दोघी ते हळूहळू चोळतात, स्वच्छ पाण्यात धुऊन काढतात, कोरडे करतात आणि जिथल्यातिथे पुन्हा ठेवून देतात. एका वर्षासाठी बंद.

"मावशी, तू मलाच का बोलावतेस?" एकदा मंजिरीने विचारले, "तुझी सून आहे, मुलगी आहे..."

"त्यांच्यासाठी हे फक्त सोनं आहे, मंजू. माझ्यासाठी ह्या आठवणी आहेत; माणसांच्या, प्रसंगांच्या... ह्यांच्या-माझ्या नात्याच्या... त्या मला मरेपर्यंत जवळ हव्या आहेत. नंतर त्यांचं जे होईल ते होईल. आणि तुझ्यापासून काही धोका नाही."

"म्हणजे?"

"लंकेच्या पार्वतीसारखी राहणारी तू, काही घे म्हटलं तरी घ्यायची नाहीस. म्हणून तुला बोलावते, कळलं?"

मावशी खट्याळ हसते आणि मायेने मंजिरीच्या पाठीवरून हात फिरवते.

**क. तारामावशी पुढील दागिने शरीरावर कुठे घालत असतील?**

अ. मोहनमाळ – गळ्यात
आ. कंठा - ------------------------------
इ. बांगड्या - ------------------------------
ई. अंगठी - ------------------------------
उ. तोरड्या – पायात
ऊ. नथ - ------------------------------
ॲ. बिंदी - ------------------------------
ऑ. पैंजण - ------------------------------

तारामावशी मंजिरीला म्हणतात "ह्या डब्यात मी माझं गळ्यातलं ठेवणार आहे. दे बरं एक गळ्यातलं मला!" मंजिरी त्यांना काय देईल? उदा॰ मोहनमाळ

**ख. ह्याप्रमाणेच खाली वरील अलंकारांपैकी एक लिहा.**

अ. गळ्यातलं – ------------------------------
आ. नाकातलं – ------------------------------
इ. पायातलं – ------------------------------
ई. हातातलं – ------------------------------



पण – दागिना जेव्हा अवयवाभोवती बांधला जातो, तेव्हा त्याचा प्रत्यय बदलतो.
उदा॰ कंबरपट्टा = कंबरेचं

उ. कंबरेचं - ------------------------------
(कंबरपट्टा = कमरपट्टा)

टीप :
वरील सरावात 'गळ्यातलं, नाकातलं, हातातलं' हे शब्द आपण नामे म्हणून वापरले आहेत. 'गळ्यातली मोहनमाळ' मधील 'गळ्यातली' ह्या विशेषणापासून इथे 'गळ्यातलं' हे सामान्यनाम केले आहे. ते गळ्यात घालण्याच्या सर्व अलंकारांसाठी वापरता येईल. ह्याचप्रमाणे 'हातातली बांगडी' = हातातलं, 'कंबरेचा कंबरपट्टा' = कंबरेचं इत्यादी.





**ग.** मंजिरी तिच्या स्वतःच्या आईला पत्र लिहिते आणि आईला प्रथमच ती दरवर्षी तारामावशीच्या महाबळेश्वरच्या बंगल्यात तिला मदत करायला कशी जाते, हे सविस्तर सांगते. मंजिरीच्या भूमिकेतून हे पत्र लिहून आईला सविस्तर माहिती देऊ या. पत्र अनौपचारिक भाषेतच लिहायचे आहे. पुढील काही वाक्यांची मदत घेता येईल.

प्रिय आई,

कालच मी महाबळेश्वरहून परत आले. तुला आश्चर्य वाटेल, पण मी गेली काही वर्षे

नियमितपणे ----------

त्या कोठीच्या खोलीत एक जुना, लोखंडी पेटारा आहे. त्यात ----------

पेटाऱ्याच्या अगदी तळाशी ----------

मावशी मला दरवेळी हे सगळं सांगते. मग आम्ही ----------.

एकदा मी विचारलं, ----------.

त्यावर ती म्हणाली ----------

तुझीच,

----------

## ९ विशेषणांचा नामासारखा वापर

**क.**

पूर्वी श्रीमंत घरातील बायका सणासमारंभाला जाताना अगदी नखशिखान्त दागिन्यांनी मढून घराबाहेर पडायच्या. नखशिखान्त म्हणजे डोक्यापासून पायापर्यंत वेगवेगळी आभूषणे त्या घालत. त्या कोणते दागिने शरीराच्या कोणत्या भागावर घालत?



| हातात<br>बांगड्या, तोडे, पाटली | बोटात<br>अंगठी | कानात<br>कुड्या, डूल |
|---|---|---|
| गळ्यात<br>तन्मणी, सर, माळ, लफ्फा, मंगळसूत्र, साज, मोहनमाळ, चिंचपेटी, कंठा | | |
| नाकात<br>चमकी, नथ | डोक्यात / केसांत<br>अग्रफूल, सोन्याचं फूल | पायात<br>साखळ्या, तोरड्या, पैंजण |

**ख. चला, खेळू या.**

वरील आकृतीमधील आभूषणांची यादी आणि ती आभूषणे कुठे घालतात हे एक मिनिट नीट पाहून लक्षात ठेवू या आणि ही यादी बाजूला ठेवू या. आता खेळाला सुरूवात करू या. ह्या खेळात झटपट प्रश्न विचारायचा आणि झटपट उत्तर द्यायचे आहे. वर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी गोलाकार उभे राहू या.

उदा॰ पहिला विद्यार्थी दुसऱ्या विद्यार्थ्याला विचारेल : माझ्या डोक्यातलं कुठाय?

ह्यावर दुसरा विद्यार्थी डोक्यात घातल्या जाणाऱ्या एका दागिन्याचे नाव घेईल.

उदा॰ हे घे तुझं अग्रफूल

मग दुसरा तिसऱ्याला विचारेल : माझ्या हातातलं कुठाय?

तिसरा उत्तर देईल आणि चौथ्याला प्रश्न विचारेल. ह्याप्रमाणे खेळ पुढे जाईल. ज्याचा प्रश्न किंवा उत्तर चुकेल किंवा जो प्रश्न विचारायला किंवा उत्तर द्यायला वेळ लावेल तो साखळीतून बाद होईल.

## १० गोंदण की टॅटू? बदलते ट्रेंड्स

**क. बरोबर पर्यायावर ✓ खूण करू या.**

अ. आई, आजी आणि पणजी ह्यांपैकी रोहनला सर्वात ‘कूल’ कोण वाटतं?
१. आई २. आजी ३. पणजी

आ. रोहनला पणजीच्या गोंदणातलं सगळ्यात काय आवडलं?
१. पार्टनरचं नाव आणि इमेज २. झाडाचं चित्र ३. लक्ष्मण हे नाव

इ. रोहन कोणता टॅटू काढणार आहे?
१. लक्ष्मण हे नाव आणि इमेज
२. स्वतःचं नाव आणि इमेज
३. सारंगी हे नाव आणि इमेज

ई. रोहनचा एक की-वर्ड आहे, त्याच्या मैत्रिणीचा एक आहे आणि आई-वडील एक घेणार आहेत. काय आहेत हे शब्द? जोड्या जुळवू या.

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | रोहन | १. | मतैक्य |
| आ. | सारंगी | २. | अत्यानंद |
| इ. | आई-बाबा | ३. | महोत्सव |



**ख. वादविवाद करू या**

गोंदण्याची पद्धत भारतात खूप पूर्वीपासून आहे. गोंदण फक्त हिरव्या रंगात असे आणि त्यासाठी वापरण्याचा रंग नैसर्गिक असे. पण त्यामुळे अलीकडील रंगीबेरंगी टॅटूसारखी झळाळी त्या गोंदणाला नसे. टॅटूवर अलीकडे फार आक्षेप घेतले जातात. टॅटू काढावा की नाही? तो परत पूर्णपणे घालवता येतो का? टॅटू काढणे आरोग्याला हानिकारक आहे का? असे अनेक प्रश्न लोकांना पडतात. तुम्हाला काय वाटते? वर्गात दोन गट करून वादविवाद करू या. एक गट अर्थातच टॅटूच्या बाजूने बोलेल आणि दुसरा त्याच्या विरुद्ध बोलेल. खाली मदतीसाठी काही मुद्दे दिले आहेत.

| **टॅटू का काढावा?** | **टॅटू का काढू नये?** |
|---|---|
| जीवनातील काही खास आठवणी जतन करून ठेवण्यासाठी, चांगलं दिसतं म्हणून, सगळे काढतात म्हणून, जगाबरोबर चालावं म्हणून, फॅशन स्टेटमेंट म्हणून | टॅटूसाठी वापरण्यात येणाऱ्या सुया, ग्लोव्हज इत्यादी साहित्याची स्वच्छता? वापरण्यात येणारे रंग शरीराला घातक असू शकतात. नंतर उद्भवणारे इतर धोके : टॅटू फसला किंवा नंतर नको वाटला तर? |

## ११ चला, गप्पा मारू या.

**पहिला विद्यार्थी** : मी काल चिमणीचं घरटं पाहिलं.
**दुसरा विद्यार्थी** : काय सांगतोस! चिमणीचं घरटं आताशा अभावानेच आढळतं.
**तिसरा विद्यार्थी** : मी काल भारद्वाज पक्षी पाहिला.
**दुसरा विद्यार्थी** : खरंच? भारद्वाज पक्षी आताशा अभावानेच आढळतो.
**चौथा विद्यार्थी** : मी काल खंड्या पक्षी पाहिला.
**दुसरा विद्यार्थी** : वा वा! खंड्या पक्षी आताशा अभावानेच आढळतो.
**सर्व विद्यार्थी** : हो हो, हे सर्व पक्षी आताशा अभावानेच आढळतात.

ह्याप्रमाणेच : वाल्मिकी अभयारण्य, पांढरा वाघ, काळा चित्ता, एकशिंगी गेंडा

## १२ संधी

वरील श्राव्य उताऱ्यात रोहन, त्याची मैत्रीण आणि आई-वडील ह्यांचे खास शब्द, ज्यांना रोहन की-वर्ड म्हणतो, ते आपण पाहिले. हे शब्द होते – महोत्सव, मतैक्य आणि अत्यानंद.
हे तिन्ही शब्द संधी होऊन झाले आहेत. कसे, ते पाहू या.

| | | |
|---|---|---|
| महोत्सव | महा + उत्सव | आ + उ → ओ |
| मतैक्य | मत + ऐक्य | अ + ऐ → ऐ |
| अत्यानंद | अति + आनंद | इ + आ → या |

**याचप्रमाणे पुढील तक्त्यातील रिकाम्या जागा भरू या.**

| | | |
|---|---|---|
| जलौघ | | अ + ओ → औ |
| | सदा + एव | |
| अत्यंत | | |
| | किती + एक | |
| अत्युत्तम | | इ + उ → यु |
| गणेश | | अ + ई → ए |
| | सूर्य + उदय | |

## १३ पेहेरावातून प्रभाव

(फॅशन हा विषय मराठी संस्कृतीत नवा असल्याने ह्या चित्रफितीत बरेच इंग्रजी भाषेतील शब्द वापरले गेले आहेत. जमेल तिथे त्याचे मराठी प्रतिशब्दपण आहेत. उत्तरात शक्यतो मराठी शब्द वापरू या. नाहीच मिळाले तर इंग्रजी शब्दांचा पर्याय आहेच! दर चार किंवा पाच मिनिटांनी थांबून फीत परत पुढे पाहावी. ह्याप्रमाणे ही चित्रफीत दोन किंवा तीन वेळाही पाहता येईल.)
चित्रफीत पाहू या आणि पुढील प्रश्नांची उत्तरे देऊ या.

क. चित्रफितीचा विषय काय आहे?

----------------------------------------

ख. पेहेरावाचं महत्त्व काय आहे?
अ. ----------------------------------------
आ. ----------------------------------------

ग. पेहेराव कसा असावा? त्याची कोणती चार सूत्रे इथे सांगितली आहेत?
अ. ----------------------------------------
आ. ----------------------------------------
इ. ----------------------------------------
ई. ----------------------------------------

घ. कपाट कपड्यांनी भरलेले असले, तरी 'मी काय घालू?' असा प्रश्न सर्वांना नेहमी पडतो. त्यावर कोणती तीन उत्तरे आपल्याला इथे मिळतात?
अ. ----------------------------------------
आ. ----------------------------------------
इ. ----------------------------------------
(६.३० मिनिटांपुढे)

च. कामाच्या ठिकाणी घालण्याचे कपडे (फॉर्मल /औपचारिक कपडे), ह्या विषयावर आपल्याला तज्ज्ञांकडून काय सल्ले मिळतात?

अ. रंग = ----------

आ. कापडाची निवड = ----------

इ. पोशाखावरील रेषा = ----------

ई. पोशाख काय दाखवतो = ----------

उ. हे पोशाख कुठे घालता येतात? = ----------

ऊ. इतर वेळी घालण्याचे कपडे (कॅज्युअल कपडे) ह्याविषयी तज्ज्ञांकडून आपल्याला काय माहिती आणि सल्ले मिळतात?

१. ---------- २. ----------

ए. भारतीय पोषाख 'फॉर्मल' म्हणून कामावर वापरायचा असेल तर काय करावे?

१. रंग ---------- २. साडी ----------

३. पर्‌फ्युम ---------- ४. माप ----------

५. सलवार-कुडत्याचे प्रकार कसे वापरावे ----------

छ. आश्लेषा देशपांडे काय प्रश्न विचारतात?

----------

ज. आश्लेषाच्या प्रश्नावर तज्ज्ञांनी दिलेल्या सल्ल्यांपैकी दोन किंवा तीन सांगू या.

अ. ----------

आ. ----------

इ. ----------

ई. ----------

## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो रगेलपणा | ती पगडी, त्या पगड्या | ते शिरोभूषण, ती शिरोभूषणे / शिरोभूषणं |
| तो रंगेलपणा, | | ते लुगडे, ती लुगडी |
| तो गोटा, ते गोटे | | ते मांजरपाट |
| तो पेटारा, ते पेटारे | | ते कवाड, ती कवाडे / कवाडं |
| तो बाणा, ते बाणे | | ते गोंदण, ती गोंदणे / गोंदणं |
| तो विलास, ते - | | ते मतैक्य, |

| | | |
|---|---|---|
| तो गोठ, ते - | | ते सुभाषित, ती सुभाषिते / सुभाषितं |
| तो डौल, ते - | | ते गंध |
| | | ते त्राण |
| | | ते उद्घाटन, ती उद्घाटने / उद्घाटनं |
| | | ते ठिगळ, ती ठिगळे / ठिगळं |
| | | ते तरट, ती तरटे / तरटं |

## क्रियापद

जोपासणे, उद्‌भवणे, मढणे, उतरवणे, गोंदणे, घोकणे

## विशेषण

लफ्फेदार, झोकदार, ठोंब्या, गधडा, राकट, सरता, विटका

## क्रियाविशेषण

रसरसून, अनवाणी

## नाम / इतर शब्द + क्रियापद

लंकेची पार्वती असणे, रांगते वय असणे, काचा मारणे, गर्व चढणे, उद्घाटन करणे, भुरळ पडणे, ग्वाही देणे, जिभेवर खेळवणे, अंगाखांद्यावर नाचवणे, अभावानेच आढळणे, निष्कर्ष काढणे, नन्नाचा पाढा वाचणे

## वाक्‌प्रचार / म्हणी / सुभाषिते

| | | |
|---|---|---|
| मोडेन पण वाकणार नाही | घरादारावर तुळशीपत्र ठेवणे | साधी राहणी, उच्च विचारसरणी |
| पैसा हे विष आहे | संपत्ती माणसाला बिघडवते | लोका सांगे ब्रह्मज्ञान |
| धट्टीकट्टी गरिबी, लुळीपांगळी श्रीमंती | | |

## आता मला हे येतं...

महाराष्ट्रातील पेहेराव ओळखणे
☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

काळानुरूप झालेले पेहेरावातील बदल समजून घेणे
☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

व्याकरण : अधिविशेषण (पूर्वविशेषण) / विधिविशेषण (उत्तरविशेषण)
☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

'चांगला प्रकार – चांगल्या प्रकारे' अशा शब्दसमूहांचा योग्य वापर करणे
☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

महाराष्ट्रीय दागिने ओळखणे आणि सांगणे
☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

विशेषणांचा नामासारखा वापर करणे
☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

बदलते ट्रेंड्स जाणणे
☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

संधी ओळखणे आणि करणे
☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी



# ३ हास्यतरंग








प्रशांत कुलकर्णी

## चला, शिकू या ...

- व्यंगचित्रे समजणे
- विनोद, त्याची आवश्यकता व त्याचे महत्त्व ह्यांबद्दल बोलणे
- महाराष्ट्राला लाभलेल्या विनोदी लेखकांचे उतारे वाचणे व समजणे
- व्याकरण : विशेषणसाधित क्रियाविशेषणे ओळखणे व वापरणे
- संधी ओळखणे आणि करणे


"आई, ......
"आजीला चार्जिंगला लावलयं का गं ?"
१


२


महिला अत्याचार तक्रार पेटी
कचरा पेटी
३


४


10000.00
Petrol
५

करा आणि शिका

## १ व्यंगचित्रे

**क. कोणते व्यंगचित्र तुम्हाला सर्वात जास्त आवडले? पहिल्या पानावरील व्यंगचित्रांना तुमच्या आवडीनुसार प्राधान्यक्रम देऊ या.**

**पहिला क्रमांक :** ------------ **दुसरा क्रमांक :** ------------ **तिसरा क्रमांक :** ------------

**ख. वर्गातील इतर विद्यार्थ्यांच्या उत्तरांशी तुलना करू या : कोणत्या व्यंगचित्राला सर्वात जास्त पसंती मिळाली?**

**ग. कोणत्या निकषांनुसार तुम्हाला वरील व्यंगचित्रे सर्वात जास्त आवडली? याबाबत वर्गात चर्चा करू या. (विषय, भाषा, चित्रशैली, परिणामकारकता)**



### करा आणि शिका

**घ. अनेक व्यंगचित्रे निःशब्द असतात. आपल्याला आवडणाऱ्या व्यंगचित्रकाराच्या अशा व्यंगचित्रांचे छोटेसे प्रदर्शन वर्गात भरवू या.**

**च. तुमच्या आयुष्यातील सर्वात विनोदी प्रसंग कोणता होता? त्याबद्दल लिहू या आणि वर्गात वाचून दाखवू या.**

## २ हास्यविनोद आणि मराठी माणूस

**क. भाग १**

विनोद करणारी म्हणजेच इतरांना हसवणारी व्यक्ती कुणाला कितीही हवीशी वाटत असली, तरी तिला पहिल्या रांगेतले मानाचे स्थान सहसा दिले जात नाही. तिच्या कपाळावर 'उथळ', 'पोरकट', 'टवाळ', 'वात्रट' अशीच एखादी चिठ्ठी कायमची चिकटवली जाते. महत्त्वाच्या विषयाबद्दल चर्चा करणे, महत्त्वाचे निर्णय घेणे वगैरे गोष्टी गांभीर्यपूर्वक करण्याची प्रथा असल्यामुळे अशा उथळ माणसाला तिथे जागा नसते. विदूषकच तो. गमत्या. गंभीर बाबीतले त्याला काय कळणार! प्रल्हाद केशव अत्रे म्हणतात – 'जगातील दुःखे पचविण्याचा हास्य आणि विनोद हा एकच राजमार्ग आहे. खरोखरच, हास्यविनोद हा सर्वांत मोठा मानवधर्म आहे असेच मी मानतो. (...) असा कोणीही महात्मा किंवा धर्मसंस्थापक अद्यापिही उत्पन्न झालेला नाही की ज्याने विनोदाच्या वेदान्तावर एखाद्या खेळकर किंवा आनंदमय धर्माची स्थापना केलेली आहे. जगात जिथे पाहावे तिथे गंभीर चेहऱ्यांची आणि मठ्ठ डोक्याचीच माणसे जास्त भरलेली दिसतात. या लोकांनी जगामध्ये मनुष्याचे जिणे अगदी अशक्य करून सोडलेले आहे.'



तर, मुद्दा आहे 'हास्यविनोद आणि मराठी माणूस' हा. सामान्यतः असे म्हटले जाते, की मराठी माणसाला विनोदाचे अंग बेताचेच आहे. त्याच्या स्वभावाचे वर्णन 'गंभीर, रुक्ष, कोरडा, सुतकी, घुमा' अशासारख्या शेलक्या विशेषणांनी केले जाते. ही त्याची प्रतिमा पूर्वीपासूनच झालेली आहे, त्यामुळे तिच्यात काही तथ्य नसेलच असे

म्हणता येणार नाही. पण असे असूनही मराठी भाषेतील 'हसणे' ह्या क्रियेच्या तऱ्हा आणि त्यांच्याशी संबंधित शब्द, वाक्प्रचार, म्हणी वगैरेंची संख्या पाहिल्यावर मराठी माणसाच्या वरील प्रतिमेविषयी मनात कुतूहल निर्माण होते. विनोदाचे वावडे असूनही तो इतक्या प्रकारांनी हसतो असे समजायचे की काय?

**अ. खालील अर्थांचे शब्द वा वाक्प्रचार वरील उताऱ्यात शोधू या.**

| | |
|---|---|
| १. विनोद करता येणे व विनोदाची समज असणे | |
| २. दुःखावर मात करणे | |
| ३. गमती करणारा | |
| ४. महत्त्वाची, आदराची जागा देणे | |
| ५. बालिश, लहान मुलांप्रमाणे | |
| ६. योग्य आणि उत्तम मार्ग | |
| ७. परंपरा | |

**आ. विनोद करणाऱ्या व्यक्तीसाठी खालीलपैकी कोणती विशेषणे वापरली जातात? बरोबरची खूण करू या.**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गंभीर | | गमत्या | ✓ | मठ्ठ | | कोरडा | | उथळ | | रुक्ष | |
| पोरकट | | खेळकर | | आनंदमय | | टवाळ | | वात्रट | | | |

शब्दसंपदा

**इ. घुसखोर शब्द खोडू या.**

१. वात्रट, खोडकर, खट्याळ, राकट, आचरट

२. टवाळ, मवाली, गावगुंड, द्वाड, भाबडा

३. चलाख, उथळ, वरवरचा, पोरकट, सुमार

४. अद्यापिही, अजून, कधीपर्यंत, इथपर्यंत, आतापर्यंत

५. जिणे, जगणे, जीवन, जेवणे, आयुष्य

६. मठ्ठ, ढ, माठ, मात, मंद

७. वावडे, प्रतिसाद, मंदी, मनाई, प्रतिबंध, वर्जित

## करा आणि शिका

**विनोदी साहित्याचा परभाषेत अनुवाद करणे ही सोपी गोष्ट नाही; पण प्रयत्न करायला हरकत नाही. तुमच्या मातृभाषेतील एखाद्या वैशिष्ट्यपूर्ण विनोदी उताऱ्याचा किंवा लहानशा किश्शाचा मराठीमध्ये अनुवाद करून पाहू या. तो वर्गात वाचून दाखवू या आणि त्याचे लेखक, स्थानिक संदर्भ आणि भाषेचा वापर इत्यादी विषयांबद्दल बोलू या.**

करा आणि शिका

**ख. भाग २**



म्हणजे पाहा : लहान, अगदी तान्हे, निरागस मूल खुदुखुदु हसते. त्याला रुसायलाही वेळ लागत नाही नि हसायलाही. 'नको बाई रुसू, कोपऱ्यात बसू! येऊ दे गं गालावर खुदकन हसू' अशी विनवणी केली, की त्याला क्षणात हसू फुटते. वयात येऊ लागलेल्या – विशेषतः मुली – सतत खुसुखुसु हसत असतात. त्यासाठी विनोद व्हावा लागतो असे नाही. उगाचच हसत सुटतात. पण त्यांनी खळखळून हसणे, खिदळणे, खदखदा हसणे मराठीच नव्हे, तर जगातल्या बहुतेक सर्वच संस्कृतींना अगदी आताआतापर्यंत पसंत नव्हते. बायकामुलींनी दात न दिसतील अशा बेताने फार तर स्मित करावे किंवा शक्यतो फक्त डोळ्यांनीच हसावे. खो खो हसणे, पोट धरधरून हसणे, हसून हसून गडबडा लोळणे वगैरे प्रकार लहान-मोठ्या पुरुषांसाठीच असतात, पण तेही एका मर्यादेपर्यंतच. "चार उनाड टोळभैरव जमवायचे आणि ह्या कट्ट्यावर नाही तर त्या नाक्यावर ख्यैः ख्यैः खुः खुः खी खी करत वेळ घालवायचा. कसं होणार ह्याचं, देवालाच माहीत!" अशी वाक्ये ज्याला आयुष्यात एकदाही ऐकावी लागली नसतील, असा पुरुष सापडणे कठीण.





पन्नासएक वर्षांपूर्वीची गोष्ट : दादा कोंडक्यांच्या एका गाजलेल्या लोकनाट्यप्रयोगाला मी गेलो होतो. प्रेक्षागृह तुडुंब भरले होते आणि वाक्यावाक्याला हास्याची कारंजी उसळत होती. लोक डोळ्यांत पाणी येईपर्यंत, पोटाची दामटी वळेपर्यंत हसत होते. शेजारच्या खुर्चीवर एक दहा-अकरा वर्षांची मुलगी बसली होती. तिची तर हसून हसून मुरकुंडी वळली होती. पण तिच्यासोबत आलेल्या प्रौढ बाईंनी तिला दम दिला : "किती मोठमोठ्यानं हसतेयस! लोक काय म्हणतील! गप्प बसून पाहा, नाही तर तुला घरी घेऊन जाईन!" बिचाऱ्या मुलीने त्यानंतर एकदाही हसण्यासाठी तोंड उघडले नाही.

आता काळ बदलला आहे. मराठी माणसाने विरुद्ध दिशेने थोडी प्रगती केली आहे. स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने सार्वजनिक ठिकाणीसुद्धा मोकळे हसतात. आजकाल हसण्याची पट्टीही बरीच वर चढलेली आहे. जिथे फार तर गालातल्यागालात हसायचे, तिथे माणसे हल्ली अक्षरशः खिंकाळतात. जिथे अजिबातच हसू नये तिथेही नको तितके हसतात. चालायचेच. नव्याने शिकलेल्या कोणत्याही गोष्टीचा जातायेता, उठताबसता प्रयोग करून पाहणे, त्याचे इतरांसमोर प्रदर्शन करणे हा मनुष्यस्वभावच आहे.

**अ. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे वरील उताऱ्यातील हसण्याशी संबंधित असणारे वाक्यांश अधोरेखित करू या.**

**आ. हसण्याच्या तऱ्हा**

**१. 'हसणे' ह्या क्रियापदाशी संबंधित वाक्प्रचार आणि त्यांचा अर्थ ह्यांच्या जोड्या लावू या.**

| | |
|---|---|
| क. हसे होणे | महत्त्व न देणे; दुर्लक्ष करणे |
| ख. हसण्यावारी नेणे | दुःखालाही अति महत्त्व दिल्यास त्याचे हसू येते; थट्टा होते. |
| ग. हसून सोडून देणे | फजिती होणे; टिंगल होणे |
| घ. सात मजली हसणे | हसून / गोड बोलून सावरून घेणे |
| च. कुत्सित / कुजकट / खवचट हसणे | नेहमी हसत राहणारी व्यक्ती नेहमीच सुखी राहते. |
| छ. एखाद्याला हसणे | हीन भावनेने हसणे |
| ज. अति झाले न् हसू आले | कुणाच्या टीकेची आणि टिंगलीची आपल्याला पर्वा नाही असे सांगताना म्हणतात. |
| झ. हसता आहे, पुसता नाही | हसरे मूल गुलाबाच्या फुलाप्रमाणे प्रसन्न आणि हवेसे वाटते. |
| ट. हसता नाही की पुसता नाही | न चिडता दुर्लक्ष करणे |
| ठ. हसून गोड / साजरे करणे | एखाद्याची चेष्टा करून हसायला सगळे तयार असतात, पण त्याची काळजीने विचारपूस करणारे कुणी नसते. |
| ड. हसतमुखी सदा सुखी | हसत राहणाऱ्याचे आरोग्यही चांगले राहते. |
| ढ. हसतील त्यांचे दात दिसतील | खूप मोठ्याने आणि खूप हसणे |
| ण. हसरे मूल गुलाबाचे फूल | ज्याच्या सुखात किंवा दुःखात सहभागी होणारे कुणी नसते असा अनाथ, एकाकी पडलेला. |
| त. हसे त्याला बाळसे | एखाद्याची चेष्टा / टिंगल करणे |

**२. रिकाम्या जागी योग्य तो वाक्प्रचार वापरू या.**

(हसण्यावारी नेणे, कुजकट / खवचट हसणे, हसता आहे, पुसता नाही, कोणी हसता नाही की पुसता नाही, हसे त्याला बाळसे, हसतमुखी तो सदा सुखी, हसतील त्यांचे दात दिसतील, हसरे मूल गुलाबाचे फूल, कुत्सित हसणे, हसून गोड / साजरे करणे)

क. अचानक आलेल्या वादळी पावसामुळे अंगणात पाणी साचले. घरातच दाटीवाटीने बसावे लागल्यामुळे पाहुण्यांची गैरसोय झाली. पण बाबांनी आणि काकांनी प्रसंग ---------------- ----------------------------------------.



ख. "किशोरी, तुझ्या हसऱ्या सुनेकडे पाहिलं की मन प्रसन्न होतं. एक लक्षात ठेव, ------------------------------------------------. ती त्यामुळे सगळ्या घरालाही सुखी ठेवेल."

ग. "तू लुंगीवर टी-शर्ट घालून पार्टीला जाणार आहेस? हसतील तुला सगळे!" "हसू देत. ------------------------------------------------. मी असाच जाणार."

घ. आमच्या खडूस घरमालकापासून पिठाच्या गिरणीवाल्यापर्यंत सर्वांनाच कावेरीच्या मुलीने लळा लावला होता. म्हणतात ना, '------------------------------------!'

च. "उमा, बाळ तुझ्यासारखंच हसरं आहे ना? छान! म्हणजे त्याच्या तब्येतीची काळजी नाही. ------------------------------------------------!"

छ. नुसते हसून एखाद्याला बेचैन करण्याची, त्याचा अपमान करण्याची कला मानसीला साधलेली आहे. परवा सागरनं मुलाला एक बक्षीस मिळाल्याबद्दल पेढे वाटले. सगळ्यांनी त्याचं अभिनंदन केलं. मानसी न बोलता फक्त ------------------------------------------------. त्याने अस्वस्थ झालेला सागर नंतर बराच वेळ तिच्या हसण्याचे अर्थ लावत बसला होता.

ज. जरासा मंदबुद्धी असणारा नानू वाड्यातल्या लहानथोरांच्या थट्टेचा, करमणुकीचा विषय होता. पण त्याची काळजी करणारे कुणीच नव्हते. ------------------------------------------------ अशी नानूची अवस्था होती.

झ. मुरली सगळ्या गावाचा आहे, पण कोणाचाच नाहीये. त्याचा कुणी ------------------------------------------------. त्याने सगळ्यांसाठी राबायचे, पण त्याचे दुखलेखुपले विचारणारे कुणीच नाही.

ट. अमितला उत्साहाने काही सांगण्याची सोय नाही. आपण क्रिकेटचा सामना भारतात जिंकलो, की तो आधी ------------------------------------------------ आणि म्हणेल, "जिंकणारच! आपलीच बॅट, आपलाच चेंडू, आपल्याच खेळपट्ट्या अन् आपलेच प्रेक्षक! परदेशात जिंकून दाखवाल तर खरं." परदेशात विजय मिळाला की जास्त ------------------------------------------------ म्हणेल, "त्यात काय! सामना फिक्स केला असणार!"

ठ. "मी सोमणला आधीच सांगितलं होतं, की परेश महाकारस्थानी आहे. तो तुला प्रमोशन मिळू देणार नाही. पण सोमणनं ते ------------------------------------------------. आता बसलाय कपाळाला हात लावून."

**इ. तीन ते चार विद्यार्थ्यांचे गट करू या. वरीलपैकी काही म्हणी आणि वाक्प्रचार वापरून एक संभाषण लिहू या आणि ते वर्गात सादर करू या.**

## ३ मराठी साहित्य आणि विनोद

### अर्वाचीन मराठी साहित्यातील विनोदकार

१. ह्या जमातीचा इतिहास फार तर दीडेकशे वर्षांचाच असेल. त्यापूर्वी साहित्याची निर्मिती सामान्यतः समाजाला वळण लावण्यासाठी आणि जीवनावर प्रेम करायला शिकवण्यापेक्षा त्याला विरक्तीकडे नेण्यासाठी होत असल्याचे दिसते; तीही पद्यातून. देवदेवतांची चरित्रे, भक्ती, वेदान्त असे त्याचे मर्यादित विषय असत. भरीला पद्यरचनेचे काटेकोर नियम पाळण्याचे दडपणही असे. अशा साहित्यात विनोदासाठी जशी असायला हवी तशी मोकळीढाकळी जागा मिळणे कठीणच होते. स्वतंत्र मराठी गद्य साहित्य फारसे नव्हते. संस्कृत भाषेत नाटकांची परंपरा होती आणि त्यात विदूषक हे पात्र विनोदनिर्मितीकरता नेमलेलेच असायचे. मराठीत नाटकेच नव्हती त्यामुळे विदूषकही नव्हते आणि त्यांचा विनोदही नव्हता.

२. मराठी पद्यामध्ये विनोद अधूनमधून आढळतो तो बाळकृष्णाच्या खोड्या, देवांनी राक्षसांच्या केलेल्या फजितीचे किस्से, मारुतीच्या पराक्रमाच्या कथांमधील गमती अशा स्वरूपात. एवढाच विनोद पिढ्यान्‌पिढ्या लोकांना माफक हसवत राहिला. मानवी जीवनातल्या आणि स्वभावातल्या विसंगतींमधून विनोद जन्म घेत असतो हे तेव्हा कुणाच्या गावीही नसावे. अपवाद संत एकनाथांनी रचलेल्या भारुडांचा आणि काही लावण्या-पोवाड्यांचा. पण विनोद फुलण्यासाठी, तो सशक्त आणि परिणामकारक होण्यासाठी मोकळे वातावरण, मोकळी अभिव्यक्ती आणि प्रयोगशीलता यांना समाजमानसात जे स्थान असावे लागते, तेच नसल्यामुळे त्याचे वाहत्या प्रवाहात रूपांतर होऊ शकले नाही.



३. मग ब्रिटिश आले. बरोबर आपली भाषा आणि समृद्ध वाङ्‌मय घेऊन आले. त्या वाङ्‌मयाशी परिचय झालेल्या देशी सुशिक्षितांनी पुराणकथांमध्ये अडकलेली आपली नजर सोडवून घेतली आणि विसंगतींनी भरलेल्या सभोवतालाकडे पाहायला सुरुवात केली. नव्याने आलेल्या मुद्रणकलेने त्यांच्या हातातील लेखणीला बळ दिले. उपहास आणि उपरोधाच्या मदतीने विनोदाची पहिली पावले पडू लागली. मराठी माणूस थोड्या मोकळेपणाने हसू लागला.

### नवा विनोद, नवे विनोदकार

४. एकोणिसावे शतक हा महाराष्ट्राचा प्रबोधनकाळ होता. गाढ झोपी गेलेल्या समाजाला गदगदा हलवून जागे करण्यासाठी पत्रकार, लेखक, विचारवंत धारदार उपहास आणि उपरोधाचा प्रभावी वापर करू लागले होते. त्यातून कळतनकळत थोडीफार विनोदनिर्मितीही होत होती. वृत्तपत्रीय लेखनापासून ते झपाट्याने लोकप्रिय होत असलेल्या नाट्यकलेपर्यंत अशा लेखनाची लागण झाली होती. अशा विविध माध्यमांतून इतक्या विविध विषयांवर आपल्याला व्यक्त होता येऊ शकते, ही जाणीवच विलक्षण असणार. सुरुवातीच्या काळात हलक्या प्रतीच्या, बटबटीत, असभ्य वाटणाऱ्या विनोदाकडून हळूहळू निखळ आणि दर्जेदार विनोदनिर्मितीसाठी पोषक वातावरण तयार होत होते.

५. नवविचारांनी भारलेल्या श्रीपाद कृष्ण कोल्हटकर (१८७१-१९३४) ह्या लेखकाला हे वातावरण फारच मानवले आणि साहित्यक्षेत्रातल्या तळाच्या पायरीवर अवघडून, ताटकळत उभ्या असलेल्या विनोदाला सन्मानाने वरच्या पायरीवर आणून ठेवण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी केले. मराठीतील 'स्वतंत्र विनोदी साहित्याचे आद्य प्रवर्तक' म्हणून ते आजही ओळखले जातात. टीकालेखन, निबंध, नाटक, प्रहसन असे विविध साहित्यप्रकार आणि अनेक विषय त्यांनी निखळ विनोदाच्या अंगाने हाताळले. परिणामी निरुपयोगी आणि अन्याय्य रूढी जपणाऱ्या सनातनी वर्गाचा रागही ओढवून घेतला.



६. राम गणेश गडकरी (१८८५-१९१९) हे कोल्हटकरांचे वारसदार. त्यांनीही नाटके, कविता, व्यक्तिचित्रे, टीकालेख, प्रहसने इत्यादी प्रकार हाताळले. त्यांच्याकडे दिपवून टाकणारे भाषावैभव, कल्पकता, तीक्ष्ण आणि भेदक विनोदबुद्धी होती. मराठी साहित्यातील त्यांचे स्थान अढळ आहे. परंतु त्यांचा विनोद कोल्हटकरांच्या विनोदाला ओलांडून पुढे जाताना दिसत नाही असे त्यांच्या टीकाकारांचे म्हणणे आहे. गडकऱ्यांना अवघे चौतीस वर्षांचे आयुष्य मिळाले. ते अधिक जगले असते तर? त्यांच्या चाहत्यांना हुरहुर लावणाऱ्या ह्या प्रश्नाचे उत्तर अर्थातच कधीच मिळणार नाही.



७. नंतरच्या काळात विनोदी लेखक म्हणून ज्यांनी अपार लोकप्रियता मिळवली अशांपैकी चिं॰ वि॰ जोशी, प्र॰ के॰ अत्रे, पु॰ ल॰ देशपांडे, द॰ मा॰ मिरासदार ही काही नावे आहेत. अर्थात, त्यांनी फक्त विनोदीच लेखन केले असे नव्हे; पण त्यांची 'विनोदकार' ही ओळख अधिक ठळक आहे. ज्या लेखकांची अशी ओळख नाही आणि तरीही ज्यांच्या साहित्यात जागोजागी दर्जेदार विनोद आढळतो, असे तर अनेक लेखक महाराष्ट्राला लाभले आहेत.



**क. खाली दिलेली माहिती कोणत्या परिच्छेदात आली आहे? उजवीकडच्या चौकटींत योग्य क्रमांक लिहा.**

| | माहिती | परिच्छेद क्रमांक |
|---|---|---|
| उदा॰ | मानवी जीवनातील विसंगतींमधूनही विनोद निर्माण होतो, हा विचार तेव्हाच्या साहित्यात दिसत नाही. | २. |
| अ. | ह्या काळातील मराठी साहित्यात धार्मिक विषयांवर भर असे, त्यामुळे त्यात विनोदाला जागा नव्हती. | |
| आ. | मराठीतील विनोदी साहित्याचा हा खरा सुवर्णकाळ. | |
| इ. | ह्या काळात उपहास आणि उपरोध ह्यांच्या मार्गाने थोडाफार विनोद व्यक्त होत होता. | |

| | | |
|---|---|---|
| ई. | संत एकनाथांनी मात्र त्यांच्या भारुडांमधून मानवी जीवनातल्या आणि स्वभावातल्या विसंगतींमधून विनोद जन्म घेत असतो हे दाखवले. | |
| उ. | संस्कृत भाषेतच विनोदी विदूषकाचे पात्र असलेल्या नाटकांची परंपरा होती. | |
| ऊ. | ते अजून जगले असते तर कदाचित त्यांनी मराठी साहित्यातील विनोदाला नवे आयाम मिळवून दिले असते. | |
| ए. | ह्या काळात विनोदनिर्मितीसाठी अनुकूल असे वातावरण नव्हते. | |
| ॲ. | मराठी भाषेत तेव्हा केवळ पद्यरचनाच आढळतात. | |
| ऐ. | मराठी साहित्यात विनोदाला एक सन्मानाची जागा मिळाली. | |
| ओ. | पुढे इंग्रजांच्या साहित्यातून स्फूर्ती घेत मराठी साहित्यात हळूहळू विनोदनिर्मिती होऊ लागली. | |
| ऑ. | चांगल्या दर्जाच्या विनोदासाठी अनुकूल वातावरण तयार झाले होते. | |

## ४ महाराष्ट्राला लाभलेले विनोदी लेखक

**प्रल्हाद केशव अत्रे**



वाङ्‌मयांत विनोद हा टिकाऊ नाही, अशीच पुष्कळांची समजूत आहे. माझे काही हितचिंतक मधून मधून मला उपदेश करीत असतात की, "आता हे तुमचे विनोदी लेखन पुरे. आजपर्यंत तुम्ही लोकांना पुष्कळ हसवले; पण आता काही तरी भरीव आणि टिकाऊ लिहा!" गंभीर लेखन हेच केवळ 'भरीव आणि टिकाऊ' असते असे पुष्कळांना वाटते, त्याला काय करावे? हास्य आणि विनोद हे जीवनातले एक मोठे रहस्य आहे. ज्यांनी आयुष्याचा बरावाईट अन् कडूगोड असा सर्व अनुभव घेतलेला आहे, ज्यांच्या अंतःकरणांतून मानवजातीबद्दलच्या सहानुभूतीचा जिवंत झरा एकसारखा वाहतो आहे आणि सर्व मानवजात सुखी आणि आनंदी व्हावी, अशी ज्यांच्या अंतःकरणाला रात्रंदिवस तळमळ लागून राहिलेली आहे, अशा उमद्या आणि दिलदार माणसालाच आयुष्यात विनोदाचा साक्षात्कार होतो. हलकट आणि लबाड माणसे कधीही विनोदी होऊ शकत नाहीत.

देवादिकांनी समुद्रमंथन करून चौदा रत्ने बाहेर काढली. त्यामध्ये त्यांना विनोदाचे रत्न कसे काय सापडले नाही, याचे मला राहून राहून आश्चर्य वाटते. काही हरकत नाही. जे देवादिकांना सापडले नाही, ते माणसाला मिळाले. संसारातल्या सर्व अनुभवांचे जो एकसारखे मंथन करत राहतो, त्यालाच अखेर हे विनोदाचे रत्न सापडते. विनोदाचे हे महत्त्व लोकांना जेव्हा कळेल तेव्हाच त्यांना समजेल की, आपल्याला हसवणारा विनोदी लेखक हा वेड्यावाकड्या आणि वात्रट शब्दांच्या कोलांटउड्या मारणारा कोणी तरी उथळ आणि मूर्ख विदूषक नसून, तो मानवजातीचा सर्वात मोठा उपकारकर्ता आहे!

**क. हिंदू पुराणकथांमध्ये देव आणि दानव ह्यांनी केलेल्या समुद्रमंथनाची कथा मिळवून वर्गात वाचून दाखवू या.**



**ख. दिलेल्या वाक्याचा अर्थ न बदलता त्याची सुटी वाक्ये तयार करू या**

उदा. विनोद करणारी म्हणजेच इतरांना हसवणारी व्यक्ती कुणाला कितीही हवीशी वाटत असली, तरी तिला पहिल्या रांगेतले मानाचे स्थान सहसा दिले जात नाही.
विनोद करणारी म्हणजेच इतरांना हसवणारी व्यक्ती अनेकांना हवीशी वाटते. पण तसे असले तरी तिला पहिल्या रांगेतले मानाचे स्थान सहसा दिले जात नाही.

१. ज्यांनी आयुष्याचा बरावाईट अन् कडूगोड असा सर्व अनुभव घेतलेला आहे, ज्यांच्या अंतःकरणांतून मानवजातीबद्दलच्या सहानुभूतीचा जिवंत झरा एकसारखा वाहतो आहे आणि सर्व मानवजात सुखी आणि आनंदी व्हावी, अशी ज्यांच्या अंतःकरणाला रात्रंदिवस तळमळ लागून राहिलेली आहे, अशा उमद्या आणि दिलदार माणसालाच आयुष्यात विनोदाचा साक्षात्कार होतो.

२. विनोदाचे हे महत्त्व लोकांना जेव्हा कळेल तेव्हाच त्यांना समजेल की, आपल्याला हसवणारा विनोदी लेखक हा वेड्यावाकड्या आणि वात्रट शब्दांच्या कोलांटउड्या मारणारा कोणी तरी उथळ आणि मूर्ख विदूषक नसून, तो मानवजातीचा सर्वांत मोठा उपकारकर्ता आहे!

**ग. पुढे दिलेल्या वाक्यांमध्ये कंसात काही शब्द आहेत. त्यांचे उताऱ्यातील समानार्थी शब्द शोधून मोकळ्या जागेत लिहू या.**

अ. "तेव्हा शेवटच्या वर्षातल्या प्रवीणसारखा (मोठ्या मनाचा, मनमिळाऊ आणि उदार) ---------- ---------- मुलगा माझ्यावर मरत होता हे मला ठाऊक नव्हतं ना! एरवी तुझ्यासारख्या रासवटाच्या नादी मी कशाला लागले असते?" ---------- ----------

आ. "मध्यंतरापूर्वीच धाडकन पडलेली दोन नाटके, एका मालिकेच्या पहिल्याच भागातून मिळालेला नारळ आणि मुहूर्तापूर्वीच निर्मात्याने बाहेरचा रस्ता दाखवल्यामुळे हातून गेलेला एक लघुपट, अशी रॉकी पोकळे नावाच्या अप्रतिम नटाची कलाक्षेत्रातली (डोळ्यांत भरण्यासारखी, घसघशीत, भरपूर) ---------- होती. ----------

इ. ज्यांना विद्यार्थ्यांचे भले व्हावे अशी मनापासून (काळजी, कळकळ) ---------- वाटत नाही, त्यांचे इथे काही काम नाही. ----------

ई. "हे बघ, मला बुद्धी जरा कमीच आहे. त्यामुळे तुमच्यासारखं वैचारिक (घुसळण, वादविवाद, चर्वितचर्वण) ---------- वगैरे करून त्यातून तात्त्विक रत्नंबित्नं तर सोडच, साधं लोणीही काढणं माझ्या बापाच्यानं होणार नाही. तेव्हा, टाऽ टाऽऽ!!"

उ. "मुलींबाबत मी एकूण निसरड्या पावलांचा होतो हे मला मान्यच आहे. पण कॉलेजात माझे बरेच (माझी काळजी घेणाऱ्या, माझ्याविषयी आपुलकी असणाऱ्या व्यक्ती) ---------- होते. त्यांच्यामुळे मी बचावलो हेही तू समजून घे की!" ----------

ऊ. काही चित्रपटांमध्ये खलनायक इतक्या टोकाचा (नीच, तिरस्कार वाटावा असा आणि फसवणारा, कपटी) ---------- ---------- दाखवला जाई, की शेवटी तो विनोदीच वाटू लागे. ---------- ----------

## ५ माझी विनोदी शाळा

लवकरच मी पुढच्या इंग्रजी अभ्यासासाठी पुण्यास आलो आणि भावे स्कूलमध्ये दाखल झालो. भावे स्कूलसारखे विनोदी स्कूल त्यावेळी पुण्यात दुसरे कोणतेही नव्हते. भावे स्कूल म्हणजे मूर्तिमंत विनोद. त्याची इमारत विनोदी. फर्निचर विनोदी. शिक्षण विनोदी. सगळेच काही विनोदाने अगदी आमूलाग्र भरलेले. त्यामुळे माझ्या स्वभावाला ही शाळा सर्वात जास्त मानवण्यासारखी होती. विद्यार्थ्यांना 'स्वातंत्र्य' देण्याची चळवळ पाश्चात्त्य देशात अलीकडे निघाली. पण भावे स्कूलने ह्या चळवळीचा शोध कित्येक वर्षांपूर्वी पुण्यामध्ये लावून ठेवलेला होता. भावे स्कूलची शिस्त अगदी संपूर्ण स्वातंत्र्यावर आधारलेली होती. एक अभ्यास वजा केला तर ह्या शाळेतल्या विद्यार्थ्यांना वाटेल ते करण्याची परवानगी होती. अभ्यास करायला मात्र तेथे मुळीच परवानगी नव्हती. त्यामुळे क्रिकेट, टग ऑफ वॉर, नाटक आणि उडाणटप्पूपणा ह्या चार क्षेत्रांत भावे स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पुण्यात आणि पुण्याबाहेर विलक्षण कीर्ती संपादून ठेवली होती.

भावे स्कूलच्या त्यावेळच्या विद्यार्थ्यांचे सरासरी वय 'वीस' वर्षांचे होते. बिनमिश्यांचा विद्यार्थी क्वचितच तिथे पाहावयाला सापडे. (...) नवीन पोरसवदा शिक्षक वर्गात शिरला की त्याचा त्यांनी निकाल लावलाच म्हणून समजा. भावे स्कूलच्या विद्यार्थ्यांच्या कसोटीला जो शिक्षक उतरला, त्याला जगात कुठे भय नाही असा त्या वेळी समज असे. आता, कोणता शिक्षक भावे स्कूलमधल्या विद्यार्थ्यांच्या पसंतीला उतरेल ह्याला काही नियम नव्हता.

निरनिराळ्या योग्यतेच्या आणि गुणांच्या इरसाल शिक्षकांची भावे स्कूलमध्ये त्या वेळी अगदी गर्दी उडून गेली होती. त्यामध्ये विद्वान होते, शास्त्री होते, लेखक होते. कवी होते, नाटककार होते. नाटक मंडळींचे चालक होते, आणि त्या त्या दिवशीच्या गावातल्या नाटकांचे पास वर्गामध्ये आपण होऊन विद्यार्थ्यांना वाटणारे नाट्यप्रेमी शिक्षकही होते.

मी शाळेत दाखल होण्यापूर्वीच शाळेची ही कीर्ती माझ्या कानांवर आलेली होती. म्हणून अशा नामांकित शाळेत जाऊन आपण कधी सुस्थळी पडतो आहोत, असे मला अगदी होऊन गेले होते. (...)

भावे स्कूलच्या ह्या वर्णनावरून कोणाची अशी कल्पना होईल की, या शाळेत छडीची शिस्त औषधापुरतीही नसली पाहिजे. छे, छे, तसे मुळीच नाही. वर्षांतून काही दिवस शाळेच्या हेडमास्तरांना कडक शिस्तीची अचानक आठवण होई. मग ते भयंकर क्रूर चेहरा करून आणि हातात एक लांबलचक छडी घेऊन शाळेच्या बाहेर उभे राहत, अन् पहिल्या घंटेनंतर जो कोणी म्हणून आत शिरेल त्याच्या हातावर जोराचा फटकारा लगावीत. आपण ज्याला छडी मारतो आहोत तो विद्यार्थी आहे, पालक आहे, गडी आहे की मास्तर आहे ह्याचादेखील ते विचार करीत नसत. 'हात पुढे कर!' की 'लगाव' असा त्यांचा कडक लष्करी खाक्या असे. शिस्तीच्या ह्या सत्रात एका नवीन मास्तराला खरोखरच छडी खावी लागली. त्या दिवशी मधल्या सुट्टीत तो शाळेच्या कारकुनाला आपला सुजलेला हात दाखवीत म्हणाला, "'मी इथे येण्यापूर्वी या शाळेबद्दल जे ऐकलं होतं ते पार खोटं आहे. या शाळेची शिस्त फारच कडक आहे. इथे विद्यार्थ्यांनाच का, पण शिक्षकांनाही छड्या खाव्या लागतात!" कारकून ते ऐकून सर्दच झाला. तो म्हणाला, "अहो, तुम्ही नवीन मास्तर आहात म्हणून सांगितले का नाही हेडमास्तरांना?" मास्तर म्हणाले, "मी सांगणार होतो; पण हेडमास्तर म्हणाले, 'तोंड उघडशील तर आणखी दोन छड्या लगावीन!'"

अशा तऱ्हेने भावे स्कूलमध्ये वर्षांमधून एकादा आठवडा कडक शिस्तीचे राज्य जेव्हा सुरू होई, तेव्हा विद्यार्थ्यांच्या हास्यविनोदाला खूपच भरती येई. अशा विनोदी शाळेत माझ्या आयुष्याची

चार वर्षे गेली. (...) भावे स्कूलने परीक्षेच्या अभ्यासाची विद्या मला फारशी शिकवली नाही किंवा ज्ञानाचेही फारसे संस्कार माझ्या मनावर केले नाहीत; पण माझ्या जीवनात खेळकरपणाचा मात्र मजबूत पाया घालून ठेवला. (...)

पण भावे स्कूलचा विद्यार्थी नसतो तर आयुष्यात विनोदी लेखक मात्र मी कधीच होऊ शकलो नसतो, हे अगदी नक्की. या शाळेने माझ्या खेळाच्या वृत्तीचा विकास केला आणि आयुष्यामधल्या प्रत्येक गोष्टीकडे खेळकर आणि खोडकर दृष्टीने पाहावयाला मला शिकवले.

**- प्र॰ के॰ अत्रे**




प्रशांत कुलकर्णी

**क. पुढील वाक्यांमधील अधोरेखित शब्दांच्या / शब्दसमूहांच्या अर्थाचे शब्द / शब्दसमूह वरील उताऱ्यात आहेत. ते शोधून मोकळ्या जागेत लिहू या.**

अ. एकूण बारा देशांतील खेळाडूंचे संघ शहरात <u>येऊन पोहोचले आहेत</u> / ------------------------. परंतु येथील दमट हवा त्यांना <u>सहन होण्यासारखी</u> / ------------------------ नसल्यामुळे त्यांचे प्रशिक्षक चिंतेत आहेत.

आ. यंदा भाषेचा अभ्यासक्रम <u>प्रथमपासून शेवटपर्यंत</u> / ------------------------ बदलला आहे. त्यात संतसाहित्याचा समावेश <u>लक्षात येण्याएवढाही</u> / ------------------------ नसल्याने त्यावर टीका होत आहे.

इ. शेतकऱ्यांकडून सुपीक जमिनी <u>मिळवून</u> / ------------------------ तिथे महामार्ग बांधण्याला प्रखर विरोध झाला.

ई. भातुकलीच्या खेळातून उठून आल्यासारखी दिसणारी <u>लहानखुरी</u> / ------------------------ वैशाली जिल्हाधिकारी म्हणून समोर आल्यावर केळकर <u>अवाकच</u> / ------------------------ झाले. आता ही आपली बॉस?

**ख. अत्र्यांचे हे लेखन १९५३ साली प्रकाशित झाले. त्या काळातील भाषेचे वळण कोणत्या शब्दांमुळे कळते? ते शब्द आज कसे लिहिले जातात?**

| | तेव्हा | आज |
|---|---|---|
| अ. | पाहावयाला | पाहायला |

**ग. बोलण्या-लिहिण्याची एक पद्धत**

पहिल्या घंटेनंतर जो कोणी म्हणून आत शिरेल ...

अधोरेखित शब्दसमूहातून 'म्हणून' हा शब्द वगळला तरी अर्थ बदलत नाही. ही भाषेच्या वापराची एक पद्धत आहे इतकेच.

आणखी उदाहरणे –

अ. ज्याला कुणाला म्हणून सुट्टी घ्यायची आहे, त्याने तसा अर्ज लिहून द्यावा.

आ. रस्त्यात जिथे कुठे म्हणून खड्डे दिसतील, त्यांचे फोटो काढून पाठवा.

इ. तुम्ही जेव्हा केव्हा म्हणून गावात याल तेव्हा दुपारनंतरच या.

## ६ गुरूची विद्या ...



प्रतिभावंत नाटककार, कवी आणि विनोदकार राम गणेश गडकरी ह्यांचा हा एक किस्सा. त्यांच्या धारदार आणि तीक्ष्ण विनोदाच्या फटकाऱ्यातून कुणीही, अगदी ज्यांच्याबद्दल त्यांना अतिशय आदर होता अशा व्यक्तीही सुटत नसत. पण हे सगळे गप्पागोष्टी करताना. सभेत भाषण करायचे म्हटले, की गडकऱ्यांची घाबरगुंडी उडे. त्यामुळे ते शक्यतो जाहीर बोलणे टाळतच असत. पण क्वचित त्यांचाही नाइलाज होई.

असेच एकदा ते विनोदविद्येतील आपले गुरू तात्यासाहेब कोल्हटकर ह्यांच्यासमवेत एका सभेला गेले. ऐन वेळी आयोजकांनी दोघांनाही भाषण करण्याचा आग्रह केला. प्रथम तात्यासाहेब बोलले, आणि उत्तम बोलले.

मग गडकऱ्यांची पाळी आली. लटलटत्या पायांनी ते उठले आणि म्हणाले, "आता काय बोलावं ते मला कळत नाहीये. मी भाषणाचं टिपण करून आणलं होतं. येताना ते सहज तात्यासाहेबांना वाचायला दिलं, तर तेच त्यांनी आपल्या भाषणात वापरून टाकलं. आता माझ्याकडे बोलण्यासारखं काही नाही."

एवढं बोलून श्रोत्यांच्या टाळ्यांच्या गजरात आणि हास्यकल्लोळात गडकरी खाली बसले. तात्यासाहेब 'आ' वासून त्यांच्याकडे बघतच राहिले. गुरूची विद्या गुरूलाच फळली.



**पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे**

(...) कोटी चटकन सुचणारी असते आणि पुढे पुढे तिची खोडच लागते. तरीपण विचारता आहात म्हणून सांगतो. मी पॅरिसला गेलो होतो. तिथे शॅम्पेन घेताना 'त्यांच्या नि आपल्या संस्कृतीत फरक काय?', असं कुणी तरी विचारल्यावर मी चटकन म्हणालो, 'त्यांची द्राक्ष-संस्कृती आणि आपली रुद्राक्ष-संस्कृती!' (...) तरीपण कोटीचा सोस असू नये. तो फार वाईट. (...)

एखाद्या गोष्टीकडे पाहताना, एखाद्या घटनेत आपण स्वतःला किती गुंतवून घ्यायचं, जीवनात महत्त्वाचं काय आणि वरवरचं काय, हे विनोदामुळे प्रत्येकाला चटकन कळू शकतं. मला स्वतःला विचाराल, तर विनोदानं मला तारतम्य दिलं. आयुष्यात पहिलं काय आणि दुसरं काय हे समजून घ्यायला शिकवलं. (...)

एखादा साधा, जीवनावर प्रकाश टाकणारा विनोद हा कवितेइतकाच सुंदर असतो. कवितेसारखाच तो 'वाऽ वाऽ' म्हणायला लावतो. (...)

ज्या वेळी विनोद फार तात्कालिक होतो त्या वेळी तो विसरला जातो हे खरं; पण जोपर्यंत विनोद आणि मानवता यांत जोडणारा धागा आहे, तोपर्यंत हा प्रश्नच येत नाही. सबंध जीवनाचा अनुभव आणि त्याबद्दलचा दृष्टिकोन यांतून विनोद वगळला जाईलच कसा? अहो, चार्ली चॅप्लिनच्या चित्रपटात उदात्ततेचा स्पर्श नाही का? 'गोल्ड रश'मध्ये तो बूट खातो तेव्हा आपण हसतो; पण त्याच वेळी आपल्याला माणसाची सारी भूकच कळत नाही का? शेवटी विनोदी लेखक तरी काय म्हणतो? – 'मी हसतो कारण मला रडणं जमत नाही!' (...)

**क. खाली दिलेल्या वाक्यांमध्ये वरील उताऱ्यातील कोणती नाम + क्रियापद जोडी वापरता येईल?**

अ. ह्या पुस्तकात लेखकाने आत्मविश्वासाशी संबंधित छोट्या छोट्या मुद्द्यांवर ------------ आहे.

आ. माझ्या आवडीची गोष्ट करण्याची परवानगी मिळेल न मिळेल ह्या भीतीने लहानपणी मला बाबांशी खोटं बोलण्याची ------------ होती.

इ. पैशाचा ------------ नये; तो माणसाला वाईट काम करण्यासही प्रवृत्त करतो.

ई. बायकोचे अकाली निधन झाल्यावर दादा फारच एकटे पडले. आजूबाजूच्या लहान मुलांचा अभ्यास घेण्यात त्यांनी स्वतःला ------------.

**ख. पु॰ ल॰ देशपांडेंना पॅरिसमध्ये सुचलेली कोटी तुम्हाला समजली का? तिचा अर्थ समजावून सांगू या.**

**ग. तुमच्या मते लक्षात राहतील अशी कोणती विधाने त्यांनी केली आहेत?**

**घ. दोन मराठी विनोदकारांचे विनोदाविषयीचे विचार आपण वाचले.**

- दोघांमध्ये काही समान मुद्दे आढळले का? कोणते?
- काही मतभेद आढळले का? कोणते?
- विनोदाचे तुमच्या जीवनात काय स्थान आहे? तुम्हाला विनोद सुचतो का? त्याबद्दल बोलू या.

### करा आणि शिका

**चिठ्ठ्यांचा वापर करून शिक्षक वर्गातील दोन विद्यार्थी निवडतील. त्यातील प्रत्येकाने वरीलपैकी एका साहित्यिकाची भूमिका करायची आहे. उरलेले विद्यार्थी त्यांना 'विनोद' या विषयावर प्रश्न विचारतील, साहित्यिकांची भूमिका करणाऱ्या विद्यार्थ्यांनी वरील उताऱ्यांच्या मदतीने आपली उत्तरे द्यायची आहेत.**



## ७ कॉपी, कॉपी!

**क.** ऐकू या.

**ख. खालील प्रश्नांची उत्तरे देऊ या.**

अ. मुख्याध्यापक प्रश्नपत्रिकेतील कोणते प्रश्न वाचून दाखवतात? पहिले दोन प्रश्न लिहा.
१. ------------------------------------------------
२. ------------------------------------------------

आ. तुम्ही लिहिलेल्या दोन्ही प्रश्नांची उत्तरे निषाद आणि अक्षय काय देतात?
१. ------------------------------------------------
२. ------------------------------------------------

इ. दुसऱ्या प्रश्नाचे उत्तरही कॉपी करून लिहिले आहे हे मुख्याध्यापक कसे ओळखतात?
------------------------------------------------

ई. ह्या दोन्ही प्रश्नांची उत्तरे कॉपी करून लिहिली नसावीत हे सिद्ध करण्यासाठी आई-वडील काय युक्तिवाद करतात?
१. ------------------------------------------------
२. ------------------------------------------------

**च.** 'मृदुकाय' म्हणजे काय असेल असे आईला वाटते?
------------------------------------------------

**छ.** शेवटच्या प्रश्नाचे उत्तर निषादने काय लिहिले आहे? ------------------------

**ज.** शेवटच्या प्रश्नाचे उत्तर अक्षयने काय लिहिले आहे? ------------------------

## ८ विनोदाचे प्रादेशिक रंग

भाषा एकच असली तरी प्रदेशानुसार ती आपले रूप बदलते. कधी शब्दांच्या अर्थच्छटा बदलतात, कधी पूर्ण अर्थच बदलतो, उच्चारात फेरफार होतात, बोलण्याचे हेल वेगळी वळणे घेतात, असे बरेच काही होते. तशीच विनोदाची तऱ्हाही बदलते. निवडक नमुने पाहू या :

कोकण प्रांत म्हटले की एकीकडे डोळ्यांपुढे येतो तो तिथला विशाल समुद्रकिनारा, श्रीमंत निसर्ग; पण दुसरीकडे दारिद्र्याने पोळलेला तिथला सर्वसामान्य कोकणवासी आणि त्या चटक्यांमधून जन्म घेणारा त्याचा तिरकस पण काळजावर चरे ओढणारा विनोद.

**अंतू बर्वा**

रत्नागिरीच्या त्या मधल्या आळीत लोकोत्तर पुरुष राहतात. देवाने ही माणसांची एक निराळीच घडण केलेली आहे. (...) अंतू बरवा ह्याच मातीत उगवला नि पिकला. वास्तविक अंतू बरव्याला कुणी 'अंतू' असे एकेरी म्हणावे असे त्याचे वय नव्हे. मी त्यांना प्रथम पाहिले त्या वेळीच त्यांच्या दाढीचे खुंट नि कानांवरचे आणि छातीवरचे केस पिकलेले होते. दातांचा बराचसा अण्णू गोगट्या झाला होता. 'अण्णू गोगट्या होणे' म्हणजे 'पडणे' हा अंतूने मराठी भाषेला बहाल केलेला वाक्प्रचार आहे. रत्नांग्रीचा अण्णू गोगटे वकील गेली कित्येक वर्षे ओळीने मुन्शीपाल्टीच्या निवडणुकीत पडत आला आहे. तेव्हापासून विहिरीत पोहरा पडला तरी पोहऱ्याचा "'अण्णू' झाला काय रे?" म्हणून अंतू ओरडतो. (...)

अंतूशेटच नव्हे, तर त्या आळीतले त्या वयाचे सारेच नमुने कमीअधिक फरकाने एकाच वळणाचे किंवा एकाच आडवळणाचे. भाषेला फुरशासारखी पायात गिरकी घेऊन चावायची सवयच झालेली. कुणाचे बरे झाल्याचे सुख नाही; वाईट झाल्याचे दुःख नाही. जन्माचे सोयर नाही; मरणाचे सुतक नाही. (...)

"दामूकाका दिसले नाहीत कुठे, अंतूशेट!"

"कोण? दामू नेना? तो चैनीत आहे! वरती रंभा त्याच्या टकलावर तेल थापत्ये नि उर्वशी पंख्यान् वारा घालत्ये म्हणतात."

"म्हणजे?"

"अहो, म्हंजे वाघाचे पंजे! दामू नेन्याची रत्नांग्रीहून बदली झाली!" असे म्हणून अंतूशेटनी आकाशाकडे बोट दाखवले. (...)

जीवनाच्या कुठल्या तत्त्वज्ञानाचा अर्क ही मंडळी प्याली आहेत देव जाणे. (...) विशाल सागरतीर आहे, नारळाची बने आहेत, पोफळीच्या बागा आहेत, सारे काही आहे; पण त्या उदात्ततेला दारिद्र्य विलक्षण छेद देऊन जाते आणि मग उरते एक भयाण विनोदाचे अभेद्य कवच!

कशावरून तरी गांधींच्या गोष्टी निघाल्या. अंतूशेटनी आपले भाष्य सुरू केले: "अहो,



कसला गांधी! जगभर गेला, पण रत्नांग्रीस फारसा आला नाही. पक्का तो! त्यास नेमकं ठाऊक – इथं त्याच्या पंचाचं कौतुक नाही नि दांडीचं नाही. आम्ही सगळेच पंचेवाले नि त्याच्याहीपेक्षा उघडे! सुताबितात तथ्य नाही हो! आमचा शंभूभट जन्मभर जानव्याचं सूत काढीत आला. ब्रिटिश सरकार सोडा, पण रत्नांग्रीचा गिलिगन कलेक्टरदेखील घाबरला नाही! तिसरं शस्त्र म्हणजे उपासाचं! इथं निम्मं कोकण उपाशी! नेहमी तुपाशी खाणाऱ्यास उपाशी माणसाचं कौतुक. आम्हास कसलं? नाही, माणूस असेल मोठा; पण आमच्या हिशेबी त्याच्या मोठेपणाची नोंद करायची कुठल्या खात्यावर?" (...)

अंतूशेटच्या असल्या भाषणात केवळ तिरका विनोद नसतो. त्यांचे कुठे तरी काही तरी जळत असते. (...)

**- पु. ल. देशपांडे**

**शब्दार्थ आणि सांस्कृतिक संदर्भ :**

आपला विनोद समोरच्या व्यक्तीला समजावून द्यावा लागणे, ह्यासारखी विनोद करणाऱ्यासाठी वेदनादायक दुसरी गोष्ट नसेल. 'विनोद बेडकासारखा असतो; त्याचे विच्छेदन करा, की तो मरतो'. असे मार्क ट्वेन ह्यांनी म्हटलेच आहे. श्रोत्यांनी किंवा वाचकांनी विनोदामधील सारे बारकावे, उघड अर्थामागे लपलेले छुपे अर्थ आणि संदर्भ, शब्दांचे खेळ हे सगळे समजून घेऊन दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद अतिशय सुख देणारा असतो. पण कधी कधी नाइलाज होतो. विशेषतः, परक्या भाषेतील, अनोळख्या संस्कृतीतील, वेगळ्या काळातील संदर्भ माहीतच नसले तर माणसाने प्रतिसाद द्यावा तरी कसा? अशा वेळी आवश्यक माहिती पुरवण्याखेरीज दुसरा मार्गच नसतो. 'अंतू बर्वा' नीट समजून घेण्यासाठी आपल्यालाही हाच मार्ग स्वीकारावा लागेल. काही महत्त्वाचे आणि कळीचे शब्द आणि संदर्भ तेवढे पाहू या.

१. लोकोत्तर = जे सर्वसामान्य लोकांसारखे नाहीत असे; असामान्य.

२. उगवला नि पिकला = जन्मला आणि म्हातारा झाला.

३. बरवा = मूळ नाव 'अनंत बर्वे' असे असावे. अनंतचे अंतू व्हावे ही सामान्य गोष्ट आहे. बर्वेचे 'बरवा' किंवा 'बर्वा' होणे हे खास कोकणी वळण. तसेच नेनेचा 'नेना', गोगटेचा 'गोगट्या', अण्णाचा 'अण्णू' झाला आहे. एकंदरीतच कुणाचाही, अगदी गांधींचाही, – निदान पाठीमागे तरी – एकेरी, एकवचनी उल्लेख करणे, ही कोकणी रीतच आहे. त्यातून 'असेल कुणी मोठा; मला काय त्याचं!' हा भाव डोकावतो.

४. रत्नांग्री = रत्नागिरी ह्या नावाचा स्थानिक उच्चार.

५. एकाच आडवळणाचे = बोलण्या-वागण्याची जी समाजमान्य रीत असते, ती सोडून ज्यांचे वेगळ्याच रितीचे – म्हणजेच आडवळणाचे – वागणेबोलणे असते असे.

६. फुरसे = अचानक पायाला विळखा घालून चावा घेणारा कोकणातील एक विषारी साप.

७. सोयर = जन्मासारखी शुभ घटना घडल्यावर आनंद मानण्याची प्रथा.

८. सुतक = कुटुंबात मृत्यू झाल्यानंतर काही काळ शोक मानण्याची प्रथा.

९. रंभा, उर्वशी = हिंदू कल्पनेनुसार स्वर्गात देवांचे मनोरंजन करण्यासाठी नेमलेल्या अतिशय सुंदर आणि कलासंपन्न अशा अप्सरांपैकी सर्वांत प्रसिद्ध नावे.

१०. थापत्ये, घालत्ये = क्रियापदाचे स्त्री॰ ए॰व॰ रूप. ह्याचप्रमाणे करते – करत्ये, म्हणते – म्हणत्ये इ॰

११. वाघाचे पंजे = 'एवढंही कळलं नाही?' असे चिडवण्यासाठी म्हणतात. मूळ ओळी – म्हंजे काय म्हंजे?, वाघाचे पंजे । कुत्र्याचे कान, उंटाची मान । तुझं-माझं लग्न, सावधान ।

१२. विनोदाचे अभेद्य कवच = सैनिक लढताना अंगावर संरक्षक कवच घालतात तसे दुःख-दुर्दैवाचे घाव सहन करण्यासाठी बोचऱ्या, निर्दय विनोदाच्या कवचाची माणसाला गरज असते.

१३. दांडी = मिठासाठी सत्याग्रह करण्यासाठी गांधी आपल्या कार्यकर्त्यांसह गुजरातेतल्या दांडी ह्या ठिकाणापर्यंत चालत गेले होते (१९३०). स्वातंत्र्यलढ्यातील ही फार महत्त्वाची घटना होती. (मराठीत दांडी ह्या नामाला वेगळे अर्थ आहेत; ते इथे लागू पडत नाहीत.)

१४. गांधींची अस्त्रे = सत्याग्रह, उपास (उपोषण) आणि चरख्यावर सूत कातणे ही तीन अस्त्रे गांधींनी वापरली.

**क. खालील अर्थांचे शब्द उताऱ्यात शोधू या.**

| | |
|---|---|
| अ. गल्ली, अरुंद रस्ता | |
| आ. असाधारण, विलक्षण, अलौकिक | |
| इ. पहिल्या नावाने, एकवचन वापरून बोलावणे | |
| ई. विहिरीतून पाणी काढण्यासाठीचे लाकडी किंवा धातूचे भांडे | |
| उ. जो नियमाप्रमाणे, पद्धतीप्रमाणे नाही असा; वेगळ्याच जातकुळीचा | |
| ऊ. तटस्थ, निर्लेप असणे; कशाचाही परिणाम न होणे | |
| ए. सुपारीचे झाड | |
| ॲ. भेदता किंवा फोडता न येण्यासारखा | |
| ऐ. संरक्षण करणारे टणक व भक्कम आवरण | |
| ओ. कमरेला गुंडाळता येण्यासारखे, गांधी वापरत असत तसे साधे, पांढरे सुती कापड | |
| ऑ. कापसापासून वळलेला बारीक धागा | |

**ख. वर दिलेले शब्दार्थ पुन्हा पाहा आणि खालील संदर्भांचा अर्थ लिहू या.**

| | |
|---|---|
| अ. निवडणुकीत पडणे | |
| आ. रंभा त्याच्या टकलावर तेल थापत्ये नि उर्वशी पंख्यानं वारा घालत्ये म्हणतात | |
| इ. म्हणजे वाघाचे पंजे | |
| ई. 'पक्का तो!' | |
| उ. जानवे | |

**ग. वरील उतारा पुन्हा वाचा आणि खालीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ते लिहू या.**

| | | | |
|---|---|---|---|
| उदा. अंतू बरवा हा वयाने तरुण आहे. | | १. अण्णू गोगटे हा पेशाने वकील होता. | |
| अंतू बरवा हा वयाने तसा तरुण नाही. | ✓ | २. अण्णू गोगटे हा पेशाने नेता होता. | |
| १. आळीतले सगळेच बेपर्वा होते. | | १. दामू नेने ह्यांची बदली झाली आहे. | |
| २. आळीतले अंतूच्या वयाचे सगळेच बेपर्वा होते. | | २. दामू नेने हे आता हयात नाहीत. | |
| १. कोकणामध्ये खूप गरिबी आहे. | | १. दारिद्र्य असूनही कोकणातल्या लोकांकडे विनोद आहे. | |
| २. कोकणामध्ये खूप श्रीमंती आहे. | | २. दारिद्र्य असूनही कोकणातल्या लोकांकडे विज्ञान आहे. | |
| १. गांधीजी रत्नागिरीला कधीच आले नाहीत. | | १. कोकणातले निम्मे लोक उपाशी असतात. | |
| २. गांधीजी रत्नागिरीला फारसे आले नाहीत. | | २. कोकणातले निम्मे लोक तुपाशी खातात. | |

**घ. लेखक म्हणतात, कोकणातल्या लोकांचा विनोद हा 'चटक्यांमधून जन्म घेणारा', 'तिरकस पण काळजावर चरे ओढणारा विनोद' असतो. असा विनोद तुम्हाला उताऱ्यात कोणत्या गोष्टींमध्ये दिसतो ते लिहू या.**



काय, सहाशे हजार कोटींचे नुकसान? हे चक्रीवादळ येण्याआधी आम्ही इतके श्रीमंत आहोत, हे आम्हाला माहीतच नव्हतं.

## ९ व्याकरण

**क. एक पत्र**

प्रिय आदित्य,

तुझे पत्र वाचून मी निराश झालो आहे. तुला मी शंभरदा सांगितले आहे, की आपण लिहिलेला मजकूर एकदा मोठ्याने वाचून पाहावा; त्यामुळे आपल्या चुका आपल्याला कळतात. संपूर्ण सुट्टी तू आळसात घालवली आहेस. एवढ्यातेवढ्याने तुझा मूड काय जातो, तुझा अपमान काय होतो! आजीने तुला कौतुकाने वाढवले, तुझे सगळे हट्ट पुरवले, तरीही तक्रार असतेच! तुझ्याशी कसे वागावे तेच समजत नाही.

परवा शेजारच्या नाना सोमणांचे निधन झाले. झोपेत गेले; सुटले. आजीची तब्येत होती तशीच आहे. तिला आता उभ्याने कामे होत नाहीत. स्वयंपाकासाठी बाई शोधावी लागणार. बघू.

तब्येतीला जप आणि जमल्यास अभ्यास कर.

तुझा,
आजोबा

**अ. वरील पत्रामध्ये अधोरेखित केलेली क्रियाविशेषणे ही कधी नामांपासून तर कधी विशेषणांपासून तयार झाली आहेत. त्यांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करू या.**

| नामापासून तयार झालेले क्रियाविशेषण | विशेषणापासून तयार झालेले क्रियाविशेषण |
|---|---|
| उदा॰ शंभरदा, | उदा॰ मोठ्याने, |

विशेषण + प्रत्यय = विशेषणसाधित क्रियाविशेषण
शंभर + दा = शंभरदा
विशेषण + तृतीयेचा प्रत्यय = विशेषणसाधित क्रियाविशेषण
मोठा + सामान्य रूप + ने = मोठ्याने

**आ. वरील नियमाप्रमाणे आपण शोधलेल्या विशेषणसाधित क्रियाविशेषणांची फोड करून दाखवू या.**

उदा॰ एकत्र = एक + त्र

## १० संधी

**क. वाचू या.**

आमच्या बंड्याचे एकेक विनोद म्हणजे इतके भारी असतात ना! हसता हसता पुरेवाट! लोक थकून जातात ऐकताना. पण कधी कधी मात्र नकोसे वाटतात सारखे विनोद. ते ऐकण्याचीही एक वेळ असावी लागते. प्रत्येक वेळी विनोद आणि चुटके यांनीच करमणूक होते असं नाही. गायन, नृत्य इत्यादी कलांनीही करमणूक होतेच की!



**अ. वरील उताऱ्यात अधोरेखित केलेले संधी कसे तयार झाले आहेत ते पाहू या.**

| | | |
|---|---|---|
| एकेक | एक + एक | ए + ए → ए |
| नकोसे | नको + असे | ओ + अ → ओ |
| गायन | गै + अन | ऐ + अ → आय |

**आ. याचप्रमाणे पुढील तक्त्यातील रिकाम्या जागा भरू या.**

| | | |
|---|---|---|
| इत्यादी | | इ + आ → या |
| जरासे | | |
| | प्रति + एक | |
| | ने + अन | ए + अ → अय |
| चांगलीशी | | |

व्याकरण

## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो हास्यतरंग, ते - | ती झोळी, त्या झोळ्या | ते समुद्रमंथन |
| तो साक्षात्कार, ते - | ती कोलांटउडी, त्या कोलांटउड्या | ते रत्न, ती रत्ने / रत्नं |
| तो उपकारकर्ता, ते उपकारकर्ते | ती जीवनदृष्टी | ते मंथन, ती मंथने / मंथनं |
| तो ढेरपोट्या, ते ढेरपोटे | ती संगती, त्या - | ते टक्कल, ती टकले / टकलं |
| तो गमत्या, ते गमत्ये - | ती विसंगती, त्या - | ते रुद्राक्ष, ती रुद्राक्षे / रुद्राक्षं |
| तो टोळभैरव, ते | ती थाप, त्या थापा | ते तारतम्य |
| तो नाका, ते नाके | ती चीज, त्या चिजा | ते कारंजे / कारंजं, ती कारंजी |
| तो अर्क, ते - | ती विरूपता, त्या - | |
| तो वेदान्त, ते - | ती कोटी, त्या कोट्या | |
| | ती उदात्तता | |
| | ती दामटी, त्या दामट्या | |
| | ती मुरकुंडी, त्या मुरकुंड्या | |

## क्रियापद

भेडसावणे, चकाकणे, न्याहाळणे, पुटपुटणे, आढळणे, खिदळणे, उसळणे, खिंकाळणे

## विशेषण

टिकाऊ, भरीव, बरेवाईट, कडूगोड, उमदा, दिलदार, हलकट, लबाड, वेडेवाकडे, वात्रट, डांबरी, भ्रांतिष्ट, तात्कालिक, पोरकट, टवाळ, मठ्ठ, रूक्ष, सुतकी, घुमा, शेलका, तान्हे, निरागस, उनाड, तुडुंब

## क्रियाविशेषण

नित्यनियमाने, अद्यापि, खुदकन, खुसुखुसु, खळखळून, खदाखदा

## नाम / इतर शब्द + क्रियापद

दत्तक घेणे, अभिमान बाळगणे, प्रकाश टाकणे, दुःख पचविणे, वावडे असणे, (एखाद्या गोष्टीचे) प्रदर्शन करणे

## आता मला हे येतं...

**व्यंगचित्रे समजणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**विनोद, त्याची आवश्यकता व त्याचे महत्त्व ह्यांबद्दल बोलणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**महाराष्ट्राला लाभलेल्या विनोदी लेखकांचे उतारे वाचणे व समजणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**व्याकरण : विशेषणसाधित क्रियाविशेषणे ओळखणे व वापरणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**संधी ओळखणे आणि करणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी



# ४ हे विश्वचि माझे घर!



चला, शिकू या ...

- सर्वसमावेशक भारतीय संस्कृती समजून घेणे
- संवेदनशीलता, मानवतावाद, आंतरराष्ट्रीय सहकार्य यांबद्दल समजून घेणे व चर्चा करणे
- व्याकरण : धातुसाधित विशेषणे (गाणारा गळा - गायलेले गाणे - गाता गळा) समजणे व वापरणे
- संधी ओळखणे आणि करणे

## १ हे विश्वचि माझे घर!

हे विश्वचि माझे घर । ऐसी मति जेयाची स्थिर
किंबहुना चराचर । आपणचि जाहला ॥

**क. संत ज्ञानेश्वरांच्या ह्या ओळी खालील शब्दार्थांच्या मदतीने समजून घेऊ या आणि त्यावर चर्चा करू या.**

| | | | |
|---|---|---|---|
| **विश्वचि** = विश्वच | **ऐसी** = अशी | **मति** = बुद्धी, ज्ञान, समज | **जेयाची** = ज्याची |
| **चराचर** = सर्व प्राणिमात्र, सर्व सृष्टी | | **आपणचि** = आपणच | **जाहला** = झाला |

**ख. वाचू या.**

### आपले आणि परके



बटाट्याच्या काचऱ्यांची भाजी, साबुदाण्याची खिचडी, पावभाजी हे खास मराठी म्हणून ओळखले जाणारे पदार्थ आहेत. मुलांना बटाटा विशेष प्रिय असतो. साबुदाण्याची खिचडी खायला मिळते म्हणून उपास करायलाही ती तयार असतात आणि भूक नसली तरीही पावभाजी खायला लहानथोर सगळेच एका पायावर तयार असतात. माझीही गोष्ट वेगळी नाही. पण हे तिन्ही पदार्थ – म्हणजे बटाटा, साबुदाणा आणि पाव – मुळात भारतीय नाहीत हे कळले, तेव्हा मी फारच खट्टू झाले होते. असे कसे असू शकेल? शिवाय, नुसते पदार्थच नाही, तर त्यांची नावेही परकीय आहेत! हे बरोबर नाही. अशाने लोक काही काळानंतर मॅगी नूडल्स आणि पिझ्झाही उपासाला खाऊ लागतील! छेः!



नंतर रुसून काही दिवस ह्या पदार्थांना मी माझ्या शत्रुपक्षात टाकले होते आणि ते खायचेच सोडले होते. एवढेच नव्हे, तर ह्यापुढे अशा देशद्रोही पदार्थांना हातही लावणार नाही, अशी घोर प्रतिज्ञाच केली होती. पण नाव परके आहे म्हणून चहासुद्धा सोडावा लागणार, हे लक्षात आल्यावर मात्र मी सपशेल (आणि मोठ्या आनंदाने) माघार घेतली. एकंदरीतच हे 'आपले' अन् ते 'परके' वगैरे गोष्टींमध्ये काही अर्थ नसतो, असे म्हणून माझा शत्रुपक्षही मी बरखास्त करून टाकला.

ज्ञानदेवांनाही साबुदाण्याची खिचडी आवडत असणार ह्याची मला खात्री आहे.

**विमली,**
**सातवी क**

**अ. लिहू या.**

१. उताऱ्यात ज्यांचा उल्लेख आहे ते पदार्थ भारतीय नाहीत, मग मूळचे कुठले आहेत?

---

२. त्यांची नावे कोणत्या भाषांतून आली आहेत? त्यांना काहीसे मराठी वळण दिले गेले आहे का?

---

३. तुमच्या भाषेत मराठीतून किंवा इतर भारतीय भाषांमधून काही शब्द आले आहेत का?

---

४. ज्ञानेश्वरांच्या कवितेचा विमलीने असा अर्थ घेतला आहे :



'मी, माझे स्वतःचे कुटुंब, स्वतःचे घर किंवा गाव' ह्यापलीकडे जाऊन ज्याला ही भूमी, इथे राहणारी सर्व माणसे, इथल्या वृक्षवेली, वाहणारा वारा, वाहणारे पाणी, कीडमुंगी आणि अजस्र प्राणी असे सर्व सजीव, आणि मातीचे कण, खडक, महाकाय पर्वत, आकाश आणि दूरचे ग्रहतारे असे सर्व निर्जीव म्हणजे आपणच आहोत असा पक्का विश्वास ज्याला वाटतो, त्याला 'हे विश्वचि माझे घर' असे म्हणता येते.' तुम्हाला कोणता अर्थ जाणवतो?

---

**आ. चर्चा करू या.**

१. ज्ञानेश्वरांनी जो विचार मांडला त्याच्याशी साम्य असणारा विचार मांडणारे कुणी विचारवंत, साहित्यिक किंवा कलावंत तुम्हाला माहीत आहेत का? असल्यास त्यांच्याबद्दल सांगू या आणि इतरांशी चर्चा करू या.

२. खाद्यपदार्थ, सण, प्रथा, फॅशन अशासारख्या गोष्टी बाहेरून येऊन तुमच्या समाजजीवनात मिसळून गेल्या आहेत का? त्याबद्दल आपली मते मांडू या.

**इ. पुढे दिलेली सुटी वाक्ये जोडून एक वाक्य तयार करू या.**



उदा॰ बाळ रांगत जिन्यापर्यंत गेले. आरुषी घाबरली. ती ओरडली, “आईऽ!”
बाळ रांगत जिन्यापर्यंत गेल्यामुळे आरुषी घाबरून “आईऽ!” असं ओरडली.

१. मी नळ बंद केला. बादली भरून वाहत होती.

२. आकाश निरभ्र आहे. पूर्ण चंद्राचा प्रकाश आहे. त्या प्रकाशात आकाश उजळले आहे.

३. यंदा पाऊस कमी झाला आहे. शेतीचे नुकसान झाले आहे. सदाशिवला काळजी वाटते आहे.

४. मी बाहेर पडलो. त्याआधी खिडकी बंद करायचे विसरलो. उघड्या खिडकीतून कबुतर आत शिरले. त्याने घर घाण केले.

५. जिलबी शिळी झाली होती. उमाने थोडीशी खाल्ली. तिचे पोट बिघडले. जिलबी उरली. ती तिने फेकून दिली.

**ई. पुढील वाक्यांमधून छोटी वाक्ये सुटी करू या.**

उदा॰ वीजपुरवठा सारखा बंद पडत असल्यामुळे अरूप वैतागला होता.
वीजपुरवठा सारखा बंद पडत होता. अरूप वैतागला होता.

१. सलग सुट्ट्या आल्यामुळे बंद राहणाऱ्या बँकांचे व्यवहार ठप्प झाले आहेत.

२. कार्यक्रम संपल्यानंतर उशिरा घरी परतलेल्या हाफिजने जेवण्याचा कंटाळा केला.

३. फरशीवर सांडलेले मीठ गोळा करून बरणीत भरताना मीराची तारांबळ झाली.

४. पाठदुखीने हैराण होऊन घरात बसलेल्या केतकीला परीक्षा देणे अशक्य झाल्याने तिचे वर्ष वाया गेले.

## २ वाचू या.

**क.**

चला जाऊ द्या काफिला,
अजुनी नाही मार्ग संपला,
इथेच टाका तंबू!

जाता जाता जरा विसावा
एक रात्र थांबू –
इथेच टाका तंबू!

**- ग॰ दि॰ माडगूळकर**

**रबाब**

पर्वतांच्या रांगांवर रांगा. जीवघेणी थंडी. अंगात ऊब यावी म्हणून लोकरीच्या शाली, कांबळी घेऊन बसलेली मित्रमंडळी. स्वच्छ निरभ्र आकाशात नक्षत्रांचा खच. रात्री एका शेकोटीच्या भोवती बसल्यावर ‘पश्तो’ भाषेत माणसे बोलताहेत. तिथून जवळच अफगाणिस्तानात जाण्याचा रस्ता आहे. आपल्या मनात विचार येतो, इथल्या मार्गाने खैबरखिंड लागत असली पाहिजे. आजच्या हिंदुस्थानात येण्याचा हा एक फार पूर्वीचा मार्ग. किती दूरदूरचे

प्रवासी, व्यापारी, साहसी लोक हजारो वर्षे या मार्गाने ये-जा करत असतील! किती प्रकारचे संगीत, किती विविध वाद्ये या जगातल्या उंचच उंच पर्वतांनी ऐकली असतील...!

रबाब हे असेच एक वाद्य आहे. खास पेशावरच्या पठाणांचे हे वाद्य आहे. त्याला अलगोजा व ढोलकची साथ असली, तर छान मैफल जमते.

४००-५०० वर्षांपूर्वी काबूल, कंधार हिंदुस्थानातच होते. बर्फाच्छादित हिंदुकुश पर्वतातून मार्ग काढीत सैनिक-शिपाई, व्यापारी-प्रवासी भारतात दिल्लीपर्यंत आणि पुढे कलकत्ता-ढाक्क्यापर्यंत जात असत. 'रबाब' हे असल्याच लोकांनी आणलेले मध्य आशिया आणि पर्शियामधून आलेले वाद्य.

प्रदेशाच्या राजकीय सीमा, भौगोलिक सीमा आणि सांस्कृतिक सीमा या एकच नसतात. नद्यांचा प्रवाह बदलतो तेव्हा सरोवरे लहान-मोठी होणे, समुद्र हटणे वा हटवणे, भूकंप, ज्वालामुखीचे उद्रेक अशा कारणांनी या भौगोलिक सीमांमध्ये परिवर्तन येऊ शकते. पण राजकीय सीमा किंवा सांस्कृतिक सरहद्दी या मानवनिर्मित असतात. आता हेच पाहा ना : ज्याला भारत देश म्हणून आज आपण ओळखतो, तो शंभर वर्षांपूर्वी नकाशावर किती वेगळा होता! पण हजारो वर्षांपासून त्याच्या सांस्कृतिक सीमा मात्र विस्तारत होत्या. त्यातला महत्त्वाचा घटक म्हणजे सांगीतिक घटक. त्याचा केंद्रबिंदू कोठे होता? कोणत्या प्रांतातून संगीत निर्माण होत होते? कुठे कोण गात-वाजवत ते एकीकडून दुसरीकडे नेत होते? गाण्याची आणि गाणाऱ्यांची कीर्ती, वादनाची आणि वाद्यांची प्रसिद्धी कुठून कसकशी होत गेली? महाराष्ट्रात 'माधवीवीणा' कधी येऊन पोहोचली असेल? 'तबला' मुळात मराठी की गुजराथी की हिंदुस्थानी की तामिळी की पर्शियन?

शोध घेतल्यावर कळले ते असे : भारतात प्राचीन काळापासून तालवाद्यांचा उपयोग होत होता. मृदंग, पखवाज अशी आडवी ठेवून वाजवण्याची वाद्ये जशी होती, तशी उभी ठेवून वाजवण्याची वाद्येही होती. बाहेरून आलेल्या फारसीभाषकांनी त्या उभ्या वाद्यांसाठी 'तब्ल' हा फारसी शब्द वापरला. ('टेबल' हेदेखील त्याचेच इंग्रजी रूप.) भारतीयांनी हा परका शब्द स्वीकारला, पण 'आपलासा' करून. म्हणून त्याचे 'तबला' असे नामकरण झाले. वाद्य भारतीयच, फक्त त्याचे नाव बाहेरून आलेले आहे.

**- भास्कर चंदावरकर**

**अ. शब्दांच्या अर्थाशी जोड्या जुळवू या.**

| | |
|---|---|
| १. खच | क. बदल, पालट |
| २. बर्फाच्छादित | ख. मध्य, मध्यबिंदू, मुख्य ठिकाण |
| ३. परिवर्तन | ग. ताल किंवा ठेका धरण्याचे वाद्य |
| ४. सांगीतिक | घ. वस्तूंचे मोठ्या संख्येने असणे |
| ५. केंद्रबिंदू | च. संगीताचे, संगीताशी संबंधित |
| ६. तालवाद्य | छ. बर्फाने / हिमाने झाकलेले |

**आ. पुढील शब्द कोणत्या शब्दांपासून तयार झाले आहेत?**

१. सांस्कृतिक : ..........

२. सांगीतिक : ..........

३. भौगोलिक : ..........

**इ. भौगोलिकदृष्ट्या आकाराने लहान देश असूनही त्याच्या सांस्कृतिक सीमा मात्र बऱ्याच विस्तारलेल्या आहेत, अशी काही उदाहरणे तुम्हाला माहीत आहेत का? असल्यास त्यांच्याबद्दल थोडक्यात लिहू या.**

**ख. स्थलांतर**

आज आलीयत नवी पाखरं
कुठल्यातरी अनोळखी प्रदेशांतून.
त्या परदेशी पाखरांनी आणलीयत नवी गाणी,
ज्या गाण्यांचे स्वर
कित्येक शतकं मी माझ्या हृदयात कोंडून ठेवलेले.
त्यांच्या इवल्याशा चोचींतून
मी ऐकलीयत माझ्या हृदयाची गाणी,
उदास –
जशी ही पाखरं एक एक झाड,
एकेक गाव सोडून जातात.
...मीही जाईन परदेशी बनून
एखाद्या अनोळखी प्रदेशात.
पाखरांच्या गाण्यांमधनं वाहत...



**- वसंत पाटणकर**

## करा आणि शिका

**काव्यवाचन स्पर्धा : वरील कविता पाठ करून म्हणून दाखवू या. म्हणताना खालीलपैकी जो भाव कवितेशी जुळणारा आहे तो व्यक्त करण्याचा प्रयत्न करू या. इतर विद्यार्थ्यांनी काव्यवाचनासाठी गुण द्यावेत.**



तटस्थपणा चिडचिड आनंद

मत्सर विनोद उत्साह

करा आणि शिका

**ग. चराचर**

चर आणि अचर मिळून तयार झालेली आपली सृष्टी, म्हणजेच भोवतालचे 'चराचर' आहे. हालचाल करू शकणारे, स्वतःहून एका स्थळाकडून दुसऱ्या स्थळाकडे जाऊ शकणारे ते 'चर' असतात. ज्यांना हे करता येत नाही ते 'अचर' असतात. पशुपक्षी अन्नपाण्याच्या शोधात स्थलांतर करतात. गरज भागली, ऋतू बदलला की ते बरेचदा आपल्या मूळ प्रदेशात परतही जातात.

माणूसही स्थलांतर करतो; फक्त तो प्रत्येक वेळी आपल्या मूळ स्थानाकडे परतेलच ह्याचा भरवसा नसतो. नवा प्रदेश, तिथला निसर्ग, तिथे वसती करणारे समाज, त्यांच्या जीवनशैली, संस्कृती, रितीभाती ह्या सगळ्याशी त्याला जुळवून घ्यावेसे वाटले, त्यांना 'आपलेसे' करून आपणही 'त्यांचेसे' होणे त्याला जमले, तर तो तिथलाच होऊन राहतो.

गाण्यांमधून वाहत येणाऱ्या अनोळखी गावच्या नव्या पाखरांना आपलेसे करून घेणे, ही भारताची संस्कृती आहे. त्याची साक्ष देणारी अनेक उदाहरणे आणि पुरावे इतिहासात सापडतात. विषय संगीताचा निघाला आहे तर त्यातलेच एक उदाहरण पाहू या.



व्हायोलिन हे पाश्चिमात्य वाद्य भारतात नेमके कधी आले, कुणी आणले वगैरे तपशील तूर्त बाजूला ठेवू या. एका परक्या पण परिपूर्ण वाद्याचा भारतीय संगीत विश्वात प्रवेश झाला एवढेच म्हणणे पुरे. तर, दक्षिण भारतातील मंदिरांत सादर होणाऱ्या नृत्याला साथ करण्याने त्याच्या भारतातील कारकिर्दीची सुरुवात झाली. लवकरच त्याचा कर्नाटक शैलीच्या संगीतात प्रवेश झाला. मुत्थुस्वामी दीक्षितार हे त्या क्षेत्रातील फार मोठे नाव होते. त्यांचे धाकटे बंधू बाळूस्वामी ह्यांना ह्या नव्या वाद्याने झपाटून टाकले. एका इंग्रज व्यक्तीकडून त्यांनी व्हायोलिनवादन शिकून घेतले.

भारतीय मानसिकतेची एक वैशिष्ट्यपूर्ण बाजू अशी आहे, की एखादी परकीय गोष्ट एकदा आपण स्वीकारली, की तिचे भारतीयीकरण आपण फार लवकर करू शकतो. बाळूस्वामींनीही व्हायोलिनवर पहिले आपले संगीत वाजवले. म्हणजे पाश्चिमात्य संगीतकारांच्या रचना शिकण्याचा त्यांनी प्रयत्नसुद्धा केला नाही. शिवाय, व्यवस्थित मांडी ठोकून, जमिनीवर बसून व्हायोलिन वाजवायला ते शिकले. (...) अशा अनेक बाबतींत दक्षिण भारतीयांनी स्वतः स्वतंत्र निर्णय घेऊन व्हायोलिनला आज पूर्ण भारतीय करून टाकले आहे.

**- भास्कर चंदावरकर**

ह्या वाद्याचा प्रवेश उत्तर भारतीय शास्त्रीय संगीतातही झाला. व्ही॰ जी॰ जोग, श्रीधर पार्सेकर, गजाननबुवा जोशी, डी॰ के॰ दातार यांसारख्या मराठी व्हायोलिनवादकांनी मोठी कीर्ती मिळवली. चित्रपट संगीतात तर व्हायोलिनने अढळ स्थान मिळवले आहे.

गाणारी पाखरे आणि पाखरांचे गाणे माणसाने आखलेल्या सीमांना जुमानत नाही, ही किती चांगली गोष्ट आहे!

**अ. अधोरेखित शब्द लक्षात घेऊन उदाहरणाप्रमाणे खालील वाक्यांची रचना बदलून लिहू या.**

उदा. चर आणि अचर मिळून तयार झालेली आपली सृष्टी, म्हणजेच भोवतालचे 'चराचर' आहे.
चर आणि अचर मिळून आपली जी सृष्टी तयार झाली, ती म्हणजेच भोवतालचे 'चराचर' आहे.

१. हालचाल करू शकणारे, स्वतःहून एका स्थळाकडून दुसऱ्या स्थळाकडे जाऊ शकणारे ते 'चर' असतात.

२. गाण्यांमधून वाहत येणाऱ्या अनोळखी गावच्या नव्या पाखरांना आपलेसे करून घेणे, ही भारताची संस्कृती आहे.

३. त्याची साक्ष देणारी अनेक उदाहरणे आणि पुरावे इतिहासात सापडतात.

४. तर, दक्षिण भारतातील मंदिरांत सादर होणाऱ्या नृत्याला साथ करण्याने त्याच्या भारतातील कारकिर्दीची सुरुवात झाली.

५. गाणारी पाखरे आणि पाखरांचे गाणे माणसाने आखलेल्या सीमांना जुमानत नाहीत, ही किती चांगली गोष्ट आहे!

६. गाणारी पाखरे आणि पाखरांचे गाणे माणसाने आखलेल्या सीमांना जुमानत नाहीत ही किती चांगली गोष्ट आहे!

**आ. उदाहरणाप्रमाणे खालील वाक्यांची रचना बदलून लिहू या.**

उदा. ज्यांना हे करता येत नाही ते 'अचर' असतात. हे करता न येणारे 'अचर' असतात.

१. पशुपक्षी अन्नपाण्याच्या शोधात स्थलांतर करतात. गरज भागली, ऋतू बदलला की ते बरेचदा आपल्या मूळ प्रदेशात परतही जातात.

२. माणूसही स्थलांतर करतो; तो प्रत्येक वेळी आपल्या मूळ स्थानाकडे परतेलच ह्याचा भरवसा नसतो.

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

३. त्यांचे धाकटे बंधू बाळूस्वामी ह्यांना ह्या नव्या वाद्याने झपाटून टाकले. एका इंग्रज व्यक्तीकडून त्यांनी व्हायोलिनवादन शिकून घेतले.

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

४. 'भारतीय मानसिकतेची एक वैशिष्ट्यपूर्ण बाजू अशी आहे, की एखादी परकीय गोष्ट एकदा आपण स्वीकारली, की तिचे भारतीयीकरण आपण फार लवकर करू शकतो.

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

## ३ न घडो मत्सर!

इंद्रायणीकाठी देवाची आळंदी आहे. मराठी मनाला या स्थळाचं केवढं आकर्षण! वारकऱ्यांचं हे तीर्थक्षेत्र. त्यांचा म्हणून एक वेगळा धर्म आहे : 'भागवत धर्म'. तो सर्वसमावेशक आहे. सर्वांना आपले मानणारा धर्म. त्याबद्दल काही समजून घ्यायचे होते, म्हणून आळंदीला पोहोचलो. आळंदी देवस्थानाचे पदाधिकारी, मुख्य चोपदार आणि इतर काही जण भेटले. ते आम्हाला देऊळ दाखवायला घेऊन गेले.



"हा प्रवेशद्वारावरचा नगारा. महादजी शिंदे यांनी मंदिरासाठी बरीच देणगी दिली. त्या पैशातूनच रोज इथे नगारा-वादन होतं. पेशव्यांनीही मोठी देणगी दिली. ... आणि हा नगारा निजामाचा."

"निजामाचा? तो हैदराबादचा हिंदुद्वेष्टा वगैरे..."

"हो, तोच. त्यानं मंदिरासाठी बरीच मोठी देणगी दिली. संस्थानं खालसा झाल्यानंतरही त्यानं आपल्या सरकारकडे पैसे देऊन ठेवले. आज एकविसाव्या शतकातही याच पैशातून हा नगारा वाजतो. वाजवणाऱ्याची बिदागीही त्यातूनच दिली जाते. 'कोणाही जिवाचा न घडो मत्सर' हे भागवत धर्माचं ब्रीद आहे. मुळात तो धर्माच्या आधारावर माणसांची विभागणी करतच नाही. आम्ही जातिभेद, धर्मभेद मानत नाही."

त्यांचे बोलणे ऐकत असताना 'वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा' असं म्हणणारा तुकाराम आम्हाला आठवला... नव्यानं कळला.

**- गिरीश कुबेर, राजीव खांडेकर**

सर्वांना आपले <u>मानणारा</u> धर्म = जो सर्वांना आपले मानतो असा धर्म.
मानणे : मानतो (साधा वर्तमानकाळ) : मानणारा...

<u>वाजवणाऱ्याची</u> बिदागीही त्यातूनच दिली जाते. = जो वाजवतो, त्याची बिदागीही त्यातूनच दिली जाते.
वाजवणे : वाजवतो (साधा वर्तमानकाळ) : वाजवणारा...

**क. खाली दिलेल्या वाक्यांचे वरीलप्रमाणे स्पष्टीकरण लिहू या.**

अ. ‘माणूस’ ही एकच जात <u>मानणारे</u> आणि निसर्गातील प्रत्येक घटकावर प्रेम <u>करणारे</u> हजारोंच्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते.

-------------------------------------------

-------------------------------------------

आ. तळपत्या उन्हात कडेवर तान्ही बाळे घेऊन <u>चाललेल्यांना</u> त्या तरुण नेत्याने आपल्या जीपमध्ये बसवले.

-------------------------------------------

-------------------------------------------

इ. दुष्काळी परिस्थितीतही अर्थकारण <u>सावरणाऱ्या</u> रेशीम शेतीमुळे गावाचे जगभर नाव झाले.

-------------------------------------------

-------------------------------------------

**ख. कंसातील क्रियापदांचा उपयोग करून नामांसाठी योग्य धातुसाधित विशेषणे वापरू या.**

उदा॰ कॉलेजच्या संमेलनात प्रतिभाने <u>गायलेली</u> <u>गाणी</u> अजून आठवतात.

अ. हा आपला सलग चौथा न (चालणे) ------------ चित्रपट. आता आपल्याला एक (चालणे) ------------ चित्रपट करणे गरजेचे आहे. नाही तर कंपनी बुडेल.

आ. उन्हाळ्याच्या दिवसांत आदल्या रात्री (शिजवणे) ------------ अन्न सकाळपर्यंत टिकेलच असे सांगता येत नाही.

इ. रात्रभर (कोसळणे) ------------ पाऊस अखेर थांबला. (दाटणे) ------------ ढग विरळ झाले. पूर्वेकडे पहाटेचे (उजळणे) ------------ क्षितिज दिसू लागले.

ई. अशा संस्थेची जबाबदारी म्हणजे कधीही न (संपणे) ------------ रस्ता असतो.



उ. पूर्ण (वाढणे) ------------ झाडे दोन्ही बाजूंना रांगेत उभी होती. त्यांनी रस्त्यावर सावली (धरणे) ------------ होती. गूगलने (दाखवणे) ------------ देऊळ आता थोड्याच अंतरावर होते.

ऊ. "काय झालं आज शाळेत?"
"शिक्षा झाली, सुट्टीनंतर पाच मिनिटं उशिरा आल्याबद्दल. आम्ही नियम (पाळणे) ------------------------ शाळेला दिसत नाहीत, कधी तरी चुकून (मोडणे) ------------------------ मात्र लगेच दिसतात."
"तुमचे शिक्षक ओरडतात का रे तुम्हाला?"
"म्हणजे काय! शाळेत दोनच प्रकारचे शिक्षक आहेत : (ओरडणे) ------------------------ आणि खूप (ओरडणे) ------------------------."
"आणि (शिकवणे) ------------------------?"
"अं... (शिकवणे) ------------------------ तसे बरेच आहेत. काही खूप चांगलं (शिकवणे) ------------------------ही आहेत. त्यांना आम्ही त्रास नाही देत."

ए. "नीट बघा, कुठे तरी शिल्पकाराचे (कोरणे) -------------------- नाव असेल. कदाचित वरच्या कोपऱ्यात (कोरणे) ---------------- मजकूर आहे, त्यात ते (गुंफणे) ---------------- असू शकेल."

**ग. योग्य जोड्या तयार करू या. अनेक जोड्या शक्य.**

| | | |
|---|---|---|
| गाणे | | जिना |
| फिरणे | | संध्याकाळ |
| सरकणे | | वय |
| हलणे | | क्षण |
| जाणणे | | हात |
| कळणे | | पंखा |
| वाढणे | | गळा |
| सरणे | सरती संध्याकाळ, सरते वय, सरते क्षण, सरते आयुष्य, सरता ऋतू | पाने |
| निसटणे | | आयुष्य |
| देणे | | मुलगी |
| | | ऋतू |

**धातुसाधित विशेषणांपासून नामेही तयार होतात.**

उदा॰

**अ.**

**आई** : काय रे, का रडतोयस?

**मुलगा** : आई, वर्गातले सर्व जण मला मी जाड आहे म्हणून चिडवतात.

**आई** : हे बघ, चिडवणारी मुलं थोड्या दिवसांनी गप्प बसतील. त्या चिडवणाऱ्यांकडे आपण दुर्लक्ष करावं म्हणजे झालं.

**आ.**




**आई** : काय रे, काय झालं?

**मुलगा** : आई, आमच्या शाळेबाहेर एक लहान मुलगा दिसला. खूप भुकेला होता बिचारा!

**आई** : असे भुकेले पाहिले की वाईट वाटतंच! तू तुझा अर्धा डबा त्याला का दिला नाहीस? भुकेल्यांना नेहमी खायला द्यावे.

**घ. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे वाक्ये तयार करू या.**

उदा॰ हसणे – वाईट वाटून न घेणे : हसणारे हसतात. हसणाऱ्यांकडे दुर्लक्ष करावे.

अ. देणे – उपकार न विसरणे ------------------------------

आ. बोलणे – लक्ष न देणे ------------------------------

इ. सांगणे – सगळे न ऐकणे ------------------------------

ई. घेणे – अपमान न करणे ------------------------------

उ. पाहणे – विचार न करणे ------------------------------

ऊ. लिहिणे – सगळे गांभीर्याने न घेणे ------------------------------

**च. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संभाषण करू या.**

**अ. विभक्तिप्रत्यय :** ला / ना

उदा॰ बॉस + व्यवस्थापक : (कर्मचारी – वेळेच्या आधीच घरी जाणे / जादा काम करणे)

**बॉस** : हे काय, सगळे कर्मचारी गेले नाहीत का अजून?

**व्यवस्थापक** : नाही सर, काही जण वेळेच्या आधीच घरी गेले, पण हे जादा काम करतायत.

**बॉस** : हे बघा, जादा काम करणाऱ्यांना त्याचा नेहमी मोबदला देत जा आणि वेळेच्या आधीच घरी जाणाऱ्यांना चांगली तंबी देत जा.

१. मुख्याध्यापक + शिक्षक : (विद्यार्थी – लवकर घरी जाणे / वर्गात थांबून अभ्यास करणे)
२. व्यवस्थापक + सफाई कर्मचारी : (रस्ते – झाडणे / राहणे)
३. ग्रंथपाल + मुख्याध्यापक : (पुस्तके – येणे / न येणे)
४. परीक्षक + परीक्षार्थी : (प्रश्न – सोडवणे / उरणे)
५. आई + मुलगी : (आंबे – खाणे / उरणे)

**आ. विभक्तिप्रत्यय :** चा / ची / चे

उदा॰ बॉस + व्यवस्थापक : (कर्मचारी – वेळेच्या आधीच घरी जाणे / जादा काम करणे)

**बॉस** : हे काय, सगळे कर्मचारी गेले नाहीत का अजून?

**व्यवस्थापक** : नाही सर, काही जण वेळेच्या आधीच घरी गेले, पण हे जादा काम करतायत.

**बॉस** : मग जादा काम करणाऱ्यांचा पगार वाढवा आणि वेळेआधी गेलेल्यांचा पगार कापा.

व्याकरण

संवाद

१. मुख्याध्यापक + शिक्षक : (विद्यार्थी – लवकर घरी जाणे / वर्गात थांबून अभ्यास करणे)
२. व्यवस्थापक + सफाई कर्मचारी : (रस्ते – झाडणे / राहणे)
३. ग्रंथपाल + मुख्याध्यापक : (पुस्तके – येणे / न येणे)
४. परीक्षक + परीक्षार्थी : (प्रश्न – सोडवणे / उरणे)
५. आई + मुलगी : (आंबे – खाणे / उरणे)

**छ. सीमोल्लंघन**

**अ. योग्य पर्याय निवडू या. (एकापेक्षा जास्त पर्याय बरोबर असू शकतात.)**

**१. नावेद आकाशात नजर लावून बसलाय, कारण...**
क. प्रकाशकांना त्याची चित्रं पसंत पडली नाहीत.
ख. त्याचं काम प्रकाशकांना विदेशी वाटतं.
ग. लहान मुलांना त्याची चित्रं समजणार नाहीत असं प्रकाशक म्हणाले.

**२. नावेदला हेच काम करायचं आहे, कारण...**
क. त्याच्या घरच्यांना दुसरं कोणतंच काम आवडत नाही.
ख. त्याला दुसरं कोणतंच काम येत नाही आणि आवडतही नाही.
ग. त्यानं त्याच्या कामावर खूप मेहनत घेतली आहे.

**३. सीमोल्लंघन म्हणजे**
क. दुसऱ्या देशात, दुसऱ्या प्रांतात जाणं.
ख. दुसऱ्या देशाची संस्कृती समजणं.
ग. सीमा ओलांडून पलीकडे जाणं.

**४. आता सीमोल्लंघन प्रत्यक्ष करावं लागत नाही.**
क. सीमोल्लंघन घरूनच शक्य आहे.
ख. भरपूर पैसा असला की स्वतः सीमोल्लंघन करावं लागत नाही.
ग. स्वतः सीमा ओलांडून पलीकडे जावं लागत नाही.

**आ. प्रत्यक्ष देशाच्या पलीकडे न जाता केलेल्या सीमोल्लंघनाचा आपला अनुभव लिहू या.**

**इ. दोन विद्यार्थी एकत्र येऊन 'सीमोल्लंघन' ह्या विषयावर एक संभाषण लिहू या आणि ते वर्गात सादर करू या.**

## ४ वाचू या.



बेल्जियम नावाचा एखादा देश आहे, हे मला स्वतःला ८-९ वर्षांपूर्वी माहीत नव्हतं. मास्टर्स झाल्यावर माझ्या नवऱ्याला बेल्जियममधे नोकरी मिळाली आहे, असं जेव्हा कळलं तेव्हा माझा बेल्जियमचा ई-शोध सुरू झाला आणि अनेक कारणांमुळे तो अजूनही चालूच आहे. फरक इतकाच की आता तो प्रत्यक्ष अनुभवांतून घेते आहे. (...)

मी इथं दर वर्षी एक किंवा दोन सांस्कृतिक कार्यक्रमांचंही आयोजन करते. त्यात सहभागी झाल्यानं मला लिखाणाशी आणि रंगमंचाशी माझं नातं कायम ठेवता आलं आहे. ह्या कार्यक्रमांच्या माध्यमाने आम्ही भारतीय विवाहपद्धती, भारतीय सिनेमा, भारतीय खाद्य-संस्कृती ह्यांबद्दल माहितीही देतो. इथं राहताना या लोकांचे भारताबद्दल अजूनही किती गैरसमज आहेत हे कळतं. मला नेहमी विचारले गेलेले प्रश्न म्हणजे, तू लग्नाआधी अमेयला न भेटता त्याच्याशी लग्न केलंस का? किंवा इंडियन सिनेमा म्हणजे फक्त गाणीच असतात का? भारतीय जेवण? अच्छा, म्हणजे चिकन टिक्का मसाला! अर्थातच अशा पार्श्वभूमीवर हे सांस्कृतिक कार्यक्रम अनेकांसाठी भारताची खरी ओळख करून देणारे ठरतात. (...)



अशा आणि इतर अनेक कारणांमुळे मला वाटतं आपण वेगवेगळ्या ठिकाणी राहावं. अगदी राहायला जमत नसेल तर प्रवास करावा. माझा हा अखंड प्रवास माझ्यासमोर माणसांचा आणि संस्कृतींचा असा खजिना उघडतो. माझ्या घरी आलेला युरोपियन पाहुणा ज्या वेळी चमचे बाजूला ठेवून हाताने जेवतो, त्या वेळी मी त्या माणसांबद्दल किती पूर्वग्रह बाळगले होते, हे मला समजतं.



ह्या प्रवासामुळे आणि शोधामुळे मला सतत समजतं, की सगळीकडचे लोक वेगवेगळ्या गोष्टींसाठी अगदी सारखेच हळवे असतात. फ्रेंच लोक चीझ आणि वाइनसाठी असतील तर बेल्जियन्स बीअरसाठी. मुंबईकर पाणीपुरीसाठी असतील तर पुणेकर बाकरवडीसाठी. या प्रवासात समजतं, की जशी आपली स्वप्नं असतात तशीच अनेक लोकांची विविध स्वप्नं असतात. आणि ती सर्व अगदी हृदयातून अंकुरलेली असतात. थोडक्यात काय, तर 'जिकडे जावे तिकडे माझी भावंडे आहेत । सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत... ॥' हेच खरं!

**- अश्विनी गावडे**

**क. वरील उतारा नीट वाचून खालील वाक्यांचे स्पष्टीकरण लिहू या.**

उदा॰ सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत... हेच खरं!

लेखिकेने अनेक देश पाहिले, परदेशी प्रवास केला आणि तिच्या लक्षात आले की 'परका' देश तसा परका नसतोच खरे तर. दुसऱ्या देशांमध्येही आपल्याला आपल्या देशातील माणसांसारखी

माणसं भेटतात, त्यांचीही आपल्यासारखीच स्वप्नं असतात. म्हणून लेखिका म्हणते, "सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत... हेच खरं!"

अ. सगळीकडचे लोक वेगवेगळ्या गोष्टींसाठी अगदी सारखेच हळवे असतात.

आ. माझ्या घरी आलेला युरोपियन पाहुणा ज्या वेळी चमचे बाजूला ठेवून हाताने जेवतो, त्या वेळेस मी त्या माणसांबद्दल किती पूर्वग्रह बाळगले होते, हे मला समजतं.

इ. इथं राहताना या लोकांचे भारताबद्दल अजूनही किती गैरसमज आहेत हे कळतं.

## ५ वाचू या.

**क. मी : जगाचा नागरिक**



'अरेबियन नाईट्स' हे माझे लहानपणचे आवडते पुस्तक होते. त्या पुस्तकाची मी पारायणे केली. (...) अरेबियन नाईट्सने एक अद्भुतरम्य सृष्टी माझ्या डोळ्यांसमोर उभी केली आणि तिच्यात मी मनसोक्त विहार केला. सत्यसृष्टी घाणेरडी होती, करंटी होती. सौंदर्याचे चुकून दर्शन होत नसे. नगरच्या गल्ल्या, ते बोळ! पाण्याच्या अभावामुळे सर्वत्र पसरलेली ती घाण. (...) बखळीच्या पल्याडची ती प्राथमिक शाळा आणि दाढी वाढवलेल्या मास्तरांच्या हातातील त्या छड्या! त्या उठाबश्या आणि मानेवर खडे ठेवून रडत रडत काढलेले ते खर्डे! सारेच हिडीस, घाणेरडे आणि करंटे! (...) अरेबियन नाईट्सने मला वाचवले. मला पऱ्यांच्या राज्यात नेले! गंधर्वनगरीत नेले. तेथे मी हरून अल् रशीदच्या मांडीला मांडी लावून बसलो. हरूनच्या बरोबर आणि त्या काळ्याकभिन्न शिद्याच्या पुढे गुप्त वेषाने मी मध्यरात्री बगदाद शहरात हिंडू लागलो. (...) मोठी मजा मजा होती. झोपी गेलेल्या हसनला आम्ही गुंगीचे औषध देऊन राजवाड्यात आणीत होतो आणि खट्याळ पण देखण्या दासींच्या सुपूर्द करीत होतो. पडद्याआडून त्याची गंमत पाहत होतो. त्या बडबड्या न्हाव्याच्या गमतीजमतीच्या गोष्टी ऐकत होतो आणि त्याच्याबरोबर खोटेखोटेच पंचपक्वान्नांचे जेवण मिटक्या मारीत जेवत होतो.

मी हरून अल् रशीदबरोबर नुसता बगदादलाच मुक्काम केला नाही, नुसत्या गमती केल्या नाहीत किंवा पाहिल्या नाहीत. मी सिंदबादबरोबर अनेक सफरी केल्या, अनेक साहसांत उड्या घेतल्या आणि सहीसलामत सुटलो. (...)

सिंदबादबरोबर मी अनेक देश पाहिले, अनेक भलीबुरी माणसे पाहिली, अनेक संकटांतून वाचलो आणि अनेक अनुभव घेतले. सिंदबादच्या सहवासामुळे मी वर्तमानकाळ विसरलो, त्या गल्ल्या विसरलो आणि जगाचा नागरिक बनलो. जग पाहण्याची मला तहान लागली. माझी सहानुभूती व्यापक झाली. माझ्या भावनांच्या आणि कल्पनेच्या जाळ्यात सारे गवसले. मोठा झाल्यावर मी अधाशाप्रमाणे नाना देशांतील नाना लोकांची खबर घेऊ लागलो, त्यांच्याविषयी मिळतील ती पुस्तके वाचू लागलो आणि हातात बळ आल्यावर त्या न पाहिलेल्या लोकांच्या जीवनावर लिहू लागलो. इंग्लंडला गेलो, पॅरिसमध्ये दिवसरात्र भटकलो, बर्लिनच्या कॅबरेमध्ये जर्मन मित्रांबरोबर रात्रीच्या रात्री जागवल्या. इटलीतील दाढी वाढलेल्या शेतकऱ्यांबरोबर मॅकोरोनीची

चव घेतली, हॉलंडमधल्या कोळ्यांबरोबर भाकरीसंगे चीज खाऊन ढेकर दिला – पण मी परक्या मुलुखात आहे, परक्या माणसांबरोबर बोलत आहे, खातपीत आहे, असे मला कधीच वाटले नाही. ते सारे माझे भाऊबंद होते. कारण त्यांचे माझे लागेबांधे लहानपणीच 'अरबी भाषेतल्या सुरस आणि चमत्कारिक गोष्टीं'नी जुळवून दिले होते.

**- वि. द. घाटे**

**शब्दार्थ : पारायण करणे** = पुन्हा पुन्हा वाचणे, **हिडीस** = किळस वाटावी असे, गलिच्छ, **करंटे** = अभागी, दुर्दैवी, शिद्दी= सिद्दी, **गवसणे** = सापडणे, मिळणे, **अधाशाप्रमाणे** = भुकेल्या माणसाप्रमाणे, हावरटपणे, **ढेकर देणे = पोट तुडुंब भरल्यावर पोटातील वायू तोंडातून बाहेर पडणे**

**अ. लेखकाने केलेल्या या विधानामागे दोन कारणे आहेत : एक वाचण्याआधीचे आणि दुसरे वाचण्यानंतरचे. ही दोन्ही कारणे लिहू या.**

---

---

---

अरेबियन नाईट्सने मला वाचवले.

---

---

---

**ख. शतप्रतिशत अमेरिकी**

जगातल्या जवळपास सर्व व्यक्तींना आपापल्या संस्कृतीचा किंवा वारशाचा अभिमान असतोच. तसा तो सर्वसामान्य अमेरिकी नागरिकालाही असतो. प्रत्येकामध्ये आपापल्या संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाची भावना शतप्रतिशत असते; तशी ती सर्वसामान्य अमेरिकी नागरिकामध्येही शतप्रतिशतच असते.

पण त्या श्रेष्ठतम भरजरी संस्कृतीची वीण हलके हलके उसवून पाहिली, तर प्रत्येकाच्याच नकळत तिच्यात संस्कृतिबाह्य धाग्यांनी किती प्रमाणात घुसखोरी केली आहे ह्याचा त्या प्रत्येकाला पत्ताच नसतो. तसाच तो सर्वसामान्य अमेरिकी नागरिकालाही नसतो.

असा स्वदेशाभिमानी अमेरिकी नागरिक पहाटे पहाटे उठतो, तेव्हा त्याच्या अंगावर असलेला पायजमा नावाचा वेष मुळातला भारतीय असतो. ज्या पलंगावर तो निजलेला असतो त्याची संकल्पना प्रथम पर्शिया किंवा आशिया मायनरमध्ये जन्मलेली होती हे त्याच्या गावीही नसते. प्रथम भारतात पिकवला गेलेला कापूस किंवा मध्यपूर्वेत पिकवलेले लिनन किंवा आशिया मायनरमधल्या प्राण्यांकडून मिळालेली लोकर किंवा चिन्यांनी शोधलेले रेशीम अशा अ-अमेरिकी घटकांनी तयार झालेल्या प्रावरणांमध्ये त्याचा देह नखशिखान्त गुंडाळलेला असतो.



नीट जागा झाल्यावर तो घड्याळ नावाच्या - मध्ययुगीन युरोपात शोधलेल्या - उपकरणावर नजर टाकतो. मग तो घाईघाईने बाथरूममध्ये शिरतो. सांडपाण्याची अशी सुसज्ज आणि कार्यक्षम यंत्रणा आपल्याखेरीज जगातल्या इतर कोणत्याही सर्वसामान्य व्यक्तीला लाभत नाही, असा स्वाभिमानी विचार त्याच्या मनात क्षणभर येतो; पण हाय रे दैवा! तिथल्या काचेचा शोध प्राचीन इजिप्तमध्ये लागलेला असतो. पोर्सलिनचा चीनमध्ये, आणि ब्रॉन्झ युगात भूमध्य समुद्र किनाऱ्यावरील परगण्यांमध्ये धातूवर इनॅमलची प्रक्रिया प्रथम झालेली असते. बाथटब आणि कमोड म्हणजे रोमन लोकांनी शोधलेल्या वस्तूंचीच थोडी सुधारित आवृत्ती असते.

बाहेर आल्यानंतर अंगावरचे कपडे काढून तो ज्या खुर्चीवर टाकतो तिचा पहिला आविष्कार मध्यपूर्वेमध्ये झालेला असतो. अंगावर घट्ट बसणाऱ्या कपड्यांचे मूळ डिझाईन आशियातल्या गवताळ प्रदेशातील लोकांनी फार पूर्वीच केलेले असते. त्यांना लावलेल्या बटणांची कल्पनाही अश्मयुगाच्या अखेरीस युरोपमध्ये जन्मलेली असते. पायांत चपखल बसणारे जोडे आणि त्यांना केलेले चकचकीत पॉलिश ग्रीकांच्या कल्पनेतून आलेले असते. शेवटी, तो आपले रूपडे ज्या आरशात बघतो तोही मुळात भूमध्य समुद्राच्या प्रदेशातून आलेला असतो.

नाश्त्यासाठी वापरलेल्या ताटल्या चिनी मातीच्या; काटा मध्ययुगीन इटलीमध्ये तर चमचा रोमन संस्कृतीमध्ये जन्मलेला. वाफाळलेली कॉफी ॲबिसिनियातल्या अरबांना प्रथम सापडलेली असते. जर तो अमेरिकी संस्कृतीचा प्रखर अभिमानी असला, तर कॉफीबरोबर भूमध्य समुद्राच्या प्रदेशात सापडलेल्या संत्र्याचा रस घेतो, मग स्कॅन्डिनेव्हियात शोधलेल्या वॅफल्सकडे आपला मोर्चा वळवतो.

कामावर जाण्यासाठी तो इंग्रजांनी शोधलेली ट्रेन पकडतो. तत्पूर्वी प्राचीन लीडियामध्ये प्रथम वापरले गेलेले नाणे हे चलन देऊन वर्तमानपत्र खरेदी करतो. ते वाचताना मेक्सिकनांनी शोधलेली सिगारेट किंवा ब्राझीलमध्ये शोधलेला सिगार शिलगावतो. जर्मनीत विकसित झालेल्या छपाईच्या तंत्राने चिन्यांनी शोधलेल्या कागदावर प्राचीन मध्यपूर्वेत प्रथम घडवली गेलेली अक्षरे वापरून छापलेल्या बातम्या वाचतो. परकीय कल्पना स्वीकारल्यामुळे आपल्या संस्थांवर झालेले अनिष्ट परिणाम दाखवून देणाऱ्या अग्रलेखावरून तो नजर फिरवतो. तेव्हा आपण स्वतः शतप्रतिशत (ग्रीकांनी शोधलेली दशमान पद्धत) अमेरिकी (नवे जग शोधणाऱ्या अमेरिक्युस व्हेस्प्युसी ह्या इटालियन गृहस्थाच्या नावावरून पडलेले नाव) असल्याबद्दल हिब्रू देवाचे आपल्या इंडो-युरोपीय भाषेमध्ये आभार मानतो.

**- राल्फ लिंटन**

**शब्दार्थ :** वारसा = पूर्वजांकडून मिळालेली संपत्ती, हक्क इ॰ / शतप्रतिशत = शंभर टक्के / श्रेष्ठतम = अतिशय वरच्या दर्जाचे / भरजरी = जरीचे नक्षीकाम केलेले / वीण = कापडातील उभ्या-आडव्या धाग्यांची गुंफण / उसवणे = शिवलेला दोरा किंवा विणलेले धागे निघून येणे / संस्कृतिबाह्य = संस्कृतीत न बसणारे, बाहेरचे / स्वदेशाभिमानी = स्वतःच्या देशाचा अभिमान असणारा / निजणे = झोपणे / गावी नसणे = अजिबात माहीत नसणे / प्रावरण = पांघरूण / उपकरण = साधन / सुधारित = सुधारणा केलेले / आविष्कार = उदय होणे, प्रत्यक्ष घडणे / वाफाळलेली = वाफा येण्याइतकी गरम / अनिष्ट = वाईट, अयोग्य / दशमान = मेट्रिक मोजमाप पद्धत / नवे जग = अमेरिका

शब्दसंपदा

## ६ संधी

**क. वाचू या.**



दिगंबर तणतणतच घरात शिरत म्हणाला, "समजतो कोण हा दिलीप स्वत:ला?"

चिन्मयनं विचारलं, "काय रे दिगू, झालं काय असं भडकायला?" दिगू सांगू लागला, "अरे, कालपरवा आपल्या कंपनीत आलेला हा दिलीप, आज नवीन नाटकाचा नायक होतो? वाक्चातुर्याच्या बळावर स्वत:चं महत्त्व वाढवून ठेवलंय यानं. गोड गोड बोलून भक्त गोळा करून ठेवलेत भोवताली. उच्छाद मांडलाय नुसता! काय, तर म्हणे याला सगळी भगवद्गीता पाठ आहे! करायचंय काय तिचं? अरे, नाटकातला एक लहान परिच्छेदसुद्धा पाठ होत नाही याचा. अभिनयाची तर बोंबच आहे. आणि सदाचार, सद्भावना वगैरे काही असावं की नाही?"

चिन्मय त्याला समजावत म्हणाला, "सोड रे दिगू, तो वर बसलेला जगन्नाथ पाहतोय सगळं. मला खात्री आहे, लवकरच दिग्दर्शकाला पश्चात्ताप होईल आणि तुझ्यासारखा अभिनय काय, कुणीही सोम्यागोम्या करेल, नाही का? एखादा सज्जन आणि सद्गुणी कलाकार नायकाच्या भूमिकेसाठी निवडला जाईल."

दिगू हात जोडत म्हणाला, "अशीच तुझी सदिच्छा माझ्या पाठीशी राहो!"

**अ. उताऱ्यातील अधोरेखित शब्दांपैकी काही शब्दांचे संधी कसे तयार झाले आहेत ते पाहू या.**

| | | |
|---|---|---|
| दिगंबर | दिक् + अंबर | क् + अं → गं |
| चिन्मय | चित् + मय | त् + म → न्म |
| वाक्चातुर्य | वाक् + चातुर्य | क् + च → क्च |
| महत्त्व | महत् + त्व | त् + त्व → त्त्व |
| उच्छाद | उत् + छाद | त् + छ → च्छ |
| भगवद्गीता | भगवत् + गीता | त् + ग → द्ग |
| परिच्छेद | परि + छेद | इ + छ → च्छ |
| सदाचार | सत् + आचार | त् + आ → दा |

व्याकरण

आ. वरीलप्रमाणे तक्त्यातील रिकाम्या जागा भरू या.

| | | |
|---|---|---|
| सद्भावना | सत् + भावना | |
| जगन्नाथ | | त् + न → न्न |
| दिग्दर्शक | | |
| रंगच्छटा | | अ + छ → च्छ |
| मातृच्छाया | मातृ + छाया | ऋ + छ → च्छ |
| पश्चात्ताप | पश्चात् + ताप | |
| सज्ञन | | |
| | सत् + गुणी | |
| | सत् + इच्छा | |

## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो संप्रदाय, ते - | तो ओवी, त्या ओव्या | ते चराचर |
| तो वारकरी, ते - | ती गवळण, त्या गवळणी | ते योगदान |
| तो अभंग, ते - | ती विरहिणी, त्या - | ते दैवत, ती दैवते / दैवतं |
| तो मत्सर, | ती बिदागी, त्या बिदाग्या | ते भक्तिमंदिर, ती भक्तिमंदिरे / भक्तिमंदिरं |
| तो चोपदार, ते - | ती परिणामकारकता | ते भारूड, ती भारुडे / भारुडं |
| तो नगारा, ते नगारे | ती जगरहाटी | ते प्रवचन, ती प्रवचने / प्रवचनं |
| तो निजाम, ते - | ती कांबळ, त्या कांबळी | ते ब्रीद, ती ब्रीदे / ब्रीदं |
| तो द्वेष्टा, ते द्वेष्टे | ती शेकोटी, त्या शेकोट्या | ते सीमोल्लंघन, ती सीमोल्लंघने / सीमोल्लंघनं |
| तो खच, ते - | ती सरहद्द, त्या सरहद्दी | ते पारायण, ती पारायणे / पारायणं |
| तो विहार, ते - | ती सत्यसृष्टी | |
| तो मुलूख, ते - | ती बखळ, त्या बखळी | |
| तो लागाबांधा, ते लागेबांधे | | |



## क्रियापद

गवसणे

## विशेषण

अनमोल, मूर्त, विश्वात्मक, विशाल, चिरंतन, सर्वसमावेशक, दिलखुलास, हिडीस, करंटा, खट्याळ, देखणा

## क्रियाविशेषण

खालसा, मनसोक्त, सहीसलामत

## नाम / इतर शब्द + क्रियापद

वाळीत टाकणे, खालसा होणे, जगरहाटी सोडणे, पारायणे करणे, विहार करणे, मिटक्या मारीत जेवणे, सहीसलामत सुटणे, रात्री जागवणे

## आता मला हे येतं...

**सर्वसमावेशक भारतीय संस्कृती समजून घेणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**संवेदनशीलता, मानवतावाद, आंतरराष्ट्रीय सहकार्य यांबद्दल समजून घेणे व चर्चा करणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**व्याकरण : धातुसाधित विशेषणे (गाणारा गळा – गायलेले गाणे – गाता गळा) समजणे व वापरणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**संधी ओळखणे आणि करणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# ५ मराठी भाषा – विविध पैलू






चला, शिकू या ...

- मराठी भाषेची मूलभूत माहिती करून घेणे
- मराठी भाषेतील गमतीजमती समजून घेणे
- मराठी वळवावी तशी वळते हे समजून घेणे
- मराठी भाषेच्या विविध बोलींची झलक पाहणे
- एकाच शब्दाचे अनेक अर्थ समजून घेणे
- अनेक लिंगे असणारी नामे ओळखणे
- व्याकरण : ध्वन्यनुकारी शब्द / क्रियापदे वापरणे
- व्याकरण : 'ऊक' जोडून होणारी नामे वापरणे
- व्याकरण : संधी ओळखणे आणि करणे

## तुम्हाला माहीत आहे का? बरोबर उत्तरावर ✓ खूण करू या.

**१**
मराठी भाषा साधारण कोणत्या शतकात बोलली जाऊ लागली?

१. बाराव्या ☐
२. सहाव्या ☐
३. तिसऱ्या ☐

**२**
मराठी भाषा घडत असताना तीवर पुढीलपैकी कोणत्या भाषांचा प्रभाव पडला?

१. जर्मन ☐
२. उर्दू ☐
३. फारसी ☐

**३**
मराठी भाषेतील पहिला शिलालेख कुठे सापडला?

१. अजिंठा लेणी ☐
२. शनिवारवाडा ☐
३. श्रवणबेळगोळ ☐

**४**
भारतातील किती राज्यांची राजभाषा मराठी आहे?

१. एका राज्याची ☐
२. दोन राज्यांची ☐
३. चार राज्यांची ☐

**५**
मराठी भाषा दिन पुढीलपैकी कोणत्या साहित्यिकाचा जन्मदिन आहे?

१. पु. ल. देशपांडे ☐
२. प्र. के. अत्रे ☐
३. कुसुमाग्रज ☐

**६**
भारताबाहेर कोणत्या देशांत मराठी बऱ्याच प्रमाणात बोलली जाते?

१. इंग्लंड ☐
२. अमेरिका ☐
३. इस्राएल ☐

**७**
मराठी भाषकांची एकूण संख्या किती?

१. ९ कोटी ☐
२. ९ लाख ☐
३. ३ कोटी ☐

**८**
मराठी भाषा दिन कधी साजरा करतात?

१. १ मे ☐
२. १५ ऑगस्ट ☐
३. २७ फेब्रुवारी ☐

**९**
मराठी भाषा कोणत्या लिपीत लिहितात?

१. रोमन ☐
२. देवनागरी ☐
३. चित्रलिपी ☐

**वरील कोड्याचे उत्तर –**
१. – दोन
२. – दोन आणि तीन
३. – तीन
४. – दोन
५. – तीन
६. – तीन
७. – एक
८. – तीन
९. – दोन



## १ माझी मराठी

### भाग एक



आमच्या लहानपणी – म्हणजे १९६०च्या आसपास – मुंबईसारखी मोजकी शहरे सोडली, तर बाकीच्यांचे सामाजिक जीवन 'बहु' म्हणावे – म्हणजे बहुरंगी, बहुसांस्कृतिक, बहुभाषक वगैरे – असे काही नव्हते. समाजाचा प्रत्येक घटक आपापल्या पूर्वजांनी आखून ठेवलेल्या रेषेवरून बिनबोभाट चालत होता. खाणे-पिणे, नेसणे, बोलणे हे सगळे कसे संस्कारांना अनुसरून चालायचे. रेष सोडून चालणे तर राहूच द्या, चुकून पाऊल तिरपे पडणेही अमान्य होते.

उदाहरणार्थ भाषा. आम्ही फक्त मराठी – तीही जिला 'प्रमाण मराठी' म्हटले जाते तीच ऐकत, बोलत, वाचत आणि लिहीत होतो. तिच्यापेक्षा वेगळ्या तऱ्हेची मराठी घरकामासाठी येणाऱ्या स्त्रियांच्या तोंडून किंवा लोकप्रिय नाटक-चित्रपटांमधून ऐकायला मिळत असे; पण आमच्या भाषाव्यवहारात आम्ही ती कधी येऊ देत नव्हतो. हिंदी चित्रपट वर्षात एखाददुसरा पाहायला मिळे. हिंदी भाषेशी तेवढाच संबंध येई. तशी हिंदी गाणी आमच्या फार जिवाभावाची होती खरी, पण ती संगीतामुळे. इंग्रजी अगदीच परकी, लादलेली भाषा. आमच्या परिसरात ती कुठेच नव्हती.

थोडक्यात, आम्ही शंभर टक्के निर्भेळ मराठी भाषक होतो.

**क. वरील उताऱ्यातील अधोरेखित शब्द योग्य जागी वापरून पुढील वाक्ये पूर्ण करू या.**

अ. माझ्या मैत्रिणी खूप आहेत, पण सई माझी अगदी ------------------------ मैत्रीण आहे.

आ. माझ्या मित्रमंडळींपैकी काही ------------------------ मित्रांना मी आज रात्री जेवायला बोलावलंय.

इ. बरा आहे गं तो चित्रपट. मुख्य म्हणजे तीन तास ------------------------ करमणूक होते.

ई. कुठलंही काम अगदी ------------------------, ह्या कानाचं त्या कानाला कळू न देता करण्यातच खरी चतुराई आहे.

**ख. उताऱ्याचा पुढील भाग वाचण्याआधी खालील प्रश्नांवर थोडी चर्चा करू या आणि नंतरच्या वादविवादासाठी त्याआधारे मुद्दे तयार करू या.**

अ. 'निर्भेळ मराठी भाषक' असण्याची कोणती लक्षणे पन्नास वर्षांपूर्वीच्या ह्या पिढीत होती?

१. ------------------------------------------------

२. ------------------------------------------------

३. ------------------------------------------------

४. ------------------------------------------------

आ. आपल्या सामाजिक, सांस्कृतिक, आणि भाषिक परिघाबाहेर पडण्याचे ह्या पिढीने कटाक्षाने टाळले. त्यावेळच्या मराठी भाषेचे 'निर्भेळपण' त्यामुळे टिकून राहिले असे तुम्हाला वाटते का?

'हो' असे उत्तर असेल तर त्याची कारणे देऊ या.

'नाही' असे उत्तर असेल तर त्याची कारणे देऊ या.

**भाग दोन**



काहीच शंभर टक्के निर्भेळ वगैरे नसते, अगदी भाषासुद्धा, हे यथावकाश आम्हाला कळले. रांगत्या वयापासून जी कावळा-चिमणीची 'गोष्ट' आम्ही ऐकत आलो, तीच 'कथुली' सातशे वर्षांपूर्वीची बाळेही ऐकत होती; फक्त आमच्या गोष्टीतल्या 'कावळ्याचं घर होतं शेणाचं, चिमणीचं घर होतं मेणाचं', तर तेव्हाच्या कथुलीतल्या 'काऊळेयाचें घर सेणाचें, साळैचें घर मेणाचें' होते. आमच्या गोष्टीत 'मोठ्ठा पाऊस पडत होता', तर त्यांच्या कथुलीत 'पाऊस पडे' असे थोडक्यात आटोपते घेतले होते. पण तीही मराठीच होती आणि आमचीही मराठीच आहे, असा महत्त्वाचा साक्षात्कार आम्हाला झाला. इतक्या शतकांपासून वाटेतले खाचखळगे पार करत, आक्रमणांना आणि अतिक्रमणांना तोंड देत आणि त्यांनाही आपलेसे करून घेत आपले 'मराठीपण' तिने टिकवून ठेवले आहे. तिच्याबद्दल प्रेम वाटण्यासारखी अशी अनेक कारणे आहेत.

**क. वरील उताऱ्यातील अधोरेखित शब्द योग्य जागी वापरून पुढील वाक्ये पूर्ण करू या.**

**अ.** आजी मला रोज रात्री किती मोठी, छान गोष्ट सांगते. ती आज नाही, तर तू अशी छोटीशी ---------------- सांगतोयस का?



**आ.** मला काहीच कळत नव्हते तेव्हापासून, अगदी ---------------- ---------------- म्हणा ना, माझे पालक मला 'शहाण्यासारखं वाग' असा सल्ला देत आहेत. म्हणजे नक्की काय ते मला अजूनही कळलेलं नाही. त्यांना विचारलं तर म्हणतात, '---------------- कळेलच तुला'! ती वेळ कधी येणार, आणि शहाण्यासारखं वागणं म्हणजे नक्की कसं वागणं हा ---------------- मला कधी होणार, ह्याचीच वाट मी गेली अठरा वर्षं बघतोय.

**ख. खालील वाक्ये 'अडथळा, अडचण, समस्या आणि खाचखळगा' हे शब्द एकवचन आणि अनेकवचनात वापरून पूर्ण करू या. हे शब्द बऱ्याच अंशी समानार्थी असल्याने त्यांचा वापर एकापेक्षा जास्त वाक्यांत होऊ शकेल. आधी वाक्ये पूर्ण करू या आणि मग चर्चा करू या.**

अ. मला आयुष्यात काही ---------------- आलीच नाही असं समजू नका. मी आजवर अनेक ---------------- सामना केला आहे.

आ. अशा लहानसहान ---------------- घाबरून कसे चालेल? यशस्वी व्हायचे असेल तर अशा प्रत्येक ---------------- धीराने मात केली पाहिजे.

इ. ही वाट ---------------- भरलेली आहे. जपून जा. लक्षात ठेवा, ह्यातील प्रत्येक ---------------- जीवघेणा ठरू शकतो.

ई. वाटेत येणाऱ्या ---------------- तोडगा काढत आणि प्रत्येक ---------------- यशस्वीपणे मात करत मी इथवर पोचलो आहे.

**ग. पुढील उतारा वाचू या.**



दिवाळी अंकासाठी एखादी कथा लिहावी म्हटलं, पण सुचतच नव्हतं काही. शेवटी कशीबशी एक कथुली झाली लिहून. नाही तरी बालगटासाठीच काढायचा आहे अंक. गंमत म्हणजे, हीच कथुली नंतर मनस्वीच्या शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनात मला वापरता आली. तिथे गुरु-शिष्य नात्यावर एक नाटक बसवायचं होतं. माझी दिवाळी अंकातली गोष्ट एकलव्यावर होती. तीच आधाराला घेऊन एक नाटुकलं तयार केलं. मनस्वीच एकलव्य झाली होती. पण मोठं धनुष्य तिला पेलवेना. म्हणून तिच्या दादाने छोटीशी धनुकली दिली करून. एकलव्याच्या भूमिकेत गोड दिसत होती माझी मनुली.

**अधोरेखित केलेले शब्द पाहू या आणि त्यांच्या जोड्या करता येतात का ते पाहू या.**

उदा॰ कथा - कथुली

अ. ------------------- - नाटुकलं

आ. धनुष्य - -------------------

इ. ------------------- - मनुली

**टीप :** एखाद्या वस्तूच्या, गोष्टीच्या किंवा व्यक्तीच्या नावाला '-उली', '-उकली' असे प्रत्यय वापरून त्या नावाला लहान रूप दिले जाते. या प्रकारे तयार झालेल्या शब्दातून केवळ लहानच नव्हे, तर लडिवाळ रूप असा अर्थ सुचवला जातो. यात मूळ शब्दाच्या रूपात प्रत्ययाशिवाय आणखीही बदल होतो.

**ह्याप्रमाणे पुढील नामांची रूपे पाहू या.**



उदा॰ घर - घरकुल

अ. ताट - -------------------

आ. सूप - -------------------

इ. बुधला - -------------------

ई. डफ - -------------------

**आता पुढील शब्द पाहू या.**

छोटा - छोटुकला, छोटुकले छोटुकली, छोटुकल्या छोटुकले / छोटुकलं, छोटुकली

मूळ शब्द विशेषणे असतील तर त्यांचे लिंग-वचन बदलते.

**याप्रमाणे पुढील विशेषणांची रूपे लिहू या.**

धीट - धिटुकला, ------------------- ------------------- -------------------

गोड - गोडुला, ------------------- ------------------- -------------------

चिमणा - चिमुकला, ------------------- ------------------- -------------------

**घ. वादविवादासाठी खालील प्रश्नांच्या आधारे मुद्दे तयार करू या.**

आपण निर्भेळ मराठीभाषक आहोत असा त्या वेळच्या पिढीचा समज बरोबर होता का? की त्यांची भाषा त्यांच्याही नकळत नवनवे बदल आत्मसात करत होती?
उताऱ्यात तसे काही संदर्भ आले आहेत का? कोणते? मुद्दे जमवू या.

**च. चला, वादविवाद करू या.**



वर्गातील विद्यार्थ्यांचे दोन गट करू या. एक गट पुढीलपैकी एका बाजूचे समर्थन करेल तर दुसरा गट दुसऱ्या बाजूचा समर्थक असेल. प्रत्येक गट वेगवेगळी उदाहरणे देऊन आपली बाजू मांडेल आणि दुसऱ्या गटाला पटवून देण्याचा प्रयत्न करेल. शिक्षक मार्गदर्शन करतील.

**गट एक** - इतर भाषांच्या संपर्कात आल्यामुळे भाषा बिघडते. आपल्या भाषेचे जतन आणि संवर्धन करायचे असेल, तर आपल्या सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातच वावरले पाहिजे आणि इतर भाषांशी संपर्क टाळला पाहिजे.

**गट दोन** - भाषेत बदल व्हायला कोणतेही एकच कारण लागत नाही. ती सतत घडत, बदलत राहते. आजूबाजूच्या समाजाचा, राजकीय घडामोडींचा, भाषिक शेजाराचा तिच्यावर परिणाम होतच राहतो. होणारा हा बदल बऱ्याचदा तिला अधिक समृद्ध करतो.



**छ. भाषा**

अर्थाविण शब्द
मृत की हो झाला ।
नुसत्या ध्वनीला कार्य नाही ॥
शब्दार्थावाचून वाक्य निरर्थक ।
आशयाशिवाय भाषा
जिणे नाही ॥
अर्थपूर्ण भाषा हेचि गा साधन ।
जन्म-मृत्यू सांधे, बांधते जीवन ॥
भाषेत विचार, कल्पना, आचार ।
भाषेमध्ये भाव, प्रेम भाषारूपी ॥
भाषेला व्यापून विश्व हे फिरते ।
भाषा जगण्याचे सार्थक करते ॥

**- रमेश पानसे**

शिक्षकांच्या मदतीने शेजारील कवितेचा अर्थ समजावून घेऊ या आणि स्वतःच्या शब्दात इथे लिहू या.

------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

## २ मराठी भाषेतील गमती जमती

**क.** चला, वाचू या; पण त्यासाठी आधी वर्गातील विद्यार्थ्यांचे तीन गट करू या. प्रत्येक गटाने एकेक परिच्छेद वाचू या. त्यात मराठी भाषेविषयी काय मजेशीर माहिती दिली आहे ते सांगू या. त्यात कोणते गमतीचे शब्द, वाक्प्रचार, म्हणी आहेत ते सांगून, जमल्यास त्यांचा अर्थही सांगू या. शब्दकोशाची मदतही घेता येईल.

### जीव घाबरा करणारी भाषा

मराठी भाषेच्या अभ्यासक मॅक्सिन बर्न्टसन ऊर्फ मॅक्सिनमावशी. आज वय ऐंशीच्या घरात. मायभूमी अमेरिका सोडून भारतात आल्या आणि मराठीच्या प्रेमापोटी कायमच्या इथेच राहिल्या. मराठी भाषा शिकतानाचा आपला अनुभव डॉ. बर्न्टसन यांनी 'जीव घाबरा करणारी भाषा' या लेखात खूपच गमतीशीरपणे मांडला आहे.

(१) इकडे यायच्या अगोदर मला भारताबद्दल फारसे काही माहीत नव्हते. पण हा देश शांतताप्रेमी आणि अहिंसावादी आहे अशी माझी ठाम समजूत होती. महात्मा गांधींचे चरित्र, थोडेसे हिंदू तत्त्वज्ञान आणि टी. एस. एलियटचे वेस्टलँड (ॐ शांतिः शांतिः शांतिः) वगैरे वाचल्यामुळे ही कल्पना झाली असेल. (...) माझा मराठीचा अभ्यास सुरू झाला तेव्हा माझा पूर्ण भ्रमनिरास झाला.




अगदी पहिल्याच दिवशी माझे मराठीचे शिक्षक म्हणाले, "मी सातारा जिल्ह्यातला आहे. आमच्या जिल्ह्याचे लोक मारामारीसाठी प्रसिद्ध आहेत. 'मी तुला मारीन' याला मराठीत अनेक वाक्प्रचार आहेत. 'मी तुला तुडवीन', 'मी तुला वाजवीन', 'तुझं नरडं दाबीन', 'तुझ्या नरड्यावर पाय ठेवीन' इत्यादी इत्यादी."

सुरवातीला मला वाटले, की हा भांडखोरपणा फक्त सातारा जिल्ह्याचे वैशिष्ट्य आहे. हळूहळू मात्र माझ्या लक्षात यायला लागले, की ही वृत्ती मराठी भाषेतच भिनलेली आहे. बाळबोध लिपीबरोबरदेखील हिंसेचे बाळकडू पाजले जाते- अक्षरांचे पाय मोडणे, पोट फोडणे. (आणि पुढे ध चा मा करून काय झाले ते इतिहासाच्या वर्गात शिकवले जाते.)

(२) केवळ अक्षरांच्या बाबतीत ही स्थिती, तर सामाजिक व्यवहाराची काय कथा! 'नाक दाबले तर तोंड उघडते', ह्यांसारख्या म्हणींमध्ये तर उघड हिंसाचार दिसतोच, पण एरव्हीसुद्धा काय होतं ते पाहा. नुसता दोष देऊन पुरेसे समाधान न होता लोक अमक्याचे खापर इतरांच्या माथी फोडतात, त्यांना धारेवर धरतात. राजकारणी लोक एकमेकांच्या पाठीत खंजीर खुपसतात, न्हावी नसलेली माणसे लोकांची बिनपाण्याची हजामत करतात आणि भांडवलदार कामगारांचे रक्त आटवतात! रोजच्या जीवनाच्या स्पर्धेमध्ये लोक एकमेकांच्या पोटावर पाय ठेवतात किंवा एकमेकांचे पाय ओढतात. आई-बाप लहान मुलांचे कान उपटतात आणि मुले मोठी झाल्यावर आई-बापाच्या डोक्यावर मिरी वाटतात.



ही झाली अप्रत्यक्ष भांडणाची उदाहरणे. मग उघड उघड भांडण सुरू झाले की भाषाही एकदम भडकते! तळपायाची आग

मस्तकाला जाते, माणूस दात-ओठ खातो, आपले तापलेले हात थंड करून घेतो आणि शिव्या द्यायला हपापलेला जीव भरपूर तोंडसुख घेतो.

नवलाची गोष्ट म्हणजे हा हिंसाचार फक्त इतरांच्याच विरुद्ध असतो असे नव्हे. स्वतःविरुद्ध लोक तितकेच हिंसक असतात. झोपेतून उठल्यावर अंग मोडतात, गप्पा मारता मारता बोटे मोडतात, घसाफोड करतात, तोंड फाटेस्तोवर बोलतात. प्रेमप्रकरणाच्या बाबतीत तर ही स्वतःवर हिंसा करण्याची प्रवृत्ती विशेष दिसून येते. आपली एकुलती एक मुलगी प्रेमविवाह करणार आहे असे कळल्यावर आई-बाप घर डोक्यावर घेतात. बायको परपुरुषाशी गप्पा मारतीय हे पाहून नवरा स्वतःच्या डोक्यात राख घालतो.

(३) भांडखोरपणाबरोबरच मराठी भाषेचे एक वैशिष्ट्य म्हणजे शरीरशास्त्राविषयीच्या अद्भुत कल्पना. जिभेला हाड असणे ही चांगली गोष्ट समजली जाते. लोकांचे हातपाय गळतात, त्यांच्या काळजाचे पाणी होते, त्यांच्या तोंडचे पाणी पळते, त्यांच्या पोरांना पंख फुटतात, शिंगे फुटतात. ज्याला तिसरा डोळा फुटतो तो माणूस आदरणीय समजला जातो.



मराठी माणसांना होणारे रोग तर अनाकलनीय आहेत. लोकांचे तोंड येते (ते गेले होते कुठे?), डोळे येतात. झोपडपट्टीतल्या मुलांच्या जीवे येते (नेमके काय येते देव जाणे), कोणी वेड्यासारखे वागायला लागले, की त्याचे डोके फिरले किंवा डोके हलले असे म्हणतात.

शरीराबद्दल विचित्र कल्पना आहेतच, तर खाण्याबद्दल तर काही विचारूच नका. मराठी माणसे वाट्टेल ते खातात- बोलणी खातात, डोके खातात, वेळ खातात, मार खातात, अक्षरे खातात, (...) पैसे खातात. (शेणही खातात असे मी ऐकले आहे.)

मग ही राकट, दांडगट, शरीरशास्त्र आणि तर्कशास्त्र ही दोन्ही न जुमानणारी भाषा परकीय माणसाने शिकायची कशी? कधी कधी या विचाराने मी वैतागून जाते. मग ही भाषा थोडी का होईना, माझ्यावर कृपा करून (मला) यायला लागली आहे, या सुखद विचाराने माझा जीव भांड्यात पडतो.

**- मॅक्सिन बर्न्टसन**

टीप : पोटावर पाय ठेवणे = पोटावर पाय देणे
डोक्यात राख घालणे = डोक्यात राख घालून घेणे

**ख. चला, खेळू या, 'वाक्प्रचार ओळखा'!**

**वर्गातील एकेका विद्यार्थी / विद्यार्थिनीने पुढे येऊन मूकाभिनय करून वरील उताऱ्यातील कोणताही एक वाक्प्रचार दाखवायचा आहे. इतर विद्यार्थी तो वाक्प्रचार ओळखतील.**

उदा॰ नाक दाबले तर तोंड उघडते.



संवाद

## ३ चला, गप्पा मारू या.

### धारेवर धरणे



**पहिला विद्यार्थी :** अरे, आज माझी चांगलीच पंचाईत झाली.
**दुसरा विद्यार्थी :** का रे, काय झालं तरी काय?
**पहिला विद्यार्थी :** अरे, मी आज गृहपाठ केला नव्हता.
**दुसरा विद्यार्थी :** मग?
**पहिला विद्यार्थी :** मग काय, सरांनी चांगलंच धारेवर धरलं मला!
**दुसरा विद्यार्थी :** काय? धारेवर धरलं?
**पहिला विद्यार्थी :** हो ना, चांगलंच धारेवर धरलं!
**सगळे विद्यार्थी :** अरे बाप रे! म्हणजे आता आपल्यालाही धारेवर धरणार सर!



ह्याचप्रमाणे –

अ. घरी यायला उशीर होणे - आई

आ. ड्रायविंग लायसन्स घरी विसरणे - पोलीस

इ. ऑनलाइन विजेचे बिल भरायला विसरणे – बाबा

ई. परीक्षेला जाताना ओळखपत्र विसरणे – शिक्षक

## ४ मराठी भाषा वळवावी तशी वळते

१

पायात चप्पल घालायची की चपलेत पाय घालायचे?
अंगात सदरा घालायचा की सदऱ्यात अंग घालायचे?
हातात बांगड्या भरायच्या म्हणजे पोत्यात धान्य भरतो तशा भरायच्या?
असे अनेक प्रश्न अजूनही अनुत्तरित आहेत. जाणकारांनी उत्तरे द्यावीत.

२

**पादचारी १ :** अहो, इथे 'धंदा अपार्टमेंटस्' कुठे आहेत सांगता का जरा?
**पदाचारी २ :** काय? 'धंदा अपार्टमेंटस्'? अशा नावाची इमारत आहे?
**पादचारी १ :** होय हो! हा बघा, आहे ना पत्ता माझ्याकडे. कारवे रस्त्यावरच आहे ही इमारत.
**पादचारी २ :** पण इथे कुठे कारवे रस्ताही नाहीये!
**पादचारी १ :** नाही कसा? आपण तर त्याच रस्त्यावर उभे आहोत ना?
**पादचारी २ :** हा तर कर्वे रस्ता आहे. बघू मला तो पत्त्याचा कागद.



**पादचारी १ :** हा बघा.
**पादचारी २ :** अरे देवा! अहो, 'धनदा अपार्टमेंटस्', कर्वे रस्ता असा पत्ता आहे. ती बघा, समोरच आहे ती इमारत.




**क.** वरील तिन्ही प्रसंगांत बोलणाऱ्या, ऐकणाऱ्या, वाचणाऱ्या व्यक्तींचा का गोंधळ उडाला आहे? दुसऱ्या प्रसंगात चुकीच्या उच्चारांमुळे 'धनदा' चं 'धंदा' झालं आणि 'कर्वे'चं 'कारवे' झालं.

प्रसंग १ आणि ३ मधील गोंधळ कशामुळे झालाय?

वाक्प्रचारामुळे, बोलण्याच्या पद्धतीमुळे, इतर भाषांच्या उच्चारपद्धतींच्या प्रभावामुळे, संयुक्त क्रियापदांच्या वापरामुळे ... ??

**वर्गात चर्चा करू या आणि उत्तर सांगू या.**

## ५ देवा, पाव रे पाव आता!

**क. ऐकू या.**

**ख. बरोबर असलेल्या सर्व पर्यायांवर ✓ खूण करू या.**

अ. पाव म्हणजे काय?
१. खाण्याचा बेकरीत बनवलेला पदार्थ ☐
२. चतकोर ☐
३. 'पावणे' ह्या क्रियापदाचे रूप ☐



आ. सोहम किती पाव खाणार आहे?
१. एक ☐ २. तीन ☐ ३. चतकोर ☐

इ. डॅनिएलला किती पाव आणायचे आहेत?
१. एक ☐ २. आठ ☐ ३. तीन ☐



ई. पाव किती जण खाणार आहेत?
१. दोन ☐ २. तीन ☐ ३. चार ☐

आहे ना मराठी भाषा मजेशीर? एक शब्द आणि तीन अर्थ!

| | |
|---|---|
| तो पाव = बेकरीत बनवलेला खाण्याचा पदार्थ | |
| तो पाव = चतकोर, चौथा भाग | |
| पाव = 'पावणे' ह्या क्रियापदाचे आज्ञार्थी रूप<br>पावणे = प्रसन्न होणे | |

## ६ शब्द एक अर्थ अनेक

**क. तिघातिघांचे गट करून उदाहरणाप्रमाणे खालील सराव सोडवू या.**

आधी कंसातील शब्द योग्य जागी लिहून वाक्ये पूर्ण करू या.
एकापेक्षा जास्त अर्थ असणारे शब्द तक्त्यात उदाहरणाप्रमाणे लिहू या.

(साथ – साथ, घाटावर – घाटाच्या, लावणी – लावणी, पाटाच्या – पाटावर, कर – कर – कर, वास – वासही)



उदा॰ 'प्रार्थना करावी देवाची सकाळी दोन्ही (१) कर जोडोनी' असं म्हणायची आजी. तर आता आधी प्रार्थना (२) कर आणि मग जा तुला कोणता सरकारी (३) कर भरायचा आहे तो भरायला.

अ. अहाहा! काय सुंदर (१) ------------ सुटलाय ह्या फुलांचा. हा फुलांचा बहर आहे तोवर माझा (२) ------------ ह्या बागेतच राहणार आहे असं दिसतंय.

आ. हे शहर नाही, गाव आहे. इथे नळ नाहीये. आधी (१) ------------ पाण्यात पाय धू आणि मग (२) ------------ बस जेवायला.

इ. पूर्वी बायका नदीच्या (१) ------------ वेगवेगळ्या (२) ------------ घागरी घेऊन येत. मजा यायची पाहायला.

ई. महापूर ओसरला आणि गावात कॉलऱ्याची (१) ------------ आली. त्या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याने तरीही गावकऱ्यांची (२) ------------ सोडली नाही.

उ. पिकाची (१) ------------ करून झाल्यावर दमलेला शेतकरी बरेचदा (२) ------------ ऐकून मनोरंजन करून घेतो.

**ख. वरील अनेकार्थी शब्दांचे उदाहरणाप्रमाणे अर्थ स्पष्ट करू या.**

| | शब्द | अर्थ |
|---|---|---|
| उदा॰ | (१) (दोन्ही) कर<br>(२) (प्रार्थना) कर<br>(३) कर (भरायचा) | (१) हात<br>(२) करणे ह्या क्रियापदाचे आज्ञार्थी रूप<br>(३) सरकारला द्यावयाचा सारा |

| | | |
|---|---|---|
| अ. | | |
| आ. | | |
| इ. | | |
| ई. | | |
| उ. | | |



### करा आणि शिका

तुम्हीही शब्दकोशाच्या मदतीने असे एकापेक्षा जास्त अर्थ असणारे किमान पाच शब्द शोधून त्यांचा वाक्यात उपयोग करा.







**ग. खेळ शब्दांचा**

वर्गातील विद्यार्थ्यांचे दोन गट करू या. दोन्ही गटांनी एकाच वेळेस दुसऱ्या गटाला एक दोन अक्षरी शब्द द्यायचा आहे. त्या दुसऱ्या गटाने त्याच दोन अक्षरांपासून त्या अक्षरांना काना (ा), एक किंवा दोन मात्रा ( े ै ), दीर्घ अथवा ऱ्हस्व उकार ( ु ू ), दीर्घ अथवा ऱ्हस्व वेलांटी (ि ी), अनुस्वार ( ं ) इत्यादी वापरून त्याच दोन अक्षरांपासून जमतील तितके शब्द बनवायचे आहेत. अक्षरांचा क्रम बदलला तरी चालेल, पण ह्या दोन अक्षरांखेरीज तिसरे अक्षर शब्दात येता कामा नये. तसेच अनेकवचनपण लिहू नये. नाम असेल तर लिंग लिहावे, इतर शब्द असतील तर कंसात (वि॰, क्रि॰ वि॰, अव्यय) असे लिहावे. एका वेळी पाच मिनिटांचा वेळ मिळेल. त्यानंतर शिक्षक / शिक्षिका शब्द तपासून गुण देतील. जितके संपूर्ण नवे आणि बरोबर शब्द, तितके गुण. जर लिंग, शुद्धलेखन इ॰ चुका असतील, तर शिक्षक / शिक्षिका प्रत्येक चुकीसाठी १/२ गुण कापतील.

उदा॰ दिलेला शब्द ‘पर’. उत्तरे – तो पार, ते पोर, तो पीर, तो पेरू, तो पूर, ती पुरी, तो पेरा, ते पेर, तो पारा, पुरे (क्रि॰वि॰), पुरा (वि॰),
अक्षरांचा उलट क्रम ‘रप’ त्यापासून उत्तरे – तो राप, ते रोप, ते रूप, ते रुपे, तो रिपू

**घ. भाषेची गंमत – गमतीची भाषा**

प्रत्यय जोडण्यामुळे एका शब्दाचा दुसऱ्या शब्दाशी असणारा संबंध स्पष्ट होतो. मग वाक्याचाही अर्थ आपल्याला कळतो. पण प्रत्ययाच्या आगेमागे असणाऱ्या शब्दांची अदलाबदल झाली, तर अर्थ उलट होतो, भलता होतो, किंवा अर्थच उरत नाही. चला, आता प्रत्ययाची जागा बदलण्याचा हा सराव करू या. आधी प्रत्ययाच्या जागा बदलू या आणि नंतर ही दोन्ही रूपे वापरून वाक्ये बनवू या.

उदा॰ फुलाचा वास – वासाचं फूल,
ह्या फुलाचा वास किती छान आहे ना? ह्या बागेत एकही वासाचं फूल नाही का?

अ. बाळाचे लाड – ------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

आ. शेजाऱ्याचा कुत्रा - ------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------



इ. आवडीची भाजी - ------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

ई. वाळवंटाचा देश - ------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------



उ. पैशाची भानगड - ------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

**च. 'भर' चा प्रत्यय / उपसर्ग म्हणून वापर**

ह्याचा वापर जसा होईल त्याप्रमाणे अर्थातही बदल होतो.
उदाहरणाप्रमाणे शब्द तयार करून वाक्यात उपयोग करू या.

**भर**

उदा॰ भरदिवसा – ऐन दिवस असताना, दिवसभर – संपूर्ण दिवस
भरदिवसा झोपलायस, बरं नाही का वाटत?
दिवसभर झोपा काढतोस, आणि रात्री गावात भटकतोस! काय म्हणतील लोक?

टीप – उपसर्ग लागताना शब्दाचे सामान्यरूप होऊन त्याला विभक्तिप्रत्यय लागेल का ह्याकडे लक्ष द्या! दिवस – भरदिवसा – दिवसभर , चौक – भरचौकात - चौकभर

अ. दुपार - ----------------------------, ----------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------



आ. रस्ता - ----------------------------, ----------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------



इ. बाजार- ----------------------------, ----------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------



ई. सभा - ----------------------------, ----------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

उ. वर्ग - ----------------------------, ----------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

टीप : मराठीत जसे एकाच शब्दाचे अनेक अर्थ असू शकतात हे आपण पाहिले तसेच शब्दात केलेल्या छोट्याशा फरकाने शब्दाचा अर्थच बदलतो.

**छ. खालील वाक्यांतील रिकाम्या जागा उदाहरणाप्रमाणे भरू या आणि भाषेची ही गंमत समजावून घेऊ या.**

**फरक काना-मात्रा-वेलांटीचा**

(वडा-वडी, जोडा–जोडी, ढगाळ-ढगळ)



उदा॰ १. मनीष आणि मनीषा कायम जोडीनेच फिरतात. त्यांची जोडी सर्वांनाच आवडते.

२. दिनकररावांच्या पायात नेहमीच अस्सल पुणेरी जोडा असतो.

अ. १. --------------- तिखट लागला का रे तुला?

२. आता ही गोड --------------- खा.

आ. १. काय --------------- हवा आहे! पाऊस पडणार बहुतेक.

२. इतके --------------- कपडे का घातलेयस? अगदी बावळट दिसतोयस ह्या कपड्यात.

**ज. जागाबदल – केवळ एका वेलांटीची जागा बदलली आणि अर्थ किती वेगळा झाला!**

(काळीज – काळजी, मीन – मानी)

उदा॰ १. मोठ्या जड काळजाने त्याने तिचा निरोप घेतला.

२. तिच्या काळजीने त्याचा जीव कासावीस झाला.

अ. १. ------------------- ही राशीचक्रातली शेवटची रास.
२. कोणताही ------------------- माणूस अशी फुकटची भीक स्वीकारणार नाही.

**झ. उलट-सुलट – अक्षरांची केली उलटापालट आणि तयार झाला एक नवीनच शब्द!**
(तवा - वात, गढी – ढीग)




उदा. १. सांभाळून! तवा तापलेला आहे, बरं का! चटका बसेल.
२. पणती कशी लावणार? माझ्याकडे वात नाहीये.

अ. १. ही सुंदर ------------------- कोणी बांधली ह्याचा कुठेही उल्लेख नाही.
२. झेंडूच्या फुलांचा हा मोठा --------------- मला लांबूनच दिसला.

करा आणि शिका

### करा आणि शिका

भाषेतील अशा वेगवेगळ्या गमतीच्या गोष्टी तुमच्या निदर्शनास आल्या आहेत का? अशा गोष्टी शोधून त्या वर्गात सर्वांना सांगू या आणि त्यावर चर्चा करू या.

## ७ अनेक लिंगे असणारी नामे

### वेळ

**मेघना** : हे बघ तुझ्याशी बोलायला मला आत्ता अजिबात वेळ नाहीये.
**अभि** : अगं, वेळ कोणालाच नसतो. तो काढावा लागतो. आणि दुसरं म्हणजे वेळेवर सगळी कामं करून टाकावीत. नंतर काम झालं नाही म्हणून पस्तावायची वेळ यायला नको.
**मेघना** : ती वेळ माझ्यावर कधीच येणार नाही.
**अभि** : तसं झालं तर बरंच आहे. पण असं म्हणतात, की काळ आणि वेळ कधीच सांगून येत नाहीत.



**क.** वरील उताऱ्यात 'वेळ' हा शब्द एकूण सहा वेळा आला आहे. काही वेळा तो पुल्लिंगी तर काही वेळा स्त्रीलिंगी आहे. तो कोणत्या वाक्यात कोणत्या लिंगात आहे हे आपल्या शेजाऱ्याबरोबर चर्चा करून शोधून काढू या.
'वेळ' हा शब्द जर पुल्लिंगी असेल तर तो कोणत्या अर्थाने वापरला जाईल आणि स्त्रीलिंगी असेल तर कोणत्या अर्थाने वापरला जाईल? आपापल्या शेजाऱ्याबरोबर चर्चा करून प्रत्येक अर्थाचे एक एक वाक्य बनवू या आणि वर्गात वाचून दाखवू या.

**ख.** मराठी भाषेत दोन्ही लिंगांत असणारी आणखीही नामे आहेत. कधी वेगळ्या लिंगात त्यांचा अर्थ बदलतो, तर कधी बदलत नाही. खालील वाक्ये वाचू या, शब्दांचा अर्थ सांगू या आणि कधी अर्थ बदलतोय आणि कधी नाही, ते सांगू या.

| | | अर्थ बदलतो: हो | अर्थ बदलतो: नाही |
|---|---|---|---|
| अ. | वर्गात सरांनी महेशला त्या अवघड शब्दाचा संधी सोडवायला सांगितलं. | | |
| आ. | मला संधी मिळाली असती तर मी तो संधी लगेच सोडवला असता. | | |
| अ. | वेळेवर भात तयार झालं, की शेतकरी विसावतो. | | |
| आ. | कुकरमध्ये भात लावलाय. तो झाला, की पानं घेते. | | |
| अ. | बाळाचं पोट भरल्याचं एक लक्षण म्हणजे मोठी ढेकर येणे. | | |
| आ. | बाळाचं पोट भरल्याचं एक लक्षण म्हणजे मोठा ढेकर येणे. | | |
| अ. | शाळेच्या सभेस हजर राहणे हे पालक म्हणून आमचे कर्तव्य आहे. | | |
| आ. | पालकाची भाजी खाणे तब्येतीला चांगले असते. | | |
| अ. | ते पातेलं आधी शेगडीवरून खाली उतरव. भात करपेल नाही तर. | | |
| आ. | ती चांदीची पातेली मला खूप आवडते. मी नेहमी तिच्यात श्रीखंड ठेवते. | | |

**ग. खाली काही क्रियापदे अधोरेखित केली आहेत. ती समान अर्थाने वापरली आहेत की ते नाही ते सांगू या.**

| | | हो | नाही |
|---|---|---|---|
| अ. | अनुजानं तिच्या वाढदिवसाला शाळेत चॉकलेटं वाटली. | | |
| आ. | समीरनं केलेली कविता मला काही इतकी चांगली वाटली नाही. | | |
| अ. | ऑफिसात येण्याआधी मी मुलांना शाळेत सोडते. | | |
| आ. | दर श्रावण महिन्यात माई लसूण खाणं सोडते. | | |

## ८ निवडणूक



शाळेत विद्यार्थी प्रतिनिधीची निवडणूक जवळ आली होती. संदेश निवडणुकीसाठी उभा होता. त्याने प्रत्येक कामासाठी एकेका वर्गमित्राची नेमणूक केली होती. मंगेश पत्रकं लिहीत होता. अनुज घोषणांचे फलक तयार करत होता. वर्गावर्गात जाऊन प्रचार कसा आणि कधी करायचा ह्याचे वेळापत्रक विवान बनवत होता. संदेश जिंकला, की मिरवणूक काढायची होती. त्या मिरवणुकीचा शाळेतील मार्ग हर्षद ठरवत होता. संदेश स्वतःचं भाषण लिहीत होता. घरात तो आणि त्याचे मित्र नुसता धुमाकूळ घालत होते. आज रविवार असल्यानं अजित घरातच होता. ही सगळी गडबड पाहून त्याची खूप करमणूक होत होती, पण ह्या सर्व मुलांना सारखे खायला आणि प्यायला घालताना आणि त्यांनी केलेला पसारा आवरताना माधवीची पुरती दमणूक होत होती.

**क. वर्गात चार चार विद्यार्थ्यांचे गट बनवू या. वरील उताऱ्यात काही धातुसाधित शब्द अधोरेखित केले आहेत.**
**गटात चर्चा करून ह्या शब्दांचे लिंग, वचन आणि हा शब्द कोणत्या क्रियापदापासून आला आहे ते ओळखू या आणि वर्गात सादर करू या. नंतर शिक्षक / शिक्षिका ह्यांची बरोबर उत्तरे सांगतील.**

**ख. योग्य शब्द वापरून रिकाम्या जागा भरू या.**

अ. एखाद्या व्यवहारात आपण पैसे गुंतवतो, आणि एक ------------------ करतो.

आ. नवीन नेता निवडायचा असतो तेव्हा आपण निवडणूक घेतो.

इ. आपल्या उमेदवाराला आपण मिरवत मिरवत नेतो, म्हणजे त्याची ------------------ काढतो.

ई. आपण निवडून दिलेला उमेदवार एका मोठ्या पदावर नेमला जातो. त्याची त्या पदावर ------------------ होते.

उ. आपण मतं देऊन निवडून आणलेला उमेदवार नंतर आपल्याला फसवतो आणि दिलेली वचनं पूर्ण करत नाही तेव्हा आपली ------------------ होते.

ऊ. तो सावकार भरमसाट दराने व्याज आकारून लोकांना पिळून काढत होता. पण लोकांना ह्या होणाऱ्या ------------------ ची कल्पनाच नव्हती.

ए. जर कोणी जास्त दराने व्याज द्यायला नकार दिला, तर तो त्यांना इतरत्र जाण्यापासून अडवायचा आणि त्यांची ------------------ करायचा.

## ९ ध्वन्यनुकारी शब्द / क्रियापदे

ज्या शब्दांमध्ये ध्वनिवाचक शब्दांची पुनरावृत्ती झालेली असते, अशा शब्दांना अनुकरणवाचक / नादानुकारी किंवा ध्वन्यनुकारी शब्द / क्रियापद असे म्हणतात.

**क. आवाज ओळखू या.**

ह्या ध्वनिफितीत ऐकू येणारा आवाज ओळखू या आणि त्या आवाजानुसार योग्य त्या नादानुकारी / ध्वन्यनुकारी शब्दाची योग्य ती जोडी लावू या.

| | | |
|---|---|---|
| १. | पावसाची | बुडबुड |
| २. | रागावलेल्या कुत्र्याची | रिपरिप |
| ३. | गळणाऱ्या नळाची | सळसळ |
| ४. | वाऱ्याने उडणाऱ्या पुस्तकाच्या पानाची | करकर |
| ५. | आकाशातील विमानाची | गुरगुर |

व्याकरण

| | | |
|---|---|---|
| ६. | वाऱ्यामुळे होणारी पानांची | घरघर |
| ७. | जुन्या दरवाजाची | टपटप |
| ८. | पाण्यात बुडणाऱ्या घागरीची | फडफड |

**ख.** कोणते नाम ऐकल्यावर तुम्हाला कोणते ध्वन्यनुकारी नाम अथवा क्रियापद आठवते? जोड्या लावू या.

| नाम | नाम |
|---|---|
| १. भांड्यांचा | कडकडाट |
| २. घंटेचा | खळखळाट |
| ३. टाळ्यांचा | घणघणाट |
| ४. हास्याचा | गडगडाट |
| ५. ढगांचा | खणखणाट |

| नाम | क्रियापद |
|---|---|
| ६. बांगड्या | रुणझुणणे |
| ७. पैंजण | खुळखुळणे |
| ८. पैसे | किणकिणणे |
| ९. नद्या | कडाडणे |
| १०. विजा | झुळझुळणे |

## १० दिसायला सारखे दिसणारे पण उच्चारात फरक असणारे शब्द

**क. खालील वाक्ये ऐकू या. अधोरेखित शब्दांच्या उच्चारात तुम्हाला काय फरक ऐकू येतोय? ह्यापैकी कोणते शब्द विशेष नामे आहेत आणि कोणते इतर शब्द आहेत?**

नव्या, दिव्या आणि काव्या खास मैत्रिणी. आज

(१) नव्याचा वाढदिवस. ती आज नक्कीच नटूनथटून शाळेत येईल. (२) नव्या कपड्यात (३) नव्या किती छान दिसेल ना?

(१) काव्याचं नाव इतकं काव्यमय असलं तरी प्रत्यक्षात ती अगदी लबाड आहे. आम्हाला फसवण्यासाठी (२) काव्यानं काल केलेल्या (३) काव्याचं काय वर्णन करू?

(१) दिव्या हुशार मुलगी. परीक्षेत चांगले मार्क मिळवण्यासाठी ती काहीही करेल. घरातली वीज गेलेली असेल तर (२) दिव्या रस्त्यावरच्या (३) दिव्याखाली बसून अभ्यास करते.



**ख. दिसायला सारखे दिसणारे पण उच्चारात फरक असणारे असे आणखीही शब्द आपल्याला मराठीत सापडतात. खालची तीन उदाहरणे वाचू / ऐकू या.**

अ. उद्या / उद्यान – (१) उद्या ना, (२) उद्यानात आणखी सुंदर फुलं दिसतील तुला.

आ. जरा / जरा – ज्याप्रमाणे (१) 'जरा' (थोडेसे) आणि (२) 'जरा' (वृद्धत्व) असा अर्थात आणि उच्चारात फरक आहे तसाच (१) 'जड' (वजनदार) आणि (२) 'जड' (भौतिक) ह्यांच्याही अर्थात आणि उच्चारात फरक आहे.



इ. गज / गज – (१) गज हे जुने अंतर मोजण्याचे परिमाण आहे, तर गणपतीचे 'गजानन' हे नाव (२) गज + आनन असा संधी होऊन आले आहे. (३) गज म्हणजे हत्ती.

करा आणि शिका

**करा आणि शिका**

मराठी भाषेतले असेच सारखे दिसणारे पण अर्थ आणि उच्चार वेगळे असणारे शब्द शब्दकोशाच्या मदतीने शोधून काढू या आणि वर्गात सादर करू या.

## ११ मराठीतील कोणते शब्द तुम्हाला उच्चारायला कठीण जातात?

**क. ध्वनिफितीबरोबर म्हणून पाहू या.**

ज्ञान, अज्ञान, ज्ञानेश्वर – ज्ञ

जहाज, जटिल – ज

चंद्र, चमचा, चिंच – च

अडकित्ता, नासाडी, साडी – ड

ऋतू, ऋषी – ऋ

डळमळीत, खळखळाट – ळ

अण्णा, खणखणीत – ण

झगमगीत, झगा – झ



जितेंद्र जोगची जहाजातून जगप्रवासाला जाण्याची जंगी जिगीषा जयेश जोगळेकरने जाणीवपूर्वक जोपासली.

चिकित्सक चिन्मय चिमुकल्या चमच्याने चिकाटीने चिमूटभर चिकट चीज चाखताना चुकून चीत्कारला.

**ख. मराठीतील बोलण्या-ऐकण्यास कठीण वाटणारे काही स्वर आणि व्यंजने आणि त्यापासून झालेले, उच्चारण्यास कठीण शब्द पाहून बहुतेक अमराठी भाषक मराठीला रूक्ष, कठीण अशी उपाधी देतात. पण मराठी भाषकाला मात्र हीच भाषा कानाला अतिशय गोड लागते आणि तिचे शब्द थेट हृदयाला भिडतात.**

असंच एकदा ग॰ दि॰ माडगूळकरांशी बोलताना कुणी तरी म्हटलं, "मराठीत 'ळ' हे अक्षर निरुपयोगी आहे. काही कुठं उपयोग नाही त्याचा" ... यावर उत्तर म्हणून गदिमांनी हे पुढील गीत लिहिलं - या गीतात 'ळ' चा किती सुरेख वापर त्यांनी केलाय!... आणि प्रसिद्ध गायिका माणिकताई वर्मांच्या मधाळ आवाजानं त्याचं सोनं केलंय ...

**घननीळा**

घननीळा, लडिवाळा
झुलवू नको हिंदोळा!
सुटली वेणी, केस मोकळे
धूळ उडाली भरले डोळे
काजळ गाली सहज ओघळे
या साऱ्याचा उद्या गोकुळी
होईल अर्थ निराळा

- ग॰ दि॰ माडगूळकर



**ग. ह्या दुसऱ्या गीतात 'ड' आणि 'ट' ही अक्षरे परत परत येतात. त्यांचा वापर कानाला किती गोड लागतो, त्याचा अनुभव घेऊ या.**

**त्या तिथे पलिकडे...**

त्या तिथे पलीकडे तिकडे
माझिया प्रियेचे झोपडे
गवत उंच दाट दाट
वळत जाय पायवाट
वळणावर आंब्याचे-
झाड एक वाकडे!

- ग॰ दि॰ माडगूळकर



## १२ मराठी भाषेच्या विविध बोली : एक झलक

**आत्तापर्यंत तुम्ही जी मराठी प्रमाणभाषा शिकलात त्यापेक्षा जरा वेगळी असणारी, काळानुसार आणि प्रदेशानुसार बदललेली ही मराठी भाषेची रूपे. वर्गातील विद्यार्थ्यांचे तीन गट करू या. प्रत्येक गटाने दोन उतारे वाचून त्यात आपण शिकलेल्या भाषेपेक्षा काय वेगळे आहे त्यावर अधोरेखित शब्दांच्या साहाय्याने वर्गात चर्चा करू या.**

गट १

### क. प्रमाणभाषाच, पण एका शतकापूर्वीची

आजकालचा काळ सभा, परिषदा, संमेलने यांचा आहे. राष्ट्रीय, सामाजिक व धार्मिक सभा तर प्रसिद्धच आहेत; पण याशिवाय विशिष्ट धंदेवाल्यांच्या व जातीच्या सभाही नेहमी होत असलेल्या आपण पाहतो.(...)

ही सभांची साथ समाजाच्या शिखरापाशी उद्भवून खाली पसरत पसरत हल्ली किती खोल जाऊन पोहोचली आहे हे मला नुकतेच पाहावयास मिळाले. गेल्या महिन्याच्या आरंभापासून आमच्या गावात रोज नवे नवे चेहरे दिसावयाला लागले. (...) पहिल्याने तर आगंतुक पाहुण्यांचा आम्हाला उमजच पडेना आणि त्यांच्या ठावठिकाणांचाही पत्ता लागेना; पण ते गावात येण्याला आणि गावातील चोऱ्यांची संख्या वाढण्याला एकच गाठ पडली.



**- श्रीपाद कृष्ण कोल्हटकर**

### ख. कन्नडच्या चालीची मराठी

एकदा तुंगभद्रा आमच्याकडं आली होती तेव्हा धीर करून मी तिला विचारलं,
"तुमच्या विहिरीत भूत आहे का ग?"
ती एकदम काकणांचा आवाज यावा तसं हसली आणि म्हणाली,
"भूत वगैरे काही नसतो. तो फक्त आपल्या मनात राहतो. आपलं मन स्वच्छ असला की मग भूत नाही, गीत नाही. तू भिलास की काय तरी?"



**- प्रकाश नारायण संत**

गट २

### ग. ही मालवणकडील मराठी

"ही राजकन्या माझ्यासारखी दिसतां काय रे?" चानी विचारू लागली.
मी चानीकडे एकदा आणि त्या पुस्तकातील राजकन्येकडे एकदा पाहिले आणि मग म्हणालो,
"चानी, या राजकन्येपेक्षाही तू चांगली दिसतेस."
त्यावर चानी मनापासून हसली आणि विचारू लागली,
"खरंच रे? माकासुद्धा वाटतां, ह्या गावात माझ्याइतक्या देखणं माणूस नाय.
माका काय वाटतां म्हायत आसा?"
"काय वाटतं तुला?"
"माका वाटतां, आपणसुद्धा खुंयच्यातरी राजाबरोबर लगीन करूचा."



**- चिंतामण त्र्यंबक खानोलकर**

### घ. ग्रामीण विदर्भातील भाषेचा रंग

.... झाडं म्हन्जे जमिनीची शोभा. पोरं म्हन्जे घराची शोभा. अन् ढोरं म्हन्जे कोठ्याची शोभा .... ह्या ढोरायले कवापासून माणसायनं पाळणं सुरू केलं आसंल म्हणावं? जंगलातले सम्दे जनावर मोकळे फिरतात. हारणं; वाघ; कोल्हे; लांडगे. पण बैलायले नाई कोणी मोकळं फिरू देत. या बैलायचा जल्म कशासाठी? माणसायसाठी राबायसाठी.... समजा बैलंच नसते



दुनियेत त काय झालं आसतं? माणसं लेकाचे तडफडून मेले आसते. हे हायेत म्हणून जमिनीची नांगरणी-वखरणी हाये. अन् नांगरणी-वखरणी हाये म्हणून माणसायचे खायाचे चोचले.

**- सदानंद देशमुख**

**गट ३**

### च. सांगली-कोल्हापूर वळणाची मराठी

जेवता जेवता दादानं माझ्याकडनं बोली करून घेतली, "अकरा वाजता शाळा असती. सकाळी दीस उगवायला मळ्यात हजर व्हायला पाहिजे. अकरा वाजूस्तवर पाणी पाजलं पाहिजे. मळ्याकडनंच परस्परभारी शाळंला जायाचं. दिसाच्या गोंड्याबरोबर दप्तर घेऊनच मळ्याला यायचं नि घटकाभर ढोरं चारायची. कवा मळ्यात कामं असतील तवा शाळंला खाडं करायला पाहिजे ... हाय काय कबूल?"

"हाय की! मळ्यात कामं असतील तर खाडं नको करायला?" मी जणू सगळं पटल्यागत बोलत होतो. आत आनंदाला भरतं येत होतं.

**- आनंद यादव**

### छ. खान्देशी भाषा

**अ. मानूस**

मानूस मानूस
मतलबी रे मानसा
तुले फार हाव
तुझी हाकालेल आशा
 मानसा मानसा,
 तुझी नियत बेकार
 तुझ्याहून बरं
 गोठ्यातील जनावर
मानसा मानसा,
कधी व्हशीन मानूस
लोभासाठी झाला
मानसाचा रे कानूस!

**- बहिणाबाई चौधरी**

**आ.**

माझी आई देवाला नमस्कार करीत असताना माझ्या आत्याने तिला विचारले, "देवापाशी काय मांगते?"

त्यावर आई म्हणाली,

"काय मांगू, राजस! देवाचा एकबी हात रिकामा नाही. त्यालेबी त्याची कामं आहेती. आपली कामं आपूनच केली पाहिजे. त्यानं घर देलं, शेतजमीन देली, आनखी काय पाहिजे? आपुन कष्टाचे धनी!"

**- सोपानदेव चौधरी**



**ज. 'ती फुलराणी'**




**अ. चित्रफीत पाहून प्रश्नांची उत्तरे देऊ या.**

१. गजरेवाल्या मुलीला 'वसंत' हे नाव कसं माहीत असतं?

२. कोट घातलेला माणूस त्याच्या वहीत काय लिहून घेत असतो?

३. कोणती व्यक्ती कोणत्या भागातून आली आहे हे त्या कोट घातलेल्या माणसाला कसं ओळखता येतं?

**आ. छत्री घेतलेला जाकीटवाला माणूस वापरत असलेल्या खालील अधोरेखित शब्दांसाठी प्रमाणभाषेतील शब्द लिहू या.**

| | |
|---|---|
| मीटर डाऊन करून ठेवतत | |
| टॅक्सी मिळण्याचो आणि डोक्याचो संबंध काय? | |
| पावसात टॅक्सी गावायची म्हणजे ... | |

**इ. फुलवाली वापरत असलेल्या खालील शब्दांसाठी मराठी प्रमाणभाषेतील शब्द लिहू या.**

| | |
|---|---|
| क. म्या - | ख. न्हाय - |
| ग. इकायचा - | घ. कवा - |
| च. 'बा'चं - | छ. म्हंगाला - |
| ज. गावणार - | झ. वक्ताला - |

**ई. खालील शब्दजंजाळातून चित्रफितीत आलेले वाक्प्रचार / म्हणी शोधा व वाक्यात उपयोग करा.**

१. ..........

२. ..........

३. ..........

सुळी, तेजीत, शब्दांची, सोडून, कल्हई, चोर, संन्याशाला, धंदा, काढणे, असणे, देणे

## १३ संधी

**क. वाचू या.**



बाहेर फटाक्यांचे दणदणीत आवाज येत होते आणि कुणाल नेहमीप्रमाणे आवाजाला घाबरून कानांवर हात गच्च दाबून थरथरत कोपऱ्यात जाऊन बसला होता. त्याची अवस्था पाहून आज्जी त्याच्याजवळ गेली. त्याला जवळ घेऊन त्याला कुरवाळत म्हणाली,

"अरे वेड्या, आज दिवाळी नाही का, राजा? मग फटाके वाजणारच. उद्या कोणाच्या लग्नात ढोल-ताशे वाजतील. तू किती वेळा असा घाबरून लपून राहणार? आता मोठा झालास तू. या निराधार भीतीपासून आपलं संरक्षण आपणच करायचं. एक गोष्ट नेहमी लक्षात ठेव, भित्यापाठी ब्रह्मराक्षस!"

निरक्षर असली तरी आमची आज्जी हुशार होती. अशा भयगंडाचे दुष्परिणाम तिला माहीत होते. भीतीने खचलेल्या कुणालचं मनोबल वाढवण्यासाठी ती निरंतर प्रयत्न करत असे. त्याच्या भयगंडाचा तिला कधी मनस्ताप होत नसे आणि त्याला चिडवणाऱ्यांचाही ती यथेच्छ समाचार घेत असे.

**ख. वरील उताऱ्यात अधोरेखित केलेले संधी कसे तयार झाले आहेत ते पाहू या.**

| | | |
|---|---|---|
| ब्रह्मराक्षस | ब्रह्मन् + राक्षस | न् + र् → र् |
| निराधार | नि: + आधार | नि: + आ → रा |
| संरक्षण | सम् + रक्षण | म् + र् → अं |
| दुष्परिणाम | दु: + परिणाम | दु: + प् → ष्प् |
| मनोबल | मन: + बल | अ: + ब् → ओब् |
| मनस्ताप | मन: + ताप | अ: + त् → स्त् |
| यथेच्छ | यथा + इच्छ | आ + इ → ए |
| समाचार | सम् + आचार | म् + आ → मा |

**ग. याचप्रमाणे पुढील तक्त्यातील रिकाम्या जागा भरू या.**

| | | |
|---|---|---|
| निरंतर | | |
| | नि: + अक्षर | |
| | राजन + मुद्रा | |
| | मन: + धैर्य | |
| संयोग | | |
| आत्मप्रशंसा | | |
| | भयम् + कर | |
| निरिच्छ | | |

व्याकरण

## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो साक्षात्कार, ते - | ती गढी, त्या गढ्या | ते बाळकडू |
| तो समर्थक, ते - | ती अडवणूक, त्या अडवणुका | ते ढोर, ती ढोरे/ ढोरं |
| तो भ्रमनिरास | ती घरघर | |
| तो मूकाभिनय, ते - | ती फडफड, त्या फडफडी | |
| तो पाट, ते - | ती गुरगुर, त्या गुरगुरी | |
| तो हिंदोळा, ते हिंदोळे | ती जरा | |

### क्रियापद

भिनणे, पस्तावणे, झुळझुळणे, किणकिणणे, रुणझुणणे



### विशेषण

मोजका, जिवाभावाचा, निर्भेळ, जराजर्जर

### क्रियाविशेषण

बिनबोभाट, यथावकाश

### वाक्प्रचार आणि म्हणी

| | | |
|---|---|---|
| खापर इतरांच्या माथी फोडणे | कोणाला तरी धारेवर धरणे | एखाद्याच्या पाठीत खंजीर खुपसणे |
| बिनपाण्याची हजामत करणे | रक्त आटवणे | एकमेकांच्या पोटावर पाय ठेवणे |
| दुसऱ्याचे पाय ओढणे | मुलांचे कान उपटणे | डोक्यावर मिरी वाटणे |
| तोंडसुख घेणे | तळपायाची आग मस्तकात जाणे | घर डोक्यावर घेणे |
| नाक दाबलं तर तोंड उघडणे | दात-ओठ खाणे | बोलणी खाणे |
| डोके खाणे | वेळ खाणे | मार खाणे |
| अक्षरे खाणे | पैसे खाणे | शेण खाणे |
| डोक्यात राख घालणे | जिभेला हाड नसणे | हातपाय गळणे |
| काळजाचे पाणी होणे | तोंडचे पाणी पळणे | पंख फुटणे |

| | | |
|---|---|---|
| शिंग फुटणे | तिसरा डोळा फुटणे | तोंड येणे |
| डोळे येणे | जीवे येणे | डोके फिरणे |
| डोके हलणे | अंग मोडणे | बोटे मोडणे |
| घसाफोड करणे | तोंड फाटेस्तोवर बोलणे | घर डोक्यावर घेणे |
| डोक्यात राख घालणे | | |

## नाम / इतर शब्द + क्रियापद

समर्थन करणे, ठाम असणे, बाळकडू पाजणे, नेमणूक करणे

## आता मला हे येतं...

**मराठी भाषेची मूलभूत माहिती करून घेणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**मराठी भाषेतील गमतीजमती समजून घेणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**मराठी – वळवावी तशी वळते हे समजून घेणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**मराठी भाषेच्या विविध बोलींची झलक पाहणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**एकाच शब्दाचे अनेक अर्थ समजून घेणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**अनेक लिंगे असणारी नामे ओळखणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**व्याकरण : ध्वन्यनुकारी शब्द / क्रियापदे वापरणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**व्याकरण : 'ऊक' जोडून होणारी नामे वापरणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**व्याकरण : संधी ओळखणे आणि करणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# ६ हर्षोल्हास




## चला, शिकू या ...

- वेगळ्या वाटेवरचे सण माहीत करून घेणे
- नवे उत्सव आणि समारंभ जाणून घेणे
- व्याकरण : साहचर्यवाचक शब्दयोगी अव्यये वापरणे
- व्याकरण : नामसाधित क्रियापदे / नामधातू तयार करून वापरणे
- व्याकरण : संधी ओळखणे आणि करणे

## वेगळ्या वाटेवरचे सण

### १ उत्सव



क. माणूस हा स्वभावतःच उत्सवप्रिय प्राणी आहे. अनेक धार्मिक सण तो गेली हजारो वर्षे साजरे करत आला आहे, पण त्याखेरीज नवनवे प्रसंग साजरे करण्याची आस त्याला सदैव लागून राहिलेली आहे. त्यामुळेच वाढदिवस, लग्नसमारंभ, वाङ्‌निश्चय, पदोन्नती, पदवीग्रहण समारोह, असे अनेक प्रसंग तो मित्रमैत्रिणी आणि नातेवाईक ह्यांच्याबरोबर साजरे करू लागला. गेल्या काही शतकांत भारतातील वेगवेगळ्या प्रांतात काही वेगळे, काही अजब उत्सव साजरे केले जाऊ लागले. ह्यातील काही चित्रे आधी दिलेली आहेत, ती पाहू या; हे उत्सव कुठे साजरे होत आहेत, त्यांची काय वैशिष्ट्ये आहेत ते ओळखता येतंय का ते बघू या आणि वर्गात त्यावर चर्चा करू या.

ख. ह्या उत्सवांची माहिती खालील उताऱ्यांत दिली आहे. उताऱ्याशी संबंधित चित्राचा क्रमांक कंसात लिहू या. ह्या सर्व उत्सवांत कोणता समान धागा आहे? ते साजरे करण्यामागे काही विशिष्ट सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक कारणे आहेत, की केवळ मौजमजेसाठी हे उत्सव साजरे केले जातात? वर्गात चर्चा करू या.

#### वाघाची शिकार – पुली-काली (४)

केरळमध्ये पुली-कालीचा उत्सव ‘ओणम’नंतर चौथ्या दिवशी साजरा केला जातो. रंगांची उधळण असणाऱ्या आणि ऊर्जेने भरलेल्या ह्या उत्सवात भाग घेणारे कलावंत प्रशिक्षित असतात. ‘वाघाची शिकार’ हा ह्या पुली-काली नृत्य-नाट्याचा विषय असतो. भडक काळ्या, पिवळ्या आणि लाल रंगात रंगलेले हे ‘वाघाचे शिकारी’ पारंपरिक लोकसंगीताच्या ठेक्यावर नाचत रस्त्यात उतरतात तेव्हा ह्या उत्सवाचे साक्षीदार होण्यासाठी हजारोंच्या संख्येने लोक उपस्थित असतात. पुली-कालीचा हा उत्सव गेली दोनशे वर्षे साजरा केला जात आहे, असं सांगितलं जातं.

#### उधळलेल्या बैलाचा पाठलाग – जल्लीकट्टू (  )

तमिळनाडूत पोंगल ह्या सणाचाच एक भाग म्हणून ‘जल्लीकट्टू’ हा थरारक खेळ शंभरहून अधिक वर्षांपासून खेळला जातो. त्यासाठी लागणाऱ्या तगड्या आणि दणकट बैलांची खास देखभाल करून, त्यांना विशेष खुराक देऊन ह्या खेळाचे खास प्रशिक्षणही दिले जाते. खेळाच्या दिवशी बैलांच्या शिंगांना बक्षीस बांधले जाते आणि त्यांना मोकळे सोडले जाते. ते बक्षीस ओढून घेण्यासाठी शेकडो माणसे त्यांच्या मागे धावत असतात. उधळलेल्या बैलांच्या तासून धारदार केलेल्या शिंगांनी माणसांना गंभीर इजा होऊ शकते. बैलांना दुखापत होण्याची शक्यता मात्र कमी असते.

बेडकाचे लग्न (  )

पावसाचे महत्त्व शेतकऱ्यांपेक्षा जास्त कोणाला असणार? पर्जन्यदेवतेला प्रसन्न करून घेण्यासाठी करण्यात येणाऱ्या अनेक उपायांपैकीच एक म्हणजे बेडकाचं लग्न. महाराष्ट्रात आणि आसाममध्ये पाऊस चांगला व्हावा म्हणून बेडकांची विधिवत लग्ने लावली जातात.

गोव्याचा पर्जन्योत्सव (  )

विविध रंगांनी सजलेला, मौज-मस्तीने आणि आनंदाने भारलेला असा हा गोव्याचा पर्जन्योत्सव. गोव्यात पोर्तुगीजांची सत्ता होती तेव्हापासून 'सेंट जॉन बॅप्टिस्ट' ह्यांच्या आठवणीसाठी हा साजरा करतात. सगळी तरुणाई हा उत्सव साजरा करण्यासाठी जमते. पाण्याने भरलेले तलाव आणि तळी ह्यांत खेळून आनंद साजरा केला जातो. खाणेपिणे नाच-गाण्यां ह्यांनी आणखी रंगत येते. सुंदर कपडे घालून सजलेले लोक बोटीतून सहल करतात आणि एकमेकांना शुभेच्छा देतात. गोव्याचे सौंदर्य पाहायचे असेल तर ह्या उत्सवाला भेट द्यायलाच हवी.

बैसाखी (  )

पंजाबमध्ये आणि भारताच्या इतर काही भागांत एप्रिल महिन्याच्या तेरा तारखेला बैसाखीचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. ह्या दिवशी शीख बांधव नववर्ष साजरे करतात आणि चांगल्या पीकपाण्यासाठी देवाचे आभार मानतात. जोशपूर्ण भांगडा नृत्य आणि गाणी ह्या उत्सवाची रंगत अधिकच वाढवतात.

रण-उत्सव, कच्छ-गुजरात (  )

गुजरातच्या कच्छ प्रांतात जगातील सर्वात मोठे मिठाचे वाळवंट आहे. पांढऱ्याशुभ्र मिठाचे हे वाळवंट पौर्णिमेच्या रात्री तर जास्तच झगमगून उठते. दरवर्षी साधारण नोव्हेंबर ते फेब्रुवारी महिन्यात तिथे आयोजित केल्या जाणाऱ्या रण-उत्सवात त्या प्रदेशातील लोककलेचा आनंद लुटता येतो. गायन, वादन, नृत्य अशा अनेक कार्यक्रमांची रेलचेल असते. पौर्णिमेच्या चांदण्यात लखलखणाऱ्या, मैलोगणती पसरलेल्या धवल वाळवंटात उंटावरून सफर करताना येणारा अनुभव केवळ अवर्णनीय आहे.

ग. तुलनात्मकदृष्ट्या अलीकडील काळात साजरे होऊ लागलेले हे वरील उत्सव आता बरेच लोकप्रिय झाले आहेत. आताची तरुण पिढीही काही तरी नवीन साजरं करू पाहतेय, तर त्यांच्यावर 'तुम्ही उगीचच काहीही साजरं करता' असा आरोप जुनी पिढी करत असते. ह्या आरोपाचं खंडन ही नवी पिढी कसं करते हे पाहण्यासाठी आम्ही काही तरुणांना 'तुम्ही काय आणि का साजरं करता?' असा प्रश्न विचारला, तेव्हा आम्हाला पुढील उत्तरे मिळाली :

१. यतीन : मी दरवर्षी माझ्या लाडक्या कुत्र्याचा, सिंबाचा वाढदिवस साजरा करतो म्हणून लोक मला हसत. आज माझ्याच विचाराचे अनेक जण मला येऊन मिळालेत. आपल्या संस्कृतीत प्राणिमात्रांचा नेहमीच विचार केला गेलाय. आपल्या उपयोगी पडणाऱ्या प्राण्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी लोक आजही बैलपोळा, नागपंचमी, वसुबारस ह्यांसारखे काही समारंभ साजरे करतात. मग माझ्यावर निःस्वार्थी प्रेम करणाऱ्या माझ्या ह्या मित्रासाठी मी काही साजरं केलं, तर काय बिघडलं? शिवाय काहीही 'साजरं' करायला कारण लागतं का? आनंद झाला, की तो वाटायचा, म्हणजे तो द्विगुणित होतो.



२. मेघना : आम्ही आमच्या गल्लीत दरवर्षी 'सेवादिन' साजरा करतो. आमच्या गल्लीत बरीच म्हातारी माणसं एकटीच राहतात. आम्ही त्यांना वर्षभर सर्व प्रकारे मदत करतो. मग वर्षातला एक दिवस सेवादिन म्हणून साजरा करतो. आजच्या बदललेल्या सामाजिक परिस्थितीला अनुरूप अशा नवीन प्रथा पाडणे हाच ह्यामागचा उद्देश आहे.



आपल्या समाजाला एकत्र आणण्यासाठी आणि एकत्र बांधून ठेवण्यासाठी उत्सव साजरे करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. लोकमान्य टिळकांनी ह्याच हेतूने शंभर वर्षांपूर्वी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली. समाजाची आजची गरज लक्षात घेऊन त्यानुरूप योग्य असे नवे उत्सव साजरे करण्यास सुरुवात करणे, ह्यात गैर काहीच नाही.

३. गिरिजा : आम्ही आमच्या सोसायटीच्या अंगणात गेल्या वर्षी झाडं लावली. त्यातली जी जगली त्यांचा आज वर्षाचा वाढदिवस आम्ही साजरा करत आहोत. ह्यापुढे दरवर्षी ह्याच स्वरूपात पर्यावरणाला पूरक असे समारंभ आम्ही साजरे करणार आहोत.



निसर्गाचे आभार मानण्यासाठी पूर्वी किती तरी उत्सव साजरे केले जात. आता आपण काय करतो? निसर्गापासून आपण दूर जाऊ लागलो आहोत. निसर्गाचं आणि माणसाचं जे अतूट नातं आहे ते नव्यानं अधोरेखित करण्यासाठी जुनेच सण नवीन साजात साजरे करण्यास काय हरकत आहे?

४. सात्त्विक : आमची पाचशे कुटुंबांची वसाहत आहे. येथील बहुतेक रहिवासी सतत कोणत्या ना कोणत्या स्पर्धांमध्ये भाग घेत असतात. त्यात ते जिंकोत अथवा न जिंकोत, त्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून आम्ही दरवर्षी आमच्या वसाहतीत 'सहभाग दिन' साजरा करतो.



स्वाभिमान, आत्मसन्मान ह्यांत वाढ होण्यासाठी स्वतःची आणि आपल्या जवळच्यांची पाठ थोपटून घेणं महत्त्वाचं आहे. त्यामुळे अधिक चांगलं काम करण्यासाठी सर्वच उद्युक्त होतात. आपल्या समाजात जे जे चांगलं होतंय आणि होईल ते ते साजरं करू या. मग ते यश सांस्कृतिक, बौद्धिक, कला, क्रीडा ह्यांपैकी कोणत्याही क्षेत्रातलं असो!

**अ. नवी पिढी साजरे करत असलेल्या ह्या नव्या उत्सवांविषयी तुमचं काय मत आहे? चला, वर्गात आपापलं मत मांडून त्यावर चर्चा करू या –**

१. वरीलपैकी ---------------------- समारंभ साजरा करण्याची कल्पना मला आवडली, कारण ---------------------------------------------------------------------------------------------------------------.

२. वरीलपैकी ---------------------- समारंभ साजरा करणे योग्य नाही, कारण ---------------------------------------------------------------------------------------------------------------.

**आ. कोणतीही गोष्ट साजरी करण्यासाठी काही कारणे असावीत लागतात. उदाहरणार्थ सामाजिक, सांस्कृतिक, कौटुंबिक किंवा मानसिक कारणे. वरील समारंभ साजरे केल्याने कोणते फायदे / तोटे होऊ शकतील?**

३. ------------------------- हा समारंभ साजरा केल्याने ------------------------------------------------------------------------------- हे साध्य होईल.

४. ------------------------------------ हा समारंभ साजरा केला, तर ------------------------------------------------------------------------------- असंही घडू शकेल. इत्यादी

**घ. तुमच्या देशात किंवा प्रांतातही प्रस्थापित उत्सवांखेरीज अनेक नवनवे उत्सव साजरे होऊ लागले असतील. तुम्हाला स्वतःला कोणता वेगळा समारंभ साजरा करायला आवडेल? त्यात कोणता वेगळेपणा असेल? ह्या नव्या उत्सवामागची आपली कल्पना कागदावर उतरवून वर्गात सविस्तर सादर करू या. त्यासाठी पुढील प्रश्नांची मदत घेता येईल.**



अ. का? (फक्त मौज-मजेसाठी, सामाजिक प्रबोधन व्हावे म्हणून, जनजागृतीसाठी इत्यादी)

आ. केव्हा? (ठरावीक तारखेला, एखादा सामाजिक बदल आवश्यक असेल तेव्हा इत्यादी)

इ. कुठे? (मोकळ्या मैदानात, सभागृहात, रस्त्यावर, घरोघरी, अंगणात इत्यादी)

ई. कोणाचा सहभाग? (विद्यार्थी, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, सर्व नागरिक इत्यादी)

उ. कशा पद्धतीने? (शांततेत, जल्लोशात, मिरवणूक, चर्चा-भाषणे इत्यादी)

ऊ. ह्या उत्सवाचे कोणते परिणाम तुम्हाला अपेक्षित आहेत? (समाजप्रबोधन, मौज-मजा, रूढींमधील बदल इत्यादी)

## च. मराठी महिने, ऋतू व सण

अ. खालील तक्त्यात मराठी महिन्यांची नावे दिली आहेत. त्यापुढे त्या महिन्यात येणारे ऋतू आणि सणांची नावे दिली आहेत. तक्ता नीट वाचू या.

| | महिना | ऋतू | सण |
|---|---|---|---|
| १. | चैत्र | वसंत | गुढीपाडवा, वसंतपंचमी |
| २. | वैशाख | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | ज्येष्ठ | ग्रीष्म | वटपौर्णिमा<br>आषाढी एकादशी |
| ४. | आषाढ | | |
| ५. | श्रावण | वर्षा | रक्षाबंधन<br>गणेशचतुर्थी |
| ६. | भाद्रपद | | |
| ७. | अश्विन | शरद | नवरात्र<br>दिवाळी |
| ८. | कार्तिक | | |
| ९. | मार्गशीर्ष | हेमंत | मकरसंक्रांत |
| १०. | पौष | | |
| ११. | माघ | शिशिर | होळी<br>रंगपंचमी |
| १२. | फाल्गुन | | |

करा आणि शिका

आ. आता पुढील खेळात आपल्या स्मरणशक्तीची परीक्षा घेऊ या.
विद्यार्थ्यांचे तीन गट करू या.
शिक्षक प्रत्येक गटाला चिठ्ठ्यांचे तीन संच देतील. पहिल्या संचात बारा महिन्यांची नावे असलेल्या बारा चिठ्ठ्या असतील. दुसऱ्या संचात सहा चिठ्ठ्यांवर सहा ऋतूंची नावे असतील आणि तिसऱ्या संचात वेगवेगळ्या सणांची नावे असतील.
प्रत्येक गटात महिना – ऋतू – सण अशा जोड्या लावू या. जो गट लवकरात लवकर जास्त बरोबर जोड्या लावेल, तो विजेता ठरेल.




इ. मराठी महिने आणि इंग्रजी महिने हे समांतर नाहीत. म्हणजे मराठीतील पहिला महिना चैत्र आहे, पण इंग्रजी पहिला महिना जानेवारी साधारण मराठी मार्गशीर्ष महिन्याच्या आसपास येतो. ह्याचे कारण म्हणजे मराठी महिने हे चंद्र दिनदर्शिकेप्रमाणे तर इंग्रजी महिने हे सौर दिनदर्शिकेप्रमाणे मोजले जातात.
ह्या वर्षाची मराठी आणि इंग्रजी कॅलेंडरे घ्या आणि यंदा दिवाळी कधी येते आहे ते पाहा.
उदा॰ दिवाळी अश्विन महिन्यात येते. २०१८ मध्ये दिवाळी नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला आली होती, तर २०१९ मध्ये ऑक्टोबरच्या शेवटी.
ह्याचप्रमाणे पुढील महत्त्वाचे मराठी सण यंदा कोणत्या इंग्रजी महिन्यात येत आहेत ते शोधू या.
- संक्रांत, गणेशोत्सव, गुढीपाडवा

ई. स्वतःचा वाढदिवस कोणत्या मराठी महिन्यात येतो ते सांगू या.

उ. नाताळ, ईद, पतेती हे सण कोणत्या मराठी महिन्यात येतात ते सांगू या.

## २ साजरागोजरा

नेहमी मराठी भाषेच्या खडबडीतपणाबद्दल काहीसे तक्रारीच्या सुरात बोलले जाते. त्यावरून विनोदही होतात. त्यामुळे तिच्या अंतरंगातला ओलावा आणि गोडवा दाखवणारे शब्द जेव्हा काळाच्या पोटात गडप होतात, तेव्हा जीव कासावीस होतो. 'साजरा' हा असाच एक नाहीसा होण्याच्या वाटेवर असलेला शब्द आहे.

ह्या शब्दाचा अर्थ 'छान', 'सुंदर', 'शोभणारा' असा आहे. त्याचे मूळ कोणत्या भाषेत आहे ते मला ठाऊक नाही. कुणी म्हणे ते संस्कृतमध्ये आहे, कुणी म्हणे ते फारसीमध्ये आहे. असेलही; पण काळाच्या ओघात बदलत त्याने घेतलेले आजचे रूप लोभस आणि अगदी मराठी वळणाचे वाटते.

उत्सव-समारंभ किंवा कोणतेही शुभकार्य आनंदाने आणि गोंधळ गडबड न होता पार पडले की ते 'साजरे झाले' असे म्हणतात. एखादी गोष्ट छान करणे, सुंदर करणे म्हणजे ती 'साजरी करणे'.

"वाः! लग्न अगदी साजरं झालं, बरं का!"

"सुदैवानं शेवटचं अध्यक्षांचं भाषण फारच रंगतदार झालं. काही नव्या कविता वाचून त्यांनी टाळ्या घेतल्या आणि प्रसंग साजरा केला म्हणून आयोजक वाचले."

"ती तुमची लेक ना? जांभळ्या पैठणीत अगदी साजरी दिसतेय हो!"

अशी वाक्ये अवचित कानावर पडली की कसे प्रसन्न वाटते. साजरा ह्या शब्दाचे 'साजिरा' हे जुने रूप अधिक गोड वाटते. मराठीला जोडशब्द तयार करण्याचा छंद असल्यामुळे 'गोजिरा', 'गोजरा' हे शब्द जोडून 'साजिरागोजिरा', 'साजरागोजरा' हे जोडशब्द तयार होतात. ते उच्चारल्यावर गोंडस जुळी बाळे किंवा ढवळ्या-पवळ्या रंगांची वासरांची जोडी नजरेसमोर येते.



हसरा नाचरा । जरासा लाजरा ।
सुंदर साजिरा । श्रावण आला ॥

नवी, कोवळी, लुसलुशीत पालवी घेऊन ऊनपावसाचे खेळ खेळत येणाऱ्या श्रावण महिन्याचे हे प्रसन्न वर्णन. 'साजणे' असे क्रियापदही आहे. त्याचे 'शोभणे, शोभून दिसणे, योग्य असणे' असे अर्थ आहेत. पाहा –

"खरं सांगू का, तुझ्या भारदस्त व्यक्तिमत्त्वाला हिऱ्यापेक्षा मोतीच साजून दिसतो."

ह्या शब्दाचा रोजच्या वापरात सहज वापर होण्याचा काळ कधीच मागे पडला. आज साधेसुधे कार्यक्रमही साजरे होण्याऐवजी 'संपन्न' किंवा 'सेलिब्रेट' होतात.



नट्टूनथट्टून समारंभात मिरवणाऱ्या मुली 'ऑस्सम' किंवा 'गॉर्जस' किंवा अशाच काही तरी दिसतात. (मुलगे कसे दिसतात? कोण जाणे!) मान्य आहे, की भाषा बदलतात. जसे त्यातले काही हरवते, गळून पडते, तशी त्यांना नवी पालवीही फुटते. पण हरवलेल्याबद्दलची हळहळ वाटतेच ना!

क. वरील उताऱ्यात 'साजरे' ह्या क्रियाविशेषणाबरोबर येणारी कोणती क्रियापदे तुम्हाला दिसतात? ती शोधू या आणि ती जोडी वापरून नवे वाक्य तयार करू या.

उदा॰ १. साजरे करणे - ..............................

२. ..............................

३. ..............................

**ख. मराठीला जोडशब्द तयार करण्याचा छंद आहे असे आपण वाचले. ह्या उताऱ्यातील जोडशब्दांची यादी करू या.**

१. ------------------- २. ------------------- ३. -------------------

**ग. आपल्याला असे आणखी कोणते जोडशब्द आठवत आहेत? निदान पाच-सहा शब्द लिहू या.**

१. ------------------- २. ------------------- ३. -------------------
४. ------------------- ५. ------------------- ६. -------------------

**घ. खालील वाक्प्रचार योग्य त्या जागी लिहून वाक्ये पूर्ण करू या.**
(काळाच्या पोटात गडप होणे, काळाच्या ओघात बदलणे, काळ मागे पडणे)



पूर्वी बायकांना अगदी स्वातंत्र्य नसे. 'चूल आणि मूल' ह्यांच्या भोवतीच त्यांचे सारे आयुष्य रेंगाळत असे. कोणतेही मत व्यक्त करण्याचे, मनाप्रमाणे जगण्या-वागण्याचे स्वातंत्र्य त्यांना भारतातच काय जगाच्या पाठीवर कुठेही नव्हते. पण आता तो (१) -------------------. त्या काळच्या जाचक चालीरीती (२) ------------------- किंवा नाहीशा झाल्या आहेत. ह्याचा अर्थ असा होत नाही, की बायका आता पूर्णपणे स्वतंत्र झाल्या आहेत. ज्या दिवशी स्त्रिया खऱ्या अर्थाने स्वतंत्र होतील त्या दिवसापासून 'स्त्री-स्वातंत्र्य' ह्या शब्दाची गरजच पडणार नाही. मग काही काळातच हा शब्दच (३) -------------------.

## ३ असाही एक उत्सव

**स्थळ कॅफे**

क. सनत आणि कुणाल ह्या दोघांमधला संवाद ऐकू या आणि बरोबर पर्यायावर खूण करू या.

| | |
|---|---|
| सनत आणि कुणालची भेट | अ. अचानक होते.<br>आ. कुणाल सनतला शोधत असतो.<br>इ. सनत कुणालला शोधात असतो. |
| सनतला मोकळं मोकळं का वाटतंय? | अ. त्याचं सगळं कर्ज फिटलंय.<br>आ. त्याचा ब्रेकअप झालाय.<br>इ. त्याचं वजन कमी झालंय. |
| ब्रेकअप साजरा करण्यासाठी सनत | अ. काकांना कॉफी पाजतो.<br>आ. कुणालला कॉफी पाजतो.<br>इ. लवकरच रेवा पार्टी देईल असं सांगतो. |
| सनतच्या ब्रेकअपवर कुणालचं मत | अ. सनतनं रेवाशी जमवून घ्यायला हवं.<br>आ. रेवाने सनतशी जमवून घ्यायला हवं होतं.<br>इ. दोघांनी जुळवून घ्यायला हवं होतं. |
| कुणालच्या मते ही पिढी लग्न का करत नाही? | अ. जबाबदारी नको म्हणून.<br>आ. खर्च नको म्हणून.<br>इ. ब्रेकअप नको म्हणून. |

**गद्य = १) आपण सामान्यतः जसे बोलतो अथवा लिहितो ते भाषेचे रूप.**
**२) अरसिक, कंटाळवाणे विवेचन, लेखन**
**गद्य माणूस = अरसिक माणूस**

**ख. चला वादविवाद करू या**

"हे बरंय बाबा तुमचं. जबाबदाऱ्या नकोत म्हणून लग्न नको, केलं तरी खर्च नको म्हणून त्याचा समारंभ नको; पण नसलेल्या जबाबदाऱ्यांमधून मोकळं झाल्याचा मात्र उत्सव हवा."



कुणालच्या ह्या विधानाशी आपल्यापैकी काही जण सहमत असतील, काही नसतील. घटस्फोट किंवा ब्रेकअप ह्यासारख्या घटनांचा उत्सव साजरा करावा का?

वर्गातील विद्यार्थ्यांचे दोन गट करून वादविवाद करू या. तयारीसाठी १०-१५ मिनिटे घेऊ या. एक गट आनंद साजरा करावा ह्या मताचा असेल तर दुसरा त्याच्या विरुद्ध मताचा असेल. मदतीसाठी दोन वाक्ये दिली आहेत.

| उत्सव साजरा करावा | उत्सव साजरा करणे बरोबर नाही. |
|---|---|
| नको असलेल्या, ओझं वाटू लागलेल्या, जड झालेल्या नात्यातून सुटका झाली तर त्याचा आनंद साजरा करण्यात हरकत ती कसली? | जे प्रेमाचं नातं आपण आयुष्यभरासाठी स्वीकारलं, ते तुटताना त्याची वेदना मनाला जाणवणारच. उगाचच आनंदोत्सव साजरा करून 'मला मुळीच वाईट वाटत नाही' असा आव का आणावा? |

## ४ बालतरूची पालखी

क. शांतिनिकेतनमध्ये साजरा केल्या जाणाऱ्या बालतरूच्या पालखी सोहळ्याचे हे पु. ल. देशपांडे ह्यांनी केलेले नितांत सुंदर वर्णन वाचू या. ह्या लेखातील परिच्छेदांना (अ. ते उ.) उदाहरणाप्रमाणे शीर्षक देऊ या.

ख. आपल्या वृत्तपत्रासाठी हा लेख अतिसंक्षिप्त रूपात आपल्याला परत लिहायचा आहे. त्यासाठी-

अ. प्रथम प्रत्येक परिच्छेदात आपल्याला जी माहिती महत्त्वाची वाटते ती अधोरेखित करू या.

आ. ह्या माहितीच्या आधारे हाच लेख अगदी थोडक्यात परत लिहिण्याचा प्रयत्न करू या.

इ. वर्गातील सहाध्यायांचे लेख वाचून वर्गात एकत्र चर्चा करू या.



(अ. प्रस्तावना)



(लहान मुलामुलींनी वृक्षवेलींच्या, पानाफुलांच्या सहवासात वाढावे असे रवींद्रनाथ टागोरांना वाटे. शांतिनिकेतनात ते प्रथम आले तेव्हा तिथला सारा परिसर वाळवंटासारखा कोरडा, रखरखीत होता. १९०८साली रवींद्रनाथांनी वृक्षारोपणाची मोहीम सुरू केली. सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी त्यात सहभागी झाले. आज तो परिसर शेकडो झाडांनी आणि वेलींनी हिरवागार झालेला आहे. वृक्षारोपणाचा समारंभ श्रावणाच्या बावीस तारखेला – रवींद्रनाथांच्या पुण्यतिथीला – आजही मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.)

(आ. ------------------------------------------------)

दुपारपासून पाहतो तो किती तरी छोटीछोटी मुले आणि मुली सुंदर पोशाख घालून ‘पाठभवना’च्या दिशेला निघालेली. पिवळ्या रंगाची धोतरे, झब्बे, डोक्याला पिवळ्या रंगाचा रुमाल बांधलेला, कमरेला उपरणे कसलेले, कपाळावर चंदनाचा टिळा – अशा वेषात मुले; आणि त्याच रंगाच्या साड्या किंवा परकर-पोलके, गळ्यात फुलांच्या माळा, चिमुकल्या मनगटांत फुलांचे गजरे, केसांत पल्लवांचे तुरे खोचलेले – अशा वेषात त्या पोरी गौरीसारख्या सजलेल्या. शांतिनिकेतनातल्या वृक्षांनी सावली धरलेल्या वाटांवरून पिवळ्या फुलांची चिमुकली रोपेच पाय फुटून हिंडायला लागल्यासारखे दृश्य.(...)

(इ. ------------------------------------------------)

रुग्णालयापुढले पटांगण. भोवतालचा परिसर आबालवृद्ध स्त्रीपुरुषांनी फुलून गेला होता. एका बाजूला छोटासा मांडव घातलेला होता. तिथे संगीतभवनातल्या छात्राछात्रींचे समूह-गायन चालले होते. रुग्णालयासमोरच एक टेबलखुर्ची मांडलेली होती. ती विश्वभारतीचे कुलगुरू आणि प्रमुख पाहुणे यांच्यासाठी. चारी बाजूंना ही गर्दी. रस्त्याच्या दुतर्फा माणसे उभी. रांगेत उभे राहणे, शिस्त, व्यवस्थित रीतीने सभा पार पाडणे वगैरे गोष्टींवर आपल्या देशात एकूणच श्रद्धा कमी. बंगालला ह्याही बाबतीत आघाडीवर राहायची हौस आहे. त्यामुळे ते मोकळे अंगण सोडले, तर सगळीकडे खेचाखेच! तेवढ्यात मला बंगालीबाबूंनी आदेश दिला, “देशपांडेजी, ढुकून!” (“घुसा!”) मग ‘हर हर महादेव’ म्हणून मी पुढे घुसलो. माझे घुसणे पाहून हा आपल्यांतलाच एक असे समजून मला कोणी बोलले नसावे.

(ई. ------------------------------------------------)



अंगणाच्या मध्यभागी एक सुंदर मंडल तयार केले होते. पानाफुलांनी भोवती ‘आल्पना’ म्हणतात ती रांगोळी काढली होती. बाजूला वनदेवतांसारख्या नटलेल्या सुंदर किशोरी उभ्या होत्या. त्यांच्या हातांत तबके होती. तबकांत फुले होती. धूपदीपही असावेत. लग्नाचा सोहळा असावा असे वातावरण. वृक्षारोपण समारंभाला आलेली पुरुषमाणसेही पांढरेशुभ्र धोतर, शुभ्र किंवा रेशमी कुर्ता अशा वेषात आणि बायकाही नटूनथटून आल्या होत्या. आकाशात ढगांची दाटी होती तरी कुणाला पावसात भिजण्याची भीती नव्हती. (...)

(उ. ------------------------------------------------------------------------)



काही वेळाने दुरून एक मिरवणूक आली. तो पिवळ्या फुलांचा ताटवा रस्त्यातून प्रवाहासारखा नाचतगात येत होता. मिरवणूक जवळ आल्यावर पाहतो, तर नारळीचे एक रोप पानाफुलांनी सजवलेल्या एका सुंदर पालखीतून मिरवत आणले जात होते. ज्ञानेश्वरांच्या पादुकांच्या पालखीसारखी बालतरूची पालखी. अकराबारा वर्षांच्या चार मुलांनी त्या पालखीवर ताडाच्या पानांतून तयार केलेली आणि फुलांनी शृंगारलेली छत्रे धरली होती. डहाळ्यांच्या चवऱ्या ढाळल्या जात होत्या. त्या मुलामुलींचे शिक्षक आणि शिक्षिका त्याच मिरवणुकीत गात येत होत्या. मंगलप्रसंगी बंगाली स्त्रिया शंख वाजवतात, तसा शंखनाद चालला होता. चिमुकल्या मंजिरी, तालवाद्ये यांचा गजर होता. युवराजांची स्वारी बालप्रजेने पालखीतून मिरवत आणावी तशी ह्या बालतरूची पालखी ही छात्रछात्रींची सेना मिरवत आणत होती. मुलामुलींच्या तोंडी गुरुदेवांचे गीत होते : 'श्रावणधारांचा आशीर्वाद तुला लाभू दे ... तुझ्या मस्तकावर आणि पानापानावर अमरावतीचं धाराजल पडू दे ...' अशा शुभेच्छा त्या गीतातून व्यक्त होत होत्या. मिरवणूक जवळ आली आणि पोरांच्या ओठांबरोबर थोरांचेही ओठ हळूहळू हलायला लागले. त्या समुदायाने त्यात आपले आवाज मिसळले. त्या सुरेल गजरात त्या पालखीतला तो बालतरू खरोखरीच एखाद्या चिमण्या राजपुत्रासारखा दिसायला लागला.

**- पु॰ ल॰ देशपांडे (एक साठवण)**



एका व्यक्तीने बुद्धांना विचारले, "साजरा करायला सर्वात चांगला दिवस कुठला?" बुद्धांनी शांतपणे सांगितले – "मरणाच्या एक दिवस अगोदर!" ती व्यक्ती म्हणाली "मरणाचा तर दिवस माहीत नसतो." बुद्ध हसून म्हणाले "जीवनातला प्रत्येक दिवस शेवटचा समज आणि जीवनाचा खरा आनंद घेण्यास आजपासून सुरवात कर...!"

## ५ शाळाप्रवेश – एक समारंभ

**रोहन** : हॅलो, भूषण? अरे, मी रोहन बोलतोय. माझं जरा महत्त्वाचं काम होतं तुझ्याकडे.

**भूषण** : अरे, बोल ना मग.

**रोहन** : तू गेल्याच वर्षी तुझ्या ध्रुवसाठी शाळेत प्रवेश मिळवलास ना? मला आठवतंय, मीपण आलो होतो तुमच्या<u>बरोबर</u>, तुम्हाला कंपनी द्यायला. पण मी फक्त तुमच्या<u>सोबत</u> आलो. तुम्ही काय काय तयारी केलीत हे विचारलंच नाही.

**भूषण** : पण मग आत्ता का ही माहिती विचारतोयस?

**रोहन** : यंदा माझी पाळी आहे ना! आमची आद्या आता चार वर्षांची होईल. तिला बालवर्गात प्रवेश घ्यायचा आहे. तू काय काय केलंस सांगतोस का मला?

**भूषण** : हं! चांगल्या शाळेत प्रवेश मिळवणं ही काही सोपी गोष्ट नाही बरं का, रोहन. मी तर जय्यत तयारी<u>निशी</u> गेलो होतो मुलाखतीला.

**रोहन** : हो, तेच विचारायचं आहे. काय काय तयारी केली होतीस तू?

**भूषण** : हे बघ, एक फाईलच तयार कर तू. आद्याचा जन्मदाखला, तुम्हा दोघांचा विवाहदाखला, आद्या शाळेत जायला वैद्यकीयदृष्ट्या फिट आहे असं प्रमाणपत्र. ह्या सर्व दाखल्यांसकट एक फाईल बनव आधी.

**रोहन** : हं, हे सर्व दाखले आहेतच. आणखी काही?



**भूषण** : अरे हो! तुम्हा दोघांचा उत्पन्नाचा दाखला असेलच! तुमची आर्थिक परिस्थिती कशी आहे, हेही विचारतात ह्या शाळा अलीकडे.

**रोहन** : ऐकलंय मी हे. आमच्या दोघांच्या शैक्षणिक पात्रतेसह सर्व दाखले लावतो मी त्या फाइलीत आणि मग माझ्या आणि सोनियाच्या आईवडिलांसकट मुलाखतीला हजर होतो. बघतोच कसा प्रवेश मिळत नाही ते.

**भूषण** : वाः! इतक्या फौजफाट्यासंगे, इतक्या तयारीनिशी आणि निश्चयानिशी गेलात, तर कामगिरी नक्कीच फत्ते होणार. मला आणखी काही आठवलं तर कळवतोच तुला. तुम्हा सर्वांना शाळाप्रवेशासाठी शुभेच्छा, बरं का!

क. वरील परिच्छेदात काही शब्दांश अधोरेखित केले आहेत. ते शब्दांश कोणत्या शब्दप्रकारात मोडतात? योग्य उत्तरावर ✓ खूण करू या.

अ. क्रियापद आ. विशेषण इ. विभक्तिप्रत्यय ई. अव्यय

ख. ह्या शब्दांशाला अव्यय म्हणतात हे आपण ओळखले. वरील उताऱ्यातील अव्यये नामाशी कोणता संबंध दाखवत आहेत? योग्य उत्तरावर ✓ खूण करू या.

अ. स्थळ आ. विरोध इ. साहचर्य ई. तुलना

ग. ह्यातील काही अव्ययांच्या बाबतीत एकाऐवजी दुसरे अव्यय वापरता येते, पण हे नेहमीच शक्य होत नाही.

दोन दोन विद्यार्थ्यांचे गट करून वरील संवाद मोठ्याने वाचू या आणि ही अदलाबदल कुठे शक्य आहे आणि कुठे शक्य नाही ते शोधू या.

उदा॰ मी तुमच्याबरोबर / सवे / समवेत / सह / संगे खरेदीला येणार आहे हं, थांबा माझ्यासाठी. ✓

पण - मी तुमच्यानिशी खरेदीला येणार आहे हं, थांबा माझ्यासाठी. ✗

बरोबर, सोबत, सवे, संगे, सकट, सहित, समवेत, सह, निशी ही सर्व साहचर्यवाचक अव्यये आहेत.

| औपचारिक वापर | अनौपचारिक वापर | जुन्या साहित्यात वापर | क्वचित वापर |
|---|---|---|---|
| सह<br>सहित<br>समवेत | बरोबर<br>सकट<br>सोबत | सवे<br>संगे | निशी |

व्याकरण

टीप – 'निशी' हे साहचर्यवाचक अव्यय कधीच इतर सर्व साहचर्यवाचक अव्ययांच्या जागी वापरता येत नाही आणि इतर सर्व साहचर्यवाचक अव्यये कधीच 'निशी'च्या ऐवजी वापरता येत नाहीत.

**घ. योग्य ते साहचर्यवाचक अव्यय वापरून वाक्ये पूर्ण करू या.**

अ. पुराचा लोंढा येताना पाहिला आणि घरदार सोडून सर्व गावकरी तिथून जिवा---------------- पळत सुटले. (निशी / बरोबर)

आ. माझा माझ्या भागीदारा---------------- करार झाला आहे. नफ्यातला साठ टक्के वाटा माझा असेल. (सकट / बरोबर)

इ. कंपनीतले अगदी रखवालदारा---------------- सगळे कर्मचारी संपावर गेले आहेत. (संगे / सकट)

ई. त्या जाचक नियमाला सर्व विद्यार्थ्यांनी सर्व शक्ती---------- विरोध केला. (बरोबर / निशी)

उ. जीवनची बदली झाली आणि तो त्याच्या बायको-मुलां---------- बदलीच्या गावी निघून गेला. (सहित / निशी)

ऊ. चालून आलेल्या शत्रूचा त्या शूर राणीने सर्व सामर्थ्या-------- प्रतिकार केला. (सकट / निशी)

**काही म्हणी**

गाड्याबरोबर नळ्याची यात्रा.
शेळी जाते जिवानिशी, खाणारा म्हणतो वातड.
ऊस गोड लागला म्हणून मुळासकट खाऊ नये.
ढवळ्यासंगे बांधला पवळा; वाण नाही पण गुण लागला.



**च. ह्या म्हणींचा अर्थ कळतोय का? समजून घेण्याचा प्रयत्न करू या. योग्य म्हण योग्य जागी वापरू या.**

अ. अगं, त्या जिगीषाबरोबर थोडे दिवस राहिलीस काय, तिच्यासारखंच वागायला लागलीयेस! म्हणतात ना, ------------------------------------------.

आ. मी रात्रंदिवस खपून हे सादरीकरण पूर्ण केलं त्याचं कौतुक करायचं सोडून तुम्ही त्यात खोडीच काढताय. '------------------------------------------' असंच झालं हे!

इ. तुम्ही सगळ्या मैत्रिणी जाणारात ना सिनेमाला? मी म्हातारी कशाला हवीये बरोबर? मला नीट ऐकूही येत नाही. उगाच आपली ------------------------------------------.

ई. हे बघ मानस, तो उमेश तुला वाढदिवसाची भेट म्हणून कितीही महाग वस्तू निवडायला सांगेल; तू मात्र बेताच्याच किमतीची वस्तू निवड हं! लक्षात ठेव, ----------------------
------------------------------------------.

**छ. तुम्ही कोणाबरोबर काय कराल? प्रत्येक गोलातील एकेक शब्द / शब्दसमुच्चय घेऊन वाक्ये बनवू या.**




उदा. मी मैत्रिणीबरोबर सिनेमाला जाईन.

अ. ........................................................................................................ .

आ. ........................................................................................................ .

इ. ........................................................................................................ .

ई. ........................................................................................................ .

## ६ आम्रमहोत्सव

**आई** : अरे नचिकेत, नको ते आंबे सारखे हाताळूस; डागाळतील रे ते मग!

**नचिकेत** : मी कंटाळलो गं आई, वाट बघून. अजून किती उबवायचे आहेत ते? हे बघ, काही आंबे सुरकुतलेपण! आजच्या जेवणात आमरस हवाच हं! मी काढतो बाजूला पिकलेले आंबे.



क. आई आणि नचिकेतच्या संवादातील अधोरेखित क्रियापदांत तुम्हाला कोणते नाम लपलेले दिसते?

उदा. हाताळणे – तो हात

डागाळणे - ...............................

कंटाळणे - ...............................

उबवणे - ...............................

सुरकुतणे - ...............................

**नामसाधित क्रियापदे :**

टीप -
नामापासून क्रियापद बनताना त्यात कोणते आणि कसे बदल होतात त्याकडे लक्ष देऊ या.

| नाम + णे | नाम + आवणे | नाम + आळणे |
|---|---|---|
| भांडण : भांडणे | नाद : नादावणे | हात : हाताळणे |
| झोप : झोपणे | वेड : वेडावणे | डाग : डागाळणे |
| आनंद : आनंदणे | आळस : आळसावणे | माणूस : माणसाळणे |
| अनुभव : अनुभवणे | सांज : सांजावणे | गंध : गंधाळणे |
| सराव : सरावणे | दुःख : दुखावणे | भेग : भेगाळणे |
| उत्तर : उत्तरणे | खूळ : खुळावणे | पिसे : पिसाळणे |
| अभ्यास : अभ्यासणे | डोके : डोकावणे | झोप : झोपाळणे |
| चक्कर : चक्करणे | चक्र : चक्रावणे | |
| फळ : फळणे | पाणी : पाणावणे | पण : |
| फूल : फुलणे | ऊब : उबवणे | लाथ : लाथाडणे |
| मोहर : मोहरणे | धास्ती : धास्तावणे | ठेच : ठेचकाळणे |
| अंधार : अंधारणे | लाड : लाडावणे | |
| अंकुर : अंकुरणे | खंत : खंतावणे | |
| बहर : बहरणे | सुख : सुखावणे | |
| कंटाळा : कंटाळणे | | |
| शोभा : शोभणे | | |
| सुरकुती : सुरकुतणे | | |
| पालवी : पालवणे | | |
| रडू : रडणे | | |
| हसू : हसणे | | |
| उजेड : उजाडणे | | |
| दरवळ : दरवळणे | | |

**ख. कंसातील नामांपासून क्रियापदे बनवू या आणि ती योग्य जागी वापरून वाक्ये पूर्ण करू या.**

(लाथ, सराव, आळस, नाद, पाणी, भेग)

उदा. जयेश पुरता नादावलाय. सारखा त्या एकाच गोष्टीच्या मागे लागलाय.

अ. तू का इतका ..........? सारखा जांभया देतोयस ते!

आ. आलेली इतकी चांगली संधी तू .......... आहेस! नंतर पश्चात्ताप होईल हं!

इ. त्या म्हातारीची करूण कहाणी ऐकून सर्वांचेच डोळे ...........

ई. ओळीने तीन वर्षे दुष्काळ पडलाय इथे. कुठे पाण्याचा टिपूस नाही. सगळ्या जमिनी .......... आहेत.

उ. अंधाऱ्या खोलीत शिरल्यावर थोडा वेळ मला काहीच दिसेना. काही वेळाने माझे डोळे अंधाराला .......... आणि खोलीतील सामानाची रचना साधारण दिसायला लागली.

ग. वर्गातील विद्यार्थ्यांचे दोन गट बनवू या. दोन्ही गटांतील विद्यार्थ्यांनी आळीपाळीने दुसऱ्या गटाला खालील नामांपैकी एक नाम द्यायचे आहे. त्या गटाने त्या नामापासून नामसाधित क्रियापद बनवून त्याचा वापर करून एक वाक्य तयार करून वर्गात सांगायचे आहे. जो गट जास्तीत जास्त अचूक क्रियापदे आणि वाक्ये तयार करेल तो विजेता ठरेल. शिक्षकांचा निर्णय अंतिम राहील. चला तर, करू या सुरुवात!



पिसे, माणूस, उजेड, खूळ,
पालवी, अंकुर, उत्तर, धास्ती,
दुःख, झोप, आनंद, गंध,
शोभा, डोके, गोंधळ, चक्कर, झोप

घ. योग्य क्रियापदाचे योग्य रूप लिहू या. शेजारील वर्तुळात हे क्रियापद ज्या नामापासून तयार झाले, ते नाम लिहू या.

(सुरकुतणे, दुखावणे, भेगाळणे)

अ. दिवसभर हेच कपडे घातलेयत मी. आता ते अगदी ...........
वयामुळे आजीची त्वचा ...........
हात पुसून पुसून हे फडकं पार ...........
पलंगावरची चादर बदल आता. तू लोळल्यामुळे .......... बघ किती!
(..........)

आ. भूकंप झाला आणि गावातील बऱ्याच घरांच्या भिंती ...........
थंडीमुळे माझ्या टाचा बघ किती ...........
दरड कोसळल्यामुळे घाटातला रस्ता ...........
ओळीनं चार वर्षे दुष्काळ पडतोय. सगळ्या शेतजमिनी ...........
(..........)

इ. माझा गुडघा लोखंडी खांबावर आपटला आणि ...........
तुझ्या कठोर शब्दांनी सर्व जण ...........
ईश्वरी, तुझ्या वागण्यानं सर्वांची मनं ...........
तू का .......... इतकी? जयेश तुझ्याशी बोलत नव्हता.
(..........)

## ७ असाही एक वाढदिवस

**क. एक छोटी चित्रफीत पाहू या.**

**ख. पुढील प्रश्नांची उत्तरे देऊ या.**

अ. ज्याचा वाढदिवस साजरा होत आहे त्या मुलाचे संपूर्ण नाव ..................

आ. मुलाच्या आईचे आणि वडिलांचे नाव .................. ..................

इ. महाराष्ट्राच्या कोणत्या भागात हा समारंभ साजरा होत आहे?

महाराष्ट्र प्रांताचे उपक्षेत्र ..................

तालुका ..................

गाव ..................

ई. गावातील कोणत्या जागी हा वाढदिवस साजरा केला जातोय? ..................

उ. वाढदिवसाची भेट म्हणून खास कोणती गोष्ट निमंत्रितांकडून हक्काने मागितली गेली आहे? ..................

ऊ. निमंत्रितांचे कोणते तीन गट वाढदिवसाच्या विशेष उपक्रमात भाग घेत आहेत? .................. .................. ..................

ए. गावात होत असलेल्या कोणत्या उपक्रमाबरोबर ह्या वाढदिवस समारंभाची सांगड घातली गेली आहे? ..................

ॲ. ह्या नवीन प्रकारच्या वाढदिवस समारंभातून कोणत्या दोन गोष्टी एकाच वेळी साध्य झाल्या? .................. ..................

## ८ संधी

**क. वाचू या.**

सुहास पहाटे लवकर उठतो. प्रात:काळचं नि:शब्द वातावरण त्याला भुरळ घालतं. काळ्या जगाची रात्रीची दुष्कर्म रात्रीच्या काळोखात विरून गेलेली असतात आणि पूर्वेच्या क्षितिजावर तेज:पुंज सूर्य नव्या दिवसाच्या नव्या आशा घेऊन उगवत असतो. या प्रहराचं जग किती निष्पाप वाटतं! भारावून जाऊन सुहास त्या क्षितिजावरच्या भास्कराला नमस्कार करतो.



**ख. वरील उताऱ्यात अधोरेखित केलेले संधी कसे तयार झाले आहेत ते पाहू या.**

| | | |
|---|---|---|
| प्रात:काळ | प्रात: + काळ | अ: + क् → अ: |
| नि:शब्द | नि: + शब्द | इ: + श् → इ: |
| दुष्कर्म | दु: + कर्म | उ: + क् → ष्क् |
| तेज:पुंज | तेज: + पुंज | अ: + प् → अ: |
| निष्पाप | नि: + पाप | इ: + प् → इष् |

**ग. याचप्रमाणे पुढील तक्त्यातील रिकाम्या जागा भरू या.**

| | | |
|---|---|---|
| अध:पात | | |
| | नि: + संदेह | |
| पुरस्कार | | |
| | नि: + कपट | |
| पुन:प्रक्षेपण | | |

## ९ चला, गप्पा मारू या.

**काळ मागे पडणे**

**पहिला विद्यार्थी :** शाळेच्या अंगणात पावसाचं पाणी साचलंय. जाऊ या का रे आपण त्यात कागदाच्या नावा सोडायला?

**दुसरा विद्यार्थी :** वेडा आहेस का? आपण आता मोठे झालो. नावा सोडायचा काळ मागे पडला.

**पहिला विद्यार्थी :** काळ मागे पडला? म्हणजे काय?

**दुसरा विद्यार्थी :** काळ मागे पडला म्हणजे ते दिवस गेले आता.

**पहिला विद्यार्थी :** ते दिवस गेले? तो काळ मागे पडला?

**सर्व विद्यार्थी :** हो हो, ते दिवस गेले आता. तो काळ मागे पडला.

ह्याचप्रमाणे : चिखलाच्या पाण्यात उड्या मारणे, झाडावर चढून चिंचा काढणे

संवाद

## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो पल्लव, ते - | ती आस | ते तालवाद्य, ती तालवाद्ये |
| तो धूप | ती चवरी, त्या चवऱ्या | ते धाराजल |
| तो बालवर्ग, ते - | ती खेचाखेच | ते प्रबोधन |
| तो दाखला, ते दाखले | ती मंजिरी, त्या मंजिऱ्या | ते खंडन |
| तो साज, ते - | ती आत्मप्रशंसा | ते चऱ्हाट, ती चऱ्हाटे / चऱ्हाटं |
| | | ते मंडल, ती मंडले / मंडलं |
| | | ते छत्र, ती छत्रे / छत्रं |

## क्रियापद

उचकटणे, कसणे, शृंगारणे, हाताळणे, डागाळणे, उबवणे, नादावणे, लाथाडणे, आळसावणे, पाणावणे, भेगाळणे, सरावणे, माणसाळणे, पिसाळणे, झोपाळणे, आनंदणे, पालवणे, चक्करणे, दरवळणे, अंकुरणे, फळणे, अनुभवणे, चक्रावणे, गोंधळणे, उत्तरणे, मोहरणे, खुळावणे, दुखावणे

## विशेषण

भंगार, नितांतसुंदर, जाचक, निर्घृण, नितांत, साजरा, उद्युक्त



## क्रियाविशेषण

विधिवत, अवचित

## वाक्प्रचार आणि म्हणी

| | |
|---|---|
| काळाच्या पोटात गडप होणे | काळाच्या ओघात बदलणे |
| काळ मागे पडणे | जेहेत्ते काळाचे ठायी |
| गाड्याबरोबर नळ्याची यात्रा | शेळी जाते जिवानिशी, खाणारा म्हणतो वातड |
| ऊस गोड लागला म्हणून मुळासकट खाऊ नये | ढवळ्यासंगे बांधला पवळा, वाण नाही पण गुण लागला |

## नाम / इतर शब्द + क्रियापद

आस लागणे, व्यक्त होणे, डोकं पिकवणे, सावली धरणे, जोर लावणे

## आता मला हे येतं...

**वेगळ्या वाटेवरचे सण माहीत करून घेणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**नवे उत्सव आणि समारंभ जाणून घेणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**व्याकरण : साहचर्यवाचक शब्दयोगी अव्यये वापरणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**व्याकरण : नामसाधित क्रियापदे / नामधातू तयार करून वापरणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**व्याकरण : संधी ओळखणे आणि करणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

७

# मन मनास उमगत नाही









चला, शिकू या ...

- विविध भावना - मनाच्या अवस्था व्यक्त करणे
- 'हो'चा वापर करणे

## १ मानवी भावना

**क. आधीच्या पानावरील चित्रांचे वर्णन करू या.**

- त्यांतून कोणत्या भावना आपल्यापर्यंत पोहोचतात?

**ख. चर्चा करू या.**

- तुमच्या जीवनात भावनांचे स्थान किती महत्त्वाचे आहे?
- तुमचा स्वभाव कसा आहे? तुमचे स्वतःबद्दल आणि इतरांचे तुमच्याबद्दल काय मत आहे?
- तुमच्या स्वभावात काही बदल व्हायला हवेत असे तुम्हाला वाटते का? असल्यास कोणते?
- तुमच्या स्वभावातील कोणती गोष्ट तुम्हाला मनापासून आवडते?

**ग. वाचू या.**

**भुईचाफा**



एका बागेत एक छान मोठे बकुळाचे झाड होते. पावसाळा संपला की दर वर्षी त्याला बहर येई. फुलांचा एक मोठा सडाच खाली पडे. पिवळ्या तपकिरी रंगाचा एक गालिचाच जणू अंथरला आहे असे वाटे. सगळीकडे त्यांचा घमघमाट सुटे.

बकुळ मग खूप खुषीत असे. रोज रात्री तो वर आकाशात तारे पाही. त्याला वाटे, ही वरची सृष्टी किती सुंदर. खाली नुसती माती, दगड आणि लहान ठेंगणी झाडे आणि झुडपे. आपल्या अंगावर हे असे तारेच फुलतात असेही त्याला वाटे. आपले भाग्य हे असे थोर म्हणून तो सतत आनंदात असे. ऊन येई, वारा येई, कधी पाऊस येई तेव्हा त्याला वाटे, की वरून हे सारे तारेच आपले कौतुक करीत आहेत.



मग एके दिवशी त्याने खाली पाहिले. तसे खाली तो सहसा बघतही नसे. जवळच त्याला जमिनीतूनच एक सुंदर पांढरे, निळ्या छटा असलेले लांब पाकळ्यांचे फूल वर आलेले दिसले. त्याच्या फुलांपेक्षा हे किती तरी पटींनी मोठे होते. त्याला या फुलाचे नवल वाटले. झाड तर कुठेच दिसत नव्हते. नुसते फूल. उगाच बाजूला दोन-चार हिरव्या पात्या. हा होता भुईचाफा.

त्याला मग चैन पडेनासे झाले. फूल इतके मोठे तर झाडही आपल्यापेक्षा खूप मोठे कुठे तरी असणार. खाली जमिनीतच तर लपलेले नाही ना?

पण एक-दोन दिवसांतच ते फूल बावले, खाली मान टाकून पडले. बकुळाला थोडे बरे वाटले. आपण उगाचच काही तरी त्याला मोठे समजत होतो असे वाटले. लवकरच तो हे सगळे विसरला.

पण पुन्हा लवकरच त्याच जागेवर जेव्हा तसलेच दुसरे फूल आले, तेव्हा तो थोडा घाबरला. त्याचा शोध आता घेतलाच पाहिजे असे त्याला वाटू लागले. तो मग वरचे तारे वगैरे विसरून खाली आपणाकडे नीट पाहू लागला. आपणही खाली जमिनीतच आहोत याचे त्याला पहिल्यांदाच भान आले. अगदी खाली काय आहे ते तो पाहू लागला. त्याच्या आठवणीतही नव्हता असा त्याचाच एक भाग जमिनीत दूरवर वेगवेगळ्या ठिकाणी पांगलेला होता.

त्याने पाहिले, कुणी तरी त्याच्या लहान लहान मुळ्यांना वाट करून देत होते. अडथळे टाकून मऊ-ओलसर भूमीत नेऊन सोडीत होते.

ती होती एक म्हातारी – खूप, खूप म्हातारी. त्याने तिला ओळखलेच नाही. पण त्याला पाहून ती आनंदली आणि म्हणाली, "आलास का, पुता? तू गेला होतास वर तारे पाहायला आणि त्यांची फुले मला आणून द्यायला. मी रोज त्यांची शाल पांघरते."

बकुळाला वाटले, हे सगळे असे होते तर! ही आपली आई खाली आपणासाठी कष्ट काढणारी आणि आपण वर सगळे आपलेच राज्य आहे असे समजत होतो!

पण त्याला त्या दुसऱ्या फुलाचे अजूनही कुतूहल होते.

तो म्हणाला, "म्हातारे, तुला एक विचारू का? माझ्या जवळच वर एक दुसरे फूल फुलते. माझ्या फुलांहून खूप मोठे. त्याचे झाड मात्र कुठेच दिसत नाही."

म्हातारी म्हणाली, "तू, तसाच तोही माझाच. त्याला माझ्या कुशीतच राहायचे होते, नुसते फूलच होऊन माझ्यासाठी. मी म्हटले, 'रहा'. मीच तुझे झाड होईन, प्रत्येक फुलाच्या वेळी नव्याने."

बकुळाचे आता समाधान झाले होते. त्याने थोडे अंग हलवून आपली काही फुले त्या भुईचाफ्याच्या फुलावर उधळली. तोही डुलू लागला.

- **पुरुषोत्तम शिवराम रेगे**

**अ. पुढील वाक्यांमध्ये अधोरेखित केलेल्या भागाच्याच अर्थाचा शब्द उताऱ्यामध्ये आहे. तो शोधून त्याप्रमाणे वाक्यात आवश्यक ते फेरफार करू या आणि मोकळ्या जागेत लिहू या.**



उदा॰ हिवाळ्यात झाडांची पाने गळतात आणि अंगणात ती विखरून पडलेली असतात. / त्यांचा सडा पडलेला असतो.

१. सण म्हटले की मला तऱ्हेतऱ्हेच्या अत्तरांचा नाकात भरून राहणारा सुगंध आठवतो. / ---------------------------------------------- आठवतो.

२. त्या लाल रंगाच्या रेशमी साडीला जांभळ्या रंगाची हलकी झाक होती. / ---------------------------------------------- होती.



३. पाच दिवसांपासून फ्रीजमध्ये पडलेल्या पालेभाज्या आता कोमेजल्या होत्या. / ------------------------------ होत्या.

४. शिक्षण संपल्यावर सगळे मित्र जगभर विखुरले. / ---------------------------------------------- .

५. "मला निघायला हवं. घरी आमची आई एकटी आहे. / ------------------------------ एकटी आहे."

**आणखी काही शब्दार्थ :**

पात्या = ऊस, गवत इ॰ची लांबट पाने (ती पाती, त्या पात्या)
मुळ्या = जमिनीखाली गेलेली लहान मुळे (ती मुळी, त्या मुळ्या)
कुशीत = अगदी जवळ, बाजूला चिकटून (ती कूस)

आ. ‘भुईचाफा’ ह्या कथेमध्ये कोणत्या भावनांचे दर्शन होते?

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

इ. बकुळाचे आणि म्हातारीचे नाते कसे आहे?

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

घ. एक कथा वाचू या.



राजम्मानं लहानपणी मला एक गोष्ट सांगितली होती.

एक म्हातारी आणि तिची छोटी नात – लच्छी – गावाबाहेर दूर रानापाशी राहत होती. एकदा म्हातारीच्या झोपडीपाशी एक मोर आला. मोराला पाहून लच्छी नाचू लागली. मोरही नाचू लागला. लच्छीनं हट्ट घेतला की मोराला अंगणातच बांधून ठेवावं. म्हातारी म्हणाली, ते कसं होणार? आपल्यापाशी त्याला खायला द्यायला दाणागोटा कुठं आहे? दोघींचा काही निर्णय होईना. तेव्हा मोरच म्हणाला, मी इथंच जवळपास राहीन. मला दाणागोटा काही नको. रान तर सारं भोवतालीच आहे. मात्र एका अटीवर. मी येईन तेव्हा लच्छीनं आधी नाचलं पाहिजे. ती जेव्हा नाचायची थांबेल तेव्हापासून मीही येणार नाही. अट साधी होती. लच्छी लगेच कबूल झाली. म्हातारीचंही काम झालं. पण नाचायचं म्हणजे काही साधी गोष्ट नव्हती. हुकमी नाचायचं, तर मनही तसंच हवं. लच्छी तेव्हापासून सतत आनंदीच राहू लागली. मोर कधी, केव्हा येईल याचा नेम नसे. पुढं पुढं मोर येऊन गेला की काय याचंही तिला भान राहत नसे. (...)

मी म्हटलं, “मोर हवा तर आपणच मोर व्हायचं. जे जे हवं ते ते आपणच व्हायचं.”

- पु॰ शि॰ रेगे

तुमच्या मते ह्या कथेतील कळीचे वाक्य कोणते आहे? त्यामागील कारण स्पष्ट करून सांगू या.

च. काही मराठी गाण्यांचे अंश ऐकू या. त्यांत पुढे दिलेल्या भावना व्यक्त करणारे कोणते शब्द ऐकू आले ते लिहू या.

गाणी

| | | |
|---|---|---|
| अ. एकाच ह्या जन्मी जणू... | आ. आज उदास उदास दूर... | इ. शूर आम्ही सरदार आम्हाला |
| ई. सुन्या सुन्या मैफिलीत माझ्या | उ. नाकावरच्या रागाला औषध काय | ऊ. हृदयी वसंत फुलताना... |



आनंद : ..........................................................................................

..........................................................................................

खिन्नता : ..........................................................................................

..........................................................................................

राग : ..........................................................................................

..........................................................................................

उत्साह : ..........................................................................................

..........................................................................................

भीती : ..........................................................................................

..........................................................................................

प्रेम : ..........................................................................................

..........................................................................................

**छ. गटात न बसणारा शब्द खोडू या.**

उदा. मत्सर, असूया, ~~सूड,~~ हेवा

**अ.** अवखळ, खोडकर, अडथळा, खट्याळ

**आ.** पोकळ, फोल, निरर्थक, खोल

**इ.** अपेक्षाभंग, हिरमोड, मोडतोड, भ्रमनिरास

**ई.** खवट, खवचट, कुत्सित, खरचटणे

**उ.** अलिप्त, तटस्थ, व्रतस्थ, स्थिर, निवृत्त

**ऊ.** दचकलेला, चकित, आश्चर्यचकित, दमलेला

**ए.** धाक, वचक, दरारा, धडक

**ॲ.** संतप्त, क्रोधित, रागावलेला, संत

**ऐ.** हळवा, संवेदनशील, हलवा, भावनाप्रधान

**ओ.** चोंबडा, चुगलखोर, कोंबडा, चहाडखोर

**ऑ.** हिडीस, भीषण, किळसवाणा, घृणास्पद, वेडा

**औ.** दुर्बळ, प्रबळ, उग्र, भीषण



**ज. भावना आणि प्रतिक्रिया यांची चढत्या क्रमाने तीव्रता दाखवू या.**

दुर्लक्षित – नाकारलेला – तिरस्कृत – बहिष्कृत

उत्तेजित – चिडचिडा – संतप्त – रागावलेला

## २ ळळा-जिव्हाळा (भाग १ - पुढील भाग अभ्यासपुस्तकात)

(नव्या शाळेतील जाधवमास्तर 'ण'चा उच्चार 'न' असा करीत. शिवाय ते तोतरेही होते. तानीमावशीच्या भाच्याला त्यांनी एकदा धडा मोठ्या आवाजात वाचायला सांगितले. त्यांच्या तोतऱ्या बोलण्याची आणि उच्चारांची नक्कल करीत त्याने तो वाचला. बाकीची मुले खूप हसली.)

शाळा सुटल्यावर मास्तर म्हणाले – "थांब, आपण बरोबरच घरी जाऊ."

आम्ही चालू लागलो. मास्तरांनी माझ्या खांद्यावर हात ठेवला. सहज म्हटले, "तुझे अक्षर छान आहे; तुला पुष्कळ कविता येतात. मी तुझ्याएवढा होतो त्या वेळी मी गुरे राखत होतो, आणि मला एक अक्षर लिहायला येत नव्हतं –"

ते आतड्याने बोलत होते. एकदा मला वाटले, त्यांनी मला एक मुस्कटात द्यावी आणि 'चालता हो' म्हणून माझ्यावर ओरडावे. (...)

"मी कित्येकदा पानी, लोनी, कनसं म्हणतो म्हणून तू माझी चेष्टा केलीस. अरे, ती माझी भाषा आहे. लहानपणापासून अठ्ठावीस वर्षं मी ती बोललो, तिच्यावर वाढलो. ती झाली तरी एक भाषाच आहे. माझ्या खोलीत एका म्हातारीचा फोटो बघितलास नव्हे तू! ती माझी आई. ती रस्ते झाडायची. एक चिमणी माझ्यापुढे आदळून ती मला रात्री उशिरा पुस्तकासमोर बसवायची. तिला आयुष्यभर 'कृष्ण' म्हणायला काही आलं नाही. ते तर माझं नाव आहे, पण शेवटपर्यंत मी तिचा 'किसनाच' राहिलो. ही भाषा बरोबर की ती बरोबर याचा तू मोठा झाल्यावर विचार कर, आता ते जाऊ दे. पुस्तकात काय लिहिलं आहे, तसं बोलायला, म्हणायला यायला पाहिजे. प्रयत्न करतोच मी, करतो की नाही? पण काही वेळा ते साधत नाही. आणि मी तोतरा आहे, हे काय मी मुद्दाम देवाजवळून मागून आलोय होय? हे बघ; मी फार शहाणा आहे असं मी म्हणत नाही. मला येतं तेवढं शीक. तेवढं झालं की दुसऱ्या जास्त शहाण्या माणसाकडे जा. अरे, तू माझ्यापेक्षा जास्त शहाणा झालास, तर मला काय वाईट वाटेल होय? हो की मोठा बारीस्टर! मग मी तुला पकडून आणून तुलाच अध्यक्ष करतो. तूच वाट आमच्या पोरांना बक्षिसं! कुठलाही माणूस गावंढळ असला तरी त्याच्यात एक तरी गुण असतो. (...) आता माझंच बघ. मला सायकलवर बसायला येत नाही, गाणी म्हणता येत नाहीत, चित्रं काढता येत नाहीत. पण मला दोरीची पिशवी विणता येते, रंगीत कागदांच्या पट्ट्यांची चटई करता येते. मला गुलाबाची कलमं छान करता येतात. (...) आणखी एक तुलाच म्हणून सांगतो; मी पुष्कळ लिहितोसुद्धा. कागद आपलं म्हणणं फार शांततेनं ऐकून घेतो. मी तोतरा आहे, मी पानी म्हणतो म्हणून तो मला हसत नाही..."



आता मात्र मला रडू आवरले नाही. जाधवमास्तरांच्या हातात छडी नव्हती, त्यांनी रागाने मला शिव्या दिल्या नव्हत्या, पण मला डोळ्यातले पाणी आवरेना.

"रडायला काय झालं? पोरपणी असं चुकतंच! तूदेखील का काही लिहीत नाहीस? तुला आवडती माणसं असतील."

"होय, आहेत की! अगदी पाच माणसं आहेत," मी डोळे पुसत म्हणालो.

"पाच?" एकदम थांबून मास्तर म्हणाले, "पोरा, तू किती भाग्यवान आहेस याची तुला कल्पना नाही. मला एकच माणूस मिळालं होतं."

"पाच म्हणजे, सध्या दोनच आहेत. आई, नाना, सुम्मी आता नाहीत. पण तानीमावशी, श्रीपुमामा आहेत."

"मग असं कर, तू तुझ्या मावशीवरच लिही. मग मी तुला गूळ, शेंगा, खारीक देईन, आणि स्वच्छ चांगलं लिहिलंस तर एक बदाम देईन." (...)

मी हो म्हटले व थांबलो. देशपांडेमास्तरांनी मला छडी मारली होती तेव्हा तोंड घट्ट करून मी रडू आवरले होते. भिकारडा म्हटल्यावर मला राग आला होता. पण डोळ्यांत पाणी दाखवले तर त्यांचा विजय होईल म्हणून मी अगदी ताकाच्या खांबासारखा घुम्म राहिलो होतो, आणि आता कशाला काही नसता डोळ्यांतील पाणी थांबेना.

**- गुरुनाथ आबाजी (जी. ए.) कुलकर्णी**

**क. वरील कथेचा भाग नीट वाचू या आणि खाली दिलेल्या वाक्यांतील अधोरेखित भागांचा अर्थ निवडू या.**

अ. ते आतड्याने बोलत होते.
  १. ते फार भावुक होऊन बोलत होते.
  २. बोलताना त्यांची आतडी दुखत होती.
  ३. ते रागाने बोलत होते.

आ. एकदा मला वाटले, त्यांनी मला एक मुस्कटात द्यावी...
  १. एकदा मला वाटले, त्यांनी मला गप्प करावे.
  २. एकदा मला वाटले, त्यांनी मला खायला द्यावे.
  ३. एकदा मला वाटले, त्यांनी मला थोबाडीत मारावी.

इ. मी कित्येकदा पानी, लोनी, कनसं म्हणतो म्हणून तू माझी चेष्टा केलीस.
  १. मी कित्येकदा पानी, लोनी, कनसं म्हणतो म्हणून तू माझ्यावर रागावलास.
  २. मी कित्येकदा पानी, लोनी, कनसं म्हणतो म्हणून तू माझ्यावर रुसलास.
  ३. मी कित्येकदा पानी, लोनी, कनसं म्हणतो म्हणून तू माझी थट्टा केलीस.

ई. अरे, ती माझी भाषा आहे. लहानपणापासून अठ्ठावीस वर्षं मी ती बोललो, तिच्यावर वाढलो.
  १. अरे, ती माझी भाषा आहे. लहानपणापासून अठ्ठावीस वर्षं मी ती बोललो, तिने मला लहानाचे मोठे केले.
  २. अरे, ती माझी भाषा आहे. लहानपणापासून अठ्ठावीस वर्षं मी ती बोललो, ती बोलतच मी लहानाचा मोठा झालो.
  ३. अरे, ती माझी भाषा आहे. लहानपणापासून अठ्ठावीस वर्षं मी ती बोललो, माझ्यामुळे तिची प्रगती झाली.

उ. कुठलाही माणूस गावंढळ असला तरी त्याच्यात एक तरी गुण असतो.
  १. कुठलाही माणूस गावातून आला असला तरी त्याच्यात एक तरी गुण असतो.
  २. कुठलाही माणूस वेडा असला तरी त्याच्यात एक तरी गुण असतो.
  ३. कुठलाही माणूस वेंधळा असला तरी त्याच्यात एक तरी गुण असतो.

ऊ. पण डोळ्यांत पाणी दाखवले तर त्यांचा विजय होईल म्हणून मी अगदी ताकाच्या खांबासारखा घुम्म राहिलो होतो.



१. पण डोळ्यांत पाणी दाखवले तर त्यांचा विजय होईल म्हणून मी अगदी तटस्थपणे उभा होतो.
२. पण डोळ्यांत पाणी दाखवले तर त्यांचा विजय होईल म्हणून मी अगदी सावध उभा होतो.
३. पण डोळ्यांत पाणी दाखवले तर त्यांचा विजय होईल म्हणून मी अगदी मक्ख चेहरा करून उभा होतो.



**ख. उताऱ्याचे शीर्षक 'लळा-जिव्हाळा' असे आहे. उताऱ्यामध्ये ह्या भावना आणि त्यांच्या इतरही छटा तुम्हाला आढळतात का? त्याबद्दल चर्चा करू या.**

**ग. उताऱ्यातील ह्या वाक्यांचा तुम्हाला कसा अर्थ समजला हे व्यक्त करू या.**

अ. ही भाषा बरोबर की ती बरोबर याचा तू मोठा झाल्यावर विचार कर...
आ. कागद आपलं म्हणणं फार शांततेनं ऐकून घेतो.
इ. "पोरा, तू किती भाग्यवान आहेस याची तुला कल्पना नाही. मला एकच माणूस मिळालं होतं."
ई. आता कशाला काही नसता डोळ्यांतील पाणी थांबेना.

## ३ राग



माझे आजोबा, आईचे वडील, फार रागीट होते म्हणे. जरा काही मनाविरुद्ध झाले की राग एकदम त्यांच्या मस्तकात चढून बसत असे. अशा कोपिष्ट स्वभावामुळे त्यांच्या पाठीमागे सगळे त्यांना 'दुर्वास' म्हणत. पुराणात दुर्वास नावाचे एक ऋषी होते. एवढ्यातेवढ्या कारणावरून ते भयंकर संतापत. गल्लीत कशी दादागिरी करणारी भडक माथ्याची पोरे असतात; विरुद्ध टोळीतला एखादा पोरगा त्यांना चुकून आडवा गेला, की 'आमच्याकडं बघून हसलास? आँ? माज आला होय रे!' असा दम देत त्याला उगाचच तुडवतात, तसे त्या दुर्वासमुनींचे असे. फरक एवढाच, की तोंडामध्ये पावरफुल वाणी असल्यामुळे त्यांना कुणावर हातापायांचा प्रयोग करण्याची गरजच भासत नसे. केवळ शापवाणी उच्चारून समोरच्याला गारद करण्याची ताकद त्यांच्याकडे होती.

आमचे आजोबाही तंतोतंत दुर्वासमुनीच. घरातले आणि बाहेरचेही सगळे आपल्याला घाबरून असतात याचा त्यांना कोण अभिमान! राग तर त्यांच्या नाकावर सतत टपून बसलेलाच असे. निमित्त मिळाले की स्फोट व्हायला तयार. निमित्ते तरी कसली! उदाहरणार्थ, एखाद्याला आपण हाक मारण्यापूर्वीच त्या माणसाने आपल्यासमोर हजर व्हायला हवे, असे त्यांचे म्हणणे असायचे. हे कुणालाही कसे जमणार? मग आजोबांचा संताप उतू जाई. आरडाओरडा करून सगळ्यांच्याच बेचाळीस पिढ्यांना स्वर्गातून जमिनीवर उतरवले जाई. रागाच्या भरात हाताला लागतील त्या वस्तूंची फेकाफेक आणि तोंडाला येतील त्या अप्रतिम शिव्यांचा भडिमार सुरू होई.

हे सगळे आम्हाला आईकडूनच कळले. पण त्यातला मोठा विनोद म्हणजे आजोबांच्या संतापी स्वभावाचा वारसा तिनेच निष्ठेने पुढे चालवला. एवढेच नाही, तर त्या विषयात चार पावले



पुढे टाकत प्रगतीही केली. आजोबांच्या रागाचा पारा जेवढ्या झपाट्याने वर चढायचा तेवढ्याच वेगाने उतरायचाही. आई मात्र राग मनात धरून ठेवायची. ज्याच्यावर रागावलेली असेल त्याच्याशी दहा-दहा पंधरा-पंधरा दिवस अबोला धरायची. आम्हा मुलींना तर ते अगदी असह्य व्हायचे. दादा, माझे वडील, अगदी विरुद्ध प्रकृतीचे होते; खेळकर, आनंदी, उत्साही, सहसा न चिडणारे.

एकदा असाच आईला अबोल्याचा झटका आला होता. आम्ही दोघी बहिणी रडवेल्या होऊन आमच्या खोलीत बसलो होतो. संध्याकाळी दादा कामावरून घरी परतले आणि थेट आमच्याकडे आले. आम्ही अगदी रडायच्या बेतात होतो, तेवढ्यात आम्हाला जवळ घेत ते म्हणाले, "शः शः! रडायचं नाही. आज मी एक गंमत सांगणार आहे तुम्हाला. कुणाला सांगायची नाही ती. आईलासुद्धा नाही."

"नाही सांगणार," बहीण मुसमुसत म्हणाली.

"आई रागावली की अशी कट्टी का करते माहितेय?"

"अं हं! का करते?"

"तुमच्या जन्माआधीही ती अशीच रागीट होती, पण तेव्हा कट्टी नाही करायची. आजोबांसारखा तिचाही राग झटकन मावळायचा आणि ती त्यांच्यासारख्याच शिव्या द्यायची."

"आई? शि... शिव्या...?!" आम्ही दचकलोच. घरात 'शिवी' हा शब्दही आम्ही कधी ऐकला नव्हता.

"हं. हे अबोला धरणं वगैरे तुमच्यामुळे सुरू झालं, कारण एकदा मी तिला म्हटलं की, आपल्याला मुलं होण्याआधी द्यायच्या तेवढ्या शिव्या देऊन घे. नंतर एक जरी शिवी तुझ्या तोंडातून निघाली, तरी मी मुलांना कायमचं होस्टेलवर ठेवून देईन. तेव्हापासून, रागावल्यावर चुकून एखादी शिवी तोंडातून निघेल ह्या भीतीनं ती बोलतच नाही. मी खरंच तुम्हाला होस्टेलवर ठेवलं, तर?"



आम्ही दोघींनी एकमेकींकडे पाहिले, मग दादांकडे पाहिले, आणि तिघेही खो खो हसत सुटलो.

**क. आतापर्यंत राग ह्या भावनेशी संबंधित किती मराठी शब्द आणि वाक्प्रचार तुम्हाला माहीत झाले आहेत? आठवू या आणि पुढील तक्त्यामध्ये लिहू या. फारच कठीण वाटले तर शब्दकोश वापरू या.**

| शब्द | वाक्प्रचार |
|---|---|
| | |

ख. तुम्हाला कशाचा आणि कोणाचा राग येतो? का? राग गिळणे तुम्हाला जमते का?

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

ग. तुमच्यावर कुणी रागावले तर तुमची प्रतिक्रिया कशी असते?

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

## ४ भीती



लहानपणापासून मला कुठल्याही प्राण्याची फक्त भीतीच वाटलेली आहे. आपण ज्या गोष्टीला घाबरतो ती जास्त आपला पिच्छा पुरवते या न्यायानं लहानपणापासून माझ्यामागे इतरांच्या मानाने जरा जास्तच प्राणी लागले, असं आपलं मला वाटतं. एकदा परदेशात गेले होते, तिथे एक फार छान प्राणिसंग्रहालय होतं. काही प्राणी पिंजऱ्यात होते, पण काही छोटे निरुपद्रवी प्राणी त्यांना सांभाळणाऱ्या माणसांबरोबर मोकळेच फिरत होते. त्यांत एक मध्यम आकाराचा गोड चिंपांझी होता. लहान मुलं त्याच्याबरोबर फोटो काढत होती. मीही त्याच्याबरोबर फोटो काढावा असा माझ्याबरोबरच्यांनी आग्रह धरला. खरं तर मला भीती वाटत होती; पण दाखवणार कसं? म्हणून मी कसनुसं हसत सुरक्षित अंतर राखून त्या चिंपांझीशेजारी उभी राहिले. तो माझ्या जवळ सरकला आणि त्यानं सरळ माझ्या गळ्यात हातच टाकला! हे पाहून सगळे हसायला लागल्यावर तो अजूनच चेकाळला आणि त्यानं चक्क माझ्या गालाची पापी घेतली! मी घाबरून गार आणि शरमून लाल! तर तो मवाली चिंपांझी चक्क दात विचकत हसत होता! (...)



एका चित्रपटात म्हशीच्या पाठीवर बसण्याचा प्रसंग माझ्यावर ओढवला. चित्रीकरणासाठी मिळालेली म्हैस पोटुशी होती. मी तिच्या पाठीवर बसायला गेले तेव्हा साहाय्यक दिग्दर्शकांनी तिला पकडून ठेवलं होतं. मी तिच्यावर बसताच आमचा दिग्दर्शक ओरडला, "ॲक्शन!" तत्क्षणी ती उधळली. समोर तळं होतं त्या तळ्याच्या दिशेनं तिनं धाव घेतली. मी तीनताड उडून खाली पडले.

(...) दुसऱ्याच दिवशी 'मी घर सोडून पळून जाते आणि जाण्याआधी तिच्या गळ्यात पडून रडते' असा प्रसंग चित्रित करायचा होता. मला ब्रह्मांड आठवलं. मी तिच्यासमोर चक्क हात जोडून उभी राहिले. म्हटलं, "बाई गं, कृपा कर, मी तुझ्या गळ्यात पडल्यावर मला शिंगांनी उडवू नकोस. मी शरण येते तुला," म्हणून साष्टांग नमस्कार घातला. कॅमेरा रोल झाल्यावर देवाचं नाव घेऊन मी तिच्या गळ्यात पडले. तिला मराठी येत असावं. कारण माझ्या विनंतीला मान देऊन ती दिग्दर्शकानं 'कट' म्हणेपर्यंत शांत उभी होती!

एका चित्रपटाच्या निमित्तानं माझ्या आयुष्यात 'लक्ष्मी' नावाची हत्तीण आली. तिच्या माहुताच्या बायकोची भूमिका मी करत होते. एका प्रसंगात मला लक्ष्मीला आंघोळ घालायची होती. त्या प्रसंगाची आणि एकूणच भूमिकेची तयारी म्हणून माझं 'लक्ष्मी'बरोबर ट्रेनिंग होतं. तिला पहिल्यांदा भेटायला गेले तेव्हाच तिचा माहूत मला म्हणाला, "सगळ्यामधी इम्पार्टंट काय, तर घाबरायचं नाही. तुमी घाबरल्या की लक्ष्मीबी घाबरनार; आन् घाबरली की तिला राग येतो. मंग तिला आवरनं लई मुश्कील असतं."



मी ते लक्ष देऊन ऐकलं. एक खोल श्वास घेतला आणि तिच्या सोंडेला हात लावला. वर तिच्या डोळ्यांत पाहिलं. ती शांत वाटली. तिची खरबरीत सोंड मी कुरवाळली, तर तिनं ती हळूच उचलून माझ्या डोक्यावरून फिरवली. आशीर्वादासारखी. तिच्या समजूतदारपणात माझं घाबरणं क्षणात विरघळलं.

- **अमृता सुभाष**

**क. जोड्या जुळवू या.**

| | |
|---|---|
| अ. पिच्छा | १. घालणे |
| आ. अंतर | २. विचकणे |
| इ. गार | ३. आठवणे |
| ई. दात | ४. पुरवणे |
| उ. प्रसंग | ५. देणे |
| ऊ. ब्रम्हांड | ६. पडणे |
| ए. शरण | ७. राखणे |
| ॲ. साष्टांग नमस्कार | ८. जाणे / येणे |
| ऐ. देवाचे नाव | ९. ओढवणे |
| ओ. विनंतीला मान | १०. घेणे |

**ख. कंसातील शब्द निवडून रिकाम्या जागा भरू या.**

(निरुपद्रवी, चेकाळणे, तीनताड, उधळणे, माहुत, खरबरीत, कुरवाळणे)

अ. आधीच सुट्टी लागली होती. त्यात मावशीच्या गावी जायचं म्हणून मीनू ---------- होती.

आ. घरात उंदीर झाले म्हणून मांजर पाळली, पण ती अगदीच ---------- निघाली.

इ. नेहमीप्रमाणे हत्तिणीने ----------ला सोंडेत अलगद उचलून डोक्यावर ठेवले.

ई. आयुष्यभराच्या कष्टांनी ---------- झालेले आजीचे हात लोण्यासारखे मऊ भासतात.



उ. पोटच्या लेकराप्रमाणे वाढवलेल्या रोपांना पाणी देताना माई त्यांना हळुवारपणे ------------------------------ असे.



ए. त्या पंचतारांकित हॉटेलमधली सरबताची किंमत पाहून मी ---------------------- उडाले.

ॲ. आई-वडिलांनी कष्टाने कमावलेला पैसा व्यसनांवर ----------- ----------------- टाकणारी मुलं पाहिली की काळीज तुटतं.

**ग. वरील उताऱ्यात भीतीशी संबंधित कोणते शब्द आले आहेत? ते अधोरेखित करू या.**

**घ. वरील उताऱ्यातील एखादा प्रसंग निवडू या आणि तो आपल्या शब्दांत सादर करू या.**

**च. लेखिकेला आलेत तशासारखे अनुभव तुम्हाला कधी आलेत का? चर्चा करू या.**

**छ. खालीलपैकी एक चित्र निवडू या आणि त्या चित्राच्या मदतीने 'भीती' या भावनेवर पुढे दिलेल्या प्रश्नांच्या मदतीने चर्चा करू या.**





- माणसाला भीती का वाटते? माणसाला कशाकशाची भीती वाटते?
- भीती वाटणे वाईट असते का? भीतीचा माणसावर काय परिणाम होतो?
- भीती नष्ट केली पाहिजे का? कशी?

**भीती**

- भीती, भय, घाबरणे, तंतरणे, टरकणे
- भीतीने – चळाचळा कापणे / थरकाप होणे / गाळण उडणे / गर्भगळित होणे / जीभ टाळ्याला चिकटणे / घाम फुटणे / दातखीळ बसणे / तोंडातून शब्द न फुटणे / त त प प होणे – करणे / पोटात गोळा येणे / पोटात खड्डा पडणे / पाय लटलट कापणे
- भीतिदायक, भीतिग्रस्त, भयग्रस्त, भयकंपित, भयावह, भयप्रद

शब्दसंपदा

## ५ चिंता, काळजी, ताण...

**क. चर्चा करू या.**

तुम्हाला कधी आणि कशाची चिंता वाटते? का? त्यातून मुक्त होण्यासाठी तुम्ही काय करता?

**ख. एक संभाषण ऐकू या.**

**अ. शब्द आणि अर्थ यांच्या जोड्या लावू या.**

| | |
|---|---|
| १. विवंचना | क. खूप आरडाओरडा करून सांगितलेल्या |
| २. तंद्री | ख. चिंता, काळजी |
| ३. आक्रस्ताळ्या | ग. एखाद्या वस्तूचा आतला भाग कुरतडून ती पोकळ करणे |
| ३. आडवळण | घ. विचारात हरवून गेल्याची अवस्था |
| ४. पोखरणे | च. अप्रत्यक्षपणे सांगण्याची पद्धत |

**आ. खालील प्रश्नांची उत्तरे लिहू या.**

१. समुपदेशकाला सईदबद्दल आधीपासून माहिती आहे का? कशी?

---

२. सईदच्या समस्येची लक्षणे कोणती आहेत?

---

३. सईदच्या समस्येचे कारण काय आहे असे तुम्हाला वाटते?

---

४. एक समुपदेशक म्हणून त्या समस्येचे निवारण तुम्ही कसे कराल?

---

**ग. हे संभाषण तुम्हाला कसे वाटले? माणसे एरवी संभाषणात अशीच बोलतात का? तुम्ही त्यांच्या जागी असतात तर कसे बोलला असतात? पुस्तकाच्या शेवटी दिलेला अनुलिखित संवाद वाचून वर्गात प्रत्यक्ष सादर करू या.**

**घ. वर्गासमोर संभाषण करू या. एक विद्यार्थी एखादी भावनिक समस्या घेऊन येईल आणि एक विद्यार्थी त्याचा समुपदेशक बनेल.**

## ६ 'हो'चा वापर

क. ऐकू या.

ख. 'हो'चा निरनिराळा वापर दाखवणारी संभाषणे लिहू या.

## दृष्टिक्षेप

### नाम

| | |
|---|---|
| तो आततायीपणा | ती शापवाणी, - |
| तो भ्रमनिरास | ती फेकाफेक, त्या फेकाफेकी |
| तो तिटकारा | ती सोंड, त्या सोंडा |
| तो भडिमार | |
| तो माहूत, ते - | |
| तो भुंगा, ते भुंगे | |
| तो ठणका, ते ठणके | |



### क्रियापद

उफाळणे, चेकाळणे

### विशेषण

भ्रमिष्ट, तुटक, कावरेबावरे, संवेदनशील, अवखळ, बेपर्वा, लज्जित, दुर्लक्षित, हिडीस, फोल, खवचट, आतुर, अपर्याप्त, उग्र, निर्बळ, परागंदा, चिंताक्रांत, बहिष्कृत, कोपिष्ट, तंतोतंत, निरुपद्रवी, खरबरीत, आक्रस्ताळे, पोट्टशी

### क्रियाविशेषण

मुसमुसत, कसनुसं

### नाम / इतर शब्द + क्रियापद

आडवे जाणे, गारद करणे, टपून बसणे, स्फोट होणे, विनंतीला मान देणे

## आता मला हे येतं...

**विविध भावना – मनाच्या अवस्था व्यक्त करणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**'हो'चा वापर करणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी



८

# कवितेच्या प्रांतात

भावगीत चरण कविता पंक्ती भजन पोवाडा गीतकार श्लोक
कवी कवन भक्तिगीत अभंग पद रचना ओळ









ओवी पद्य चारोळी गीत हायकू गझल लावणी
आरती काव्य गाणे कडवे कवयित्री रचनाकार

## चला, शिकू या ...

- मराठी कवितेविषयी जाणून घेणे
- मराठी कवींविषयी जाणून घेणे
- कवितेची भाषा समजून घेणे
- काव्यरचनेच्या परंपरा आणि तऱ्हा यांची ओळख करून घेणे
- व्याकरण : अनिश्चित सर्वनामे (सामान्य सर्वनामे) शिकणे

## १ मराठी कवितेविषयी थोडे...

**मागील पानावर 'कविता' ह्या विषयाशी निगडित अनेक शब्द आले आहेत. त्यांची ओळख करून घेऊ या आणि नंतर वर्गात इतर सहाध्यायींबरोबर चर्चा करू या.**

क. त्यांपैकी 'कविता' ह्या शब्दाचे समानार्थी शब्द कोणते आहेत?

उदा॰ ते काव्य, ती काव्ये ------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

ख. कवितेचे वेगवेगळे प्रकार सांगणारे शब्द कोणते आहेत?

उदा॰ तो श्लोक, ते श्लोक ------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

ग. कवितेतील वेगवेगळ्या भागांची नावे सांगणारे शब्द कोणते आहेत?

उदा॰ ते कडवे, ती कडवी ------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

घ. 'कवी' ह्या शब्दाला समानार्थी शब्द कोणते आहेत?

उदा॰ तो गीतकार, ते गीतकार ------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

## २ कवयित्रीचा परिचय



**शांता ज॰ शेळके**
**(१२ ऑक्टो॰ १९२२ - ६ जून २००२)**

**क. चित्रफीत पाहू या आणि पुढील गीतांतील मोकळ्या जागा भरू या.**

| | |
|---|---|
| अ. ऋतू ------------, ऋतू ------------<br>पाचूचा वनी ------------<br>------------ हृदयावर,<br>सरसरतो ------------ | आ. ही वाट दूर जाते,<br>स्वप्नामधील ------------<br>माझ्या मनातला का<br>तेथे असेल ------------ |
| इ. काटा ------------ कुणाला, आक्रंदतात कोणी<br>मज फूल ही ------------, हा दैवयोग आहे<br>सांगू कशी कुणाला, कळ आतल्या ------------<br>चिरदाह वेदनेचा, मज शाप हाच ------------ | ई. ------------ मी ------------ मी<br>परी ------------ गीत हे<br>फुलाफुलात येथल्या<br>उद्या ------------ गीत हे |

**ख. एक चित्रफीत पाहू या आणि पुढील प्रश्नांची उत्तरे देऊ या.**

अ. शांता ज. शेळके ह्यांचे संपूर्ण नाव.

---------------------------------------------

आ. साहित्यक्षेत्रात केवळ एक कवयित्री म्हणूनच नव्हे, तर इतर अनेक भूमिकांतून त्या समोर आल्या. त्यातील निदान आठ सांगू या.

उदा. लेखिका, ---------------------------------------------

---------------------------------------------

इ. जन्मस्थळ - ---------------------------------------------

ई. त्यांचे कोणकोणत्या भाषांवर प्रभुत्व होते? ---------------- ---------------- ----------------

उ. त्यांनी लिहिलेले कोणते गीतप्रकार विशेष लोकप्रिय झाले?

---------------------------------------------

ऊ. 'हे बंध रेशमाचे' ह्या नाटकासाठी त्यांनी लिहिलेले कोणते गीत अजरामर झाले?

---------------------------------------------

ए. कोणता परदेशी काव्यप्रकार शांताताईंनी भाषांतरित केला? ---------------------------------------------

ॲ. आळंदीत झालेल्या कोणत्या समारंभाचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले?

---------------------------------------------

ऐ. शांताताईंनी कोणते टोपणनाव वापरले होते? ---------------------------------------------

ओ. मृत्युदिन - ---------------------------------------------

कर आणि शिका

## करा आणि शिका

**दोन किंवा तीन विद्यार्थ्यांचा एक ह्याप्रमाणे गट करू या. प्रत्येक गटाने पुढे दिलेल्या काव्यप्रकारांपैकी एकाची माहिती आणि त्या काव्यप्रकाराचे एक उदाहरण आंतरजालावरून मिळवून अगदी थोडक्यात वर्गात सादर करू या.**

हायकू, चारोळी, अभंग, ओवी, श्लोक, गझल, लावणी, आरती, भूपाळी, पोवाडा

उदा.

झेन तत्त्वज्ञानामधून 'हायकूं'चा उगम झाला. जपानी कवी पाचशे वर्षांपेक्षा अधिक काळापासून हायकू रचत आलेले आहेत. जपानी हायकूंच्या रचनेचे विशिष्ट तंत्र आहे. त्यांचे रूपबंध निश्चित झालेले आहेत. त्यात शब्दमर्यादाही आहे व अशा तंत्रशुद्ध हायकूलाच शुद्ध हायकू मानले जाते. मराठी मातीत 'हायकू' हा तीन ओळींचा काव्यप्रकार रुजवण्याचे श्रेय शिरीष पै यांच्याकडे जाते. त्यांनी रचलेल्या ह्या दोन लोकप्रिय हायकू पाहा -

काय चमत्कार झाला
हायकू लिहिल्यावर
प्राण शांत झाला

नको रे धरू चिमटीत
फुलपाखराचं नाजूक अंग
दुखतोय... पंखांवरला रंग



## ३ कवितेच्या प्रांतात

**क. वाचू या आणि रिकाम्या जागी योग्य नाम + क्रियापद जोडी वापरू या.**

(आव्हान पेलणे, निराशा होणे, वाट शोधणे, बंधनांत राहणे, रूप बदलणे, ~~पाऊल ठेवणे~~, वाटेला जाणे)

साहित्यामधील कवितेच्या प्रांतात पाऊल जरा जपूनच ठेवावे लागते. धसमुसळेपणा करून चालत नाही. शब्दावरचे आणि भाषेवरचे प्रेम वरवरचे असले, तर मन गांगरण्याची आणि ---------------- ---------------- शक्यताच जास्त असते. 'या माझ्या अजाण कवितेच्या ---------------- ---------------- नका'... असे प्रतिभावंत कवी आरती प्रभू ह्यांनी बजावलेच आहे. ह्याच कवितेत ते म्हणतात –

प्रेम हवंय का या कवितेचं?
मग ते मागून मिळणार आहे का तुम्हाला?
खूप काही द्यावं लागेल त्यासाठी
काय काय द्याल?
आत्म्याची बाग फुलवता येईल तुम्हाला?
पण त्यासाठी तुम्हाला तुमचा आत्मा
तुमच्याच तळहातावर
एखाद्या स्वातीच्या थेंबासारखा घ्यावा लागेल
पण त्यासाठी तुमचे हात तुम्हाला
चांदण्याहून पारदर्शक करावे लागतील,
कराल?



कवितेच्या इतक्या मागण्या असतात – कवीकडून आणि रसिकाकडूनही. तूर्त त्या मागण्यांचा विचार बाजूला ठेवू या आणि 'कविता आणि मराठी भाषा' ह्या मुद्द्याचाच विचार करू या.

कवितेतून व्यक्त होण्याच्या विविध तऱ्हा, नियम सर्वच भाषांमध्ये आहेत तसे ते मराठीतही आहेत. त्यामुळेच कवितेची निराळी भाषा तयार झालेली आहे. दोन हजार वर्षांपूर्वीच्या गाथा असोत, की त्यानंतरचे अभंग, ओवी, आरती, भूपाळी, विविध प्रसंगी गायली जाणारी स्त्रीगीते आणि लोकगीते, शाहिरी काव्य, निरनिराळ्या प्रकारच्या लावण्या, आधुनिक काळातील भावगीते, नाट्यगीते, चित्रपटगीते, गझल आणि असेच अनेक प्रकार असोत; प्रत्येकाच्या रचनेची विशिष्ट पद्धत असते, शिस्त असते, लय असते आणि तालही असतो. ह्या ---------------------- ---------------------- आणि तरीही रचनेतील सौंदर्य आणि गोडवा हरवू द्यायचा नाही; आशयाचे सामर्थ्य सांभाळायचे; ते पातळ किंवा कृत्रिम होऊ द्यायचे नाही हे ---------------------- जातिवंत कवीला ---------------------- लागते. नियम आणि बंधने अडचणीची होऊ लागली तर कवी ती जराशी बाजूला सारून नवी ---------------------- ---------------------- प्रयत्न करतो. शब्दांचे ---------------------- ----------------------, नवे शब्द घडवतो, ओळीच्या रचनेतून न सांगताही बरेच काही सांगतो. हे न म्हटलेले शोधणे, समजून घेणे हा रसिकासाठी बौद्धिक आनंदाचा अनुभव असतो.

**ख. 'कवितेचं प्रेम मिळवणं सोपं नाही' म्हणजे कवी होणं आणि रसिकही होणं सोपं नाही असं आरती प्रभू सांगत आहेत. तर मग आपली कविता समजून घेण्यासाठी रसिकाला काय काय करावं लागेल असं आरती प्रभूंना वाटतं? स्वतःच्या शब्दांत सांगायचा प्रयत्न करू या; नंतर वर्गात चर्चा करू या.**

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

**ग. वरील उताऱ्यातील काही वाक्ये वेगळ्या पद्धतीने लिहिण्याचा प्रयत्न करू या. पुढे त्यांची सुरुवात दिली आहे. आशय समजून घेऊन ती वाक्ये पूर्ण करू या.**

अ. कवितेची निराळी भाषा निर्माण झाली आहे, कारण ----------------------------------------
--------------------------------------------------------------------------------

आ. जुन्या किंवा नव्या, प्रत्येक गीतप्रकाराला ----------------------------------------
--------------------------------------------------------------------------------

इ. जातिवंत कवी ही सर्व बंधने सांभाळतो आणि तरीही ----------------------------------------
--------------------------------------------------------------------------------

ई. अडचणीचे होणारे नियम आणि ----------------------------------------
--------------------------------------------------------------------------------

उ. कवी जे सांगत नाही ते ---------------------------------------- ह्यातूनच रसिकाला ----------------------------------------.

## ४ कवी आणि कविता



लहानपणी मला एक फार मोठा प्रश्न पडला होता. हा 'कवी कवी' म्हणजे असतो तरी कोण? ह्या प्राण्याला सर्वच माफ असतं. तो म्हणेल ती पूर्व दिशा असते. 'जे न देखे रवी, ते देखे कवी' असं एक सुभाषितही लहानपणी आम्हाला ऐकवण्यात आलं होतं. म्हणजे आपणा सामान्यांना जे दिसत नाही, ते ह्याला दिसतं. म्हणजे नक्की काय? शिवाय हा कवी शुद्धलेखनाचे नियम बरेचदा धाब्यावर बसवतो, शब्दांशी खेळतो आणि नवनवे शब्द बनवतो. ह्याला सर्व काही माफ! त्याने लिहिलेल्या कवितांचे अर्थ आम्ही लावत बसतो. परीक्षेत त्याच्या कवितांचे रसग्रहण करायला सांगतात. आम्ही लिहिलेलं बऱ्याचदा चूकच असतं म्हणे! मग आमचे शिक्षक म्हणतात, "मुलांनो, हे कळायला संवेदनशील मन लागतं, प्रतिभा लागते, कल्पकता लागते". आम्ही ऐकत राहतो. एकदा तरी हा कवी नावाचा माणूस भेटावा आणि मला पडलेले सर्व प्रश्न त्याला विचारावे, असं मला खूप खूप वाटायचं, पण मग ही पुढची कविता वाचनात आली. केशवसुत म्हणतात त्याप्रमाणे जर देवानेच ह्या कवींना इतकी शक्ती दिली असेल, तर मग प्रश्नच मिटला! मला पडलेले सगळे प्रश्न मी मुकाट गिळून टाकले आणि स्वतःची संवेदनशीलता, प्रतिभा, कल्पकता इत्यादी वाढवण्यासाठी काय करावं ह्याचा विचार करू लागलो.

**क. डाव्या रकान्यात केशवसुतांच्या एका कवितेचा काही भाग दिला आहे. कवितेत काही शब्द अधोरेखित केले आहेत. उजव्या रकान्यात त्या शब्दांचे अर्थ दिले आहेत, पण त्यांचा क्रम योग्य नाही. योग्य शब्दासाठी योग्य अर्थ शोधून ही कविता वाचू या.**

**आम्ही कोण?**

आम्ही कोण म्हणोनि काय पुससी? आम्ही असू लाडके-
देवाचे दिधले असे जग तये आम्हांस खेळावया;
विश्वी या प्रतिभाबले विचरतो चोहीकडे लीलया,
दिक्कालांतुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके ...
... ...
आम्हांला वगळा-गतप्रभ झणी होतील तारांगणे;
आम्हांला वगळा-विकेल कवडीमोलावरी हे जिणे!



**केशवसुत १८६६-१९०५**

दिले
सहज
हिंडतो
विचारतोस
सर्व दिशांतून / अनंत कालातून

नभोमंडळ / आकाश
लगेच / क्षणात
जीवन
निष्प्रभ / स्वतःचा प्रकाश हरवलेले
नगण्य किमतीत
गाळणे / कमी करणे / काढून टाकणे

**ख. या कवितेत 'आम्ही कोण' हे कोणास उद्देशून म्हटले आहे?**
(अ) शेतकरी (आ) सामान्य व्यक्ती (इ) कवी

**ग. या कवितेचा संपूर्ण अर्थ समजून घेऊ या.**

**घ. चांगला कवी कसा असावा आणि चांगली कविता म्हणजे नक्की कशी कविता?**
खाली काही मते दिली आहेत. त्यातील आपल्याला पटलेली दोन किंवा तीन मते निवडू या. आणि वर्गात आपापले मत सांगून त्यावर चर्चा करू या. खाली दिलेल्या मतांखेरीज इतर काही मते / विचार सुचले असतील, तर तेही वर्गात सांगू या.

**चांगली कविता**

चांगली कविता आपले मन वेधून घेते.
चांगली कविता पुनःपुन्हा वाचावीशी वाटते.
चांगल्या कवितेची भाषा कृत्रिम, मुद्दाम घडवलेली अशी नसते.
चांगली कविता एक भाषिक नवसर्जन असते.
चांगली कविता कवीच्या अनुभवाचाच भाग असते.
चांगली कविता जीवन समृद्ध करते.

**चांगला कवी**

चांगल्या कवीजवळ कल्पकता असते.
चांगला कवी कवितेत आपला जीवनानुभव व्यक्त करत असतो.
चांगल्या कवीजवळ प्रतिभा असते.
चांगल्या कवीजवळ संवेदनशीलता असते.
चांगल्या कवीजवळ सर्जनशीलता असते.
चांगल्या कवीजवळ जीवनमूल्ये असतात.

## ५ कवितेची भाषा - परंपरा आणि तऱ्हा

**क.** रोजच्या व्यवहारात बोलताना आपण गद्य भाषा वापरतो. म्हणजे हवापाण्याबद्दल बोलताना 'ढग गडगडतायत, जोराचा वारा वाहतोय' असे रोखठोक म्हणतो. पण हेच 'घनु वाजे घुणघुणा । वारा वाहे रुणझुणा ।' अशा शब्दांत कवी व्यक्त करतो, तेव्हा कानामनावरून मोरपीस फिरल्यासारखे वाटते.

यातील घन - म्हणजेच ढग - विक्राळ, भीतीदायक नाही आहे, तर हवासा वाटणारा आहे.

त्यामुळे तो गडगडत, गर्जना करत नाही, 'घुणघुण' असा आवाज करत 'वाजतो'. त्याचे 'घनु' हे रूप किती लडिवाळ आहे! वाराही सोसाट्याचा नाही आहे, तो 'रुणझुण' असा पायांतील पैंजणांसारखा मधुर ध्वनी करत वाहणारा आहे.

ज्ञानेश्वरांनी सातशे वर्षांपूर्वी रचलेल्या काव्यातील ही ओळ यादवकाळातील मराठीचा गोडवा घेऊन आली आहे. त्यांच्याच ह्या आणखी काही ओळी पाहा –

**मोगरा फुलला... मोगरा फुलला**
**फुले वेचिता बहरू कळियासी आला**
**इवलेसे रोप लावियले द्वारी ।**
**तयाचा वेलु गेला गगनावेरी ॥**
**मोगरा फुलला... मोगरा फुलला...**



शब्दार्थ : लावियले = लावले; द्वारी = दारात; तयाचा = त्याचा; वेलु = वेल; गगन = आकाश; गगनावेरी = आकाशापर्यंत; वेचिता = वेचताना; बहरू = बहर; कळियासी आला = कळ्यांचा बहर आला

असे काव्य वाचल्यावर 'मराठी ही कठोर, खडबडीत भाषा आहे' हे कठोर मत थोडेसे सौम्य होऊ शकेल, नाही?

**ख. मराठी भाषेचे सौंदर्य दाखवणारी व केवळ मराठीच्याच नव्हे तर जगण्याच्याही प्रेमात पडायला लावणारी कविता वाचू या.**

अ. कंसातील शब्द योग्य कडव्यासमोर लिहू या.
(ध्रुवपद, नातीगोती, काळ-वेळ, निसर्ग, जगण्यावरील प्रेम)

| | |
|---|---|
| **या जन्मावर, या जगण्यावर**<br>या जन्मावर, या जगण्यावर, शतदा प्रेम करावे | ........................ |
| चंचल वारा या जलधारा, भिजली काळी माती<br>हिरवेहिरवे प्राण तशी ही रुजून आली पाती<br>फुले लाजरी बघून कुणाचे, हळवे ओठ स्मरावे | ........................ |
| रंगांचा उघडुनिया पंखा, सांज कुणी ही केली<br>काळोखाच्या दारावरती, नक्षत्रांच्या वेली<br>सहा ऋतूंचे सहा सोहळे, येथे भान हरावे | ........................ |
| बाळाच्या चिमण्या ओठांतून, हाक बोबडी येते<br>वेलीवरती प्रेम प्रियेचे, जन्म फुलांनी घेते<br>नदीच्या काठी सजणासाठी, गाणे गात झुरावे | ........................ |
| या ओठांनी चुंबून घेईन, हजारदा ही माती<br>अनंत मरणे झेलून घ्यावी, इथल्या जगण्यासाठी<br>इथल्या पिंपळपानावरती, अवघे विश्व तरावे<br>**- मंगेश पाडगांवकर** | ........................ |

आ. खालील शब्दांच्या अर्थाशी मिळताजुळता अर्थ असलेले शब्द कवितेत आले आहेत. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहू या.

१. न थांबणारा – ------------------------------ २. आठवणे – ------------------------------

३. संध्याकाळ – ------------------------------ ४. सजणी – ------------------------------

५. अनेक – ------------------------------ ६. जग – ------------------------------

इ. खालील शब्दांच्या विरुद्धार्थाचे शब्द रिकाम्या जागी लिहू या.

१. निगरगट्ट – ------------------------------ २. स्पष्ट – ------------------------------

३. बिनधास्त – ------------------------------ ४. बेभान – ------------------------------

ई. आंतरजालावरून कवितेविषयी आणखी माहिती शोधून काढू या. (उदा० गीतकार, संगीतकार, प्रकार इ०)

ए. या कवितेचा तुम्हाला कळलेला अर्थ समजावून सांगा.
ॲ. प्रस्तुत कविता ऐकू या.

**ग. आता एका वेगळ्याच धाटणीतील कविवर्य कुसुमाग्रज यांची 'कणा' ही कविता वाचू या.**

**कणा**

'ओळखलंत का सर मला?' - पावसात आला कोणी,
कपडे होते कर्दमलेले, केसांवरती पाणी.

क्षणभर बसला, नंतर हसला बोलला वरती पाहून
'गंगामाई पाहुणी आली, गेली घरट्यात राहून.

माहेरवाशीण पोरीसारखी चार भिंतींत नाचली,
मोकळ्या हाती जाईल कशी, बायको मात्र वाचली.

भिंत खचली, चूल विझली, होते नव्हते नेले,
प्रसाद म्हणून पापण्यांमध्ये पाणी थोडे ठेवले.

कारभारणीला घेऊन संगे, सर, आता लढतो आहे
चिखलगाळ काढतो आहे, पडकी भिंत बांधतो आहे.'

खिशाकडे हात जाताच हसत हसत उठला
'पैसे नकोत, सर, जरा एकटेपणा वाटला.

मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा
पाठीवरती हात ठेवून, फक्त 'लढ' म्हणा!'






**- कुसुमाग्रज**

**अ. योग्य पर्याय निवडू या.**

१) कपडे होते कर्दमलेले...
(क) नायकाचे कपडे चिखलाने माखलेले / मळलेले होते.
(ख) नायक दमलेला होता.
(ग) नायकाचे कपडे फाटलेले होते.

२) गंगामाई पाहुणी आली...
(क) गंगा नावाची पाहुणी नायकाकडे आली होती.
(ख) नदीला पूर आला होता.
(ग) नायकाची मुलगी माहेरी आली होती.

३) मोकळ्या हाती जाईल कशी...
(क) घरी आलेल्या पाहुणीला भेट म्हणून काही गोष्टी दिल्या.
(ख) घरी आलेली पाहुणी घरातील साऱ्या वस्तू घेऊन गेली.
(ग) घरी आलेली पाहुणी काही न घेताच निघून गेली.

४) कवितेचा नायक सरांकडे कोणत्या अपेक्षेने आलेला असतो?
(क) सरांकडून पैसे मिळतील या अपेक्षेने.
(ख) सरांकडून आसरा मिळवण्याच्या अपेक्षेने.
(ग) सरांकडून त्याला धीर देणाऱ्या, आत्मविश्वास वाढवणाऱ्या एखाद्याच शब्दाची अपेक्षा असते.

**आ. प्रस्तुत कवितेतील नायकाचे वर्णन करू या. कोणती विशेषणे वापरता येतील?**

**इ. कवितेचे शीर्षक योग्य वाटते का? चर्चा करू या.**

**ई. वर्गात कविता मोठ्याने वाचून दाखवू या.**

**घ. मी मोर्चा नेला नाही...**

मी मोर्चा नेला नाही... मी संपही केला नाही
मी निषेधसुद्धा साधा कधी नोंदवलेला नाही ।। धृ ।।

भवताली संगर चाले तो विस्फारून बघताना
कुणी पोटातून चिडताना कुणी रक्ताळून लढताना
मी दगड होऊनि थिजलो रस्त्याच्या बाजूस जेव्हा
तो मारायाला देखिल मज कुणी उचलले नाही ।। १ ।।



नेमस्त झाड मी आहे, मूळ-फांद्या जिथल्या तेथे
पावसात हिरवा झालो, थंडीत झाडली पाने
पण पोटातून कुठलीही खजिन्याची ढोली नाही
कुणी शस्त्र लपवले नाही, कधी गरूड बैसला नाही ।। २ ।।

धुतलेला सात्त्विक सदरा, तुटलेली एकच गुंडी
टकलावर अजून रुळते अदृश्य, लांबशी शेंडी
मी पंतोजींना भ्यालो, मी देवालाही भ्यालो
मी मनातसुद्धा माझ्या कधी दंगा केला नाही ।। ३ ।।

मज जन्म फळाचा मिळता मी केळे झालो असतो
मी असतो जर का भाजी तर भेंडी झालो असतो
मज चिरता चिरता कोणी रडले वा हसले नाही
मी कांदा झालो नाही ! आंबाही झालो नाही ! ।। ४ ।।



- संदीप खरे

**अ. खालील शब्दांसाठी कवितेत आलेले समानार्थी शब्द लिहा.**

१. विरोध - ..........................................
२. युद्ध - ..........................................
३. पडणे - ..........................................
४. सुद्धा - ..........................................
५. मवाळ, सौम्य - ..........................................
६. स्वच्छ - ..........................................
७. बंड, उच्छाद, मस्ती / विवाद - ..........................................

**आ. कवितेचा एकंदरीत सूर कसा वाटला? योग्य पर्याय निवडू या. एकापेक्षा अधिक पर्यायही निवडू शकतो.**

- ☐ सकारात्मक
- ☐ विनोदी
- ☐ नकारात्मक
- ☐ उपहासात्मक

**इ. कवितेतील नायकाच्या भूमिकेत तुम्ही स्वत:ला पाहू शकता का? की तुम्ही नायकापेक्षा वेगळे आहात? सविस्तर उत्तर देऊ या.**

**ई. रिकाम्या जागी योग्य नाम-क्रियापद जोडी वापरू या.**

(संप करणे, दंगा करणे, निषेध नोंदवणे, मोर्चा नेणे)

१. संबंधित कार्यालयांवर .......................... हा आंदोलनातील एक महत्त्वाचा टप्पा असतो.
२. आज-काल आपला .......................... उठसूट .......................... जातो.
३. .......................... हा तर लहान मुलांचा हक्कच आहे.

**च. खाली कवितेचा एक अंश दिला आहे. ती एका छोट्या गोष्टीची सुरुवात आहे. हा अंश आपण गद्यामध्ये सांगू या आणि वर्गात चर्चा करू या.**

एका तळ्यात होती बदके पिले सुरेख
होते कुरूप वेडे पिल्लू तयांत एक

कोणी न त्यास घेई खेळावयास संगे
सर्वांहुनी निराळे ते वेगळे तरंगे

दावूनि बोट त्याला म्हणती हसून लोक
आहे कुरूप वेडे पिल्लू तयांत एक (...)

**- ग. दि. माडगूळकर**



----------------------------------------
----------------------------------------
----------------------------------------
----------------------------------------
----------------------------------------
----------------------------------------
----------------------------------------
----------------------------------------
----------------------------------------
----------------------------------------
----------------------------------------

ह्या गाण्याचे सुंदर सादरीकरण ऐकू या – एका तळ्यात होती बदके पिले सुरेख

**छ. पुढील कवितेतील कडव्यांचा क्रम बदलला आहे, तो अर्थाप्रमाणे योग्य प्रकारे जुळवायचा आहे. रिकाम्या चौकटीत क्रम लिहू या. कडवी योग्य क्रमात आणण्यात कोणत्या गोष्टीची मदत झाली? चर्चा करू या.**

**घंटांची माळ**

| | | |
|---|---|---|
| अ. | पाठीवरचा वळ सोशीत<br>तोंडातला पांढरा फेस गिळीत<br>मोठ्या डोळ्यांतून पाणी ओघळीत<br>ते मुके जनावर स्वतःशी म्हणे : | ☐ |
| आ. | बैलासही प्रथम मोठी मौज वाटली<br>तो त्या गोड तालावर आणि अलंकारावर<br>भलताच खूश झाला<br>डोळ्यांवर बांधलेली झापड विसरला<br>घाण्याभोवती गोल गोल फिरू लागला... | ☐ |
| इ. | “देवा, आता ही परीक्षा पुरे!<br>हा जड घाणा मी ओढीन कसातरी<br>पण गळ्यातला हा घंटांचा<br>फसवा फास काढून टाक...<br>मातीत कोठे गाडून टाक!” | ☐ |

| | | |
|---|---|---|
| ई. | दुकानावर, दूर बसलेल्या हुशार मालकाला<br>दुरूनच ‘सारे’ कळे<br>चाबूक हातात घेऊन तो बैलाचे थकले पाय<br>चालतेसे करी | ☐ |
| उ. | आटपाट नगरच्या एका तेल्याने<br>मोठ्या हौसेने (आणि हिकमतीने)<br>आपल्या घाण्याच्या बैलाच्या गळ्यात<br>खुळखुळणाऱ्या घंटांची माळ बांधली;<br>ती प्रत्येक पावलागणिक<br>खुळुम खुळुम वाजू लागली! | ☐ |
| ऊ. | मात्र कधी कधी, फिरता फिरता<br>पाय जड होताच बैल थोडा थांबे<br>खुळुम खुळुम आवाज बंद होई<br>**- वि. म. कुलकर्णी**  | ☐ |

**ज. वाचू या आणि समजून घेऊ या.**

अ.



- आमच्या घरी (घरात) इंटरनेट नाही आहे.
- सुट्टीत आम्ही आमच्या गावी (गावाला) जायचो.<br>गावी (गावात) आमचा जुना वाडा आहे.
- लहानपणी मी इतका खादाड होतो, की<br>आई म्हणायची, “माझ्या पोटी (पोटातून) राक्षस जन्माला आलाय.”
- “तुमच्या नशिबी (नशिबात) परदेश प्रवास नाहीये.”

आ. वरील वाक्ये साधी, रोजच्या वापरातली गद्य वाक्ये आहेत. अधोरेखित केलेल्या शब्दांप्रमाणे रूप बदललेले इतर काही शब्द मात्र फक्त कवितेतच वापरले जातात. पाहा –

- जगी सर्वसूखी असा कोण आहे? ।
- हृदयी धरा हा बोध खरा ।
- मनी वसे ते स्वप्नी दिसे ।

इ. अशीच क्रियापदांची रूपेही कवितेत वेगळा अर्थ घेऊन येतात. पाहा –

- आजी म्हणे, “मला टीव्ही लावून द्या रे कुणी तरी!”<br>मुले म्हणत, “आम्हाला अभ्यास करायचा आहे.”

'म्हणणे' ह्या क्रियापदाची भूतकाळातील ही रूपे आपल्याला माहीत आहेत. आता कवितेत काय होते, पाहा –

- श्रावण येता फुले जाई
  "कसा हा गंध!" म्हणे ताई
- किती पक्षी गाती गाणी
  झाडावरि म्हणती बसुनी,
  'ये मुला, खेळु या मिळुनी!' (...)

इथे त्याचे रूप वर्तमानकाळी आहे. पहिले एकवचनी (म्हणते ताई) आणि दुसरे अनेकवचनी आहे (म्हणतात बसुनी)

ई. पुढे वेगवेगळ्या कवितांमधून काही ओळी निवडून दिलेल्या आहेत. त्यांतील शब्दांची कवितेच्या भाषेतील रूपे शोधून ती अधोरेखित करू या.

उदा॰ एक साधा प्रश्न माझा, लाख येती उत्तरे!



१. समुद्र अंतराला कधी कधी उचंबळे!
किती काळ लोटला... मला न तीर आढळे!

२. दारी पाऊस पडतो, रानी पारवा भिजतो,
आला गं सुगंध मातीचा
बघ पागोळ्या गळती, थेंब अंगणी नाचती,
आला गं सुगंध मातीचा

३. जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे

४. भूताचे हे बीळ भयानक, त्यात उमगती दोनच डोळे

५. नवीन मी त्या गावी, वेळ कसा मग जावा
एक न होई नाटक, येई डफ्फर क्वचित सिनेमा

६. थकतात नेत्र जेथे, तेथेच भेटशी तू!
सरतात अर्थ जेव्हा, तेव्हाच बोलशी तू!

७. भोगले जे दुःख त्याला सुख म्हणावे लागले!
एवढे मी भोगिले की मज हसावे लागले!

८. माझिया मना, जरा थांब ना
पाऊली तुझ्या माझिया खुणा
तुझे चालणे अन् मला वेदना

९. ही निळी पांढरी शरदातली दुपार :
तापल्या दुधापरी ऊन हिचे हळुवार

कवितेसाठी आपले रूप बदललेले अनेक शब्द आपण पहिले. असे काही शब्द म्हणी आणि वाक्प्रचारांमध्ये आजही वापरले जातात.

३. खाली दिलेल्या म्हणींतील कोणते शब्द तुम्ही आजच्या मराठी भाषेत वेगळे लिहाल? ते शब्द अधोरेखित करून शेजारील रकान्यात लिहू या.

| | |
|---|---|
| १. लोकां सांगे ब्रह्मज्ञान, आपण कोरडे पाषाण | १. |
| २. आले देवाजीच्या मना तेथे कुणाचे चालेना | २. |
| ३. अगं अगं म्हशी, मला कुठे नेशी? | ३. |
| ४. अडली गाय फटके खाय | ४. |
| ५. नळी फुंकली सोनारे इकडून तिकडे गेले वारे | ५. |

## ६ मुक्तछंद

**क. खालील उतारा वाचू या आणि त्याखालील तक्ता भरू या.**

एक टप्पा असा आला जेव्हा छंदामध्ये कविता बांधण्याचा कवींना जाच वाटू लागला. एक प्रकारचे साचलेपण आल्याची भावना जाणवू लागली. तेव्हा जुने नियम झुगारून रचना करायला त्यांनी सुरुवात केली. अशा रचनेला 'मुक्तछंद' असे म्हटले गेले. ह्या रचनांमधील भाषा अधिक मोकळी, अधिक सहज, रोजच्या वापरातील होती. ह्याचा अर्थ छंद सर्वांनीच पूर्णपणे नाकारलेला होता असे नव्हे, तर आशयाच्या गरजेनुसार कवी रचनाप्रकाराची निवड करू लागले होते. त्यामुळे त्यांच्या विषयांमध्ये विविधता येऊ लागली, नवे प्रयोग होऊ लागले. त्यातून आधुनिक मराठी कविता आकाराला येऊ लागली. केवळ भाषेचाच नाही, तर त्या कवितांच्या दृश्यरूपाचाही विचार काही कवींनी केलेला दिसतो.

| | |
|---|---|
| अ. मुक्तछंदात कविता रचण्याची कारणे | १.<br>२.<br>३. |
| आ. ह्या प्रकारात कवितेच्या भाषेत पडलेला फरक | १.<br>२.<br>३. |
| इ. मुक्तछंदातील रचनांमुळे मराठी कवितेत पडलेला सकारात्मक बदल | १.<br>२.<br>३.<br>४. |

**ख.** वर्गातील विद्यार्थ्यांचे तीन गट करू या. प्रत्येक गटाने खाली दिलेल्या मुक्तछंदातील कवितांपैकी तीन कविता वाचू या आणि वर दिलेल्या मुद्द्यांपैकी कोणते मुद्दे ह्या कविता वाचताना आपल्या लक्षात येतात ते वर्गात सादर करून वर्गात त्यावर चर्चा करू या.

## अ. वही मोकळी करताना

कवितेची वही गच्च भरून गेलीय :
आता पाने सुटी करून मोकळी करायला हवीत...
काही अशीच वाऱ्यावर सोडून द्यावीत
ज्यांची दूर विजनात गाणी होतील,
काही नदीत सोडावीत
म्हणजे शब्द नव्याने वाहू लागतील,
काही पाखरांना द्यावीत
त्यांचा सूर्य बुडतानाचा कोलाहल
त्यांनाच परत केल्यासारखी,
काही ढगांवर डकवावीत
जी देशाच्या सीमा ओलांडताना
आपोआपच रूपांतरित होतील...
नंतर
ज्यांची दूर विजनात गाणी होणार नाहीत,
जी नाकारतील वाहणे नव्याने,
ज्यांचा कुठल्याच कोलाहलाशी संबंध नाही,
ज्यांना देशाच्या सीमा ओलांडायच्या नाहीत
अशी काही पाने उरतीलच; ती सर्व
कुठल्याही झाडाच्या तळाशी ठेवावीत :
तुम्हीच झाडांचे बहर आहात असे
मीच त्यांना कैकदा सांगितलेले आहे.





**- द॰ भा॰ धामणस्कर**

## आ. तलाव

पेशव्यांनी पाण्यासारखा पैसा
खर्च करून बांधलेला तलाव /
बांधलेल्या तलावात
मातीमोल / कायाय कपाळ
औषधालासुद्धा पाणी नाही
आहे फक्त शंभर वर्षांचा गाळ



**- अरुण कोलटकर**

## इ. झाड

झाड तोडायचे, कापायचे, लगदा करायचा,
कागद बनवायचा
त्यावर लिहायचे, ते छापायचे, मग वाचायचे
एवढा खटाटोप कशासाठी?
सरळ झाडच वाचावे!

**- वसंत आबाजी डहाके**



## ई. गाणे

पक्षी जे झाडावर गाणे गातो
आहे झाडच दुसरे पुन्हा त्या गाण्यात
पक्षी जे झाडावर गातो
झाडावर जे गाणे पक्षी गातो
आहे पक्षी दुसरा गाण्यातच त्या पुन्हा
झाडावर जे पक्षी गातो

- पु. शि. रेगे



## उ. हळद उन्हाची



झाडांच्या शेंड्यावरती
हळद उन्हाची खळ्‌खळ्‌ते
वाऱ्याच्या पंखावरती
पिंपळपालवि सळ्‌सळ्‌ते
होडीच्या शिडावरती
एक पाखरू किल्‌बिल्‌ते
काठाच्या देठावरती
खुळी मासळी झिळ्‌मिळ्‌ते
वाळूच्या दुलईवरती
निळी शिंपली हुर्‌हुर्‌ते
माळाच्या भाळावरती
पिवळे जावळ भुर्‌भुर्‌ते
क्षितिजाच्या धारेवरती
भुरी टेकडी झुर्‌झुर्‌ते
पिंगट कौलारावरती
वेल धुराची सर्‌सर्‌ते
पाण्याच्या पाठीवरती
वर्तुळ लाडिक थर्‌थर्‌ते
स्वप्नांच्या वाटेवरती
मनात काही शिर्‌शिर्‌ते

- सदानंद रेगे

### ऊ. तेव्हा तरी

तुला जगवण्यासाठी मी काहीही करू शकत
नाही
हे लक्षात आल्यावर मनात विचार आला :
तुझी तू जगत होतीस
तेव्हा तरी
तू जगावं
असं माझं काही चाललं होतं का?

### काही नाही

आई,
तू गेल्यावर रडणारच नाही
असं काही मी कबूल करत नाही.
पण आवरायचा प्रयत्न करेन –
सावरायचाही.
एक तर माझा मेंदू,
त्यात तुझी शिकवण.
आई,
तू नसशील
तेव्हा सतत आठवत राहू नकोस
मला मोकळंच राहू दे ...गुंतूनही.
आई,
तुझी गोधडी ठेव मागे
मी पांघरेन थंडी वाजली की.
आई,
– नाही, काही नाही,
झोप

**- राजीव नाईक**

### ए. आता

सूर्याकडे पाठ फिरवून
त्यांनी शतकाचा प्रवास केला
आता अंधारयात्रिक होण्याचे
नाकारलेच पाहिजे

हा आपला बाप अंधार वाहून वाहून
अखेर पोक्या झाला
आता त्याच्या पाठीवरला बोजा
खाली ठेवलाच पाहिजे

या वैभवनगरीसाठी
आपलाच खून सांडला
आणि दगडी खाण्यांचा मक्ता मिळाला
आता आभाळमुका घेणाऱ्या
हवेल्यांना सुरुंग लावलाच पाहिजे

सूर्यफुले हाती ठेवणारा फकीर
हजारो वर्षांनतर लाभला
आता सूर्यफुलासारखे सूर्योन्मुख
झालेच पाहिजे

**- नामदेव ढसाळ**



अ. तुझं काही... माझं नाही

**तुझं**
**काही**

**माझं**
**नाही**

फुटतील वाटा दोन जिथून
तिथून
एक
माझी
होईल

तुझी
माझी
होईल
वा
माझी
तुझी
होईल
वा
माझी
माझी
राहील
तुझी
तुझी
राहील.
**तुझं माझं काही नाही.**

**- र॰ कृ॰ जोशी**

## ७ कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे!



मंजिरी, अगं शेजारच्या गौरीकडून तुझा निरोप कळला. तू येऊन गेलीस ना, काल संध्याकाळी? इतक्या दिवसांनी आलीस, आणि आलीस ती नेमकी कोणत्या मुहूर्तावर आलीस बघ ना! मी नेमकी कधी नव्हे ती गेले होते मॉलमध्ये खरेदीला. म्हणजे कुठल्याशा कपड्यांच्या ब्रँडचा सेल होता म्हणे. मी पोचले तिथे साधारण चार वाजता. असं वाटलं होतं, की त्या आडवेळेला फारसं कोणी नसेल तिथे. पण काय सांगू! अगं, केवढी प्रचंड



गर्दी होती तिथे! नुसती धक्काबुक्की. काय ह्या बायका तरी! एवढी कसली खरेदीची आवड असते कोण जाणे. कसला सेल आणि कसलं काय! त्या गोंधळात काही काही कळत नव्हतं. बरं, तिथल्या स्टाफला काही विचारावं, तर कोणाला काही धड माहीत नाही. कोणाचा कोणाला पत्ता नाही. इतकी कंटाळले ना मी. शेवटी आले परत घरी तशीच, विशेष काही न घेता. आणि घरी परत येते, तर तू येऊन गेल्याचं कळलं. इतकं वाईट वाटलं गं, आपली चुकामूक झाली त्याचं! ए, पण आज परत येतेस का तू? आपण दोघी आज जाऊन बघू या त्या सेलमध्ये काय इतकं खास आहे ते.

**क. विचार करू या आणि वर्गात चर्चा करू या.**

वरील उताऱ्यातील अधोरेखित प्रश्नशब्द कोणता प्रश्न विचारत आहेत? जर ते प्रश्न असतील, तर वाक्याच्या शेवटी प्रश्नचिन्ह का नाही?

टीप : 'कोण, काय' ही सर्वनामे वाक्यात प्रश्न विचारण्यासाठी न येता ती कोणत्या नामांबद्दल आली आहेत हे निश्चितपणे सांगता येत नाही, तेव्हा त्यांना अनिश्चित सर्वनामे (सामान्य सर्वनामे) असे म्हणतात. ह्या सर्वनामांना आवश्यक ते विभक्तिप्रत्यय लागतात.

**ख. वाक्याच्या शेवटी योग्य ते विरामचिन्ह देऊ या.**

१. हवा किती वाईट आहे ह्या शहरातली २. किती उकडत असतं सारखं ३. गावातच बरा होतो ४. कुठून बुद्धी झाली इथे येण्याची ५. जगन, अरे तो पंखा तरी नवा घे ६. कसला पंखा आहे हा ७. किती आवाज करतोय तो ८. फिरल्यासारखा वाटतोय तो पंखा ९. पण तरीही कसला घामाघूम झालोय मी १०. अरे, मी एकटाच केव्हाचा ओरडतोय ११. कुणाला ऐकायला येतंय की नाही १२. कोणी येणार आहे का माझ्याकडं बघायला १३. कोणाला काही पडलंय का माझ्या तब्येतीचं १४. जातोच कसा गावाला परत १५. कोणी तिकीट काढेल का माझं परतीचं

**ग. योग्य ते अनिश्चित सर्वनाम वापरून वाक्ये पूर्ण करू या.**

(कोण कुठला, कुणी कुणास, कुणास, काय – काय, कोणाची, कुणाच्या – कुणाचे, कशाचा कशाला)

अ. तो छोटासा मुलगा त्या उंच डोंगरावर एकटाच कसा पोचला, ---------------------- ठाऊक!

आ. प्रत्येकाची अशी फजिती कधी ना कधी होतेच. उगाच ------------------ ------------------ हसण्याची गरज नाही.

इ. अहो, आत्तापासून उगाच गवगवा करू नका. सोनलनं फक्त लग्नाला होकार दिलाय. बाकी ------------------------ -------------------- पत्ता नाहीये.

ई. आमच्या आईबरोबर वाद घालण्याची ------------------------------ हिंमत नाही. तिचे सगळे मुद्दे नेहमीच बिनतोड असतात.

उ. म्हणजे? जयरामनं केलेलं कर्ज त्याचा मित्र फेडतोय? हे म्हणजे '.................... खांद्यावर ....................ओझे' म्हणतात त्यातली गत झाली.

ऊ. .................... .................... माणूस, जराशा ओळखीवर इतके मोठे कर्ज मागण्याची त्याची हिंमत बघ!

ए. मी मानसीला मदत करायला गेले आणि तिचं नुकसानच करून बसले. .............. करता ................झालं हे!

**घ. गाणे ऐकू या.**

## ८ उजळणी

| उजळणी (असो, असोत) | |
|---|---|
| **उदाहरण** | **अर्थ** |
| मराठीचा तास असो किंवा वाङ्मय मंडळाचा कार्यक्रम; याचं इंग्रजीचं प्रेम काही लपत नाही. | असला तरी |
| मराठी वाङ्मय मंडळाचा विजय असो! | शुभेच्छा, इच्छा |
| तुमचे आशीर्वाद सतत आमच्या पाठीशी असोत. | इच्छा |
| बरं, असो! | असू दे |
| कितीही जबाबदाऱ्या असोत, आम्ही तास चुकवणार नाही. | विरोध |

## ९ कविता समजणे

**चला चर्चा करू या.**

कविता समजणं अवघड असतं असं तुम्हाला अजूनही वाटतं का? त्याची कारणं कोणती? कविता चांगली समजावी म्हणून आपल्याला अजून काय करता येईल?

संवाद

## १० कवितेविषयी बोलू काही ...

**आपल्याला आवडणाऱ्या एका कवितेबद्दल बोलू या.**

- ती कविता कोणत्या भाषेत आहे?
- आपल्याला ती कविता का आवडते?
- त्या कवितेचा आशय काय आहे?
- त्या कवितेची कोणती वैशिष्ट्ये आहेत?
- त्या कवितेच्या कवीबद्दल आपल्याला काय माहीत आहे?



## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो चरण, ते - | ती कविता, त्या - | ते कवन, ती कवने / कवनं |
| तो पोवाडा, ते पोवाडे | ती पंक्ती, त्या - | ते भजन, ती भजने / भजनं |
| तो श्लोक, ते - | ती कवयित्री, त्या - | ते भावगीत, ती भावगीते / भावगीतं |
| तो गीतकार, ते - | ती गीतकार, त्या - | ते भक्तिगीत, ती भक्तिगीते / भक्तिगीतं |
| तो कवी, ते - | ती रचना, त्या - | ते पद, ती पदे / पदं |
| तो अभंग, ते - | ती ओळ, त्या ओळी | ते पद्य, ती पद्ये / पद्यं |
| तो रूपबंध, ते - | ती ओवी, त्या ओव्या | ते काव्य, ती काव्ये / काव्यं |
| तो घाणा, ते घाणे | ती चारोळी, त्या चारोळ्या | ते गीत, ती गीते / गीतं |
| तो जाच, ते - | ती गझल, त्या गझला | ते हायकू |
| तो गवगवा | ती लावणी, त्या लावण्या | ते गाणे / गाणं, ती गाणी |
| तो रचनाकार, ते - | ती आरती, त्या आरत्या | ते कडवे / कडवं, ती कडवी |
| तो कणा, ते कणे | ती गाथा, त्या - | ते टोपणनाव, ती टोपणनावे / टोपणनावं |
| तो निषेध, ते - | ती झापड, त्या झापडी | ते रसग्रहण, ती रसग्रहणे / रसग्रहणं |
| | ती हिकमत, त्या हिकमती | ते जीवनमूल्य, ती जीवनमूल्ये / जीवनमूल्यं |
| | ती चुकामूक, त्या चुकामुकी | ते द्वार, ती द्वारे / द्वारं |
| | ती रचनाकार, त्या - | ते दिगंतर |
| | | ते साचलेपण |
| | | ते विजन, ती विजने / विजनं |
| | | ते ध्रुवपद, ती ध्रुवपदे / ध्रुवपदं |
| | | ते गुज, ती गुजे / गुजं |
| | | ते उधाण |

## क्रियापद

गांगरणे, आचरणे, दावणे, खचणे, खुलणे, मोहरणे, गहिवरणे, हरपणे, झुरणे, सावरणे, बावरणे, अडखळणे, झुलणे, भिडणे, गुणगुणणे, गुंतणे, तळमळणे, भरकटणे, भुलणे, जाणणे, थिजणे

## विशेषण

कर्णमधुर, चंचल, हळवा, धुंद, बेभान, भाबडा, आशावादी, स्वप्नाळू, हतबल, अविचारी, संभ्रमित, सात्त्विक, गेय, धड

## क्रियाविशेषण

अवचित, तूर्त, शतदा, विस्फारून

## वाक्प्रचार आणि म्हणी

| |
|---|
| जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे |
| जे न देखे रवी – ते देखे कवी |

## नाम / इतर शब्द + क्रियापद

आव्हान पेलणे, बंधनात राहणे, रूप बदलणे, व्यक्त होणे, धाब्यावर बसवणे, रसग्रहण करणे, मुकाट गिळून टाकणे, प्रश्न मिटणे, गवगवा करणे, मोर्चा नेणे, संप करणे, निषेध नोंदवणे, दंगा करणे

## आता मला हे येतं...

**मराठी कवितेविषयी जाणून घेणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**मराठी कवींविषयी जाणून घेणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**कवितेची भाषा समजून घेणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**काव्यरचनेच्या परंपरा आणि तऱ्हा यांची ओळख करून घेणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**व्याकरण : अनिश्चित सर्वनामे (सामान्य सर्वनामे) शिकणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# जडणघडण ९



**चला, शिकू या ...**

- संस्कारांचे महत्त्व जाणून घेणे
- निषिद्ध / वर्ज्य गोष्टी यांच्यावर चर्चा करणे
- महाराष्ट्रातील प्रमुख शहरे : कोल्हापूर, अमरावती, जळगाव यांची ओळख करून घेणे

## १ संस्कारांचे महत्त्व

मुलांच्या जडणघडणीत त्यांचे पालक, कुटुंब, शिक्षक, शेजारी-पाजारी, मित्रमंडळी ह्या सर्वांचाच सहभाग असतो. वरील चित्रे पाहू या. दोन किंवा तीन जणांच्या गटाने कोणतेही एक चित्र निवडू या आणि त्यात काय घडत आहे त्याचे वर्णन करू या. त्यासाठी पुढील काही प्रश्नांची मदत होईल.

क. चित्रात कोण कोण व्यक्ती दिसत आहेत?

ख. त्यांची परस्परांशी वागणूक कशी आहे?

ग. हे प्रसंग कोणत्या ठिकाणी घडत आहेत?

घ. ह्या परिस्थितीत वाढणाऱ्या मुलांच्या जडणघडणीवर अशा वागणुकीचा काय परिणाम होत असेल असे तुम्हाला वाटते?

## २ आमचे लहानपण

घरी कुणी पाहुणे आले की मला न् माझ्या धाकट्या भावाला फार आनंद व्हायचा. पहिली गोष्ट म्हणजे ते असेपर्यंत घरातली मोठी माणसे आमच्याकडे फारसे लक्ष द्यायची नाहीत. त्यांच्यादेखत आई आम्हाला रागवायची नाही. बरेचदा पाहुणे आमच्यासाठी काही तरी घेऊन यायचे : खाऊ, पुस्तक, पेन्सिली, अगदीच नाही तर निघताना हातावर एकेक रुपया ठेवायचे. धाकटा हमखास डावा हात पुढे करायचा. मग मी आईसारखे डोळे वटारून त्याच्याकडे पाहायचो. तो लगेच उजवा हात पुढे करायचा. पाहुणे हसून त्याच्या पाठीवर थोपटायचे. अशा पाहुण्यांच्या – एकदा ते आल्यावर आणि एकदा ते निघताना असे - दोनदा पाया पडावे लागले, तरी आम्हाला त्याचे काही वाटायचे नाही.



पाहुणे गेले, की दोघांच्याही पाठीत एकेक धबका घालत आई म्हणायची, “त्यांनी दिलं न् तुम्ही घेतलंत! घरात मिळतच नाही तुम्हाला काही, अं! एवढे वाढलेत, पण अजून रीतभात काही कळत नाही. ते म्हणाले असतील, की ह्या घरातल्या मुलांना वळण नाही; संस्कारच झालेले नाहीयेत!” पाहुण्यांनी जे दिलेले असेल ते ती आमच्या हातातून काढून घ्यायची. तिचे पुढे चालूच राहायचे : “असं कुणी दिलं तरी आपण घेऊ नये, बरं नाही दिसत ते. कधी कळणार तुम्हाला?”

“मग तू चहा दिलास तर त्यांनी कसा घेतला गं लगेच?” मी चिडून म्हणायचो.

“आणि तू म्हणतेस पिताना आवाज नाही करायचा. ते तर केवढ्यांदा फुर्रर्र फुर्रर्र करत पीत होते!” माझ्यामुळे धाकट्यालाही जोर चढायचा.

हसू आले तरी ते दाबून आई म्हणायची, “तुम्ही कशाला बसला होतात ते ऐकायला? कितीदा सांगितलं, मोठी माणसं बोलत असताना तिथं थांबू नये. आणि तू रे, धाकट्या, सारखं अप्पांच्या मांडीवर चढून बसायचं, मध्ये मध्ये बोलायचं, पाहुण्यांच्या पिशवीत डोकावून बघायचं... जे जे करू नये म्हणून मी शिकवत असते, त्याच्या बरोब्बर उलटच वागायचं ठरवलंय का तुम्ही?”



“तुम्ही म्हणजे? मी काय केलं?” रडवेला होऊन मी विचारायचो.

“तुला बक्षीस मिळाल्याचं तू सांगितलंस ते मी ऐकलं. आपल्याच तोंडानं आपण आपलं

कौतुक सांगू नये म्हणून सांगते की नाही मी नेहमी? लाज आणता अगदी लोकांसमोर. आणि रडू नकोस आता संध्याकाळचं! राक्षसवेळ असते ही. लहान मुलांचं रडणं ऐकून ते येतात, दात विचकत. जा, हातपाय स्वच्छ धुवा, देवापुढं दिवा लावा आणि छान शुभंकरोती म्हणा, पाढे म्हणा, अप्पांकडून नवा श्लोक शिकून घ्या ... चला, उठा!"

आमच्या पिढीचे लहानपण असे रितीभाती शिकण्यात आणि स्वतःला वळण लावून घेण्यात गेले. असे ठाकूनठोकून तयार केलेले 'प्रॉडक्ट' चारचौघांपुढे सादर करण्यात तेव्हाच्या आईबापांना केवढी धन्यता वाटायची, काय सांगू तुम्हाला! तरी आम्ही मुलगे असल्यामुळे थोडा तरी मोकळा श्वास घेण्याची संधी आम्हाला मिळायची; म्हणजे नाना लटपटी करून आम्ही ती मिळवायचोच. पण मुलींना मात्र ते शक्य व्हायचे नाही. एक तर तेव्हाच्या मध्यमवर्गीय घरात 'मुलांची वेगळी खोली' असे लाडच नसत. त्यामुळे घरातली मुले-मुली सदैव मोठ्या माणसांच्या नजरेसमोरच असत. मुलींना घराबाहेर पडायला मिळालेच, तरी शेजारीपाजारी, सख्खे आणि गावभर पसरलेले दूरचे नातेवाईक नावाचे सीसीटीव्ही कॅमेरे सदैव जागे असतच. घरी परतण्याआधीच 'कुठे, कधी, कोणाबरोबर. कोणाकडे, कोणाशी, कशाला' अशा सगळ्या प्रश्नांची सविस्तर आणि तिखटमीठ लावलेली उत्तरे पोहोचलेली असायची. मग उलटतपासणी, चौकश्या वगैरे वगैरे...



हे सगळे कशाकरता? तर पुढे सासरी गेल्यावर 'हेच संस्कार केले का आईबापानी? म्हणतात ना – खाण तशी माती अन् कापूस तशा वाती!' असे टोमणे मुलीला ऐकावे लागू नयेत म्हणून.

**क. वरील उतारा वाचू या आणि खालील प्रश्नांची उत्तरे देऊ या.**

| | पाहुणे आल्याचे फायदे – |
|---|---|
| अ. | |
| आ. | |
| इ. | |

**ख. प्रश्नांची उत्तरे उदाहरणाप्रमाणे त्याखालील रकान्यात लिहू या.**

| | मुलांवर चांगले संस्कार झाल्याचे त्यांच्या कोणत्या प्रकारच्या वर्तनातून कळेल असे आईला वाटते? | आईच्या मते कोणत्या प्रकारचे वर्तन चांगले संस्कार झाले नसल्याचे निदर्शक आहे? |
|---|---|---|
| अ. | काही घेताना उजवा हात पुढे करावा. | डाव्या हाताने काही घेतलं तर चांगले संस्कार नाहीत असं वाटू शकतं |
| आ. | | |
| इ. | | |
| ई. | | |

| | | |
|---|---|---|
| उ. | | |
| ऊ. | | |
| ए. | | |
| ॲ. | | |



**ग. मुलांना चांगले वळण लागावे म्हणून, त्याच्यावर चांगले संस्कार व्हावेत म्हणून आई-वडील त्यांना सतत सूचना देत असतात आणि शिकवण देत असतात. वरील उताऱ्यात अशा बऱ्याच सूचना आणि शिकवणी आपण वाचल्या. ह्या दिलेल्या आदेशांचे पालन व्हावे म्हणून आई-वडील मुलांना धाकही घालतात. वरील उताऱ्यात असा कोणता धाक आई मुलांना घालत आहे? तुम्हालाही लहानपणी असे कोणते धाक घातले गेले का? त्याचा परिणाम काय झाला? आपापले अनुभव वर्गात सांगू या.**

उदा॰ 'खोटं बोललात तर रात्री झोपेत कान लांब होतील' अशी भीती आई आम्हाला घालत असे. आपण चुकून काही खोटं सांगितलं असेल, आणि कान लांब झाले असतील, म्हणून झोपेतून जाग आल्या आल्या आम्ही कानाला हात लावून ते लांब झाले नाहीत ना ते पाहत असू.

**घ. वरील उताऱ्यात एक म्हण अधोरेखित केली आहे. जवळपास त्याच अर्थाच्या आणखी काही म्हणी पुढे दिल्या आहेत. त्यांतील अर्थाचा फरक समजावून घेऊ या, अर्थाबरोबर जोड्या लावू या आणि नंतर वाक्यात प्रयोग करू या.**

| | म्हण | | अर्थ |
|---|---|---|---|
| अ. | खाण तशी माती, अन् कापूस तशा वाती | १. | राजा जसा वागेल तशीच प्रजा पण वागेल. |
| आ. | उडदामाजी काळे गोरे, निवडतील काय निवडणारे | २. | सर्वांचे स्वभाव सारखेच असणे. |
| इ. | यथा राजा तथा प्रजा | ३. | आई-वडिलांची वागणूक जशी असते, तसेच मुलांचे वर्तन असते. |
| ई. | ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या बाभळी | ४. | सर्वांकडे साधारण एकच परिस्थिती असते. |
| उ. | सगळे एकाच माळेचे मणी असणे | ५. | थोड्याफार फरकाने चांगल्या व वाईट प्रवृत्तीची माणसे एकत्र असतातच. |
| ऊ. | घरोघरी मातीच्या चुली | ६. | एकमेकांचे वर्म / स्वभाव माहीत असणाऱ्या लोकांची गाठ पडली, की ते एकमेकांचे मनसुबे लगेच ओळखू शकतात. |

वाक्यात प्रयोग-

अ. वडील आणि मुलाचे मतभेद आहेत वाटतं! बाप विरुद्ध मुलगा अशी वादावादी आमच्या घरातपण चालते. म्हणतात ना, ------------------------------------------------.

आ. तुम्ही सगळे एकाच वर्गात आहात ह्याचा अर्थ तुम्हा सर्वांची बुद्धिमत्तापण सारखीच आहे असा होत नाही. म्हणतात ना, ------------------------------------------------.

इ. अंजली अतिशय आळशी आहे, पण तिच्या मुलीनंही एकही काम वेळेवर करू नये? साहजिकच आहे. म्हणतात ना, ------------------------------------------------.

ई. त्यांचे शिक्षक नेहमीच वर्गावर उशिरा जातात. मुलंपण आता तेच शिकलीयत. म्हणतात ना ------------------------------------------------.

उ. तुम्हाला काय वाटलं, तुम्ही आम्हाला फसवताय हे आम्हाला कळणार नाही? आपण एकाच गावचे, हे विसरलात का? शेवटी ------------------------------------------------.

ऊ. मी जयेशकडून चांगल्या वर्तनाची अपेक्षा केली हे चुकलंच. तो महेशचा सख्खा भाऊच आहे ना! दोघंही ------------------------------------------------.

## ३ भीती आणि समजुती

अन्न, वस्त्र, निवारा ह्या जगण्याच्या गरजा भागल्या, तरी माणसाचे सगळे प्रश्न सुटत नाहीत. आयुष्यात अनेक अडचणी येतात, अनपेक्षित संकटे येतात, भविष्यात कधी काय घडेल हे कळत नसल्यामुळे असुरक्षित वाटते, मृत्यूचे भय असते, हे सगळे का घडते ह्यामागील कारणे कळत नसतात. अशा वेळी त्याला मानसिक आधाराची गरज वाटते. आपल्या अवस्थेसाठी कोणाला तरी जबाबदार धरण्याकरता तो काही समजुती निर्माण करतो. त्यांच्याच पुढे प्रथा, परंपरा होतात. त्यामागे शिक्षणाचा अभाव, प्रश्न विचारण्याची सवय किंवा पद्धतच नसणे, अंधश्रद्धांचा पगडा वगैरे कारणे असतात. आपण जेव्हा 'अशी समजूत आहे' असे म्हणतो, तेव्हा ती गोष्ट तर्काच्या, विज्ञानाच्या कसोटीवर घासून पाहिलेली नाही आहे हेच आपण सुचवत असतो. विविध प्रकारच्या सत्ता हातात असणारी माणसे हुशारीने त्या समजुती टिकून राहतील अशी काळजी घेतात, कारण सामान्य जनतेने कुठल्या ना कुठल्या भीतीच्या दडपणाखाली राहणे त्यांच्या फायद्याचे असते.

आज एकविसाव्या शतकातही ह्यात फार मोठे बदल झाले आहेत असे नाही. आधुनिक शिक्षणामुळे काही जुन्या समजुती आणि प्रथा संपल्या असल्या, तरी त्यांची जागा नव्या समजुतींनी आणि प्रथांनी घेतलेली दिसते. व्यक्तीच्या आणि एकूण समाजाच्याच जडणघडणीवर त्याचा मोठा प्रभाव पडत असतो.

**क. सर्व जगातच काही प्राणी आणि पक्ष्यांना शुभ मानले जाते, तर काहींवर अशुभ असण्याचा शिक्का बसतो. पुढील चित्रे पाहू या आणि ती ओळखून त्या चित्राखाली त्या प्राण्याचे अथवा पक्ष्याचे नाव लिहू या.**

**ख. तुमच्या माहितीप्रमाणे ह्यांपैकी कोणते प्राणी आणि पक्षी 'शुभ' आणि कोणते 'अशुभ' ह्या वर्गात गणले जातात? त्यांच्या संपर्कात आल्याने काय होईल अशी समजूत असते? ह्या समजामागील एखादी कहाणी तुम्हाला माहीत असेल, तर ती वर्गात सांगू या.**

अ

आ

इ

ई

उ


ऊ

ए

ॲ

ऐ

ओ


**ग. काही मराठी समजुती (१)**



तुमच्या देशात / प्रांतात अशा काही समजुती आहेत का? तुम्हीपण अशा समजुतींवर विश्वास ठेवता का? तुम्हाला त्यांच्या पुष्टीसाठी काही उदाहरणे देता येतील का? वर्गात सर्वांना सांगू या.

- रात्री कुत्री रडू लागली की कुणाचा तरी अकाली मृत्यू होतो किंवा एखादे संकट येते.
- तेलाचा दिवा अचानक विझला की काही तरी वाईट घडते.
- उजव्या डोळ्याची पापणी लवली / फडफडली, भिंतीवर फिरणाऱ्या पालीने चुकचुक आवाज केला म्हणजे काही तरी अभद्र होते.
- आकाशातून उल्का पडताना दिसली आणि ती दुसऱ्याला दाखवली की अपशकुन होतो.
- रात्री चिंचेच्या झाडावर ब्रह्मराक्षस आणि पिंपळावर मुंजा असे अंधारविश्वातील नागरिक टपून बसलेले असतात. तेव्हा तरुण मुलामुलींनी त्या झाडांखालून जाऊ नये. जावे लागलेच, तरी जांभई देण्यासाठी तोंड तर मुळीच उघडू नये. मुंजा त्यातून सुर्रकन शरीरात शिरू शकतो.
- दिवस मावळल्यावर घर झाडले, तर दरवाजापर्यंत आलेली लक्ष्मी (संपत्ती) परत जाते.
- रात्रीच्या अंधारात झाडाची पाने-फुले, फांद्या तोडू नयेत. तेव्हा सारी सृष्टी झोपलेली असते. झोपेत असणाऱ्यावर शस्त्र चालवणे हे पाप असते.



- मांजराची हत्या करणे हे पाप असते. ते पुसून टाकण्यासाठी मग काशीयात्रेला जावे लागते.
- 'तीन तिघाडा काम बिघाडा', म्हणजे एका कामासाठी तीन जण एकत्र गेल्यास कामात यश येत नाही.
- एखाद्या कामासाठी जात असताना समोरून मांजर आडवे गेले, तर काम होत नाही. अशा वेळी सात पावले उलटे मागे मागे चालत जाऊन मग पुन्हा आपल्या वाटेने गेले, की संकट टळते.
- बाहेर जायला निघालेल्या व्यक्तीला 'कुठे निघालात?' असे विचारू नये; तिचे काम होत नाही.

**घ. सर्वच समजुती भीतिदायक नसतात. काही आनंददायकही असतात. (२)**

- केस विंचरताना स्त्रीच्या हातून कंगवा खाली पडला, तर प्रवासाला गेलेला तिचा नवरा लवकरच परत येतो.
- घराच्या दिशेने तोंड करून कावळा ओरडू लागला तर त्या घरी पाहुणे येतात.
- जवळची व्यक्ती संकटात असेल किंवा फार काळ भेटलेली नसेल तर देवाला (देवाच्या मूर्तीला) पाण्यात बुडवून ठेवल्यास संकट टळते.
- डाव्या डोळ्याची पापणी लवली तर काहीतरी शुभ घडते.
- डाव्या तळहाताला खाज सुटली तर धनप्राप्ती होते.
- भारद्वाज पक्ष्याचे दर्शन शुभ असते.

**च. चला, खेळू या**

वर्गातील एका विद्यार्थ्याने पुढे येऊन फळ्यावर वरीलपैकी कोणत्याही एका समजुतीचे चित्र काढावे. इतर विद्यार्थ्यांनी ती कोणती समजूत आहे ते ओळखावे.

## ४ दैनंदिन संस्कार

**संस्कारवर्ग**

**क. वाचू या.**

संस्कारवर्गाचा दुसरा आठवडा. वीणाताईंनी आज पोळीभाजीचा डबा आणायला सांगितलं होतं. जेवणाच्या सुट्टीपर्यंत व्यायाम, खेळ, गप्पा, गाणी, कविता, पाढे यात मजेत वेळ गेला. जेवणाची सुट्टी होताच सगळी मुलं हात धुऊन आली. वीणाताईंनी त्याचं महत्त्वही समजावून सांगितलं होतं ते प्रत्येकाच्या चांगलं लक्षात राहिलं होतं. सगळी मुलं रोजच्याप्रमाणेच गोल करून बसली. आता प्रत्येकाला आपापल्या डब्यातल्या भाजीबद्दल बोलायचं होतं. कालच तसं ठरलं होतं. सगळी मुलं उत्साहाने आपल्या भाजीबद्दल बोलत होती. मुक्ता मात्र हाताची घडी घालून हुप्प बसून राहिली होती. खूप विचारल्यानंतर म्हणाली, "आज आईनं भोपळ्याची भाजी दिलीय. शी:! मला नाही आवडत ती घाणेरडी भाजी. तरी आईने दिलीये. मी खाणार नाही. टाकून देणार मी ती भाजी."

"मुक्ता, बाळा, असं अन्नाला नावं ठेवू नये," वीणाताई म्हणाल्या, "काय ठरवलंय आपण? अन्न टाकायचं नाही, हो की नाही? बरं, आता आपण रोजची जेवणापूर्वीची प्रार्थना म्हणू या? पाठ झाली ना तुमची?" "होऽऽऽऽ!" सगळे एका सुरात ओरडले आणि प्रार्थना म्हणू लागले,

"वदनी कवळ घेता नाम घ्या मातृभूचे। सहज स्मरण होते आपल्या बांधवांचे।
कृषिवल कृषिकर्मी राबती दिन-रात। श्रमिक श्रम करोनी वस्तू त्या निर्मितात।
स्मरण करून त्यांचे अन्न सेवा खुशाल। उदरभरण आहे चित्त होण्या विशाल।।"

मुक्ताही प्रार्थना म्हणत होती. प्रार्थना संपल्यावर वीणाताईंनी तिला विचारलं, "मुक्ता, मी अर्थही सांगितलाय तुम्हाला या प्रार्थनेचा. आपण अन्न टाकलं, अन्नाला नावं ठेवली तर आपण कोणाचा अपमान करतो माहीत आहे ना?"

मुक्ता खालच्या सुरात म्हणाली, "हो, शेतकऱ्याचा."

वीणाताई म्हणाल्या, "फक्त शेतकऱ्याचा नाही, तो मेहनत करून धान्य, भाज्या, फळं

पिकवतो. पण हे सगळं आपल्याला भरभरून देणाऱ्या निसर्गाचाही आपण अपमानच करतो, नाही का? शिवाय, ते सगळं आपल्यापर्यंत पोहोचवणारे व्यापारी, वाणी, भाजी-फळं विक्रेते, दुकानदार, अगदी तो सगळा माल शेतातून बाजारात घेऊन जाणारे ट्रकड्रायव्हर ह्यांचाही अपमान होईल. आणि आई? तिनं सकाळच्या तिच्या कामांच्या गडबडीत तुझ्यासाठी पोळीभाजी करून डबा भरून दिला, तिचाही अपमान होतो ना?"

"हो."

"शिवाय सगळ्या भाज्या आपल्या आरोग्यासाठी चांगल्याच असतात. सगळ्या भाज्या खाल्ल्या पाहिजेत."

"कळलं, वीणाताई. आता नाही टाकणार मी अन्न आणि अन्नाला नावंही नाही ठेवणार." मुक्ताला आपली चूक कळली होती.

जेवणं झाल्यावर वीणाताईंनी प्रत्येकाला आपापला दिनक्रम सांगायला सांगितलं.

**रोहन** : मी आज सात वाजता उठलो. लगेच माझ्या चादरीची घडी घालून ठेवली आणि दात घासून, तोंड धुऊन सूर्यनमस्कार घातले, आणि मग आमच्या टॉमीला बाहेर नेऊन आणलं.

**इरा** : मीपण सकाळी व्यायाम केला. नखं कापली. मग आंघोळ करून देवाला, आजोबांना आणि आईबाबांना नमस्कार केला. नंतर दूध पिऊन झाल्यावर मटार सोलून ठेवले.

**हीना** : मीपण अम्मीला स्वयंपाकात आणि घरकामात मदत केली. आणि चाचाबरोबर बाहेर जाऊन किराणापण घेऊन आले. आल्यावर सगळं सामान नीट लावून ठेवलं.

**सॅम** : मी तर रोजच संध्याकाळी बॉबीअंकलच्या शॉपमध्ये जाऊन बसतो आणि त्यांना मदत करतो. रात्री आम्ही सगळे जेवायला एकत्र असतो. दुपारी इथे मराठीत प्रार्थना करतो तशी घरी रात्रीच्या जेवणाच्या आधी इंग्रजीत प्रेयर करतो. झोपतानापण प्रार्थना म्हणून झोपतो.

**मुक्ता** : मी आणि आई रोज झोपताना पसायदान म्हणतो. आणि वीणाताई, तुम्ही सांगितलंत तसंच मी एकाच हातानं जेवते आणि पाण्याच्या पेल्यासाठी किंवा वाढून घेण्यासाठी दुसरा हात वापरते. जेवल्यानंतर लगेच हात धुते आणि चूळ भरताना दातांवरून बोट फिरवते.

**सुजित** : वीणाताई, तुम्ही शिकवलं तसं मीपण खरकटा-उष्टा हात भांड्यांना लावत नाही. माझं ताट, वाटी, पेला घासून टाकतो. माझी चड्डी, मोजे आणि रुमालपण मीच धुतो.

**स्टेला** : काल आम्ही आमच्या सोसायटीच्या माळीदादांना मदत केली आणि त्यांनीही आम्हाला झाडांची काळजी घ्यायला शिकवलं. पण मला त्या मातीची घाण वाटत होती.

**वीणाताई** : मातीत खेळताना नाही ना घाण वाटत? पावसात चिखलात लोळता तेव्हा वाटते का घाण? मग झाडांची काळजी घेताना, त्यांना त्यांचं अन्नपाणी देताना जरा माती लागली तर बिघडलं कुठे? कोणत्याही कामाची घाण नाही वाटू द्यायची. फक्त नंतर स्वच्छता राखली की झालं.

तर तुम्ही सगळे आता चांगले स्वावलंबी झालात. चांगल्या सवयी लावून घेताय तुम्ही. पण या सगळ्या चांगल्या सवयी पुढेही ठेवाल ना? असेच शहाण्यासारखे वागाल ना?

**सगळे एका सुरात :** होऽऽऽऽऽऽ!

**ख. उताऱ्यातील संस्कारवर्गात मुलांना काय काय शिकवले जात आहे? चुकीच्या पर्यायांवर काट मारा.**

स्वच्छता स्वावलंबन प्राणी पाळणे शिवणकाम मोठ्यांचा आदर
व्यायाम नृत्य कपडे धुणे बागकाम इतरांना मदत करणे
अन्न न टाकणे धार्मिक प्रार्थना निसर्गाची काळजी घेणे पाढे

**ग. पुढे दिलेल्या सवयींमधून कोणते संस्कार दिसतात?**





अ. सूर्यनमस्कार - ----------------------------------------

आ. नखे कापणे - ----------------------------------------

इ. आई-बाबांना नमस्कार करणे - ----------------------------------------

ई. ताटातले अन्न संपवणे - ----------------------------------------

उ. झाडांना पाणी घालणे - ----------------------------------------

ऊ. स्वत:चे कपडे स्वत: धुणे - ----------------------------------------

## ५ संस्कृतिसंगम - १

**क.**

अ. तुम्ही सध्या महाराष्ट्रातील एका मोठ्या शहरात राहता. पुढील तक्त्यात दिलेल्या प्रसंगांत तुम्ही कसे वागता / वागाल?

आ. तुम्ही जर तुमच्या स्वतःच्या शहरात / देशात असाल तर ह्या प्रसंगांत कसे वागाल? दोन्ही प्रश्नांची योग्य उत्तरे देताना वेगवेगळ्या रंगांच्या पेनांनी खूण करू या.
महाराष्ट्रात – लाल रंग, स्वतःच्या देशात / प्रांतात - हिरवा रंग



**ख. वर्गात चर्चा करू या. स्वतःच्या देशात / प्रांतात तुम्ही असे का वागता आणि महाराष्ट्रात तसेच किंवा वेगळे का वागता? आपले अनुभव सर्वांना सांगू या आणि सांस्कृतिक फरकामुळे काही गमतीचे प्रसंग घडले असतील तर तेही सर्वांना सांगू या.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. | तुम्ही रोज जेवण कसे करता? | टेबल-खुर्चीवर बसून | पाटावर बसून | उभ्याने |
| आ. | तुम्ही ऑफिसात कोणता पेहेराव करून जाता? | पाश्चात्त्य औपचारिक | देशी औपचारिक | कोणताही अनौपचारिक |
| इ. | तुम्ही प्रार्थनास्थळाला कधी भेट देता? | रोज | सणावाराच्या दिवशी | कधीच नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ई. | भेटलेल्या व्यक्तीचे स्वागत तुम्ही कसे करता? | हस्तांदोलन करून | हात जोडून | काहीच करत नाही |
| उ. | तुमच्या वरिष्ठांकडे तुम्हाला जेवायला बोलावले आहे. कोणती भेटवस्तू न्याल? | मिठाई | परफ्युम किंवा कपडे यांसारखी वैयक्तिक वापराची वस्तू | फुले |
| ऊ. | तुमच्या वरिष्ठांना तुम्ही कसे संबोधित करता? | अरे / अगं + नाव (ए सुधीर, ए सविता) | अहो + आडनाव (अहो कुलकर्णी) | अहो + साहेब (अहो साहेब / अहो सर) |
| ए. | तुम्हाला मिळालेली भेटवस्तू ... | तुम्ही लगेच उघडून बघता आणि ती आवडल्याचं सांगता. | घरी गेल्यावर सावकाशीने उघडता आणि नंतर आवडल्याचे कळवता | ठेवून घेता. नंतर त्याविषयी काहीच प्रतिक्रिया देत नाही. |
| ॲ. | नुकतीच ओळख झालेल्या व्यक्तीला तिचे वय, पगार, लग्न झालं आहे का, मुलं किती असे वैयक्तिक प्रश्न... | तुम्ही सरळ आणि उघड उघड विचारता | तुम्ही आडून आडून विचारता | कधीच विचारत नाही |

## संस्कृतिसंगम - २

देशोदेशीची संस्कृती वेगळी, रितीभाती वेगळ्या, संस्कार निराळे. पण परदेशगमन आणि परदेशी वास्तव्य ह्या गोष्टी तर आता नित्याच्याच झाल्या आहेत. अशा वेळी परदेशात नोकरीसाठी अथवा उच्च शिक्षणासाठी जाताना तिथल्या संस्कृतीविषयी जाणून घेणं, तिथं कसं वागावं ह्याचे धडे घेणं ही अत्यावश्यक आणि गरजेची बाब झाली आहे. बहुतेक व्यावसायिक परदेशी जाण्याआधी स्वतः तर एखाद्या आंतरसांस्कृतिक प्रशिक्षकाकडून व्यवस्थित प्रशिक्षण घेतातच, पण आपल्या कर्मचाऱ्यांसाठीही अशी एखादी कार्यशाळा आयोजित करतात. अशा रीतीनं पुस्तकी ज्ञान घेऊन प्रशिक्षित झालेले हे कर्मचारी जेव्हा परकीय भूमीवर पाऊल ठेवतात, तेव्हा त्यांना कसलेही प्रश्न भेडसावणार नाहीत आणि तिथल्या वेगळ्या संस्कृतीत ते अगदी सहजपणे सामावून जातील असं जर कुणाला वाटत असेल, तर तो एक फार मोठा भ्रम ठरेल. कधी कधी तर हे पुस्तकी ज्ञान अडचणीत टाकणारंच ठरतं.

आमचे असेच एक जर्मन साहेब जर्मनीहून व्यवस्थित आंतरसांस्कृतिक प्रशिक्षण घेऊन





भारतात, मुंबईत आले. भारतातले संस्कार वेगळे, जर्मनीतील वेगळे. कोणाचंही स्वागत करताना भारतात दुसऱ्याचे हात हातात घेण्यापेक्षा स्वत:चे हात जोडून नमस्कार केला जातो. विशेषतः बायकांना तर नमस्कारच करावा, अशा मिळालेल्या धड्यांची मनातल्या मनात उजळणी करत साहेब इथं येऊन पोचले. त्यांचं स्वागत करायला गेलेल्या इथल्या चमूमध्ये दोन बायका आणि एक पुरुष असे होते. मग काय, साहेब हात जोडतायत तेव्हा बायकांनी शेकहँडसाठी हात पुढं केलेला असे, मग बावचळून ते हात पुढं करीत, त्यावेळी बायका जरा वरमून हात जोडत. असं दोनतीन वेळा झाल्यावर दोन्ही बाजूंनी तोंडी अभिवादन करून विषय संपवला, पण आजकालचा शहरी भारत आणि अजून बाहेरील जगाची विशेष ओळख न झालेला ग्रामीण भारत ह्यातील फरक साहेबांना समजायला पुढं बराच काळ जावा लागला. त्या दरम्यान अशा लहान लहान गमती होतच राहिल्या.

साहेब आणि त्यांच्या पत्नी ह्यांना एके ठिकाणी जेवायला बोलावलं होतं. भारतीय हातानं जेवतात, काटे, चमचे वापरत नाहीत. जेवताना उजवा हातच वापरायचा डावा हात निषिद्ध आहे, हे सर्व त्यांनी नीट लक्षात ठेवलं होतं. उष्टं म्हणजे काय आणि खरकटं म्हणजे काय हे समजलं जरी नसलं तरी हे शब्द त्यांनी लक्षात ठेवलं होतं. अगदी पाटावर बसायची तयारीही केली होती मनातल्यामनात. खरं तर असा एखादा अस्सल भारतीय प्रसंग कधी अनुभवायला मिळेल असं झालं होतं त्या दोघांनाही. पण इथेही पदरी निराशाच आली, कारण जेवण्याचा बेत होता टेबल-खुर्चीवर. खायला चमचेपण होते. मात्र पुरणपोळीचा तुकडा तोडताना जेव्हा एकच हात वापरायची वेळ आली तेव्हा दोघांचीही बऱ्यापैकी गडबड उडाली. मग त्या दोघांनी डावा हात न वापरता आपापल्या उजव्या हातानेच एकमेकांना पोळीचे तुकडे करायला मदत केली. 'उष्ट-खरकटं' ह्या संकल्पनेची वाट लागली आणि सर्वांची भरपूर करमणूक झाली.



भारतीय संस्कृतीचेपण किती पदर! 'घरात जाताना पादत्राण बाहेर काढून ठेवावं' हे लक्षात ठेवायला ठीक आहे, पण हा नियम सगळेच पाळत नाहीत. मग साहेबांचा उडायचा गोंधळ! बाकीचे तर चपला घालून आत गेले, आपण काय करायचं?

प्रार्थनास्थळीही पादत्राण बाहेर काढायचं. पण कोणत्या? मंदिरात, मशिदीत की चर्चमध्ये? की सगळीकडेच?

जर्मनीत कुणी जेवायला बोलावलं तर सहसा एक वाईनची बाटली भेट म्हणून नेली जाते. भारतात ही परंपरा नाही. मग काय न्यावं बरं आपण? हं, फुलं न्यायला काही हरकत नाही, म्हणून ह्या साहेबांनी यजमानांच्या बायकोसाठी छान गजरा नेला. त्यांनी जेव्हा तो गजरा यजमानीणबाईंना दिला तेव्हा सगळ्यांचे चेहरे तो गजरा पाहून असे का झालेयत ह्याचा विचार ते करत बसले. त्यांच्याशी बोलताना, त्यांचे अनुभव ऐकताना आमचीही आपल्याच संस्कृतीशी नव्याने ओळख होत गेली. आपण 'आपली संस्कृती' म्हणतो ती खरी आहे कशी? 'आमच्याकडे असं असं असतं, आम्ही असं असं करतो', असे आपण म्हणतो तेव्हा ते खरंच तसंच असतं का?

जागतिकीकरणानंतर ज्या वेगानं जग बदलत आहे आणि तंत्रज्ञानाच्या भरारीनं ते जितकं अधिक जवळ येत आहे, तितक्याच वेगानं जागतिक-सांस्कृतिक संदर्भ बदलत आहेत. आजवर जुन्या पिढीनं संस्काराच्या वर्खाखाली झाकून ठेवलेल्या गोष्टींना नवनवी आव्हानं मिळू लागली आहेत. पाश्चिमात्त्य संस्कृतीचा, त्यांच्या जीवनशैलीचा मोठा प्रभाव आपल्या जीवनशैलीवर पडत आहे. जुने संस्कार, जुनी जीवनशैली सांभाळून नव्या युगातील नवे बदल, नवी जगण्याची पद्धत ह्यातील नेमकं काय घ्यायचं आणि काय सोडायचं हे ठरवण्याची वेळ आता आली आहे. म्हणजे मग ह्याच नव्या संदर्भात आपल्या संस्कृतीकडेही नव्यानं आणि अधिक जागरूकतेनं बघणं आपल्याला जमेल आणि आपल्या संस्कृतीचं हे नवं आधुनिक रूप इतरांनाही समजावता येईल.

## चला, वादविवाद करू या

केवळ एखाद्या विशिष्ट देशात अथवा प्रांतातच असे सांस्कृतिक बदल होत आहेत असे नाही, तर संपूर्ण जगातच सध्या ही परिस्थिती आहे. त्याची अनेक कारणे आहेत. आधुनिक तंत्रज्ञानामुळे कमी भासणारे भौगोलिक अंतर, जागतिकीकरण ही त्यातली काही कारणे झाली. राजकीय, भौगोलिक, आणि सामाजिक कारणांमुळे मोठ्या प्रमाणावर होणारे स्थलांतरण हेही एक महत्त्वाचे कारण आहे. अशा सांस्कृतिक बदलांचा स्वीकार करून एकच जागतिक संस्कृती निर्माण व्हावी का?
चला, वर्गातील विद्यार्थ्यांचे दोन गट करून वादविवाद करू या.

गट 'अ' म्हणतो – हो, सांस्कृतिक बदलांचा स्वीकार करून एकच जागतिक संस्कृती निर्माण व्हावी.

काही कारणे – सगळे सामाजिक, सांस्कृतिक भेदभाव नष्ट झाले तरच जगात शांतता प्रस्थापित होईल. समान रीतिरिवाज रुजणे हे त्या दिशेकडे नेणारे एक महत्त्वाचे पाऊल असेल, इत्यादी.

गट 'ब' म्हणतो – नाही, अशा सांस्कृतिक बदलांचा स्वीकार करणे योग्य नव्हे.

काही कारणे – प्रत्येक संस्कृतीची स्वतःची एक खासियत आहे, एक वेगळेपण आहे. सांस्कृतिक वैविध्यांमुळेच जग इतके सुंदर झाले आहे, इत्यादी.

## ६ संस्कार

**क.**

आपल्या सांस्कृतिक जडणघडणीचा परिणाम म्हणून आपण सर्व जण विशिष्ट परिस्थितीत किंवा प्रसंगात ठरावीक पद्धतीने वागतो. महाराष्ट्रातील सांस्कृतिक आचरणाचे काही स्वाभाविक प्रकार म्हणजे जेवणाआधी 'वदनी कवळ घेता' म्हणणे, संध्याकाळी परवचा म्हणणे, कोणाला नकळत पाय लागला तरी मराठी माणूस चटकन नमस्कार करतो. आताशी दररोज जरी नाही, तरी सणावाराला बहुतेक जण देवळात जातात. जेवताना उजव्या हाताचाच वापर करणे, उष्टे हात इतर पदार्थांना न लावणे हे सगळे संस्कार नकळतच मुलांवर होत जातात. अन्य प्रदेशांतील सांस्कृतिक आचरणाचे वैशिष्ट्य दाखवणारे असे कोणते प्रकार तुम्हाला आठवतात? चार किंवा पाच प्रसंग लिहून वर्गात सर्वांना सांगू या.



शब्दसंपदा

उदा॰ गोव्यातील आमच्या गावी रविवारी सकाळी ख्रिस्ती समाजातील सर्व जण चर्चला जातात,

## ७ कसं वागायचं!

**क. आई, Exams आणि मी**



अ. आई मुलांना रोज हळद-दूध का द्यायचं ठरवते?
१.
२.

आ. मुलांच्या परीक्षेसाठी तयारी म्हणून आई कोणत्या गोष्टी बंद करायचं ठरवते?
१.
२.
३.

इ. टेन्शन येऊ नये म्हणून काय करावं असं आईला वाटतं?

ई. गंमत म्हणून ती अनि आणि जुईला कोणते प्रश्न विचारते?
१. अनिला =
२. जुईला =

उ. परीक्षेच्या दिवशी आई कोणत्या सूचना देते?

ऊ. मुलं परीक्षेहून परत आल्यावर आई काय चौकश्या करते?

**ख. आई, मी आणि Dating**

अ. अनिच्या फोनमध्ये पाहून आई काय प्रश्न विचारते?
.



आ. अनि काय उत्तर देतो?
.

इ. अनिला मैत्रीण न मिळण्याची आईच्या दृष्टीने कोणती कारणे आहेत?

------------------------------------------------------------.

ई. अनिला 'डेट' मिळावी म्हणून जुई काय मदत करते?

------------------------------------------------------------.

उ. रात्री आणि दिवसा बाहेर जाण्याच्या कोणत्या सबबी अनि आईला देतो?

रात्री = ------------------------------------------------------------.

दिवसा = ------------------------------------------------------------.

ऊ. अनि आईला ॲपविषयी काय सांगतो?

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------.

ए. गालांवरील लाल डाग कशामुळे आलेत असं अनि आईला सांगतो?

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------.

ॲ. आईला ॲप कशाला हवीय?

------------------------------------------------------------.

ऐ. आई बबडूला कोणते प्रश्न विचारते?

------------------------------------------------------------.

## ८ हो, हो, हो!

**कंसातील पर्याय योग्य जागी लिहून वाक्ये पूर्ण करू या.**

(होईल हो, हो की, हो, खरंय हो, हो, हो का नाही, होय हो, झालंच हो, हो का, ऐकतेय हो, हो ना, हो हो)



**अजित** : अचला, मी काल तुला तो तयार माल बांधून ठेवायचं काम सांगितलं होतं, ते अजून झालं की नाही झालं?

**अचला** : (क)--------------------!

**अजित** : अगं, (ख) ---------- म्हणजे काय? झालं, की नाही झालं?

**अचला** : (ग)---------- ----------!

**अजित** : होईल म्हणजे काय? वेळेवर व्हायला हवं ना?

**अचला** : (घ)---------- ----------! झालंच जवळजवळ.

**अजित** : हे बघ, आपल्या गिऱ्हाइकाकडून काही तक्रार येता कामा नये, (च)---------- ----------?

**अचला** : (छ)---------- ----------.

**अजित** : त्यांनी गेल्यावेळीच आपल्याला धमकी दिली होती, परत तुमचा माल घेणार नाही अशी.

**अचला** : (ज) ---------- ----------?



**अजित :** अगं, असं काय विचारतेयस? मी तुला सांगितलं नव्हतं का?

**अचला :** (झ) ------------------- -------------------, मीच विसरलेच बघा!

**अजित :** असं विसरून कसं चालेल? हात चालव पटापट. ऐकतेयस ना?

**अचला :** (ट)------------------------- -----------------------.

**अजित :** आपल्याला हे गिऱ्हाईक काही झालं तरी गमवायचं नाहीये, (ठ)--------------- ---------------
---------------?

**अचला :** (ड)------------------- ------------------.

**अजित :** चल मग, आवर पटकन, आणि काम पूर्ण झालं, की सांग मला.

**अचला :** (ढ)--------------- ----------------, सांगते.

## ९ वळण

**क. ऐकू या.**

**ख. पुढील प्रश्न सोडवू या.**



अ. हर्षिता खिडकीत का बसली आहे?
१. चिवडा खायला २. अभ्यास करायला ३. रस्त्यावरची गंमत बघायला

आ. सोसायटीत नव्याने राहायला आलेल्या माणसाचा वेष कसा आहे?
१. टी शर्ट – पँट २. शर्ट – पँट ३. टी शर्ट – जीन्स

इ. हर्षिता त्या नव्या माणसाचे वर्णन करताना कोणती विशेषणे वापरते? सर्व बरोबर उत्तरांवर ✓ खूण करू या.
१. लठ्ठ २. बुटका ३. टक्कल पडलेला ४. म्हातारा ५ विनोदी

ई. हर्षिताच्या आईला हर्षिताचं कोणतं वागणं आवडत नाही? सर्व बरोबर पर्यायांवर ✓ खूण करू या.
१. अनोळखी माणसावर टीका करणं
२. कोणाच्याही दिसण्याची टिंगल करणं
३. अभ्यास सोडून चिवडा खाणं
४. वयाने मोठ्या असलेल्या माणसाचा एकेरी उल्लेख करणं

उ. पालक म्हणून कसं वागायचा निश्चय हर्षिताच्या पालकांनी केला होता?
--------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------

ऊ. हर्षिता अजूनही कोणत्या चुका करत आहे असं आईला वाटतं?
--------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------

## १० ऐकू या आणि म्हणू या.

| | |
|---|---|
| क. | "सुखाचा संसार करायचा असेल तर संपदासारखी सुसंस्कृत आणि सुसंस्कारी मुलगीच लग्न करून घरात आण!" संगीताताईंनी संकर्षणला समजावलं. |
| ख. | संकोची संजयनं संदीपच्या संगतीने संपूर्ण संगीत-महोत्सवाचे संयोजन सांभाळले. |
| ग. | कंस, हंस, दंश, वंश, अंश, सिंह |

टीप : अनुस्वाराचा वापर करताना काही वेळा एखादे वेगळेच अक्षर ऐकू आल्याचा भास होतो. उदा॰ कंस, हंस, मांस, सिंह, संहिता,वंश अशा काही शब्दांमध्ये हलकासा 'व' ऐकू आल्यासारखे वाटते. पण म्हणून ते शब्द कंव्स, हंव्स, मांव्स, संव्हिता वंव्श असे लिहायचे नसतात.

## ११ चला, गप्पा मारू या

शिक्का बसणे / शिक्का मारणे

| | | |
|---|---|---|
| पहिला विद्यार्थी | : मी लहानपणी सारखा हसायचो, म्हणून माझ्यावर 'हसरा' असा शिक्का बसला. | ह्याचप्रमाणे : |
| सर्व विद्यार्थी | : काय? तुला सगळे हसरा म्हणतात? | चांगला आवाज असणे – गायक, |
| पहिला विद्यार्थी | : आणि मी लहानपणी खूप सुंदर होतो, म्हणून माझ्यावर 'देखणा' असा शिक्का बसला. | नाटकात चांगलं काम करणे – नट, |
| सर्व विद्यार्थी | : काय? तुला सगळे देखणा म्हणतात? | खेळात खूप चांगला असणे – खेळाडू, |
| पहिला विद्यार्थी | : हो, आणि मी लहानपणी खूप हुशारही होतो, म्हणून माझ्यावर 'स्कॉलर' असा शिक्का बसला. | खोटं बोलणे – खोटारडा |
| सर्व विद्यार्थी | : आणि तू खूप थापाही मारतोस ना? म्हणून आम्ही तुझ्यावर 'थापाड्या' हा शिक्का मारलाय. | |

संवाद

## करा आणि शिका

**कोल्हापूर, जळगाव, अमरावती**

ह्या पाठात आपल्याला महाराष्ट्रातील वरील तीन शहरांची ओळख करून घ्यायची आहे. वर्गातील विद्यार्थ्यांचे तीन गट करू या. प्रत्येक गटाने इतरांना वरीलपैकी एका शहराची ओळख करून द्यायची आहे. त्यासाठी तुम्ही तुमच्या मित्रमंडळीशी बोलू शकता, पुस्तके वाचू शकता किंवा सर्वात सोपा मार्ग म्हणजे आंतरजालावर माहिती मिळवू शकता.

मदतीसाठी खाली दिलेल्या आकृत्या पाहा.

दर आठवड्याला एक ह्याप्रमाणे ही सादरीकरणे प्रस्तुत केली जातील. सर्वात उत्तम सादरीकरण करणाऱ्या गटाला शिक्षक विजयी घोषित करतील.

करा आणि शिका

## कोल्हापूर

- नवा राजवाडा आणि वस्तुसंग्रहालय
- राधानगरी धरण
- सहकारी साखर कारखाने
- तांबडा-पांढरा रस्सा
- खासबाग कुस्ती मैदान
- ऊस
- महालक्ष्मी मंदिर
- मराठी चित्रपटसृष्टी
- पंचगंगा नदी
- छत्रपती शाहूमहाराज
- कोल्हापुरी साज आणि कोल्हापुरी चप्पल
- रंकाळा तलाव





## जळगाव

- उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
- गांधी तीर्थ
- गिरणा नदी
- केळी
- यावल अभयारण्य
- ना. धों. महानोर
- खानदेशी / अहिराणी बोली
- मनुदेवी मंदिर आणि धबधबा
- डाळबट्टी
- बहिणाबाई चौधरी
- वाघुर धरण
- वांग्याचे भरीत, कळण्याची भाकरी

**अमरावती**

- मेळघाट व्याघ्रप्रकल्प
- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
- सांबारवडी
- पूर्णा, तापी
- ऋद्धिपूर
- महानुभाव
- वऱ्हाडी बोली
- रोडगे
- कापूस
- चिखलदरा
- संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
- सालबर्डी



**वर दिलेल्या आकृत्यांच्या आधारे पुढील तक्ता भरू या.**

| | कोल्हापूर | जळगाव | अमरावती |
|---|---|---|---|
| पर्यटन | | | |
| शिक्षण | | | |
| खाद्यसंस्कृती | | | |
| पिके | | | |
| भाषा | | | |
| नदी | | | |
| महत्त्वाच्या व्यक्ती | | | |

## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो धबका, ते धबके | ती जडणघडण, त्या जडणघडणी | ते अंधारविश्व, ती अंधारविश्वे / अंधारविश्वं |
| तो धाक, ते - | ती राक्षसवेळ | ते आचरण, ती आचरणे / आचरणं |
| तो ब्रह्मराक्षस, ते - | ती शिकवण, त्या शिकवणी | ते कथासूत्र, ती कथासूत्रे / कथासूत्रं |
| तो मुंजा, ते मुंजे | ती पुष्टी | |
| तो भ्रम, ते - | ती अस्थी, त्या - | |
| तो चमू, ते - | ती अवज्ञा, त्या - | |
| तो वर्ख, ते - | | |
| तो पिंड, ते - | | |
| तो डाका, ते डाके | | |
| तो मनसुबा, ते मनसुबे | | |

ते कष्ट – नेहमी अ.व.
ते काबाडकष्ट – नेहमी अ.व.

### क्रियापद

भेडसावणे, वरमणे, सामावणे



### विशेषण

असुंदर, दिवंगत

### क्रियाविशेषण

झडकरी

## वाक्प्रचार आणि म्हणी

| | | |
|---|---|---|
| खाण तशी माती अन् कापूस तशा वाती | तीन तिघाडा काम बिघाडा | यथा राजा तथा प्रजा |
| ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या बाभळी | सगळे एकाच माळेचे मणी असणे | घरोघरी मातीच्या चुली |
| उडदामाजी काळे गोरे निवडतील काय निवडणारे | | |

## नाम / इतर शब्द + क्रियापद

धाक घालणे, दात विचकणे, पापणी लवणे / फडफडणे, हात उगारणे, फक्क्या मारणे, हात चालवणे, शिक्षा बसणे / मारणे, चीज करणे, काम हातावेगळं करणे, विरोध दर्शवणे, शस्त्र चालवणे, टपून बसणे

## आता मला हे येतं...

**संस्कारांचे महत्त्व जाणून घेणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**निषिद्ध / वर्ज्य गोष्टी यांच्यावर चर्चा करणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**महाराष्ट्रातील प्रमुख शहरे : कोल्हापूर, अमरावती, जळगाव यांची ओळख करून घेणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी



# पाणी १०



## चला, शिकू या ...

- ‘पाणी’ ह्या विषयावरील शब्दसंपदा अभ्यासणे
- ‘पाणी’ ह्या विषयावरील साहित्यिक उतारे वाचणे, समजणे, त्यांवर चर्चा करणे
- पाण्याची समस्या ह्या विषयाचा अभ्यास करणे, त्यावर बोलणे
- पाणी प्रश्नावर झालेल्या आणि सुरू असलेल्या चळवळींबद्दल वाचणे, त्यावर चर्चा करणे

## १ पहिल्या पानावरील एक चित्र निवडू या आणि त्यावर बोलू या.

- चित्रामध्ये पाण्याविषयी काय म्हटले आहे?
- पाण्याशी तुमचे नाते काय आहे?
- पाण्याशी संबंधित एखादी आठवण सांगू या.

## २ पाणी

**क. 'पाणी' या शब्दाशी संबंधित क्रियापदे, विशेषणे, वाक्प्रचार, म्हणी इ॰ आठवू या. त्यासाठी विद्यार्थ्यांचे गट करून प्रत्येकाने एकेका विषयावर काम करू या. शेवटी सर्वांची माहिती एकत्रित करू या.**

**ख. खालील चौकटीतील शब्दांची मदत घेऊन उदाहरणाप्रमाणे शब्द तयार करू या. शब्दकोशाची मदत घेऊ या.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बुड्या | क्रीडा | क्या | पक्षी | चर | घोडा |
| कोंबडा | संधारण | उतारा | निधी | तरण | चक्की |
| पान | पोई | चक्र | बुडी | आशय | लोट |
| कणीस | गवत | यान | कळा | शेंग | विद्युत |
| उत्सारण | समाधी | वठा | आवरण | वनस्पती | विहार |

शब्दसंपदा

**पाण-**

उदा॰ पाणसाप

...

**जल-**

उदा॰ जलसंपदा

...

**ग. पाण्याच्या निरनिराळ्या क्रिया शोधू या.**

वाहणे

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सा | च | र | च | उ | प | पो | भ |
| हिं | द | क | ळ | क | ड | ह | र |
| मु | भ | शिं | ग | ळ | जि | जि | व |
| झि | र | प | हु | क | उ | र | खं |
| ला | उ | ड | व | वा | स | ब | गा |
| आ | सां | रा | ठि | ह | ळ | र | ळ |
| छ | ट | तुं | ब | सा | वि | स | ळ |
| फ | वा | र | क | ठ | फु | सां | ड |
| ठि | त | पु | स | बु | च | क | ळ |
| ब | रं | पा | झ | र | ड | रा | ज |
| क | ग | धु | को | स | ळ | ठ | न्हा |

**घ. जलचक्राची व्याख्या तयार करू या. कंसातील शब्दांचा वापर करून पूर्ण वाक्ये लिहू या.**

(सूर्य – उष्णता – समुद्राचे पाणी – वाफ होणे – ढग तयार होणे – पाऊस – पाणी – नदी – पुन्हा समुद्राला मिळणे...)

उदा० निसर्गातील पाण्याच्या चक्राला जलचक्र असे संबोधले जाते.

शब्दसंपदा

**च. वाचू या.**

**पाण्याचे आभाळ**

आमच्या घराजवळ एक जुना पडका वाडा होता. त्या ओसाडीत देवाकरता येऊन राहिलेले एक नवराबायकोचे जोडपे होते. वाड्याच्या खोल आतल्या भागात ते राही. वाड्याच्या बाहेरच्या भागात आणि आतही काळे पडलेले, कधीकाळीचे, ठोक्याठोक्याचे तांब्याचे मोठे हंडे असत आणि ती बाई ते रोज भरून ठेवी. दोघांना इतके पाणी कशाला लागे कुणास ठाऊक. पण सकाळी पाहावे तर वाड्यात पाण्याचा टिपूसही उरलेला नसे. ऊन पडून डबके आटून जावे तसे



भरलेले पाणी रात्रीच्या अंधारामुळे आटून जात असे... रात्री भुतांचे थवे वाड्यात पाणी प्यायला येतात, अशी काही अंधुकशी बोलणी ऐकायला येत. ते ऐकून आमच्या घरासमोर दिसणाऱ्या नदीचे चांदीसारखे पसरलेले पाणी एखाद्या रात्रीच्या काळोखात, नदीपलीकडच्या झाडीतली भुते पिऊन टाकतील आणि आमची नदी कोरडी पडेल अशी मला भीती वाटे.



घरात जसे आई, दादा घागरीने पाणी आणून हंड्यात साठवत तसे देवाने आमच्या नदीत खूप खोल जागा करून पाणी साठवले होते. कितीही उन्हाळा आला, कितीही वर्षे पाऊस पडला नाही, तरी आमच्या नदीतले पाणी आटणार नव्हते. (...)

इतक्या सगळ्या माणसांनी आणूनही नदीचे पाणी संपत कसे नाही, ते कुठून येते, कुठे जाते, कळतच नव्हते.

तिकडे दूर डोंगरातून आमची नदी निघाली होती. वळणावळणांनी येणारे तिचे चित्र दादांनी मला दाखवले होते. आमच्या इथे येऊन ती पुढे समुद्राकडे जात होती. (...)

पिंपळापुढे नदीचा घाट सुरू होई. घाटाच्या काळ्याभोर लांब पायऱ्या पाण्यात उतरत जात होत्या. पाण्यातही त्या आणखी खोल खोल उतरत असतील, पाताळात जात असतील, असे वाटे.

आमच्या नदीचे पाणी मला फार आवडे. आमचे गाव नव्हते तेव्हापासूनच्या अरण्यातही ते होते. ते पसरून राहिलेले पाणी मुळीसुद्धा हलत नसे. त्याच्या सपाट भागावरून चालत जाता येईल असे कितीतरी वेळा वाटे. पाण्यात आभाळाच्या निळ्या रंगाचा तुकडा कुठे उतरलेला असे. काठावरल्या कंजाळांच्या काळ्याहिरव्या सावल्या पडलेल्या असत आणि घाटाजवळ पाणी पांढरे असे. बुरुजावर उभे राहून त्यात तोंड पाहता येई.

रात्रीच्या अंधारात दादांच्याबरोबर घाट उतरून मी खाली येई. बुरुजावर पाय सोडून बसे. गारसर वारा अंगावर येई. आमच्या समोरच्या पाण्यात चांदण्याचे नक्षीदार आभाळ उतरलेले असे. पाय टाकला की आभाळात पोचता येईल असे वाटे. तिथे पाणी नसेलच. पाण्याचे आभाळ झालेले असेल...

**- श्रीनिवास विनायक कुलकर्णी**

**अ. खालील शब्दांचा कोणता अर्थ लेखकाला अभिप्रेत आहे?**

**१. पडका**
क. अर्धवट पडलेला  ख. दुःखी, उदास  ग. वैतागलेला

**२. ओसाडी**
क. दगडी ओटा  ख. निर्जन, निर्मनुष्य ठिकाण  ग. रानगवत

**३. ठोक्याठोक्याचे**
क. ठक ठक आवाज करणारे  ख. हातोडीने ठोकल्यामुळे उमटलेल्या गोल खुणा असलेले
ग. थोड्या थोड्या अंतराचे

**४. टिपूस**
क. झरा  ख. पाण्याचा अगदी छोटा थेंब  ग. वास

**५. डबके**
क. साचलेल्या पाण्याने भरलेला खड्डा      ख. पत्र्याचा डबा      ग. चामड्याचे वाद्य

**६. पाणी आटणे**
क. कमी होणे      ख. शिळे होणे      ग. चमकणे

**७. अंधुकशी**
क. काळसर      ख. अस्पष्ट      ग. वेगळ्याच भाषेतील

**८. घाट**
क. नदीच्या काठाची दगडी बांधणी      ख. आकार, आकृती      ग. मोठा डोह

**९. अरण्य**
क. रणांगण, युद्धभूमी      ख. जंगल, रान      ग. पहाटेची वेळ

**१०. कंजाळ**
क. शेकोटी      ख. केस पिंजारलेली स्त्री      ग. पाण्यात उगवणारी एक वनस्पती

**११. बुरुज**
क. फुलांचा गोलाकार गुच्छ
ख. किल्ल्यावर तोफा ठेवण्यासाठी बांधलेली वर्तुळाकार बंदिस्त जागा
ग. एक उन्हाळी फळ

**आ. लेखकाने वरील उताऱ्यात लहानपणीची आठवण सांगितली आहे. त्या आठवणीत पाण्याशी असलेले त्यांचे नाते स्पष्ट होते. हे नाते आपल्या शब्दांत मांडू या.**



## करा आणि शिका

**आपापल्या देशामधील पाण्याच्या परिस्थितीबद्दल माहिती गोळा करू या आणि ती वर्गात सादर करू या.**

- तुमच्या देशातील पाण्याचे मुख्य स्त्रोत कोणते?
- जलप्रदूषण किती प्रमाणात आहे? त्याची कारणे कोणती?
- त्यासाठी कोणते उपाय केले जातात आणि तुम्ही कोणते सुचवाल?

**छ. वाचू या.**

पाण्याशी, नद्या-तलावांशी, झऱ्यांशी, अगदी पावसाळ्यापुरत्याच जिवंत होणाऱ्या ओढ्यानाल्यांशीही इथल्या माणसांचे असे जिवाभावाचे नाते होते. भारताची संस्कृती नद्यांच्या काठावर जन्मली आणि बहरली. अनेक वैभवशाली साम्राज्यांचा उदय कुठल्या ना कुठल्या नदीच्या साक्षीनेच झाला. नदीला आमच्या जगात मातेचे स्थान होते. ती पवित्र होती, जीवनदायिनी होती, जीवनाचे प्रतीक होती. आज वयाची सत्तरी गाठलेल्या पिढीच्या बाळपणी सकाळची आंघोळ 'हर हर गंगे, भागीरथी; गोदावरी, नर्मदे सिंधू





कावेरी, सरस्वती...' अशा नदीनामांच्या घोषाने पूर्ण होत असे.

स्त्रियांसाठी तर नदी केवळ आईच नव्हे, तर सखीही होती. नद्यांचा उल्लेख 'कृष्णामाई', 'गोदाबाई' अशा घरगुती नावांनी होत असे. त्यांच्या किनारी घटकाभर विसावा घेत मन मोकळे करण्याचे ते हक्काचे ठिकाण होते. डोळ्यांतून वाहणाऱ्या अश्रूंनाही 'गंगा-यमुना' म्हणत. दोन नद्यांची भेट जिथे होते आणि त्या दोघींचा पुढचा प्रवास हातात हात घालून जिथून सुरू होतो ते संगमाचे ठिकाण तर तीर्थक्षेत्रच मानले जाई. 'कृष्णा मिळाली कोयनेला । तसंच माझं माहेर बाई येऊन मिळालं सासरला ॥' अशी नद्यांशी नात्यांची जवळीक असे. ज्या प्रदेशात नद्या नाहीत तिथे तलाव असत. काही नैसर्गिक तर काही माणसांनी बांधलेले. एके काळी महाराष्ट्रातील विदर्भ प्रांतात चार हजारांहून अधिक तलाव होते म्हणे!

गेले ते दिवस! प्रगतीच्या झंझावातात सारे वाहून गेले किंवा बुजून उजाड झाले. घरोघरी नळांतून पाणी पोहोचले आणि नदी, ओढे, तलाव आमच्या आयुष्यातून वजाच झाले. आता पावसाळ्यात नदीला क्वचित पूर वगैरे आलाच, तर तिच्या पुढ्यात उभे राहून सेल्फी काढण्यापुरतीच ती आमच्यासाठी उरली आहे. नव्या शहरी पिढीतील किती जणांना 'आपल्या शहरातून वाहणाऱ्या नदीचे नाव काय?' ह्या प्रश्नाचे उत्तर पटकन देता येईल, कोण जाणे! अलीकडेच, लहानपणापासून मुंबईत राहिलेली एक स्मार्ट कन्यका भेटली. तिने एकदाही मुंबईचा समुद्र पाहिलेला नव्हता. हे खरे आहे, समुद्राशप्पथ!

पाणी नावाच्या जीवनापासून आमची अशी फारकत झाली आहे. देशातील, आणि अर्थातच महाराष्ट्रातीलही, एकही नदी, एकही तलाव त्यात पायही बुडवण्याच्या लायकीचा आम्ही ठेवलेला नाही आहे. एका ढांगेत ओलांडता येईल अशा किरकोळ नदीपासून समुद्रासारख्या पसरलेल्या महानद्यांपर्यंत सर्वांचे आम्ही गटारात रूपांतर करून टाकले आहे. आम्ही नेत्रदीपक प्रगती केली आहे.

**अ. उताऱ्यातील अधोरेखित शब्दांचे अर्थ ओळखू या.**

| | |
|---|---|
| १. जिवाभावाचे | क. विश्रांती |
| २. उदय | ख. चक्रीवादळ |
| ३. साक्षीने | ग. नाहीसे होणे, न उरणे |
| ४. प्रतीक | घ. धार्मिक यात्रेचे ठिकाण |
| ५. घोष | च. एखादी नवी गोष्ट उत्पन्न होऊन प्रत्ययास येणे |
| ६. घटकाभर | छ. एखाद्याच्या डोळ्यांदेखत, नजरेसमोर |
| ७. विसावा | ज. जिथे दोन नद्या एकत्र येतात ते ठिकाण |

| | |
|---|---|
| ८. संगम | झ. विलग / वेगळे होणे, संबंध न उरणे |
| ९. तीर्थक्षेत्र | ट. बोध करून देणारा संकेत किंवा चिन्ह |
| १०. झंझावात | ठ. चालताना जास्तीत जास्त अंतरावर टाकलेले पाऊल |
| ११. उजाड | ड. जवळचे |
| १२. वजा होणे | ढ. पाण्याचे एक नाव |
| १३. फारकत होणे | ण. काही काळ सातत्याने होत राहणारा उच्चार किंवा ध्वनी |
| १४. ढांग | त. भव्य, प्रभावशाली |
| १५. नेत्रदीपक | थ. थोडा वेळ |
| १६. जीवन | द. वैराण, कोरडे झालेले |

**आ. उताऱ्यातील ह्या वाक्यांचे स्पष्टीकरण देऊ या.**

१. भारताची संस्कृती नद्यांच्या काठावर जन्मली आणि बहरली.

---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

२. नदीला आमच्या जगात मातेचे स्थान होते.

---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

३. स्त्रियांसाठी तर नदी केवळ आईच नव्हे, तर सखीही होती.

---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

४. गेले ते दिवस!

---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

५. पाणी नावाच्या जीवनाशी आमची फारकत झाली आहे.

---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

## ३ पाण्याकरिता दाही दिशा

क. मुळातली 'अन्नाकरिता दाही दिशा । अम्हां फिरविशी जगदीशा ॥' अशी ओळ आता 'पाण्याकरिता दाही दिशा...' अशी बदलून घेण्याची वेळ आली आहे. माणसे – म्हणजे मुख्यतः स्त्रियाच – पाण्याच्या शोधात मैलोन्‌मैल वणवण करत असतात. ह्या परिस्थितीबद्दल चर्चा करू या.



ख. दोन ते तीन विद्यार्थी एकत्र येऊन खालीलपैकी एक घोषवाक्य निवडू या; त्यावर एक जाहिरात, कथा किंवा एक दृक्‌श्राव्य टिपण तयार करून वर्गात सादर करू या.

| 'झाडे जगवा, पाणी वाचवा' | 'पाणी हे जीवन आहे' | 'थेंबे थेंबे तळे साचे' |
|---|---|---|

ग. एक लोककथा

"चांगली चांगली कामं करत जा..."

कूडन, बुढान, सरमन आणि कौंराई अशी होती त्या चार भावांची नावे. चौघेही सकाळी लवकर उठून शेतावर कामाला जात. दुपारी कूडनची मुलगी त्यांच्यासाठी जेवण बांधून घेऊन येई.

एक दिवस शेताकडे जाताना मुलीचा पाय एका टोकदार दगडाला अडखळला आणि तिला ठेच लागली. तिला भारी राग आला. हातातल्या कोयत्याने तिने तो दगड उखडण्याचा प्रयत्न केला, तर काय! कोयता दगडाला लागताच त्याचे लोखंडी पाते सोन्याचे झाले. मग जे व्हायचे ते सगळे झपाट्याने झाले. मुलगी तो दगड घेऊन धावत धावत शेतावर पोचली. झाली गोष्ट तिने आपल्या वडिलांना आणि काकांना एका दमात सांगितली. चौघा भावांच्या तोंडून शब्दच फुटला नाही. सगळे जण धावत घरी आले. त्यांच्या लक्षात आले होते, की हा काही सामान्य दगड नाही आहे. हा परीस आहे. ज्या वस्तूला त्याचा स्पर्श होतो ती सोन्याची होते. चौघांचेही डोळे चमकले.

पण डोळ्यांतली ती चमक फार काळ टिकली नाही. कूडनच्या लक्षात आले, की आज ना उद्या ही गोष्ट राजाच्या कानावर जाईल आणि तो हा दगड आपल्याकडून हिसकावून नेईल. तेव्हा आपण स्वतःहूनच राजाकडे जावे आणि सगळे त्याला सांगून टाकावे हे बरे.

पुढे जे काही घडले ते म्हणजे लोखंडाचे सोने करण्याची नव्हे, तर परीसस्पर्शाने सगळ्या समाजाचेच सोने करण्याची गोष्ट झाली.

राजाने परीसही घेतला नाही आणि सोनेही घेतले नाही. ते कूडनला परत देऊन तो म्हणाला, "जा. ह्याचा उपयोग करून चांगली चांगली कामे करत जा. तलाव बांधत जा."

ही गोष्ट खरी, ऐतिहासिक आहे का? माहीत नाही. पण देशाच्या मध्य प्रदेशात पाटन नावाच्या भागात चार खूप मोठे तलाव आजही आहेत. चारही तलावांना ह्या चार भावांची नावे आहेत – बूढा सागर, सरमन सागर, कौंराई सागर आणि कुंडम सागर.

("आज भी खरे हैं तालाब" ह्या मूळ हिंदी पुस्तकातून साभार. प्रकाशक : गांधी शांती प्रतिष्ठान)

गेले ते दिवस, जेव्हा कवी सागरांवर, काठोकाठ भरून वाहणाऱ्या नद्यांवर कृतज्ञ भावनेने खंडकाव्ये रचत होते. सामान्य जन आपल्या लोकगीतांमधून, लोककथांमधून पुढच्या पिढीपर्यंत तोच निरोप पोचवत होते – 'पाणी आहे तर हे जग आहे. पाणी जीवन आहे.' नदीच्या प्रवाहात उभे राहून आणि ओंजळीत स्वच्छ नितळ पाणी घेऊन लोक उगवत्या सूर्याला ते अर्पण करत होते. तलाव बांधणे, विहिरी खोदणे हे मोठ्या पुण्याचे काम मानले जात होते. त्या कामात आपला वाटा उचलणे आणि पुढे त्या पाणीसाठ्याची जपणूक करणे हे आपले कर्तव्य आहे असे समाजातील सर्वांनाच वाटत होते.



आज नदीच्या नासलेल्या, विषारी प्रवाहाकडे चोरूनसुद्धा बघण्याची कुणाही संवेदनशील व्यक्तीची हिंमत होत नाही, कारण आपल्याच पापांचा सारा हिशेब नजरेसमोर येतो. शेवटी त्याची गोळाबेरीज असते : विनाश!

**असे म्हणतात, की अंधार खूप दाटून येतो तेव्हा ती लवकरच पहाट होणार असल्याची सूचना असते. असा अंधार दाटून आला आहे असे तुम्हाला वाटते का? असल्यास, पहाटेची सूचना आहे असे तुम्हाला वाटते का? विस्ताराने स्पष्टीकरण लिहू या.**

**घ. वाचू या.**

### पूर्वाश्रमीचे तळे

"कुठं गेलावतास रं एवढ्या उनाचा? अन् कुडत्याला चिखल कशानं लागलाय?" अण्णांनी सतीशला विचारलं.



"हं; लागलाय," सतीशनं तुटक उत्तर दिलं. मग अंगावरचा शर्ट काढला; झटकला आणि खुंटीवर अडकवला.

"आरं! धुवायला दे लगेच! डाग जात न्हाईत नंतर."

"कशानं धुवायचं? आहे का घरात तांब्याभर तरी? की एका शर्टासाठी वहिनीला ओढ्यावर पाठवू उन्हाचं?" सतीश एकदम उसळला.

"गेला कशाला हुतास मग चिखलात?" अण्णाही उखडले, "आन् चिखल गावला तरी कुठं तुला? हितं रडायचं म्हटलं तर डोळ्यांतबी टिपूस शिल्लक न्हाई न् तुला बरा चिखल सापडला!"

"विहिरीत उतरलो होतो. कुत्रं पडलं होतं आत. पाणी शोधत आसल. ते तर नाईच मिळालं, उलटं कुत्रं आत अडकून बसलं. ओरडत होतं. काढाय नको?"

अण्णा काही बोलले नाहीत. सतीशनं खांद्यावर उसवलेला एक जुना टी-शर्ट अंगात अडकवला न् बाहेर जाण्यासाठी त्यानं चपला सरकवल्या.



"आता कुठं?", अण्णा डोळे वटारून म्हणाले.

"तळ्याकडं. घाबरू नका, जीव द्यायला नाई चाललो! त्यासाठी तळ्यात पाणी असावं लागतंय", सतीश तिरसटून म्हणाला आणि बाहेर पडला.

गावापासून मैलभर अंतरावर एक भलंमोठं मोकळं मैदान होतं. अण्णांच्या आजोबांच्या लहानपणी तिथं मोठं तळं होतं म्हणे. खरंखुरं, पाण्यानं भरलेलं तळं. भोवती बऱ्यापैकी, बारक्यासारक्या शिकारी करता येण्याइतपत दाट झाडी होती. गुराढोरांसकट सगळ्या गावाच्या आंघोळी तळ्यात व्हायच्या. पोरं पाण्यात डुंबायची. दिवसभर तळ्याचा काठ गजबजलेला असायचा.

हळूहळू तळ्यात गाळ साचत गेला. अण्णांची पिढी वयात आली त्या सुमारास पाणी खेचणाऱ्या मोटारी आल्या. तळ्यात होता तसाच गाळ लोकांच्या डोक्यातही साचण्याइतके राजकारणाचे खेळ सुरू झाले. 'तळ्यातला गाळ काढा रे, बाबांनो!' असं सांगणारे दोन-चार शहाणे म्हातारे गावात होते, पण त्यांचं सांगणं कुणाला ऐकूच येईना. ते मेल्यावर तर रानच मोकळं झालं. मोटारींनी पाणी खेचून खेचून तळं साफ केलं. बिथरलेल्या पावसानं पाठ फिरवली. भोवतीची झाडी जमेल तेवढी तोडून लोकांनी खाल्ली, उरलेली उन्हानं जाळली. आता तेव्हाच्या आठवणी काढत एक वडाचं खोड, अन् दोन-चार चिवट बाभळी तेवढ्या उभ्या आहेत. झाडांपाठोपाठ पाखरं गेली, प्राणी फिरकेनासे झाले. क्रिकेटच्या वर्ल्ड कपाची स्पर्धा भरवता येईल असं सपाट मैदान फक्त मागं उरलं आहे.

अशा त्या तळ्याकाठी एखाद्या बाभळीच्या हातभर सावलीत सतीश बसून राहत होता. शक्य तितका वेळ घरापासून दूर, गावापासून दूर. घरच्या शेताकडे तर तो फिरकतही नव्हता. बापाशी भांडून भांडून शिकला होता, पदवी मिळाली होती ती काय चिखलात पाय घालण्यासाठी? तेव्हा वाटायचं, एवढं शिकल्यावर एकच काय, छप्पन्न नोकऱ्या घरी चालत येतील. पण उलट, स्वतः छप्पन्न उंबरे झिजवले तरी अर्धवेळही नोकरी मिळणं कठीण झालं होतं. कधी मिळाली तरी ती कायम नव्हती. सहा सहा महिने पगार हातात पडत नव्हता.

सतीशच्या वयाची तिशी उलटली होती तरी लग्नाचा पत्ता नव्हता. गावाचं नुसतं नाव कळलं, की मुलीच्या आणि तिच्या घरच्या लोकांच्या चेहऱ्याचा रंग बदलत होता. 'पाण्यासाठी वणवण करायला पोरगी कशी हो देणार तुम्हाला? हे म्हणजे जाणूनबुजून तिला कोरड्या विहिरीत ढकलून देणं झालं! त्यात मुलाला भरवशाचा काही कामधंदाही नाही!' हे प्रत्येक वेळी ऐकावं लागत होतं. मुलीही नकार देऊ शकतात हे पचवणं सतीशला फार जड जात होतं.

ह्या सगळ्याची मनाशी उजळणी करत सतीश त्या पूर्वाश्रमीच्या भकास तळ्याकाठी दिवसचे दिवस बसून राहत होता... आणि निव्वळ बसूनच राहत होता.

**अ. खालील शब्दांचा अर्थ ओळखू या.**

| | |
|---|---|
| १. तुटक | क. चिडून |
| २. उसळणे, उखडणे | ख. बेशिस्त वागणारा |
| ३. टिपूस | ग. अलिप्त |
| ४. तिरसटून | घ. गरजेपोटी अनेकांना अनेकदा भेटणे आणि विनवण्या करणे |
| ५. बिथरलेला | च. (रागाने डोळे) मोठे करणे |
| ६. उंबरे झिजवणे | छ. चेहऱ्यावरचे भाव बदलणे |

शब्दसंपदा

| | |
|---|---|
| ७. चेहऱ्याचा रंग बदलणे | ज. थेंब |
| ८. वणवण करणे | झ. राग, चीड अशा भावनांचा एकदम स्फोट होणे |
| ९. वटारणे | ट. कष्ट करणे, धडपड करणे |

**आ. गावातील पाण्याची परिस्थिती दाखवणारी वाक्ये अधोरेखित करू या.**

**इ. प्रश्नांची उत्तरे लिहू या.**

१. वरील कथेमध्ये गावातल्या तळ्याची कोणकोणती स्थित्यंतरे दिसून येतात? लिहू या.

---

२. पाण्याला 'जीवन' असे एक नाव आहे. ते का पडले असेल ह्याचा काही उलगडा वरील उतारा वाचून होतो का?



**ई. खालील वाक्ये प्रमाणभाषेत पुन्हा लिहू या.**

१. "कुठं गेलावतास रं एवढ्या उनाचा? अन् कुडत्याला चिखल कशानं लागलाय?"

२. "आरं! धुवायला दे लगेच! डाग जात न्हाईत नंतर."

३. "गेला कशाला हुतास मग चिखलात?"

४. "आन् चिखल गावला तरी कुठं तुला? हितं रडायचं म्हटलं तर डोळ्यांतबी टिपूस शिल्लक न्हाई न् तुला बरा चिखल सापडला!"

**च. वाचू या.**

## कालचा पाऊस

कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही
सदरहू पीक आम्ही आसवांवर काढले आहे
कालपर्यंत पावलांनी रस्त्यापाशी तक्रारी मांडल्या नाहीत
झाडे करपली. माथी हरपली,
नदीच्या काठाने मरण शोधीत फिरलो
आयुष्याच्या काठाने सरण नेसून भिरभिरलो
– कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही

**- यशवंत मनोहर**

**शब्दार्थ : सदरहू** = ज्याविषयी आपण बोलत आहोत ते, **सरण** = लाकडाची चिता, **माथी** = डोकी, मस्तके, **भिरभिरणे** = दिशाहीन भटकणे

**छ. पाणी फाऊंडेशनविषयी वाचू या.**



काही वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही. टेलिव्हिजनसाठी अभिनेता-निर्माता आमिर खान ह्यांनी एका मालिकेची निर्मिती केली. तिचं नाव होतं 'सत्यमेव जयते'. भारतीय समाजातल्या सामाजिक समस्यांबद्दल चर्चा करणं आणि सर्वसामान्य प्रेक्षकाला त्या समस्यांचं गांभीर्य जाणवून देणं, हा त्यामागचा उद्देश होता. ह्या प्रकल्पामध्ये काम करण्याची मला संधी मिळाली.

गंभीर असूनही ह्या मालिकेची देशभरात चर्चा झाली. दर आठवड्याला एक ह्याप्रमाणे आम्ही एकूण चोवीस सामाजिक समस्या निवडल्या होत्या. प्रेक्षकांच्या ज्या प्रतिक्रिया आम्हाला मिळत होत्या त्यावरून लक्षात आलं, की कार्यक्रम केवळ बघून न थांबता लोक अनेक ठिकाणी समस्या सोडवण्यासाठी कृतीही करायला लागले होते. आमच्या मनात विचार आला, की आपणही असा प्रयत्न का करू नये? आपला आवाका ओळखून जे करता येईल तेच करायचं. म्हणजे प्रसारमाध्यमांचा वापर करायचा. आपल्याकडे कलाकार, दिग्दर्शक, लेखक म्हणून जी कौशल्यं आहेत त्यांचा उपयोग करायचा; त्यातून लोकचळवळ – तीही महाराष्ट्रातच – उभी करायची.

पण किती आणि कोणत्या समस्या हाती घ्यायच्या हाही प्रश्न होता. चर्चा केल्यानंतर शेवटी एकाच समस्येवर लक्ष केंद्रित करावं असं ठरलं. आजच्या घटकेला संपूर्ण भारतात पाण्याची समस्या अतिशय गंभीर झाली आहे, हे आम्हाला तीव्रतेनं जाणवलं. पाण्याशिवाय उदरनिर्वाह शक्य नाही; शेती, उद्योगधंदे, आरोग्य, स्वच्छता, शिक्षण, पर्यावरण वगैरेही शक्य नाही, कारण पाण्याशिवाय समृद्ध आणि शांततापूर्ण जीवनच शक्य नाही. ही समस्या सोडवता आली तर

अनेक क्षेत्रांच्या समस्याही आपोआप सुटत जातील.

भारतात आणि महाराष्ट्रातही दुष्काळावर मात करण्याचे आजवर अनेक प्रयत्न झाले आहेत. अनेक व्यक्ती आणि संस्थांनी सातत्यानं प्रयत्न करून त्यात यशही मिळवून दाखवलं आहे. गेल्या पन्नास वर्षांबद्दल सांगायचं, तर पुरंदर तालुक्यातले विलासराव साळुंखे, नगर जिल्ह्यातले अण्णा हजारे आणि नंतर पोपटराव पवार ह्यांची उदाहरणं देता येतील. त्यांनी आपापली गावं आणि परिसर पाणीदार करून दाखवला. पावसाचं पाणी वाहून वाया जातं. ते अडवून आणि जमिनीत जिरवून पाणीसाठा वाढवता येतो, वर्षभर विहिरी भरलेल्या राहतात आणि दुष्काळातही माणसांवर स्थलांतर वगैरे करण्याची वेळ येत नाही, हे ह्या लोकांनी प्रत्यक्ष सिद्ध करून दाखवलं. 'धावणाऱ्या पाण्याला चालायला शिकवा; चालणाऱ्या पाण्याला थांबायला शिकवा; थांबलेल्या पाण्याला जमिनीत मुरायला शिकवा', असं साधं सूत्र त्यांनी वापरलं. सोपं आणि कमी खर्चिक सूत्र.



हे सगळं पाहून आम्हाला वाटलं, की पाच-दहा गावं गावकऱ्यांच्या एकतेच्या आणि श्रमदानाच्या बळावर जर एवढं साध्य करू शकतात, तर हेच राज्यपातळीवरही का करता येऊ नये? माहिती मिळवून अभ्यास केल्यावर जाणवलं, की गावकऱ्यांमध्ये 'आपले प्रश्न आपणच सोडवायचे' अशी भावना निर्माण झाली, आपसातले मतभेद विसरून माणसं एकदिलानं कामाला लागली तरच हे शक्य आहे. हे आव्हान 'पाणी फाऊंडेशननं' स्वीकारलं. त्यातूनच 'सत्यमेव जयते वॉटर कप स्पर्धा' भरवण्याची कल्पना जन्माला आली. गावात आलेलं पाणी गावातच थांबवून ठेवण्याची स्पर्धा. त्यात भाग घ्यायचा ग्रामपंचायतीनं, काम करायचं गावकऱ्यांनी आणि त्यांना प्रशिक्षण द्यायचं फाऊंडेशननं. ज्या गावांनी पूर्वी हे काम करून दाखवलं आहे अशा गावांमध्येच प्रशिक्षणवर्ग भरवायचे. भाग घेणाऱ्या प्रत्येक गावानं तीन पुरुष आणि दोन महिला असा गट त्याकरता पाठवायचा.

पहिला प्रशिक्षणवर्ग झाला तो हिवरेबाजार ह्या गावात. त्या गावानं पाण्याचा प्रश्न सोडवल्यावर तिथल्या एकूणच जीवनशैलीमध्ये पडलेला फरक लोकांना प्रत्यक्ष पाहता आला. प्रशिक्षण पूर्णपणे निरीक्षण आणि कृतीवर अवलंबून असल्यानं सर्वांना चांगला अनुभव मिळाला. शिवाय स्पर्धेमध्ये यंत्रांचा कमीत कमी वापर करणं आणि श्रमदान करणं याला महत्त्व असल्यानं प्रत्येक सहभागीच्या मनावर जो परिणाम झाला तो अपूर्व होता. परस्परांबद्दल विश्वास आणि सहकार्याची भावना निर्माण झाल्यावर अशक्य ते शक्य होतं यावर आमचा विश्वास होताच.

तीन वर्षांमध्ये कामात पंचवीसपट वाढ झाली. २४ जिल्हे, ७६ तालुके आणि ४७०६ गावांपर्यंत स्पर्धा पोचली. त्यातून आजपर्यंत अंदाजे पन्नास हजार कोटी लिटर एवढी पाणीसाठ्याची क्षमता वाढली. ही फक्त सुरुवात आहे. आणखी खूप काम करायचं आहे. आमचं ब्रीदवाक्य आहे – 'मनसंधारणातून जलसंधारण'. माणसांची मनं जुळली तर पाणीही जमिनीत मुरेल आणि महाराष्ट्र 'सुजलाम् सुफलाम्' होईल.

**- सत्यजित भटकळ**

**ज. पाण्याची रोजनिशी**

**कंसातील योग्य नाम / शब्द + क्रियापद जोडी वापरून रिकाम्या जागा भरू या आणि वाक्ये पूर्ण करू या.**

(उदा. आढावा घेणे, हट्टाला पेटणे, अप्रूप वाटणे, इतिहास घडणे, प्रत्यक्ष पाहणे, बाह्या वर सरकवणे, स्वागतासाठी उभे असणे, स्तब्ध होऊन ऐकणे, ऋण फेडणे, कुजबुज वाढणे)

'वॉटर कप' स्पर्धेचा शेवटचा टप्पा. सहभागी गावांना भेटी देऊन कामाच्या प्रगतीचा आढावा घेणं चालू होतं.

## गाव दावतपूर

जोमानं काम चालू होतं. तरुणांचा गट विशेष सक्रिय होता.

"कुदळ येती का हानता?" इरफाननं विचारलं.

मी (अ) ------------------------------, कुदळ हातात घेतली आणि घाव घालायला सुरुवात केली. मंडळींनी टाळ्या वाजवल्या. 'जमतंय की लेका!' अशी हलक्या आवाजातली (आ) ------------------------------. माझ्याबरोबर आलेला मित्र, त्याची पत्नी आणि दोन लहान मुलंही पुढं सरसावली. बघता बघता अनेक हात चालू लागले. कपाळावरून ओघळता घाम भुई भिजवत राहिला. सगळे मिळून एखादे (इ) ------------------------------ आहोत असं वाटलं.

## गाव नदी हात्तरगा



नावातच फक्त नदी आहे. दुष्काळानं गावच्या तोंडचं पाणी कधीच पळवलंय. गावानं स्पर्धेत भाग घेतल्यापासून तिथले ग्रामसेवक अजित देशमुख आणि शिक्षक अन्वर पटेल (ई) ------------------------------ आहेत. एकच ध्यास, श्रमदानाचा. शाळेतली पोरं ऐन सुटीत एकत्र करत मास्तरांनी काम चालवलं होतं. "पैसे मिळनार न्हाईत, मग का करावं आमी काम?" असा गावकऱ्यांचा प्रश्न होता.

"काम तुमचं, मग कुणी तुम्हाला का पैसे द्यावेत?' मी त्यांना विचारलं, "मास्तरांना मिळालेत पैसे? दाखवून द्या बरं मला! पैशातून जो आनंद मिळत नाही तो मिळवण्यासाठी तर काम करताहेत हे लोक. बाजूच्या गावात (उ) ------------------------------ असताना तुम्ही कोरडेच राहणार का? गावात नदी असूनही दुष्काळात 'पाणी पाणी' करणार? तुमच्या नशिबानं असा शिक्षक मिळालाय, तर त्याला साथ द्या की!"

खरंच मला त्या मास्तरांचं (ऊ) ------------------------------ होतं. कसं कळलं असेल सत्यजितला आणि आमिरला, की जगात अशीही माणसं असतात? विश्वास, माणसावरचा, चांगुलपणावरचा विश्वास ही अजब चीज आहे. खरोखर गावोगावी अशी माणसं सापडत होती.

## गाव शिराळ

संतोषनं चारचारदा फोन करून टुमणं लावलं होतं : “सर, शिराळला एक सहावीतली पोरगी आहे. एकटीच काम करतीय. तितं तेवढं जाच!”

रात्रीच्या अंधारात तासभर प्रवास केल्यावर अखेर एकदाचं शिराळ आलं. गाव ओलांडल्यावर पलीकडं एका शेतातल्या घराच्या आवारात ती सहावीतली पोरगी आमच्या (ए) ------------------------------------------. किमया विनोद आजबे नाव तिचं. मोठाले चमकदार डोळे, निरागस चेहरा. अंथरलेल्या स्वच्छ जाजमावर आम्ही सगळे तिच्याभोवती कोंडाळं करून बसलो. तिचे आई-वडील, थोरली बहीण आणि गुडघ्याएवढा धाकटा भाऊही येऊन बसले.

“टीव्हीवर ‘तुफान आलंया’ कार्यक्रम बघून मी मागच्या वर्षी एकटीनं चारी खणली. या वर्षी आई-बाबा प्रशिक्षणाला जाणार म्हटल्यावर मीपण हट्ट केला आणि त्यांच्यासंगं गेले. तिथनं आल्यावर नाटिका लिहिली एक. मैत्रिणींना घिऊन बसवली नि ग्रामसभेत करून दाखवली. शिक्षकांना सांगून आमी मैत्रिणींनी सहा हजार रोपांची रोपवाटिका केली अन् श्रमदानाला सुरुवात केली. गावकरी कुनी येईचनात. आमी घरोघरी जाऊन बोलावलं, तं म्हनायचे, “तू हो फुडं, आमी आलोच;” पन कुनीच यायचं नाई. आता आमीच साताठ जनी काम करतो. कोनी नाई आलं तरी मी करनारेय. माज्यासाटी माजी आजी आली. गावातल्या बायका वरडत्यात, ‘काय सारकं येतीस गं! जा तिकडं; आमाला कामं हायेत.’ आसं म्हनतात अन् टीव्ही बगत बसत्यात.”

किमया सगळं हसत हसत सांगत होती आणि आम्ही (ॲ) ------------------------------------ होतो. कोण आहे ही पोरगी? हिला कष्टाची, उन्हाची, भोवतालच्या अज्ञानाचा अंधार ह्या कशाकशाचीच भीती नाही. आम्ही कुरकुरतो की इथली मातीच आजारी आहे. पण ही मुलगी काय, खडकतचा विजयभाऊ काय, हातवळण्याचा समीर सय्यद, संतोष, इरफान, बावीच्या आयाबाया अन् त्यांची मुलं, ही सारी ह्याच मातीत जन्मली ना? जितेंद्र, माझा अभिनेता मित्र मला म्हणालाच होता : “गिरीश, मी प्रशिक्षणाला गेलो होतो. आपल्या गावात पाणी आणण्याचं स्वप्न घेऊन आलेली हजारो माणसं मी (ऐ) ---------------------------------------------------------- आहेत. माझा विश्वास वाढलाय, कवितेवरचा आणि स्वप्नावरचा!”

**- गिरीश कुलकर्णी**



## दृष्टिक्षेप

| | | |
|---|---|---|
| तो पाणसाप, ते - | ती पाणवनस्पती, त्या - | ते पाणगवत, ती पाणगवते / पाणगवतं |
| तो पाणक्या, ते पाणके | ती पाणचक्की, त्या पाणचक्क्या | ते पाणकणीस, पाणकणसे / पाणकणसं |
| तो पाणबुड्या, ते पाणबुडे | ती पाणपोई, त्या पाणपोया | ते जलपान |
| तो पाणपक्षी, ते - | ती पाणबुडी, त्या पाणबुड्या | ते जलसंधारण |
| तो पाणकोंबडा, ते पाणकोंबडे | ती पाणीटंचाई | ते जलयान, ती जलयाने / जलयानं |
| तो पाणउतारा | ती पाणकळा | ते जलावरण, ती जलावरणे / जलावरणं |
| तो जलनिधी, ते - | ती पाणशेंग, त्या पाणशेंगा | ते जलोत्सारण |
| तो जलविहार | ती जलक्रीडा, त्या - | ते जलचक्र |
| तो जलाशय, ते - | ती जलसंपदा | ते टिपूस, ती टिपुसे / टिपुसं |
| तो ओढा, ते ओढे | ती जलविद्युत | ते तळे / तळं, ती तळी |
| तो तलाव, ते - | ती जलसमाधी, त्या जलसमाध्या | ते डबके / डबकं, ती डबकी |
| तो झरा, ते झरे | ती जीवनदायिनी, त्या - | ते अरण्य, ती अरण्ये / अरण्यं |
| तो काठ, ते - | ती घटका, त्या - | ते तीर्थक्षेत्र, ती तीर्थक्षेत्रे / तीर्थक्षेत्रं |
| तो घोष, ते - | ती ढांग, त्या ढांगा | ते कारंजे / कारंजं, ती कारंजी |
| तो विसावा | ती वणवण | ते मनसंधारण, मनसंधारणे / मनसंधारणं |
| तो संगम, ते - | ती उपाययोजना, त्या - | |
| तो झंझावात, ते - | ती हाणामारी, त्या हाणामाऱ्या | |
| तो धबधबा, ते धबधबे | ती नांदी, त्या नांद्या | |
| तो पर्जन्ययज्ञ, ते - | ती खुंटी, त्या खुंट्या | |
| तो गाळ | ती साठवण, त्या साठवणी | |
| तो जलचर, ते - | ती दशा, त्या - | |
| तो टिपूस, ते | | |

## क्रियापदे

ओघळणे, बरसणे, झोडपणे, उसळणे, फुसांडणे, पाझरणे, ठिबकणे, जिरणे, जिरवणे, साठवणे, तरंगणे, न्हाणे, खंगाळणे, विसळणे, फवारणे, आटणे, बहरणे, ओसरणे, उद्भवणे, ढासळणे, झटकणे, उसवणे, उखडणे, तिरसटणे, डुंबणे, साचणे, बिथरणे, फिरकणे, मुरणे

## विशेषणे / क्रियाविशेषणे

ठोक्याठोक्याचे, अंधुकशी, सपाट, गारसर, घटकाभर, उजाड, नेत्रदीपक, सर्वानुमते, सुरकन्, गटागटा, खळखळ, हृदयद्रावक, खारे, तुटक, तांब्याभर, उसवलेले, तिरसटून, बिथरलेले, चिवट, पूर्वाश्रमीचे, भरवशाचे, भकास, निव्वळ, पाणीदार, पाणलोट, ओसाड

## म्हणी

| | |
|---|---|
| जळी स्थळी काष्ठी पाषाणी | तळे राखी तो पाणी चाखी |
| पाण्यात / जळात राहून माशाशी वैर करू नये | |

जळामध्ये मासा । झोप घेतो कैसा ।
जावे त्याच्या वंशा । तेव्हा कळे ॥

## वाक्‌प्रचार

आयुष्यातून वजा होणे, उंबरे झिजवणे, चेहऱ्याचा रंग बदलणे



## नाम / इतर शब्द + क्रियापद

फारकत होणे, परिस्थिती उद्भवणे

## आता मला हे येतं...

**'पाणी' ह्या विषयावरील शब्दसंपदा अभ्यासणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**'पाणी' ह्या विषयावरील साहित्यिक उतारे वाचणे, समजणे, त्यांवर चर्चा करणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**पाण्याची समस्या ह्या विषयाचा अभ्यास करणे, त्यावर बोलणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**पाणी प्रश्नावर झालेल्या आणि सुरू असलेल्या चळवळींबद्दल वाचणे, त्यावर चर्चा करणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

## पाठ्यपुस्तक व अभ्यासपुस्तकात आलेले ध्वनिमुद्रित उतारे व संवाद यांचे अनुलेखन

### पाठ १ - खेळ आणि आरोग्य

### ७. माझीपण मंगळागौर

**मानसी :** आई, मला ना, तुला काही तरी विचारायचंय.

**सुचेता :** विचार ना मग! परवानगी कशाला हवीय?

**मानसी :** मला सांग, तू माझी मंगळागौर करणार आहेस का?

**सुचेता :** हे काय नवीनच? तुझा कधीपासून ह्या गोष्टींवर विश्वास बसायला लागला?

**मानसी :** अगं, माझ्या ऑफिसातल्या मैत्रिणी आहेत ना; पुनीत कौर, एव्हलिन, मिलन शर्मा, बिपाशा, त्या विचारतायत. त्यांना ना, 'बाजीराव-मस्तानी' सिनेमातल्यासारखा खराखुरा पिंगा बघायचाय आणि करायचाही आहे.

**सुचेता :** कर्म माझं! म्हणजे त्या आपल्याकडे आल्यावर दीपिका आणि प्रियांकासारखा नाच करणार आहेत की काय? अगं, देवा-धर्माचं राहू दे, पण ह्या व्रतामागचा खरा अर्थ, त्यामागचा विचार आधी समजावून घ्या म्हणावं त्यांना; आणि तूही घे समजावून.

**मानसी :** मग सांग ना मला थोडक्यात! मी सांगते त्यांना.

**सुचेता :** अगं, मी म्हटलं ना, ह्या व्रतामागचा विचार मला महत्त्वाचा वाटतो. नवीन लग्न झालेल्या मुलीनं लग्नानंतर पहिली पाच वर्षं श्रावण महिन्यात दर मंगळवारी हे व्रत (म्हणजेच पूजा) करायचं असतं. पूर्वीच्या काळी अगदी लहान वयात लग्नं होत. मुलींना आपलं लहानपण मागं ठेवून सासरी संसाराच्या धबडग्यात अडकावं लागे. त्यांना थोडा विरंगुळा मिळावा; नाच, गाणी, खेळ ह्यातून त्यांचं मनोरंजन व्हावं आणि काही नवं शिकायलाही मिळावं, हा ह्या सर्व रूढी आणि परंपरांमागचा खरा उद्देश असे. तुझ्या मैत्रिणींना हे खेळच बघायचे आहेत ना? मग या म्हणावं रात्री जागरणाला.

**मानसी :** खेळ म्हणजे मज्जाच गं! तेच तर बघायचेत माझ्या मैत्रिणींना. कोणकोणते खेळ खेळायच्या त्या बायका? आम्हाला फक्त पिंगा आणि फुगडीच माहीत आहे ना!

**सुजाता :** थोडे का आहेत ते खेळ? झिम्मा, फुगडी, आगोटापागोटा, टिपऱ्या, लाटा बाई लाटा, गाठोडं असे अनेक खेळ. अगं, मी तर वाचलंय, की एकशे दहा प्रकारचे खेळ खेळले जायचे म्हणे. फुगड्याच एकवीस प्रकारच्या आहेत. आणि बरं का, ह्या खेळांना लागणारं साहित्य ह्या बायकांना घरातच मिळायचं. सूप, लाटणं, परात अशा घरातल्याच वस्तू.

**मानसी :** अरे वा! मज्जाच की! पण ह्या खेळांचा उपयोग फक्त मनोरंजन हाच असायचा का?

**सुजाता :** छे गं! शरीराच्या सर्व अवयवांना व्यायाम मिळावा हा मुख्य उद्देश असायचा. शिवाय केवळ घरकामात अडकलेल्या बायकांना आनंदही मिळे. खेळताना त्या गाणीही म्हणत. मंगळागौर हे व्रत कष्टाचं, दमणुकीचं नसून मनाला चैतन्य देणारं आणि सामूहिक जगण्याचा आनंद देणारं आहे, हे लक्षात येतंय ना? हे बघ, मी तुला एक लिंक देते, ती तुझ्या मैत्रिणींना हे खेळ बघण्यासाठी दे, म्हणजे इथे येण्याआधी जरा तयारीपण होईल त्यांची. काय वाटतंय?

**मानसी :** वाऽव! ग्रेट आयडिया! खूश होणारेत सगळ्या.

## पाठ २ - पेहराव आणि फॅशन

### ६. दोन इंचांचा फरक

**अलका** : "ये गं, आरती. जिने चढून आलीस की काय? घामाघूम झालीयेस ती! बैस, पाणी आणते."

**आरती** : "आले लिफ्टनंच, तरीही घामाघूम झालेय."

**अलका** : "का?"

**आरती** : "तळमजल्यावर लिफ्टमधून एक मुलगी बाहेर पडली अन् घाईघाईनं निघून गेली. आधी मला तिचा चेहरा तुझ्या धाकट्या नातीसारखा वाटला; पण म्हटलं शक्य नाही..."

**अलका** : लाल टी-शर्ट घातलेली ना? स्वराच होती ती. आत्ताच बाहेर पडली.

**आरती** : काय सांगतेस! अगं, पण ... डोक्यावर केस नव्हते तिच्या! अलके, काय झालंय?

**अलका** : उन्हाळा सुरू झालाय. उकाडा वाढलाय ना!

**आरती** : वात्रटपणा नको, अलके, काही आजारबिजार नाही ना? नीट सांग जरा.

**अलका** : नीटच सांगितलं मी तुला. डोक्याला घाम येतो म्हणून तिनं गोटा केलाय.

**आरती** : स्वतःच्या मनानं? काय गं हे! तुम्ही कुणी अडवलं नाही तिला? तू आजी तिची ...

**अलका** : तिच्या आईनंच कापले केस.

**आरती** : शाब्बास! ह्याला काय म्हणायचं? प्रगती? स्वातंत्र्य? फॅशन?

**अलका** : सगळंच. शिवाय गरजही.

**आरती** : मुलीला नाही बाई बरं दिसत ते, तू काहीही म्हण. ती म्हणाली म्हणून लगेच ऐकता कसं तुम्ही? इतकं सैल सोडू नये मुलीला.

**अलका** : आता तू जरा बावळटासारखं बोलायला लागलीयेस, आरती. आपलं लहानपण आठव. आपल्या ग्रुपमध्ये मी सोडून सगळ्यांचे बॉबकट होते. मनीषाचा तर जवळ जवळ बॉयकटच होता. आपली सकाळची शाळा असायची, तेव्हा रोज उठून दोन वेण्या घालण्याची कटकट नको, म्हणून माझी आई माझेही केस कापायला निघाली होती; पण मला लांबच केस हवे होते. आई मुकाट्यानं रोज माझ्या वेण्या घालत राहिली. तिला त्रासच होत होता. ते केसांचा गुंता काढणं, मग माझं रडणं, पाय आपटणं ... पण तिनं जबरदस्तीनं केस नाही कापले माझे. माझं निवडीचं स्वातंत्र्य तिनं मान्य केलं, तसंच स्वराचं आम्ही मान्य केलं. आमच्यात ही परंपरा आहे.

**आरती** : अगं, पण बॉबकट वेगळा, हे वेगळं. एकदम गोटाच?

**अलका** : तो काय कायमचा राहणार आहे का? केस वाढतात, आरती. बाकी जाऊ दे, तुझ्या टाळूवरच्या केसांची लांबी किती आहे? दोन इंच? दोनाचे तीन इंच झाले की तुझी पार्लरमध्ये जायला हवं म्हणून चुळबुळ सुरू होते. स्वराचे केस तुझ्यापेक्षा थोडे आणखी आखूड आहेत एवढंच. फार नाही, फक्त दोन इंचांचा फरक. काळाबरोबर एवढा तरी फरक पडणारच, नाही?

### १०. गोंदण का टॅटू? बदलते ट्रेंड्स

**रोहन** : आई, तुझी आजी, म्हणजे माझी पणजी, काय कूल होती ना? माझी आजीपण ठीकच आहे. तूच कशी गं अशी?

**आई** : अशी म्हणजे कशी रे? आणि कशावरून हा निष्कर्ष काढतोयस तू?

**रोहन** : अगं, म्हणजे तू अगदी अन-कूल आहेस. जुनाट. सदैव सगळ्याला नन्नाचा पाढा वाचणारी. ते काही नाही, मी आता टॅटू काढणार म्हणजे काढणार.

**आई** : अरे, एकदम टॅटूवर कुठे आलास? पणजीवरून सुरुवात झाली ना तुझी?

**रोहन** : मी जुने फोटो बघत होतो. पणजीच्या हातावर काय मस्त टॅटू आहे गं. 'लक्ष्मण' असं लिहिलंय, आणि त्यापुढे एका झाडाचं चित्र आहे. सो व्हेरी कूल! मी त्याचे फोटो घेतलेत माझ्या मोबाईलवर, मित्रांना दाखवायला, आणि फेसबुकवरपण टाकणार आहे.

**आई** : मेल्या, ते तुझ्या पणजोबांचं नाव आहे. आणि ते झाड म्हणजे तुळस आहे. ठोंब्या कुठला! आणि हो, तो टॅटू नाही, ते गोंदण आहे.

**रोहन** : वॉव! आपल्या लाइफपार्टनरचं नाव हातावर. पुढे एक इमेज. अत्यानंद, अत्यानंद!

**आई** : गधड्या, अत्यानंद काय?

**रोहन** : अगं, तो माझा 'की-वर्ड' आहे. आम्ही सगळ्या मित्रांनी एक एक मराठी 'की-वर्ड' घेतलाय. माझा 'अत्यानंद' आहे. आहे ना मस्त! मला काही आवडलं, की मी अत्यानंद अत्यानंद असं म्हणतो! हो, आणि मॉम, पणजीच्या चेहऱ्यावरपण टॅटू आहेत हं. छोटे ठिपके. कपाळावर, हनुवटीवर, गालावरपण.

**आई** : अरे त्याकाळी ती पद्धतच होती. नको असलं तरी गोंदण करावं लागे. कपाळावर कुंकवाच्या जागी, हनुवटीवर एक आणि गालावरपण. दृष्ट लागू नये म्हणून असेल.

**रोहन** : व्हॉटएव्हर! मीपण आता टॅटू काढणार. मस्त रंगीबेरंगी. माझं नाव आणि एक इमेज. आणि माझी गर्लफ्रेंड झाली ना, की तिचं नाव करणार टॅटू. 'सारंगी'.

**आई** : सारंगी? हे काय आणि? हापण 'की-वर्ड' आहे का?

**रोहन** : नाही गं, मैत्रीण आहे ती माझी. मी अजून प्रपोज नाही केलं. ती वाटच पाहतेय. आणि हो, तिचा 'की-वर्ड' महोत्सव आहे. महोत्सव महोत्सव!

**आई** : कहर झाला आता. तू आताशिक सोळा वर्षांचा आहेस, रोहन! थांब, बाबा येऊ दे घरी, सांगतेच त्याला तू काय गुण उधळतोयस ते. हो, आणि बाबाला माझं म्हणणं पटलं, म्हणजे ते पटेलच, की आमचा 'की-वर्ड' असेल 'मतैक्य'. मतैक्य! मतैक्य!!

## पाठ ३ - हास्यतरंग

### ७. कॉपी, कॉपी!

(अक्षयने चाचणी परीक्षेत कॉपी केल्याचे उघड झाले, त्यामुळे मुख्याध्यापकांनी त्याच्या आईवडिलांना शाळेत बोलावून घेतले आहे.)

**मुख्याध्यापक** : माझ्यासमोर ह्या दोन उत्तरपत्रिका आहेत. एक अक्षय वाडेकरची, दुसरी निषाद मनवरची.

**वडील** : निषाद! आमच्या अक्षयचा चांगला दोस्त आहे तो. दोघं कायम बरोबर असतात.

**मुख्याध्यापक** : ते आलंय माझ्या लक्षात. कायम बरोबर असण्याचंच हे फळ आहे.

**आई** : म्हणजे? अक्षयनं निषादची कॉपी केलीय? अहो, कसं शक्य आहे हे?

**मुख्याध्यापक** : तेच पाहू या आता. प्रश्न पहिला – एका सस्तन प्राण्याचे नाव सांगा. अक्षय वाडेकरचं उत्तर आहे 'गाय'. निषाद मनवरही लिहितो 'गाय'.

**आई** : सर, मला वाद घालायचा नाहीये, पण सस्तन म्हटलं की दूध देणारा प्राणीच मुलांना आठवतो ना! त्यामुळे... हा योगायोग असू शकतो असं मला ...

**मुख्याध्यापक** : दूध म्हैसही देते. पण ठीक आहे; तुमचा योगायोगाचा मुद्दा इथे मी मान्य करतो. प्रश्न दुसरा – एका माशाचे नाव सांगा. निषाद लिहितो 'बोंबील' अक्षयही लिहितो 'बोंबील'. हादेखील योगायोगच? समुद्रात इतक्या प्रकारचे मासे वावरत असतात; पण ह्या दोघा दोस्तांच्या गळांना मात्र नेमके बोंबीलच लागतात?

**वडील** : नाही, सर ... म्हणजे तुम्हाला तसं वाटणं स्वाभाविक आहे. पण काय आहे, की ही बोंबील फार छान करते. निषादच्या घरी मासे कुणाला फारसे आवडत नाहीत. त्यामुळे तो नेहमी आमच्याकडे येतो, बोंबील खायला ... म्हणून कदाचित ...

**मुख्याध्यापक** : अच्छा! मला एक सांगा, तुम्हाला ऱ्हस्व बोंबील विशेष प्रिय आहेत का?

**वडील** : ऱ्हस्व बोंबील?

**मुख्याध्यापक** : दोघाही मित्रांनी 'बि' ऱ्हस्व लिहिला आहे म्हणून विचारलं. असो. आणखी एकच प्रश्न पाहू या.

**आई** : पण सर, कॉपी अक्षयनंच केली असं कशावरून म्हणता आपण? उलटीही शक्यता असू शकते ना!

**मुख्याध्यापक** : ह्या मुद्द्याची मी वाटच पाहत होतो; पण कॉपी अक्षयनंच केली आहे. प्रश्न पाहा – एका मृदुकाय प्राण्याचे नाव सांगा.

**वडील** : कसलं काय?

**आई** : मृदुकाय.

**वडील** : तुला माहीत आहे? कमाल आहे!

**आई** : सर, ... गो ... गोगलगाय?

**मुख्याध्यापक** : त्यांना तसंच शिकवलंय वर्गात.

**वडील** : मग दोघं सारखंच उत्तर लिहिणार! कॉपी करण्याचा इथे प्रश्नच येत नाही.

**मुख्याध्यापक** : सारखं उत्तर लिहिलं तर नाहीच येणार प्रश्न.

**वडील** : म्हणजे त्यांनी वेगवेगळी उत्तरं लिहीलीयेत. मग कुणीच कुणाची कॉपी केलेली नाहीये ...

**मुख्याध्यापक** : अं हं! केली आहे. अक्षयनं निषादची कॉपी केली आहे.

**आई** : कशी काय?

**मुख्याध्यापक** : निषादनं लिहिलंय – 'मला माहीत नाही.'

**वडील** : आणि अक्षयनं?

**मुख्याध्यापक** : अक्षयनं लिहिलंय – 'मलापण माहीत नाही.'

## पाठ ४ - हे विश्वचि माझे घर

### ३. छ. सीमोल्लंघन

**निधी** : ओएऽ, कुठं आकाशात नजर लावून बसलायस?... अरेच्या! हे फार होतंय. तुला मी नकोय का इथं असायला? जाऊ मी?... बोल ना, यार, काय झालंय काय?

**नावेद** : सॉरी, निधी, पण... माझं सगळं हुकलंय... आयुष्यच हुकलंय.

**निधी** : अरे बापरेऽऽऽ! कोण आहे रे तिकडे? एक कॉफी, लवकर! युवराजांचा मूड दुरुस्त करायचाय...

**नावेद** : शट अप, यार, जस्ट... चूप, एकदम!

**निधी** : ओके, मी चूप... पण पण पण... टाईम प्लीज! त्याआधी सांग, तुझ्या कामाचं काय झालं? काय म्हणाले प्रकाशक?

**नावेद** : एकच वाक्य – असली चित्रं मुलांना समजणार नाहीत; पूर्णविराम. ह्यांना मिकी माऊस चालतो, बार्बी चालते, स्पायडरमॅन हवा असतो, पण माझं देशी काम चालत नाही. किती मेहनत घेतलीये मी यार, निधी, तू पाहिलंयस माझं काम. हे लोक एका वाक्यात ते उडवून लावतात.

**निधी** : अच्छाऽऽऽ! म्हणून चेहरा एवढा लोंबतोय तुझा!

**नावेद** : मग काय करू? मला हेच काम करायचंय, निधी, दुसरं काही मला जमणार नाही अन् आवडणार नाही, आणि इथं कुणालाच त्याची किंमत नाहीये. घरच्यांना तर नाहीच, पण बाहेरच्यांनाही नाही. कसं जमवायचं हे गणित, काही सुचत नाही.

**निधी** : सीमोल्लंघन! सीमोल्लंघन करायचं.

**नावेद** : कसलं लंघन?

**निधी** : ही: ही: ही:! लंघन नाही, बावळट, सी-मो-ल्लं-घ-न.

**नावेद** : हे काय असतं?

**निधी** : सीमा ओलांडून पलीकडे जाणं. दुसऱ्या शहरात, दुसऱ्या प्रांतात, दुसऱ्या देशात... 'हे विश्वचि माझे घर' म्हणत जगाच्या पाठीवर कुठेही... तोंड फिरवू नकोस, नावेद, मी खरंच सांगतेय.

**नावेद** : तिथे तर मला कुणी दारातून आतही घेणार नाही.

**निधी** : तुझं काम उत्तम असलं तर डोक्यावरही घेतील.

**नावेद** : आणि खर्च? मला घरादारासकट बाजारात विकलं तरीही तेवढा पैसा उभा करता येणार नाही.

**निधी** : नावेद, तुझ्या ह्या घड्याळात तारीख, वर्ष वगैरे दिसतं ना रे?

**नावेद** : हो, त्याचं काय?

**निधी** : सध्या वर्ष कुठलं चाललंय ते सांग. बघू नकोस माझ्याकडे नुसतं, वर्ष सांग.

**नावेद** : दोन हजार एकोणीस.

**निधी** : म्हणजे तुझ्या घड्याळात एकविसावं शतक चालू आहे. मग तू कुठल्या शतकात जगतोयस? मूर्ख माणसा, आता सीमोल्लंघन प्रत्यक्ष करावं लागत नाही; घरात बसूनच

ते करता येतं. काय काय करतात लोक घरात बसून! कुणी शिकतात, कुणी शिकवतात; कुणी रुग्णांवर उपचार करतात; आंतरराष्ट्रीय चर्चासत्रं घडवून आणतात; कुणी प्रवास करता करता गावाकडच्या शेतीला पाणी देतात; कुणी कधी न भेटलेल्या दिग्दर्शकाच्या चित्रपटाला संगीत देतात, तर त्यांचे गायक-वादक जिथे कुठे असतील तिथूनच गातात अन् वाजवतात. अरे, कुणी एखादा एका देशात बसून जगाच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या देशाच्या निवडणुकांचे निकालदेखील फिरवतो. गुणी माणसासाठी सगळं जग मोकळं आहे आणि तू गुणी असावास असा मला दाट संशय आहे. अरे, कॉफीचं काय झालंऽ?...

## पाठ ५ - मराठी भाषा - विविध पैलू

### ६. देवा, पाव रे पाव आता!

**डॅनिएल** : आज नाश्त्याला काय खाऊ या आपण?

**सोहम** : आमच्या इथे खालीच बेकरी आहे. तिथे गोड पाव मिळतो. आपण दूध आणि पाव खाऊ या का?

**डॅनिएल** : हो, चालेल की. मी येतो घेऊन.

**सोहम** : ठीकाय, आण. आपण पाव-पाव पाव खाऊ या. काय?

**डॅनिएल** : काय? पाव-पाव पाव? मला तीन पाव नकोत, एकच पुरे. इथला पाव मोठा असतो.

**सोहम** : हो ना, खूप मोठा असतो. म्हणूनच म्हणतोय, आपण दोघं पाव-पाव पाव खाऊ या.

**डॅनिएल** : अरे, तीन पाव नको म्हणतोय मी. एकच पुरे.

**सोहम** : एकच कसा? मी तर म्हणतोय दोघांनाही पाव-पाव पुरे. आपण दोघंही पाव-पाव पाव खाऊ या. मिहीर आणि जमीर आले, की तेही पाव-पाव पाव खातील.

**डॅनिएल** : अरे, म्हणजे एकूण किती पाव आणू मी?

**सोहम** : एक.

**डॅनिएल** : नीट मोज बरं एकदा! तू म्हणतोयस, आपण खाऊ पाव-पाव पाव. म्हणजे प्रत्येकी तीन.

**सोहम** : नाही रे, मला पाव पाव, आणि तुला पाव पाव.

**डॅनिएल** : म्हणजे तुला दोन आणि मला दोन. चार झाले की! जरा जास्तच होतायत. पण ठीकय. आणि मिहीर आणि जमीरचे रे? पाव पाव मिहीर आणि पाव पाव जमीर. म्हणजे आणखी चार. एकूण आठ! अरे बाप रे!

**सोहम** : अरे माठ माणसा, पाव पाव म्हणजे चतकोर पाव.

**डॅनिएल** : हे काय आता नवीनच? दूध - पाव खायचाय ना? चतकोर पाव काय आहे?

**सोहम** : अरे बाबा, पाव म्हणजेच चतकोर. कशाचाही चौथा भाग.

**डॅनिएल** : आता मी पुरता गोंधळून गेलोय. खायचंय काय? दूध पाव म्हणजे दुधाचा चौथा भाग? मग त्या गोल गोल गोड पावाचं काय?

**सोहम** : हाऽ हाऽ हाऽ, असा गोंधळ आहे काय? आपण तो गोल गोल गोड पाव, जो खूप मोठ्ठा असतो तो, त्याचे चार तुकडे करायचे, म्हणजे त्या एका पावाचे चार चतकोर,

म्हणजेच चार पाव पाव झाले. मग आपण सगळे एक एक पाव पाव दुधाबरोबर खाणार. चालेल ना?

**डॅनिएल :** माझं डोकं आता 'चतकोरतंय' – म्हणजे चक्करतंय रे! आणि मला वाटलं होतं, मराठी छान येते मला आता!

## ११. दिसायला सारखे दिसणारे पण उच्चारात फरक असणारे शब्द

### क.

नव्या, दिव्या आणि काव्या खास मैत्रिणी.

- आज नव्याचा वाढदिवस. ती आज नक्कीच नटूनथटून शाळेत येईल. नव्या कपड्यात नव्या किती छान दिसेल ना?
- काव्याचं नाव इतकं काव्यमय असलं तरी प्रत्यक्षात ती अगदी लबाड आहे. आम्हाला फसवण्यासाठी काव्यानं काल केलेल्या काव्याचं काय वर्णन करू?
- दिव्या हुशार मुलगी. परीक्षेत चांगले मार्क मिळवण्यासाठी ती काहीही करेल. घरातली वीज गेलेली असेल तर दिव्या रस्त्यावरच्या दिव्याखाली बसून अभ्यास करते.

### ख.

अ. उद्या / उद्यान – उद्या ना, उद्यानात आणखी सुंदर फुलं दिसतील तुला.

आ. जरा / जरा – ज्याप्रमाणे 'जरा' (थोडेसे) आणि 'जरा' (वृद्धत्व) असा अर्थात आणि उच्चारात फरक आहे तसाच 'जड' (वजनदार) आणि 'जड' (भौतिक) ह्यांच्याही अर्थात आणि उच्चारात फरक आहे.

इ. गज / गज – गज हे जुने अंतर मोजण्याचे परिमाण आहे, तर गणपतीचे 'गजानन' हे नाव गज + आनन असा संधी होऊन आले आहे. गज म्हणजे हत्ती.

## १२. क.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ज्ञान, अज्ञान, ज्ञानेश्वर | - | ज्ञ | ऋतू, ऋषी | - | ऋ |
| जहाज, जटिल | – | ज | डळमळीत, खळखळाट | - | ळ |
| चंद्र, चमचा, चिंच | – | च | अण्णा, खणखणीत | – | ण |
| अडकित्ता, नासाडी, साडी | – | ड | झगमगीत, झगा | – | झ |

# पाठ ६ - हर्षोल्हास

## ३. असाही एक उत्सव

### स्थळ कॅफे

**कुणाल :** बाबूमोशाय! ए सनत! इकडे बघ ... हाय!

**सनत :** ओः, हाय!

**कुणाल :** कुणाला शोधतोयस?

**सनत** : तुलाच. कॉफी झालेली दिसतेय तुझी. माझ्याबरोबर आणखी एक? ...काकाऽ ..., दोन कॉफी!

**कुणाल** : ओ होऽ! न मागता कॉफी! तुझा वाढदिवस तर नाहीये आज. काही खास घडलंय की काय?

**सनत** : त्याशिवाय तुझ्यासारख्या भंगार माणसाला स्वतःच्या पैशानं कॉफी कशाला पाजीन मी?

**कुणाल** : बोल.

**सनत** : आज नं ... आज मला अगदी ... म्हणजे असं ...

**कुणाल** : ए! उचकट तोंड लवकर. मला वेळ नाहीये तुझं चऱ्हाट ऐकायला.

**सनत** : कसला गद्य माणूस आहेस तू! ऐक, मला हलकं हलकं वाटतंय. पिसासारखं. ओझं डोक्यावरून उतरल्यासारखं.

**कुणाल** : ओझं? कर्जबिर्ज काढलं होतंस की काय?

**सनत** : नाही रे! जेहेत्ते काळाचे ठायी आमचे येथे आज अखेर ब्रेकअप झालेला आहे!!

**कुणाल** : कुणाबरोबर?

**सनत** : लाथ घालीन हं कमरेत, कुणाल! रेवाबरोबर, आणखी कुणाबरोबर?

**कुणाल** : हंऽऽ! म्हणजे माती खाल्लीसच शेवटी.

**सनत** : काय माती खाल्ली रे मी? नव्हतं वर्क होत काही आमच्यात, तुला माहितेय ते. आज ना उद्या हे होणारच होतं.

**कुणाल** : रेवा चांगली मुलगी आहे रे, सनत. जुळवून घेण्याचा थोडा प्रयत्न तरी करायचास!

**सनत** : ए, म्हाताऱ्या! हे डोस तिलाही पाज अन् मग मला बोल. मी तुझ्याबरोबर सेलिब्रेट करायला आलोय अन् तू ... च्! डोकं पिकवू नकोस, यार! ... थँक यू, काका. घे, कॉफी घे.

**कुणाल** : अच्छा! ही सेलिब्रेशनची कॉफी आहे तर!

**सनत** : येस! आणि एवढ्यावर भागवणार नाहीये हां मी! पुढच्या आठवड्यात रीतसर पार्टी देणार आहोत आम्ही. आम्ही म्हणजे कोण? तर मी आणि ती 'चांगली मुलगी', रेवा, कळलं?

**कुणाल** : हे बरंय बाबा तुमचं. जबाबदाऱ्या नकोत म्हणून लग्न नको, केलं तरी खर्च नको म्हणून त्याचा समारंभ नको; पण नसलेल्या जबाबदाऱ्यांमधून मोकळं झाल्याचा मात्र उत्सव हवा. गंमतच आहे सगळी. आता अशा वेळी आमच्यासारख्या गद्य म्हाताऱ्यांनी काय करायचं असतं? अभिनंदन की सांत्वन?

## पाठ ७ - मन मनास उमगत नाही

### ५. ख. एक संभाषण

**समुपदेशक** : माझ्या वयाचा फायदा घेऊन मी तुम्हाला नुसतं सईद म्हटलं तर चालेल ना?

**सईद** : जरूर! मला आवडेल ते, आणि मोकळ्या मनानं बोलताही येईल.

**समुपदेशक** : छान! मग आता बोला. मी फक्त ऐकणार आहे आणि कमीत कमी बोलणार आहे.

**सईद** : थँक्यू, सर. माझा परिचय मी मेलनं पाठवला होता, तो आपण वाचला असेल. तेव्हा मी थेट मुद्द्याकडे येतो. माझी एक समस्या आहे... समस्या म्हणजे काय आहे, की माझं मन फार अस्वस्थ आहे. तसं सगळं व्यवस्थित, मनासारखं चाललेलं आहे; विवंचना म्हणावी अशी काही नाही; आणि तरीही मला सतत कसली तरी काळजी वाटत असते. रात्रीची झोप पूर्ण झाली तरी सकाळी जाग आल्यावर ताजंतवानं वाटत नाही. कधी कधी तर जाग येऊच नये असं वाटतं...

**समुपदेशक** : हा काळजी करण्याचा स्वभाव पूर्वीपासूनचा आहे की...

**सईद** : हो. काहीसं तसंच म्हणावं लागेल. पण मला फक्त माझीच काळजी वाटते असं नाही. घरच्यांची, मित्रमैत्रिणींची... अगदी अनोळखी माणसांचीही चिंता वाटते. आजचंच सांगतो. मी इकडे येत असताना माझ्यापुढे सायकलवरून एक माणूस चालला होता. मागच्या सीटवर एक छोटा सहा-सात वर्षांचा मुलगा बसला होता. दोघं बापलेक असावेत. मुलानं बापाला दोन्ही हातांनी नीट पकडून ठेवलं होतं. त्याच्या पायांत नुसते सरकवून घालण्याचे रंगीत बूट होते. पण तंद्रीत तो आपले पाय हलवत होता. त्यामुळे त्याची पावलं बुटांमधून अर्धी बाहेर आली होती. कुठल्याही क्षणी ते बूट गळून पडतील असं वाटत होतं. हे त्याच्या वडिलांना सांगावं असं माझ्या मनात आलं, पण ते वाहनांच्या गर्दीतून वाट काढत वेगानं पुढं गेले आणि दिसेनासे झाले. झालं! माझ्या डोक्यात चिंतेचा भुंगा गुणगुण करायला लागला : त्या मुलाचा बूट पडला असेल का? उघडं पाऊल सायकलच्या चाकात गेलं असेल का? बूट पडल्याचं लक्षात आल्यावर वडील त्याला रागावले असतील का? नवे बूट आणण्यासारखी त्यांची परिस्थिती असेल का? ह्या सगळ्याचा त्या मुलाच्या मनावर काय परिणाम झाला असेल?... पुढचे दोन दिवस हे विचार माझा पिच्छा सोडणार नाहीत. रोजचं वर्तमानपत्र वाचण्याचीही मला आजकाल भीती वाटते. टीव्हीवरच्या बातम्या मी बघू शकत नाही. माझे म्हातारे वडील दिवस उजाडण्याआधीच टीव्ही चालू करतात; मोठ्या आवाजात. दिवसभर वाटेल त्या वाहिन्यांवरच्या भडक, आक्रस्ताळ्या बातम्या बघत बसतात आणि त्यांच्यावर विश्वास ठेवून उत्साहानं त्यांच्याबद्दल मोठमोठ्यांदा बोलत राहतात. मला वाटतं की, निदान माझ्या लहान मुलासमोर तरी त्यांनी हे करू नये. पण त्यांना तसं स्पष्ट सांगण्याची हिंमत मला होत नाही आणि आडवळणानं सांगितलेलं त्यांना समजत नाही. आसपास माझ्या वडिलांसारखीच माणसं बहुसंख्येनं दिसतात. सर, मला हा ताण, ही बेचैनी आता सहन होत नाही. मी आजारी आहे का? रात्रंदिवस मेंदूच्या कुठल्या तरी कोपऱ्यात बारीक ठणका लागून राहिल्यासारखं वाटतं. चोवीस तास असं चिंताग्रस्त, काळजीनं पोखरलेलं अस्वस्थ मन घेऊन जगण्याची मला हौस नाहीये. सर, माझं जगण्यावर, जगावर प्रेम आहे; माणसाच्या चांगुलपणावर माझा विश्वास आहे. तो मला गमवायचा नाहीये. मला तुम्ही मदत करू शकाल का? तुम्ही सांगाल ते करायला मी तयार आहे.

**६. क. १.**

"जोगबाई, वासंतिक संगीत महोत्सवाची दोन आमंत्रणं आहेत माझ्याकडे. यायचंय?"
"होऽऽऽ! पण आमंत्रणं कशी काय?"
"माझ्या नणंदेनं त्यांची वेबसाईट करून दिलीय, म्हणून तिला आलीयेत."
"हो का? पण मग तिला नाही जायचं?"
"शास्त्रीय संगीत नाही आवडत तिला."

**६. क. २.**

"जोगबाई, ब्याड न्यूज! महोत्सव रद्द झाला."
"होच का! आई गंऽ! मी किती उड्या मारत होते!"
"हो ना! त्यांना म्हणे जागाच मिळाली नाही. शिवाय दोन-चार गायकांनी ऐन वेळी पैसे वाढवून मागितले."
"हुंऽऽ... तुम्हाला सगळ्या आतल्या बातम्या समजत असतील, नाही?"
"हो तर!"

## पाठ ९ - जडणघडण

**९. वळण**

खिडकीत बसून चिवड्याच्या फक्क्या मारता मारता हर्षिता अभ्यासही करण्याचा प्रयत्न करत होती. कितीही टाळले, तरी खिडकीबाहेर लक्ष जातच होते.

**हर्षिता** : आई, इकडे ये पटकन!

**आई** : अगं, काय आहे? काय झालं हाक मारायला? मी इथे स्वयंपाकघरात काकड्या सोलतेय ना! आलेच थांब. हं, बोल आता.

**हर्षिता** : तो बघ, आई, तो माणूस चाललाय नं, हिरवा टी-शर्ट आणि जीन्स घातलेला, तो आपल्या सोसायटीत राहायला आलाय. त्यानं म्हणे काकाकुवा पाळलाय.

**आई** : हो का? अरे वा!

**हर्षिता** : कसला लठ्ठ आहे नं?

**आई** : कोण? काकाकुवा?

**हर्षिता** : च्, तो माणूस गं! लठ्ठ आणि बुटका. कसा विनोदी दिसतोय चालताना, बुदुक् बुदुक् ... हा हा हा!

**आई** : हं, आहे खरा विनोदी. एवढा लठ्ठ तर तुझा बाबाही आहे. शिवाय त्याला आताच टक्कलही पडायला सुरुवात झालीये. तोपण विनोदी दिसतो, नाही का?

**हर्षिता** : काय गं आई, तू रागावून बोलतेयस!

**आई** : नाही गं, पण वाईट वाटतंय मला. इथं खिडकीत बसल्या बसल्या एका अनोळखी, आपल्या आजोबांच्या वयाच्या गृहस्थांबद्दल 'तो माणूस' अशी एकेरी भाषा वापरत माझी मुलगी त्यांच्या दिसण्याची टिंगल करतेय, हे पाहून मला वाईट वाटतंय. तुला बरोबर वाटतंय ना तुझं हे वागणं?

**हर्षिता** : सॉरी!

**आई** : हर्षिता, आधी तोंडातला घास नीट चाव, तो गीळ आणि मग म्हण काय म्हणायचंय ते.

**हर्षिता** : हं!

**आई** : असं वागण्याबद्दल आम्ही लहानपणी मोठ्या माणसांचे फटके खाल्ले. तेव्हाच, आपण पालक झाल्यावर मुलांवर कधीही हात उगारायचा नाही, असा निश्चय केला. मुलं निरागस असतात, त्यांच्याकडून चुका झाल्या तर त्यांना नीट समजावून सांगायचं असं ठरवलं. ते आम्ही पाळलं, आणि मला वाटतं, अजूनही पाळतो आहोत.

**हर्षिता** : पण मी आता लहान कुठाय?

**आई** : तेच तर! तू आता पंधरा वर्षांची होत आलीस तरी अजूनही सगळं समजवावंच लागतंय, ह्याचं मला वाईट वाटतंय.

**हर्षिता** : म्हणजे काय? मी आणखी काय चुकीचं वागलेय?

**आई** : हे बघ, तू अजूनही डब्यात हात घालून चिवडा खातेयस. सगळ्यांसाठी केलाय ना तो? आता तो बाकीच्यांनीही खायचा? आणि खाली सांडलायस किती, बघ! त्याच तेलकट हातांनी तू पुस्तकाची पानं उलटते आहेस...

**हर्षिता** : कुठे?

**आई** : नाही म्हणू नकोस, मला डाग दिसतायत पानांवरचे. हे अस्वच्छ आहे, असुंदरही आहे. आपलं आपल्याला जाणवलं पाहिजे, हर्षिता, आम्ही फार काळ समजावत नाही राहणार. आवर आपला हा सगळा पसारा. मला अजून खूप कामं पडलीयेत स्वयंपाकघरात.

१०.

**क.** "सुखाचा संसार करायचा असेल तर संपदासारखी सुसंस्कृत आणि सुसंस्कारी मुलगीच लग्न करून घरात आण!" संगीताताईंनी संकर्षणला समजावलं.

**ख.** संकोची संजयनं संदीपच्या संगतीने संपूर्ण संगीत-महोत्सवाचे संयोजन सांभाळले.

**ग.** कंस, हंस, दंश, वंश, अंश, सिंह

# शब्दसंग्रह

हिरवा रंग : नामांचे सामान्यरूप    निळा रंग : इंग्रजीमधील अर्थ    लाल रंग : हिंदीमधील अर्थ

| क्र. No. | शब्द / वाक्य Word / Sentence | अर्थ Meaning |
|---|---|---|

## पाठ १ | CHAPTER 1

| | | |
|---|---|---|
| १ | तो अवधी<br>अवधी- | duration<br>समय, अवधि |
| २ | मुळे रुजणे | to take root (of a thought, idea etc.)<br>जड़ें जमना |
| ३ | ती धास्ती<br>धास्ती-<br>ती भीती<br>भीती- | deep-rooted fear of something<br>मन में बैठा हुआ डर<br>fear of something or someone<br>डर |
| ४ | सत्कारणी लावणे | to use wisely for a good purpose<br>अच्छे काम में लाना |
| ५ | बाधक | obstructive<br>बाधक |
| ६ | बाधा आणणे | to hinder<br>बाधा पहुँचाना |
| ७ | वळण लावणे | to give a certain direction<br>खास दिशा देना / अच्छे संस्कार देना |
| ८ | तो खेळिया<br>खेळिया- | a seasoned player<br>खिलाड़ी / दूसरों को खेल खिलाने वाला, चाहिए जैसे करा के लेने वाला |
| ९ | तो खेळकरी, ते -<br>खेळकऱ्या-, खेळकऱ्यां- | player<br>खिलाड़ी / नाटक खेलने वाला |
| १० | वळण घेणे | to take a turn<br>मोड़ लेना |
| ११ | सूत्रे हलवणे | to manoeuvre / to pull the strings<br>संचालन करना |
| १२ | बाद होणे | to be out (of a game)<br>आऊट होना / बाहर होना |

पाठ १

| | | |
|---|---|---|
| १३ | आसुसलेला | eager<br>उत्सुक |
| १४ | च्यावरनं | about tea<br>चाय को ले कर |
| १५ | खेळी करणे | to make moves<br>चाल चलना |
| १६ | डाव उलटवणे | to make a move to change the course of a game towards victory<br>जीतने के लिए पासा पलट देना |
| १७ | डाव फिरवणे | to turn a game around<br>पासा पलटना |
| १८ | डावपेच आखणे | to plan a strategy<br>दांवपेंच तैयार करना |
| १९ | झुगारणे | to defy / to throw / to toss / to reject<br>नकारना / फेंक देना / हटाना / उल्लंघन करना |
| २० | तो गतविजेता, ते गतविजेते<br>गतविजेत्या-, गतविजेत्यां- | past winner / defending champion<br>गतविजेता |
| २१ | विलासी | luxurious / lavish / pleasure loving / epicurean<br>विलासी / ऐयाश / मनमौजी |
| २२ | आवर्जून | determinedly and with concern / certainly<br>आग्रहपूर्वक / अवश्य |
| २३ | विरळ | thin / rare<br>पतला / दुर्लभ |
| २४ | कमकुवत | weak<br>दुर्बल / कमजोर |
| २५ | तो पोरकटपणा<br>पोरकटपणा- | childishness<br>बचपना |
| २६ | तो आचरटपणा<br>आचरटपणा- | frivolousness<br>वाहियात / गैरबर्ताव |
| २७ | अपायकारक | harmful<br>हानिकारक |
| २८ | ती दमडी, त्या दमड्या<br>दमडी-, दमड्यां- | an outdated, lowest unit of Indian currency<br>दमडी / सब से कम कीमत वाला सिक्का |

| | | |
|---|---|---|
| २९ | तो ऱ्हास<br>ऱ्हासा- | deterioration / degeneration<br>दुर्दशा / अपकर्ष / क्षय / पतन |
| ३० | भरमसाट | excessive<br>हद से ज्यादा |
| ३१ | तुरळक | sporadic / sparse<br>छुटपुट |
| ३२ | तो ओढा<br>ओढ्या- | inclination / tendency<br>रुझान / झुकाव |
| ३३ | ती वणवण<br>वणवणी- | to go from pillar to post<br>दरदर (भटकना) |
| ३४ | तो पोरखेळ, ते -<br>पोरखेळा-, पोरखेळां- | child's play / something very easy<br>बच्चों का खेल / बहुत आसान |
| ३५ | नशिबाचा खेळ | a game of fate<br>नसीब का खेल |
| ३६ | वेगळे वळण घेणे | to take an unusual turn<br>अलग मोड़ लेना |
| ३७ | तो सारीपाट<br>सारीपाटा- | a specific board game like Ludo<br>चौसर |
| ३८ | संसाराचा सारीपाट मांडणे | to make a home<br>गृहस्थी बसाना |
| ३९ | डाव अर्ध्यात सोडून जाणे | to leave the game halfway / untimely death<br>खेल बीच में ही छोड़ देना / अकाल मृत्यु |
| ४० | दान उलटे पडणे | to get unexpectedly adverse result<br>पासा उलटा पड़ना |
| ४१ | खट्याळ | naughty<br>नटखट |
| ४२ | वाह्यात | mischievous / flippant<br>वाहियात |
| ४३ | (ते) भोकाड पसरणे | to cry loudly (with mouth wide open)<br>जबड़ा फाड़ कर जोर-जोर से रोना |
| ४४ | तो चेंगटपणा<br>चेंगटपणा-<br>चेंगट | sluggishness<br>धीमे धीमे, समय गँवाते हुए काम करना<br>sluggish |

पाठ ९

| | | |
|---|---|---|
| ४५ | तो कल्ला<br>कल्ल्या- | commotion / clamour / din / brouhaha<br>शोरगुल |
| ४६ | रमतगमत | playfully and leisurely / in a slow, carefree manner<br>आराम व मजे से |
| ४७ | गळा काढणे | to cry loudly<br>जोर से रोना |
| ४८ | भोगणे | to suffer<br>भुगतना |
| | उपभोगणे | to enjoy / to consume<br>आनंद लेना / उपभोग लेना |
| ४९ | नमवणे | to defeat / to bend<br>हराना / झुका देना |
| ५० | लोळवणे | to put to roll (on the floor) / to defeat<br>लुड़काना / हराना |
| ५१ | पिरगळणे | to twist<br>मरोड़ना |
| ५२ | कळवळणे | to whine / to groan / to moan / to be filled with compassion for someone<br>कराहना / तरस आना / दयाभाव उत्पन्न होना |
| ५३ | तो खुंट, ते -<br>खुंटा-, खुंटां- | stump<br>खंबा |
| ५४ | आळीपाळीने | turn by turn<br>बारी-बारी से |
| ५५ | आयताकृती | rectangular<br>आयत आकार का |
| | चौरस | square<br>चौकोन |
| ५६ | जोशपूर्ण | forceful, full of zeal<br>जोशीला |
| ५७ | ती चुरस, त्या चुरशी<br>चुरशी-, चुरशीं- | competition<br>प्रतियोगिता |
| ५८ | तो लपंडाव, ते -<br>लपंडावा-, लपंडावां- | hide and seek game<br>लुकाछुपी |

| | | |
|---|---|---|
| ५९ | ते औचित्य, ती औचित्ये<br>औचित्या-, औचित्यां- | appropriateness / propriety<br>औचित्य / उचितता |
| ६० | नगण्य | negligible<br>नगण्य |
| ६१ | ती खोक, त्या खोका<br>खोके-, खोकां- | deep wound on head<br>सिर पर गहरा घाव |
| ६२ | ती दुखापत, त्या दुखापती<br>दुखापती-, दुखापतीं- | injury<br>चोट |
| ६३ | मुरगळणे | to get a part of body twisted<br>मोच आना |
| ६४ | सुजणे | to swell<br>सूजना |
| ६५ | मोडणे | to break<br>टूटना / तोड़ना |
| ६६ | लचकणे | to wrick<br>लचकना |
| ६७ | खरचटणे | to get a scratch on some part of the body<br>खरोंच आना |
| ६८ | तो (मुका) मार<br>मारां- | contusion<br>अंदरूनी चोट |
| ६९ | तो कुस्तीगीर, ते -<br>कुस्तीगिरा-, कुस्तीगिरां- | wrestler<br>कुश्ती करने वाला पहलवान |
| ७० | कांस्य | bronze<br>कांस्य |
| ७१ | रौप्य | silver<br>रजत |
| ७२ | सलामीवीर फलंदाज | opening batsman<br>सलामी बल्लेबाज़ |
| ७३ | नेमबाज | shooter<br>निशानची |
| ७४ | तो ताईत, ते -<br>ताइता-, ताइतां- | talisman<br>तावीज |
| ७५ | मैदानात उतरणे | to be ready to compete<br>मैदान में उतरना |

| | | |
|---|---|---|
| ७६ | बरोबरी होणे | to match, to become equalised<br>बराबरी होना |
| ७७ | पुरस्कार करणे | to promote / support / champion something<br>समर्थन करना |
| ७८ | समावेश करणे | to include<br>शामिल करना |
| ७९ | लचक भरणे | to sprain<br>लचक पड़ना |
| ८० | इतिहास घडवणे | to create history<br>इतिहास रचना |
| ८१ | परिणाम भोगणे | to suffer from consequences<br>अंजाम भुगतना |

## पाठ २ | CHAPTER 2

| | | |
|---|---|---|
| ८२ | तो पेहराव, ते -<br>पेहरावा-, पेहरावां- | costume, dress<br>पोशाक |
| ८३ | ते शिरोभूषण, ती शिरोभूषणे<br>शिरोभूषणा-, शिरोभूषणां- | headgear<br>टोपी, पगड़ी इ॰ |
| ८४ | ती शरीरबोली, त्या –<br>शरीरबोली-, शरीरबोलीं- | body language<br>शारीरिक हावभाव की भाषा |
| ८५ | ती पगडी, त्या पगड्या<br>पगडी-, पगड्यां- | turban<br>पगड़ी |
| ८६ | तो फेटा, ते फेटे<br>फेट्या-, फेट्यां- | turban<br>पगड़ी |
| ८७ | खडबडीत | rough (surface)<br>खुरदुरा / उबड़खाबड़ |
| ८८ | राकट | rough and tough / strong and sturdy (built and approach)<br>मजबूत व सख्त डीलडौल व मिज़ाज |
| ८९ | कणखर | of unshakable, firm character and disposition<br>दृढ़ |
| ९० | भौगोलिक | geographical<br>भौगोलिक |

पाठ २

| | | |
|---|---|---|
| ९१ | आक्रमक | aggressive<br>आक्रामक |
| ९२ | टणक | hard (rock like)<br>पत्थर जैसा सख़्त / कठोर |
| ९३ | तो बाणा, ते बाणे<br>बाण्या-, बाण्यां- | attitude of pride<br>गर्व का रवैया / मान |
| ९४ | लढवय्या | fighter in spirit / warrior<br>कठिनाइयों से लड़ने का दम रखने वाला / योद्धा |
| ९५ | रगेलपणा | haughtiness / impudence<br>मस्ती / बेगुमानी |
| ९६ | रंगेलपणा | epicurean<br>रंगीलापन |
| ९७ | रसरसून | wholeheartedly<br>जी भर के |
| ९८ | जोपासणे | cultivate<br>पालना, विकसित करना |
| ९९ | तो विलास, ते -<br>विलासा-, विलासां- | luxury<br>ऐश |
| १०० | रांगते वय | very young age<br>छोटी उम्र |
| १०१ | ते सुभाषित, ती सुभाषिते / सुभाषितं<br>सुभाषिता-, सुभाषितां- | aphorism<br>सुविचार |
| १०२ | उच्चाटन करणे | to eradicate<br>जड़ से उखाड़ना |
| १०३ | लफ्फेदार | with a rich and long border (of saree)<br>भारी पल्ले वाला |
| १०४ | झोकदार | graceful<br>शानदार |
| १०५ | ते लुगडे / लुगडं, ती लुगडी<br>(सामान्यत: नऊवार साडी)<br>लुगड्या-, लुगड्यां- | an old type of nine yard saree with border<br>पुराने किस्म की बॉर्डर और पल्ले<br>वाली नौ गज़ की साड़ी |
| १०६ | भुरळ पडणे | to get fascinated<br>मोहित होना |

पाठ २

| | | |
|---|---|---|
| १०७ | तो गोटा, ते गोटे<br>गोट्या-, गोटयां- | baldness / pebble<br>टकलापन / कंकड़ |
| १०८ | तो पेटारा, ते पेटारे<br>पेटाऱ्या-, पेटाऱ्यां- | trunk<br>संदूक |
| १०९ | ते कवाड, ती कवाडे / कवाडं<br>कवाडा-, कवाडां- | door<br>दरवाजा |
| ११० | मढून | covering from head to toe<br>सिर से पांव तक ढ़क कर |
| १११ | ते गोंदण, ती गोंदणे / गोंदणं<br>गोंदणा-, गोंदणां- | tattoo<br>गोदन |
| ११२ | गोंदणे | to tattoo<br>गोदना |
| ११३ | अभावानेच आढळणे | to be found rarely<br>मुश्किल से मिलना |
| ११४ | ग्वाही देणे | to assure<br>आश्वस्त करना |
| ११५ | ते मतैक्य<br>मतैक्या- | unanimity<br>एकमत |
| ११६ | ते ठिगळ, ती ठिगळे / ठिगळं<br>ठिगळा-, ठिगळां- | patch of cloth<br>चकती, पैबंद |
| ११७ | ते गंध<br>गंधा- | fragrant paste applied on forehead<br>सुगंधित टीका |
| ११८ | उतरवणे | to get something down<br>उतारना |
| ११९ | ठोंब्या | dumb<br>बुद्धू |
| १२० | गधड्या | an affectionate or a derogatory form, addressing a person as a donkey<br>प्यार से या अपमान करने के लिए किसी को गधा कह के पुकारना |
| १२१ | निष्कर्ष काढणे | to conclude<br>निष्कर्ष निकालना |

| | | |
|---|---|---|
| १२२ | नन्नाचा पाढा वाचणे | to refuse again and again<br>बार बार ना कहना |
| १२३ | ते तरट, ती तरटे / तरटं<br>तरटा-, तरटां- | sack cloth<br>टाट |

## पाठ ३ | CHAPTER 3

| | | |
|---|---|---|
| १२४ | ते व्यंगचित्र, ती व्यंगचित्रे / व्यंगचित्रं<br>व्यंगचित्रा-, व्यंगचित्रां-<br>(व्यंग्यचित्र) | caricature, cartoon<br>व्यंग्य चित्र |
| १२५ | नि:शब्द | speechless<br>नि:शब्द |
| १२६ | उथळ | shallow / cheap<br>छिछला |
| १२७ | टवाळ | a person who loves to sneer and ridicule others<br>उपद्रवी / दूसरों का मजाक उड़ाने वाला |
| १२८ | वात्रट | waggish<br>शरारती |
| १२९ | गमत्या | jovial<br>मज़ाकिया / शरारती |
| १३० | तो राजमार्ग, ते -<br>राजमार्गा-, राजमार्गां- | highway / proper way / the path or way as accepted and validated by all<br>राजमार्ग / सही रास्ता / सब के द्वारा मान्य और स्वीकृत रास्ता |
| १३१ | अद्यापि | as yet / still so far<br>अभी तक |
| १३२ | तो वेदान्त<br>वेदान्ता- | Vedanta / (Hindu) theology<br>वेदांत |
| १३३ | रुक्ष | dry / lifeless / uninteresting<br>रूखा |
| १३४ | सुतकी | mournful / sad<br>उदास / दुख भरा / रंजीदा |
| १३५ | घुमा | reserved / quiet / untalkative<br>मितभाषी / कम बोलने वाला |

पाठ ३

| | | |
|---|---|---|
| १३६ | शेलका | choice / select<br>चुनिंदा |
| १३७ | वावडे असणे | to be allergic towards something<br>किसी चीज से ऐलर्जी होना |
| १३८ | मवाली | hoodlum / vandal<br>बदमाश / गुंडा |
| १३९ | गावगुंड | hoodlum / vandal<br>बदमाश / गुंडा |
| १४० | द्वाड | naughty / wayward<br>नटखट / बदमाश |
| १४१ | भाबडा | innocent / naive<br>भोला-भाला / नादान |
| १४२ | चलाख | smart / clever / sharp<br>चतुर |
| १४३ | सुमार | dull / mediocre<br>मामूली |
| १४४ | खुदुखुदु हसणे | to giggle / to titter / laugh of a child<br>मुंह दबाकर हँसना / बच्चे की हँसी |
| १४५ | खिदळणे | to laugh heartily<br>खिलखिला कर हँसना |
| १४६ | हसून गडाबडा लोळणे | to laugh one's head off<br>हँसी से लोटपोट होना |
| १४७ | उनाड | truant / wandering<br>आवारा |
| १४८ | टोळभैरव | gang of truants<br>आवारागर्दी करने वालों की टोली |
| १४९ | हास्याची कारंजी | waves of laughter<br>हँसी के फव्वारे |
| १५० | पोटाची दामटी वळेपर्यंत हसणे | to laugh one's head off<br>हँसी से लोटपोट होना |
| १५१ | हसून मुरकुंडी वळणे | to split one's sides with laughter<br>हँसी से लोटपोट होना |

| | | |
|---|---|---|
| १५२ | खिंकाळणे | to neigh<br>हिनहिनाना |
| १५३ | -चे हसे होणे | to make a fool of onself<br>मज़ाक बनना |
| १५४ | हसण्यावारी नेणे | to take as a joke / to take lightly<br>मज़ाक में लेना |
| १५५ | हसून सोडून देणे | to laugh it away<br>हँस कर छोड़ देना |
| १५६ | सात मजली हसणे | to laugh loudly / to guffaw<br>हँसी के ठहाके लगाना |
| १५७ | कुत्सित / खवचट हसणे | witty / snooty smile<br>दूसरों को अपमानित करने वाली हँसी |
| १५८ | अति झाले न् हसू आले | adverse extreme situations evoke humour<br>अति हुई और हँसी आई |
| १५९ | हसता आहे, पुसता नाही | people are with you in your good times but not in bad times.<br>सुख में सब साथ मगर दुख में कोई नहीं |
| १६० | हसता नाही की पुसता नाही | to be alone without anyone to share joys and sorrows<br>सुख-दुख बाँटने के लिए कोई न होना |
| १६१ | हसून गोड करणे /<br>हसून साजरे करणे | to laugh away the odds<br>हँस कर (परेशानियों का) सामना करना |
| १६२ | हसतमुखी सदा सुखी | laughter is the best medicine<br>हँसमुख लोग हमेशा खुश रहते हैं |
| १६३ | हसतील त्यांचे दात दिसतील | those who ridicule others expose themselves thereby<br>दूसरों पर हँसने वाले खुद अपने दांत दिखाते हैं |
| १६४ | हसरे मूल गुलाबाचे फूल | a smiling child pleases everyone like a beautiful rose<br>हँसमुख बच्चा गुलाब के फूल की तरह सबको प्रसन्न करता है |
| १६५ | हसे त्याला बाळसे | laughter is the best medicine<br>हँसें और सेहत बनाएं |
| १६६ | दाटीवाटीने | in a congested / overcrowded manner<br>ठूंस ठूंस के |

| | | |
|---|---|---|
| १६७ | तो लळा<br>लळ्या- | attachment<br>लगाव |
| १६८ | महाकारस्थानी | conspirator<br>षड्यंत्र करने वाला / साजिश करने वाला |
| १६९ | ती विरक्ती<br>विरक्ती- | detachment, absence of desire<br>विरक्ति |
| १७० | माफक | reasonable, moderate<br>उचित / वाजिब |
| १७१ | गावीही नसणे | to be unaware<br>अनजान होना |
| १७२ | ते भारूड, ती भारुडे / भारुडं<br>भारुडा-, भारुडां- | a Marathi lyrical folk composition on social awareness<br>सामाजिक जागृति हेतु मराठी लोक कविता का प्रकार |
| १७३ | ती लावणी, त्या लावण्या<br>लावणी-, लावण्यां- | a Marathi lyrical folk composition performed by women with music and dance for entertainment<br>मनोरंजन के लिये स्त्रियों द्वारा संगीत और नृत्य के साथ सादर किया जाने वाला मराठी लोक कविता का प्रकार |
| १७४ | तो पोवाडा, ते पोवाडे<br>पोवाड्या-, पोवाड्यां- | a Marathi ballad narrating historical events in an inspiring style<br>ऐतिहासिक घटनाओं पर आधारित प्रेरणादायी पद |
| १७५ | ती अभिव्यक्ती<br>अभिव्यक्ती- | expression<br>अभिव्यक्ति |
| १७६ | ती प्रयोगशीलता<br>प्रयोगशीलते- | experimentation<br>प्रयोगशीलता |
| १७७ | ती मुद्रणकला<br>मुद्रणकले- | typography<br>मुद्रणकला |
| १७८ | धारदार | sharp / acute<br>तीव्र / तेज धार वाला |
| १७९ | तो उपहास<br>उपहासा- | derision<br>उपहास / मजाक बनाना |
| १८० | तो उपरोध<br>उपरोधा- | sarcasm<br>व्यंग्य |

| | | |
|---|---|---|
| १८१ | लागण होणे | to contract / to get infected<br>संक्रमित होना |
| १८२ | निखळ | pure / unadulterated<br>शुद्ध |
| १८३ | अवघडून | with an awkward / uncomfortable / embarrassed feeling or position<br>अजीब सा लगना / असुविधा |
| १८४ | ताटकळत | waiting<br>प्रतीक्षा करते हुए |
| १८५ | तो वारसदार, ते –<br>वारसदारा-, वारसदारां- | inheritor<br>वारिस |
| १८६ | ते प्रहसन, ती प्रहसने / प्रहसनं<br>प्रहसना-, प्रहसनां- | farcical skit<br>प्रहसन |
| १८७ | अन्याय्य | unjust / unfair<br>अन्यायी |
| १८८ | सनातनी | traditional / orthodox<br>परंपरानिष्ठ |
| १८९ | दिपवून टाकणारे | dazzling<br>चकाचौंध करने वाला |
| १९० | भेदक | penetrating<br>मर्मज्ञ |
| १९१ | तो / ती हितचिंतक, ते / त्या-<br>हितचिंतका- | well-wisher<br>शुभचिंतक |
| १९२ | भरीव | solid, substantial<br>ठोस |
| १९३ | टिकाऊ | enduring, durable, long lasting<br>टिकाऊ |
| १९४ | ते अंतःकरण, ती<br>अंतःकरणे / अंतःकरणं<br>अंतःकरणा-, अंतःकरणां- | inner voice / conscience<br>अंतःकरण |
| १९५ | तो झरा, ते झरे<br>झऱ्या, झऱ्यां- | spring<br>झरना |
| १९६ | ती तळमळ<br>तळमळी- | restlessness<br>बेचैनी |

| | | |
|---|---|---|
| १९७ | उमदा | grand, noble, noble-minded<br>उम्दा, महान, शानदार, श्रेष्ठ |
| १९८ | हलकट | low / mean<br>घटिया |
| १९९ | लबाड | fraudulent / insincere<br>कपटी / चालबाज / झूठा |
| २०० | ते मंथन, ती मंथने<br>मंथना-, मंथनां- | churning<br>मंथन |
| २०१ | ती कोलांटउडी, त्या कोलांटउड्या<br>कोलांटउडी-, कोलांटउड्यां- | somersault<br>समरसॉल्ट / उलट फेर |
| २०२ | घटनाप्रधान | event primacy<br>घटना प्रधान |
| २०३ | मूर्तिमंत | embodied / personified<br>साक्षात |
| २०४ | आमूलाग्र | fundamental<br>मूलभूत / महत्त्वपूर्ण |
| २०५ | उडाणटप्पू | truant / wandering<br>आवारा |
| २०६ | पोरसवदा | youngish / innocent<br>तरुण / कमसिन |
| २०७ | निकाल लावणे | to dispose off / to settle / to destroy<br>निपटा देना / अंजाम देना / सत्यानाश कर देना |
| २०८ | इरसाल | cunning / shrewd / fraudulent / cheat / bogus / imposter<br>धूर्त / बदमाश |
| २०९ | तो खाक्या<br>खाक्या- | one's typical trait<br>किसी की खासियत |
| २१० | सर्द होणे | to be astonished<br>चकित होना |
| २११ | घाबरगुंडी उडणे | to be frightened out of one's senses<br>बहुत डर जाना |
| २१२ | ती कोटी, त्या कोट्या<br>कोटी-, कोट्यां- | pun<br>श्लेषालंकार |

| | | |
|---|---|---|
| २१३ | खोड लागणे | to inculcate a bad habit<br>बुरी आदत लगना |
| २१४ | ते रुद्राक्ष, ती रुद्राक्षे / रुद्राक्षं<br>रुद्राक्षा-, रुद्राक्षां- | a specific brown bead (supposed to have divine power)<br>रुद्राक्ष |
| २१५ | सोस असणे | to have thirst for<br>किसी चीज की बड़ी चाहत होना |
| २१६ | स्वत:ला गुंतवणे | to engage oneself in<br>खुद को किसी काम में उलझाना |
| २१७ | ते तारतम्य<br>तारतम्या- | discernment<br>सही और गलत की पहचान |
| २१८ | प्रकाश टाकणे | to throw light upon<br>प्रकाश डालना |
| २१९ | तात्कालिक | pertaining to a particular period of time<br>तात्कालिक |
| २२० | वगळणे | exclude / omit / skip / leave out<br>अलग करना / छोड़ना |
| २२१ | ती उदात्तता<br>उदात्तते- | nobleness / sublimity<br>उदात्तता / बड़प्पन |
| २२२ | अकाली | premature / untimely<br>अकाल / समय से पूर्व |
| २२३ | तो फेरफार, ते –<br>फेरफारा-, फेरफारां- | alteration, shuffle<br>उथलपुथल |
| २२४ | तो हेल, ते हेल<br>हेला-, हेलां- | drawl<br>खींचा हुआ उच्चारण |
| २२५ | तो चटका, ते चटके<br>चटक्या-, चटक्यां- | momentary burn / hurt<br>चटका / अचानक जलने का घाव |
| २२६ | तिरकस | askew / oblique / not straight (look / speech / nature)<br>टेढ़ा (नजर / बोलना / स्वभाव) |
| २२७ | तो चरा, ते चरे<br>चऱ्या-, चऱ्यां- | scratch<br>खरोंच |
| २२८ | ती आळी, त्या आळ्या<br>आळी-, आळ्यां- | alley<br>गली |

| | | |
|---|---|---|
| २२९ | लोकोत्तर | transcendental<br>अलौकिक |
| २३० | ते फुरसे / फुरसं, ती फुरशी<br>फुरशा-, फुरशां- | saw-scaled viper<br>एक जहरीला साँप |
| २३१ | ते सोयर, ती सोयरे / सोयरं<br>सोयऱ्या-, सोयऱ्यां- | a ritualistic period of impurity and separation from normal and sacred spaces after childbirth<br>संतान के जन्म पर जच्चे-बच्चे को अशुद्ध मान कर अलग रखने का रिवाज |
| २३२ | ते सुतक, ती सुतके / सुतकं<br>सुतका-, सुतकां- | a period of mourning<br>सूतक |
| २३३ | तो अर्क, ते –<br>अर्का-, अर्कां- | extract / essence<br>सार |
| २३४ | ती पोफळ, त्या पोफळी<br>पोफळी-, पोफळीं- | areca palm (betel nut tree)<br>सुपारी का पेड़ |
| १३५ | तो बारकावा, ते बारकावे<br>बारकाव्या-, बारकाव्यां- | minute detail<br>बारीकी |
| २३६ | कळीचे शब्द | code words / keyword<br>संकेत शब्द |
| २३७ | अलौकिक | celestial / transcendental<br>अलौकिक / दिव्य / लोकोत्तर |
| २३८ | निर्लेप | pure / untainted / unfazed<br>निर्मल / बेदाग़ / जिस पर कोई परिणाम नहीं होता |

## पाठ ४ | CHAPTER 4

| | | |
|---|---|---|
| २३९ | किंबहुना | what's more / in fact / as a matter of fact<br>और ना / बल्कि |
| २४० | खट्टू होणे | to get disappointed<br>निराश होना |
| २४१ | घोर | horrendous<br>घोर |
| २४२ | सपशेल | completely / in toto / entirely<br>पूरी तरह से |
| २४३ | तो काफिला, ते काफिले<br>काफिल्या-, काफिल्यां- | convoy<br>काफिला |

| | | |
|---|---|---|
| २४४ | तो तंबू, ते -<br>तंबू-, तंबूं- | tent<br>तंबू |
| २४५ | ती कांबळ, त्या कांबळी<br>कांबळी-, कांबळीं- | rough blanket<br>कंबल |
| २४६ | तो खच, ते -<br>खचा-, खचां- | heap<br>ढेर |
| २४७ | ते चराचर<br>चराचरा- | animate and inanimate nature / environment<br>सृष्टी, संसार |
| २४८ | आपलेसे करणे | to win someone over<br>अपना बनाना |
| २४९ | अढळ | resolute / firm<br>अटल / दृढ़ |
| २५० | न जुमानणे | not to pay heed to<br>अनसुना या अनदेखा करना / नहीं मानना |
| २५१ | तो नगारा, ते नगारे<br>नगाऱ्या-, नगाऱ्यां- | drum<br>नगाड़ा |
| २५२ | ती बिदागी, त्या बिदाग्या<br>बिदागी-, बिदाग्यां- | honorarium given to artists<br>बिदागी / कलाकारों को दिया जाने वाला मानधन |
| २५३ | तो मोबदला, ते मोबदले<br>मोबदल्या-, मोबदल्यां- | compensation / remuneration<br>मुआवजा / मेहनताना |
| २५४ | तंबी देणे | to warn<br>खबरदार करना |
| २५५ | ते सीमोल्लंघन, ती<br>सीमोल्लंघने / सीमोल्लंघनं<br>सीमोल्लंघना-, सीमोल्लंघनां- | crossing a boundary<br>सीमोल्लंघन |
| २५६ | पारायण करणे | to read repeatedly and thoroughly<br>पाठ करना / बार बार पढ़ना या देखना |
| २५७ | करंटा | unfortunate<br>अभागा |
| २५८ | हिडीस | hideous<br>घृणित |
| २५९ | मिटक्या मारणे | to smack one's lips / to savour with sounds coming from mouth<br>चटखार लगाना |

| | | |
|---|---|---|
| २६० | सहीसलामत सुटणे | to escape scot-free<br>सही सलामत छुटकारा पाना |
| २६१ | गवसणे | to find<br>मिलना |
| २६२ | अधाशाप्रमाणे | greedily<br>लालच से |
| २६३ | तो लागाबांधा, ते लागेबांधे<br>लाग्याबांध्या-, लाग्याबांध्यां- | connections<br>संबंध |
| २६४ | शतप्रतिशत | hundred percent<br>शत प्रतिशत |
| २६५ | हलके हलके | delicately<br>कोमलता से |
| २६६ | वीण उसवणे | to undo the weave / to unravel<br>बुनाई उखड़ना / उखाड़ना |
| २६७ | ती घुसखोरी, त्या घुसखोऱ्या<br>घुसखोरी-, घुसखोऱ्यां- | infiltration<br>घुसपैठी |
| २६८ | तो परगणा, ते परगणे<br>परगण्या-, परगण्यां- | district / zone<br>परगना / नगर |
| २६९ | ते प्रावरण, ती प्रावरणे / प्रावरणं<br>प्रावरणा-, प्रावरणां- | upper or over garment<br>प्रावरण / ऊपरी पोशाक |
| २७० | दशमान पद्धत | decimal system<br>दशमलव प्रणाली |
| २७१ | तणतणत | writhing in anger<br>गुस्से से तिलमिलाते हुए |
| २७२ | वाक्‌चातुर्य | skill of speech / gift of the gab<br>वाणी की चतुरता |
| २७३ | उच्छाद मांडणे | to cause extreme annoyance<br>उत्पात मचाना |
| २७४ | बुडित | (drowned) in loss / bankrupt<br>(कर्ज में) डूबा हुआ |

| | | |
|---|---|---|
| २७५ | ती चपराक, त्या चपराका<br>(मारणे / देणे)<br>चपराके-, चपराकां- | slap<br>चपत / थप्पड़ |
| | थोबाडीत देणे | to give a slap<br>तमाचा मारना |
| | थोबाड रंगवणे | to leave someone red faced with a tight slap<br>जम के तमाचा मारना |
| २७६ | डबघाईला येणे | to veer towards loss<br>नुकसान की ओर जाना |

## पाठ ५ | CHAPTER 5

| | | |
|---|---|---|
| २७७ | तो शिलालेख, ते -<br>शिलालेखा-, शिलालेखां- | inscription<br>शिलालेख |
| २७८ | मोजकी | few<br>कुछ |
| २७९ | बिनबोभाट | without a fanfare<br>बिना ढिंढोरा पीटे |
| २८० | जिवाभावाची | near and dear one / intimate<br>करीबी / घनिष्ठ |
| २८१ | लादलेली | forced<br>जबरन लादी हुई |
| २८२ | निर्भेळ | pure / unadulterated<br>शुद्ध / बिना मिलावट का |
| २८३ | तो परीघ, ते -<br>परिघा-, परिघां- | circumference<br>परिधि |
| २८४ | कटाक्षाने टाळणे | to avoid strictly<br>सख़्ती से टालना |
| २८५ | यथावकाश | as time permits / at your convenience<br>जब समय मिले तब / सुविधानुसार |
| २८६ | रांगत्या वयापासून | from early childhood<br>छोटी उमर से |
| २८७ | ती कथुली, त्या कथुल्या<br>कथुली-, कथुल्यां- | very short story<br>छोटी कहानी |

| | | |
|---|---|---|
| २८८ | थोडक्यात आटोपते घेणे | to wind up quickly<br>जल्दी खत्म करना |
| २८९ | साक्षात्कार होणे | to realise / perception of a god in a vision<br>एहसास होना / दर्शन होना |
| २९० | तो खाचखळगा, ते खाचखळगे<br>खाचखळग्या-, खाचखळग्यां- | obstacle / pitfall<br>अड़चनें / बाधाएँ |
| २९१ | ते अतिक्रमण, ती अतिक्रमणे / अतिक्रमणं<br>अतिक्रमणा-, अतिक्रमणां- | encroachment<br>अतिक्रमण |
| २९२ | तोडगा काढणे | to find a solution<br>उपाय ढूँढ़ना |
| २९३ | मात करणे | to overcome / checkmate<br>शह देना / मात देना / किसी पर विजय पाना |
| २९४ | ते समर्थन, ती समर्थने / समर्थनं<br>समर्थना-, समर्थनां- | support<br>समर्थन |
| २९५ | तो भ्रमनिरास, ते -<br>भ्रमनिरासा-, भ्रमनिरासां- | disillusion<br>आशाभंग |
| २९६ | इतरांच्या माथी खापर फोडणे | to blame others for one's own mistakes<br>अपनी गलतियों का दोष दूसरों पर थोपना |
| २९७ | धारेवर धरणे | to scold left and right / to castigate<br>फटकारना / डाँटना |
| २९८ | एखाद्याच्या पाठीत खंजीर खुपसणे | to betray / to stab in the back<br>पीठ पर वार करना / विश्वासघात करना |
| २९९ | बिनपाण्याची हजामत करणे | to lambast<br>बुरी तरह से फटकारना / डाँटना |
| ३०० | रक्त आटवणे | to toil / to work very hard<br>खून पसीना एक करना |
| ३०१ | पोटावर पाय देणे | to deprive someone of his livelihood<br>किसी के पेट पर लात मारना |
| ३०२ | दुसऱ्याचे पाय ओढणे | to create hindrance in the progress of someone<br>किसी की प्रगति में टांग अड़ा कर बाधा डालना |
| ३०३ | कान उपटणे | to admonish with a scold<br>कान खींच कर डाँटते हुए सीख देना |

| | | |
|---|---|---|
| ३०४ | डोक्यावर मिरे वाटणे | to become a pain in the neck<br>सिर पर बैठ कर परेशान करना |
| ३०५ | तोंडसुख घेणे | to abuse<br>किसी को बहुत बुरा-भला कहना |
| ३०६ | तळपायाची आग मस्तकात जाणे | to turn red with anger<br>आगबबुला होना |
| ३०७ | नाक दाबले तर तोंड उघडणे | to get the desired things done by force / tactics<br>दबाव डाल के या तरकीब से काम करवा लेना |
| ३०८ | दात ओठ खाणे | to grind one's teeth (out of anger)<br>गुस्से से दाँत चबाना |
| ३०९ | बोलणी खाणे | to get a scolding<br>डाँट पड़ना |
| ३१० | डोके खाणे | to annoy / pester someone by talking irritatingly / incessantly<br>दिमाग चाटना |
| ३११ | वेळ खाणे | to consume a lot of time / to waste someone's time<br>समय ज़ाया होना / करना |
| ३१२ | मार खाणे | to get beaten<br>मार खाना |
| ३१३ | पैसे खाणे | to take bribe<br>रिश्वत लेना |
| ३१४ | शेण खाणे | to do something unethical / immoral<br>अनैतिक कृत्य करना |
| ३१५ | डोक्यात राख घालणे | to get very angry<br>बहुत गुस्सा करना |
| ३१६ | जिभेला हाड नसणे | loose, insulting talk<br>बिन सोचे कुछ भी उलट सुलट,<br>बेअदब बोलने की प्रवृत्ति / बकना |
| ३१७ | हातपाय गळणे | to become numb with fear or worry<br>डर या चिंता के मारे हाथ-पैर सुन्न हो जाना |
| ३१८ | काळजाचे पाणी होणे | to be extremely worried and sorry<br>उद्विग्न होना |

| | | |
|---|---|---|
| ३१९ | तोंडचे पाणी पळणे | to get too worried and scared<br>चिंता व डर से पसीना छूटना |
| ३२० | पंख फुटणे | to get wings (pejorative)<br>पर निकल आना |
| ३२१ | तिसरा डोळा उघडणे | to get so angry that the hell breaks loose<br>तीसरी आँख खुलना / बहुत गुस्सा आना |
| ३२२ | तोंड येणे | to suffer from mouth ulcer<br>मुँह में छाले पड़ना |
| ३२३ | डोळे येणे | to suffer from conjunctivitis<br>आँख आना / नेत्र शोथ होना |
| ३२४ | डोके फिरणे | to get mad / to go crazy<br>पागल हो जाना |
| ३२५ | अंग मोडणे | to get body ache / to get dog-tired / to get fatigued<br>शरीर दुखना / थक जाना |
| | अंग मोडून काम करणे | to work till one drops dead<br>रोम रोम दुखने तक काम करना |
| ३२६ | बोटे मोडणे | to think or say bad about someone<br>अंगुलियाँ मोड़ कर किसी के बारे में बुरा सोचना / कहना |
| ३२७ | घसाफोड करणे | to advise vigorously or a lot<br>बहुत समझाना |
| ३२८ | तोंड फाटेस्तोवर बोलणे | to talk a lot<br>बहुत ज्यादा बातें करना |
| ३२९ | ती नेमणूक, त्या नेमणुकी / नेमणुका<br>नेमणुकी-, नेमणुकीं- / नेमणुकां- | appointment<br>नियुक्ति |
| ३३० | ती मिरवणूक, त्या मिरवणुकी / मिरवणुका<br>मिरवणुकी-, मिरवणुकीं- / मिरवणुकां- | rally / procession<br>रैली / जुलूस |
| ३३१ | ती करमणूक, त्या करमणुकी / करमणुका<br>करमणुकी-, करमणुकीं- / करमणुकां- | entertainment<br>मनोरंजन |

| | | |
|---|---|---|
| ३३२ | ती दमणूक, त्या दमणुकी / दमणुका<br>दमणुकी-, दमणुकीं- / दमणुकां- | tiredness<br>थकान |
| ३३३ | तो ठावठिकाणा<br>ठावठिकाण्या- | whereabouts<br>पता ठिकाना / अतापता |
| ३३४ | भित्यापाठी ब्रह्मराक्षस | a fearful person faces great difficulties<br>डर कर जीने वाले को घोर<br>कठिनाइयाँ झेलनी पड़ती हैं। |
| ३३५ | तो भयगंड, ते -<br>भयगंडा-, भयगंडां- | phobia<br>भय / फोबिया / डर |
| ३३६ | यथेच्छ | whole-heartedly<br>जी भर के |
| ३३७ | तो मूकाभिनय, ते -<br>मूकाभिनया-, मूकाभिनयां- | mime<br>मूकाभिनय |

## पाठ ६ | CHAPTER 6

| | | |
|---|---|---|
| ३३८ | तो वाङ्निश्चय, ते -<br>वाङ्निश्चया-, वाङ्निश्चयां- | engagement<br>सगाई |
| ३३९ | ती पदोन्नती<br>पदोन्नती- | promotion<br>तरक्की |
| ३४० | तो पदवीग्रहण समारोह | convocation ceremony<br>पदवीग्रहण समारोह |
| ३४१ | तो खुराक, ते -<br>खुराका-, खुराकां- | diet / dosage<br>खुराक |
| ३४२ | तो पर्जन्योत्सव, ते -<br>पर्जन्योत्सवा-, पर्जन्योत्सवां- | festival of rains<br>बारिश का त्योहार |
| ३४३ | ती रेलचेल<br>रेलचेली- | abundance<br>बहुत ज्यादा मात्रा / संख्या |
| ३४४ | मैलोगणती | for miles<br>मीलों तक |
| ३४५ | धवल | white<br>सफेद |
| ३४६ | ते खंडन<br>खंडना- | to prove wrong / contradict<br>खंडन / गलत साबित करना |

| | | |
|---|---|---|
| ३४७ | उद्युक्त होणे | to get provoked<br>उत्तेजित होना |
| ३४८ | काळाच्या पोटात गडप होणे | to vanish with time<br>समय के साथ खत्म या लुप्त होना |
| ३४९ | जाचक | harsh / oppressive<br>अति कठोर / अत्याचारी |
| ३५० | भंगार | scrap<br>कबाड़ |
| ३५१ | जेहेत्ते काळाचे ठायी | once upon a time / at present<br>(old phrase used to narrate or to report)<br>एक समय की बात है / वर्तमान में<br>(घटना का वर्णन करते हुए या कहानी सुनाते हुए उपयोग में लिये जाने वाला वाक्यांश) |
| ३५२ | माती खाणे | to commit a mistake<br>गलती करना |
| ३५३ | डोस पाजणे | to advise<br>सलाह देना |
| ३५४ | ते सांत्वन, ती सांत्वने / सांत्वनं<br>सांत्वना-, सांत्वनां- | consolation<br>सांत्वना |
| ३५५ | दुतर्फा | on both sides<br>दोनों तरफ |
| ३५६ | तो ताटवा, ते ताटवे<br>ताटव्या-, ताटव्यां- | flower-bed<br>गुलशन |
| ३५७ | चवऱ्या ढाळणे | to fan a god or king using a fly whisk as a sign of respect<br>चंवर डुलाना |
| ३५८ | ते छत्र, ती छत्रे / छत्रं<br>छत्रा-, छत्रां- | canopy<br>छत्र / चंदवा |
| ३५९ | तो दाखला, ते दाखले<br>दाखल्या-, दाखल्यां- | certificate<br>प्रमाणपत्र |
| ३६० | तो फौजफाटा<br>फौजफाट्या- | army<br>फौज |
| ३६१ | फत्ते होणे | to become successful<br>फतेह पाना |

| | | |
|---|---|---|
| ३६२ | डागाळणे | to stain<br>दाग लगाना |
| ३६३ | हाताळणे | to handle / to deal / to tackle<br>सम्भालना |
| ३६४ | उबवणे | to incubate<br>(अंडा) सेना |
| ३६५ | सुरकुतणे | to get wrinkles / to get old<br>झुर्रियाँ पड़ना / बूढ़े होना |
| ३६६ | नादावणे | to go crazy about<br>पगला जाना |
| ३६७ | वेडावणे | to tease<br>चिढ़ाना |
| ३६८ | लाथाडणे | to kick / reject<br>ठोकर मारना |
| ३६९ | आळसावणे | to feel lazy<br>आलस आना |
| ३७० | पाणावणे | to fill with tears<br>आँख में पानी आना |
| ३७१ | भेगाळणे | to crack<br>दरार पड़ना |
| ३७२ | सरावणे | to be used to<br>आदत होना |
| ३७३ | माणसाळणे | to humanise / to get domesticated<br>मनुष्य जैसा बनाना / पालतू बनाना |
| ३७४ | पिसाळणे | to get mad in anger<br>बहुत ज्यादा गुस्से से पगला जाना |
| ३७५ | झोपाळणे | to feel sleepy<br>नींद आना |
| ३७६ | आनंदणे | to be pleased<br>खुश होना |
| ३७७ | पालवणे | to sprout<br>अंकुरित होना |

| | | |
|---|---|---|
| ३७८ | चक्करणे | to feel dizzy<br>चक्कर आना |
| ३७९ | दरवळणे | to waft<br>महकना |
| ३८० | अंकुरणे | to sprout<br>अंकुरित होना |
| ३८१ | फळणे | to fructify<br>फलना |
| ३८२ | अनुभवणे | to experience<br>अनुभव करना |
| ३८३ | चक्रावणे | to get confused<br>चक्कर में पड़ जाना |
| ३८४ | गोंधळणे | to get confused<br>चक्कर में पड़ जाना |
| ३८५ | उत्तरणे | to reply<br>जवाब देना |
| ३८६ | मोहरणे | to blossom / to bloom / to feel exhilarated<br>बहार आना / खिलना / रोमांचित होना |
| ३८७ | खुळावणे | to go crazy about<br>पगला जाना |
| ३८८ | दुखावणे | to hurt / to get hurt<br>दुखाना |
| ३८९ | तेज:पुंज | bright<br>तेजस्वी |
| ३९० | तो अध:पात<br>अध:पाता- | deterioration / decline / downfall<br>अध:पतन |
| ३९१ | ते पुन:प्रक्षेपण<br>पुन:प्रक्षेपणा- | repeat telecast<br>पुन:प्रसारण |



## पाठ ७ | CHAPTER 7

| | | |
|---|---|---|
| ३९२ | तो भुईचाफा<br>भुईचाफ्या- | a kind of orchid with fragrance<br>एक प्रकार की सुगन्धित अमरी |
| ३९३ | तो बकूळ<br>बकुळा- | a big tree of tiny fragrant flowers<br>बकुल |

| | | |
|---|---|---|
| ३९४ | तो सडा, ते सडे<br>सड्या-, सड्यां-<br>--पडणे<br>--घालणे | spread of flowers on the ground<br>जमीन पर फूलों का बिखराव<br>sprinkling of cow-dung water for cleansing at entrance of village houses<br>गाँव में आंगन को शुद्ध करने के लिए गोबर के पानी का छिड़काव |
| ३९५ | तो घमघमाट<br>घमघमाटा- | fragrance<br>महक |
| ३९६ | पांगलेला | dispersed / scattered living beings<br>बिखरे हुए सजीव |
| ३९७ | बावणे | to wither<br>मुरझाना |
| ३९८ | तो दाणागोटा<br>दाण्यागोट्या- | a comprehensive term for grain, pulse etc. / ration<br>अनाज / राशन / दानापानी |
| ३९९ | हुकमी | sure shot<br>रामबाण / हुक्मी |
| ४०० | नेम नसणे | being unpredictable<br>किसी बात या चीज या व्यक्ति का भरोसा न होना |
| ४०१ | कळीचे वाक्य | triggering sentence<br>मुद्दे की मूल बात / का मूल वाक्य |
| ४०२ | अवखळ / खोडकर / खट्याळ | mischievous / naughty<br>नटखट |
| ४०३ | पोकळ / फोल / निरर्थक | in vain<br>निरर्थक |
| ४०४ | अपेक्षाभंग / हिरमोड / भ्रमनिरास | disappointment<br>अपेक्षाभंग |
| ४०५ | खवट / खवचट / कुत्सित | rancid / condescending / snooty<br>कुत्सित / दूसरों को अपमानित करने की दंभपूर्ण प्रवृत्ति |
| ४०६ | अलिप्त | aloof / isolated<br>विलग |
| | तटस्थ | neutral<br>तटस्थ |

| | | |
|---|---|---|
| ४०७ | व्रतस्थ | disciplined, focused lifestyle<br>अनुशासित जीवनशैली |
| ४०८ | तो धाक<br>धाका-<br>तो वचक<br>वचका-<br>तो दरारा<br>दराऱ्या- | awe<br>धाक / व्यक्ति के ओहदे या उच्च स्थान का भय<br>(जैसे शिक्षक का, मातापिता का, वरिष्ठ का) |
| ४०९ | चोंबडा / चहाडखोर | tattletale / back biter<br>चुगलखोर |
| ४१० | हिडीस / किळसवाणा / घृणास्पद | repulsive / slimy / infernal<br>घृणास्पद / विभत्स |
| ४११ | तोतरा | stammerer<br>हकलाने वाला व्यक्ति |
| ४१२ | गुरे राखणे | to take care of cattle<br>गाय-बैल चराना |
| ४१३ | आतड्याने बोलणे | talking from the bottom of the heart<br>दिल की गहराई से बोलना |
| ४१४ | मुस्कटात देणे / मारणे | to slap<br>तमाचा लगाना |
| ४१५ | ती चिमणी, त्या चिमण्या<br>चिमणी-, चिमण्यां- | small kerosene lamp<br>मिट्टी के तेल का दिया |
| ४१६ | चालता हो! | go away! / get lost!<br>फूट! / चले जाओ! / दफा हो जाओ! |
| ४१७ | भिकारडा | beggerly / worthless<br>भिखारी जैसा बेकार व्यक्ति |
| ४१८ | ताकाच्या खांबासारखा घुम्म | unshaken / unwavering<br>स्थितप्रज्ञ |
| ४१९ | कोपिष्ट / भडक माथ्याचा | hot tempered<br>गुस्सैल |
| ४२० | माज येणे | to become vain / have airs due to some good fortune<br>चरबी चढ़ना |

| | | |
|---|---|---|
| ४२१ | ती शापवाणी, त्या शापवाण्या<br>शापवाणी-, शापवाण्यां- | curse<br>श्राप वाणी |
| ४२२ | गारद करणे | to defeat / to overpower / to kill<br>हरा देना / ढेर करना / पस्त कर देना |
| ४२३ | तंतोतंत | exact match<br>बिल्कुल एक जैसा |
| ४२४ | टपून बसणे | to wait eagerly to grab the chance<br>ताक में बैठना |
| ४२५ | संताप उतू जाणे | to be furious / to be inflamed<br>गुस्से से आग बबूला होना |
| ४२६ | तो भडिमार<br>भडिमारा- | furious attack (of questions / comments / bullets / abuses)<br>बौछार (प्रश्नों की / प्रतिक्रियाओं की / गोलियों की / गालियों की) |
| ४२७ | अबोला धरणे | not talking due to displeasure<br>नाराजगी के कारण बोलना बंद करना |
| ४२८ | पिच्छा पुरवणे | to be after something<br>पीछे पड़ना |
| ४२९ | तीनताड उडणे | to be astonished / to be aghast<br>भौंचक्का रह जाना |
| ४३० | ब्रह्मांड आठवणे | to feel inadequate before a daunting task<br>नानी याद आना |
| ४३१ | साष्टांग नमस्कार घालणे | to surrender completely by prostrating headlong in front of someone (meant really or in sarcasm)<br>साष्टांग / दंडवत प्रणाम करना |
| ४३२ | तंतरणे / टरकणे / चळाचळा कापणे / थरकाप होणे / गाळण उडणे / गर्भगळित होणे / जीभ टाळ्याला चिकटणे / घाम फुटणे / दातखीळ बसणे / तोंडातून शब्द न फुटणे / ततपप होणे - करणे / पोटात गोळा येणे / पोटात खड्डा पडणे / पाय लटलट कापणे | to shudder / to be scared out of one's wits / to miss a heart beat due to fright / to shake like a leaf / tremble due to fear or danger / to get goosebumps / to get shivers down one's spine<br>डर के मारे साँप सूंघ जाना / घिग्घी बंध जाना / पसीने छूटना / रूह काँप जाना / दिन में तारे नजर आना / दिल की धड़कन रुक जाना / पैरों तले जमीन खिसक जाना |

| | | |
|---|---|---|
| ४३३ | भयग्रस्त / भयकंपित | terrified<br>डरा हुआ / आतंकित |
| ४३४ | भयावह / भयप्रद | frightful<br>भयानक |
| ४३५ | ती विवंचना, त्या –<br>विवंचने-, विवंचनां- | anxiety / distressing perplexity<br>घोर चिंता |
| ४३६ | ती तंद्री<br>तंद्री- | trance<br>भाव समाधि / खयालों में खो जाने की स्थिति |
| ४३७ | भडक | gaudy / hot-tempered<br>भड़कीला / गुस्सैल |
| ४३८ | आक्रस्ताळ्या | edgy / jittery<br>छोटी छोटी बातों पर उत्तेजित हो कर चीखने-चिल्लाने वाला |
| ४३९ | पोखरणे | to dig out / to hollow out / to get hollowed due to worries<br>खोखला होना / करना |
| ४४० | ते आवर्त, ती आवर्ते / आवर्त<br>आवर्ता- / आवर्तां- | whirlpool<br>भँवर |
| ४४१ | ती रानभूल, त्या रानभुली<br>रानभुली-, रानभुली- | to get lost in nature and to stray<br>प्रकृति में खो कर भटक जाना |
| ४४२ | तो चकवा, ते चकवे<br>चकव्या-, चकव्यां- | to get stuck / to go round and round / to get lost in a labyrinth<br>भूलभुलैया में फँस जाना |
| ४४३ | मूग गिळून गप्प बसणे | to be silent when the situation demands vocal expression<br>जहां बोलने की जरूरत है वहां चुप रहना |
| ४४४ | तो / ती मनोविकारतज्ज्ञ, ते / त्या -<br>मनोविकारतज्ज्ञा-, मनोविकारतज्ज्ञां- | psychiatrist<br>मनोविकार विशेषज्ञ |
| ४४५ | ते तुटलेपण<br>तुटलेपणा- | detachment<br>अलग पड़ जाने की भावना |

## पाठ ८ | CHAPTER 8

| | | |
|---|---|---|
| ४४६ | ते भावगीत, ती भावगीते / भावगीतं<br>भावगीता-, भावगीतां- | a song expressing soft feelings<br>तरल भाव व्यक्त करने वाला गीत |

| | | |
|---|---|---|
| ४४७ | तो चरण, ते -<br>चरणा-, चरणां- | poetic verse / line<br>कविता का पद |
| ४४८ | ती पंक्ती, त्या पंक्ती<br>पंक्ती-, पंक्तीं- | line<br>पंक्ति |
| ४४९ | ते भजन, ती भजने / भजनं<br>भजना-, भजनां- | devotional song / hymn<br>भजन |
| ४५० | तो गीतकार, ते -<br>गीतकारा-, गीतकारां- | songwriter / lyricist<br>गीतकार |
| ४५१ | तो श्लोक, ते –<br>श्लोका-, श्लोकां- | verse / stanza<br>श्लोक |
| ४५२ | ते कवन, ती कवने / कवनं<br>कवना-, कवनां- | poem<br>कविता |
| ४५३ | ते भक्तिगीत, ती भक्तिगीते / भक्तिगीतं<br>भक्तिगीता-, भक्तिगीतां- | devotional song<br>भक्तिगीत |
| ४५४ | तो अभंग, ते -<br>अभंगा-, अभंगां- | old poetic metre used in devotional Marathi poems / a poem using this metre<br>प्राचीन आध्यात्मिक मराठी कविता का एक विशेष छंद / उसी छंद में लिखी हुई कविता |
| ४५५ | ते पद, ती पदे / पदं<br>पदा-, पदां- | verse / line<br>पद |
| ४५६ | ती रचना, त्या –<br>रचने-, रचनां- | composition<br>रचना |
| ४५७ | ती ओवी, त्या ओव्या<br>ओवी-, ओव्यां- | old poetic metre used in Marathi poems / a poem using this metre<br>प्राचीन मराठी कविता का एक विशेष छंद / उसी छंद में लिखी हुई कविता |
| ४५८ | ते पद्य, ती पद्ये / पद्यं<br>पद्या-, पद्यां- | verse<br>पद्य / छंद |
| ४५९ | ती चारोळी, त्या चारोळ्या<br>चारोळी-, चारोळ्यां- | short poem of four lines<br>चार पंक्तियों की छोटी कविता |
| ४६० | तो हायकू, ते -<br>हायकू-, हायकूं- | haiku / a short Japanese poem<br>हायकू / एक छोटी जापानी कविता का प्रकार |

| | | |
|---|---|---|
| ४६१ | ती गझल, त्या गझला<br>गझले-, गझलां- | ghazal / a traditional form of poetry in Persian or Urdu<br>ग़ज़ल / फारसी एवं उर्दू कविता की पारंपरिक शैली |
| ४६२ | ती आरती, त्या आरत्या<br>आरती-, आरत्यां- | hymn sung in a rhythmic form in front of god with a plate with a flame / lamp<br>आरती |
| ४६३ | ते काव्य, ती काव्ये / काव्यं<br>काव्या-, काव्यां- | poetry<br>काव्य |
| ४६४ | ते कडवे / कडवं, ती कडवी<br>कडव्या-, कडव्यां- | stanza<br>छंद |
| ४६५ | ती कवयित्री, त्या -<br>कवयित्री-, कवयित्रीं- | poetess<br>महिला कवि / कवयित्री |
| ४६६ | तो रचनाकार, ते -<br>रचनाकारा-, रचनाकारां- | composer<br>रचनाकार / कवि |
| ४६७ | ते प्रभुत्व<br>प्रभुत्वा- | command / mastery<br>प्रवीणता / निपुणता |
| ४६८ | अजरामर | immortal / eternal<br>अमर / निरंतर |
| ४६९ | ते अध्यक्षपद, ती अध्यक्षपदे / अध्यक्षपदं<br>अध्यक्षपदा-, अध्यक्षपदां- | presidency / chairmanship<br>अध्यक्षपद / अध्यक्षता |
| ४७० | भूषवणे | to adorn / to grace / to honour<br>विभूषित करना |
| ४७१ | ते टोपणनाव, ती टोपणनावे / टोपणनावं<br>टोपणनावा-, टोपणनावां- | nick name / pet name / pseudonym<br>उपनाम / छद्म नाम |
| ४७२ | तो रूपबंध, ते -<br>रूपबंधा-, रूपबंधां- | form / design<br>रूप रेखा / आकृति |
| ४७३ | आव्हान पेलणे | to accept a challenge<br>चुनौती स्वीकार करना |
| ४७४ | वाटेला जाणे | to provoke<br>उकसाना |
| ४७५ | गांगरणे | to be bewildered / confounded<br>चकरा जाना |

| | | |
|---|---|---|
| ४७६ | स्वाती | fifteenth constellation of stars / Arcturus<br>पंद्रहवा नक्षत्र |
| ४७७ | पारदर्शक | transparent<br>पारदर्शी |
| ४७८ | तो रसिक, ते -<br>रसिका-, रसिकां- | connoisseur / one who appreciates (music, etc)<br>पारखी / रसिक (संगीत, आदि) |
| ४७९ | तूर्त | for the time being<br>अभी के लिए |
| ४८० | ती गाथा, त्या -<br>गाथे-, गाथां- | legend / saga / epic<br>किंवदंती / रचना / महाकाव्य |
| ४८१ | ते स्त्रीगीत, ती स्त्रीगीते / स्त्रीगीतं<br>स्त्रीगीता-. स्त्रीगीतां- | women's song<br>स्त्री गीत |
| ४८२ | ते लोकगीत, ती लोकगीते / लोकगीतं<br>लोकगीता-, लोकगीतां- | folk song<br>लोकगीत |
| ४८३ | ते शाहिरी काव्य, ती काव्ये / काव्यं<br>काव्या-, काव्यां- | poetry by minstrel or bard<br>स्तुतिपाठक कवि ने रची हुई कविता |
| ४८४ | ते नाट्यगीत, ती नाट्यगीते / नाट्यगीतं<br>नाट्यगीता-, नाट्यगीतां- | songs in a musical drama<br>नाटक के गीत |
| ४८५ | ती लय, त्या लयी<br>लयी-, लयीं- | rhythm<br>लय |
| ४८६ | जे न देखे रवी, ते देखे कवी | a poet sees what even the sun cannot<br>जो सूरज भी नहीं देख सकता<br>वह कवि देख सकता है |
| ४८७ | ते सुभाषित, ती सुभाषिते / सुभाषितं<br>सुभाषिता-, सुभाषितां- | maxim<br>सूक्ति / नीति वाक्य |
| ४८८ | नियम धाब्यावर बसवणे | to ignore or break rules<br>नियम भंग करना |
| ४८९ | ते रसग्रहण, ती रसग्रहणे / रसग्रहणं<br>रसग्रहणा-, रसग्रहणां- | appreciation of art, music, etc.<br>कला, संगीत आदि का आनंद |

| | | |
|---|---|---|
| ४९० | संवेदनशील | sensitive<br>संवेदनशील |
| ४९१ | ती प्रतिभा<br>प्रतिभे- | talent<br>प्रतिभा |
| ४९२ | ती कल्पकता<br>कल्पकते- | creativity / imagination / ingenuity<br>सर्जनशीलता |
| ४९३ | मुकाट | quietly without objecting<br>चुपचाप बिना विरोध किये |
| ४९४ | प्रतिभाबळे | with the help of one's talent<br>प्रतिभा के सहारे |
| ४९५ | लीलया | effortlessly<br>बिना किसी परिश्रम के / सहज |
| ४९६ | तो दिक्काल<br>दिक्काला- | space-time<br>स्थल और काल |
| ४९७ | गतप्रभ | dull<br>निस्तेज |
| ४९८ | ते तारांगण, ती तारांगणे / तारांगणं<br>तारांगणा-, तारांगणां- | sky full of stars<br>तारों से भरा आकाश |
| ४९९ | कवडीमोल | valueless / worthless<br>कौड़िओं के दाम / मूल्यहीन |
| ५०० | मन वेधून घेणे | to attract / to win the heart<br>दिल जीतना |
| ५०१ | ते नवसर्जन, ती नवसर्जने / नवसर्जनं<br>नवसर्जना-, नवसर्जनां- | novel creation<br>नवनिर्माण |
| ५०२ | ते जीवनमूल्य, ती जीवनमूल्ये / जीवनमूल्यं<br>जीवनमूल्या-, जीवनमूल्यां- | values of life<br>जीवन मूल्य |
| ५०३ | ती धक्काबुक्की<br>धक्काबुक्की- | scuffle / jostling<br>धक्कामुक्की |
| ५०४ | ती चुकामूक, त्या चुकामुकी<br>चुकामुकी-, चुकामुकीं- | failing to find or meet each other<br>एक दूसरे को ढूंढने या मिलने से चूकना |

| | | |
|---|---|---|
| ५०५ | गवगवा | fanfare<br>गाजाबाजा |
| ५०६ | बिनतोड | matchless<br>बेजोड़ |
| ५०७ | विक्राळ | frightful / terrible<br>विकराल / डरावना |
| ५०८ | लडिवाळ | beloved / affectionate / tender<br>लाड़ला / स्नेहमय / कोमल |
| ५०९ | ते ध्रुवपद, ती ध्रुवपदे / ध्रुवपदं<br>ध्रुवपदा-, ध्रुवपदां | main line of the song that gets repeated / refrain<br>गाने का मुखड़ा |
| ५१० | शतदा | a hundred times<br>सौ बार |
| ५११ | निगरगट्ट | incorrigible / thick-skinned<br>चिकना घड़ा / बेशर्म, जिसे सुधारा ना जा सके |
| ५१२ | बिनधास्त | gutsy / audacious<br>निडर |
| ५१३ | बेभान | frenzied / hysterical / wild / to be beside oneself / to lose it<br>आपा खो देना |
| ५१४ | तो संगीतकार, ते -<br>संगीतकारा-, संगीतकारां- | musician / composer<br>संगीतकार |
| ५१५ | धाटणी | form / style<br>शैली / अंदाज |
| ५१६ | कर्दमलेले | muddy / dirty<br>कीचड़ से लथपथ |
| ५१७ | मोकळ्या हाती | with empty hands<br>खाली हाथ |
| ५१८ | ती कारभारीण, त्या कारभारणी<br>कारभारणी-, कारभारणीं- | wife<br>पत्नी |
| ५१९ | तो चिखलगाळ<br>चिखलगाळा- | mud and dirt<br>कीचड़ और गंदगी |

| | | |
|---|---|---|
| ५२० | ते उधाण | high tide / gust / surge / outpour<br>ज्वार / आवेश / जोश |
| | आनंदाला, उत्साहाला उधाण येणे | surge of joy, excitement<br>ख़ुशी, उत्साह का आवेश |
| ५२१ | ते गुज, ती गुजे / गुजं<br>गुजा-, गुजां- | secret<br>राज़ |
| ५२२ | गहिवरणे | to be choked with emotions<br>गला भर आना |
| ५२३ | बावरणे | to be bewildered / confounded<br>चकरा जाना |
| ५२४ | हिंदोळ्यावर | on a swing<br>झूले पर |
| ५२५ | गहिऱ्या (गहिरा) | deep<br>गहरे |
| ५२६ | बापडे (मूळ विशेषण 'बापडा') | poor<br>बेचारा |
| ५२७ | चंचल | fickle / playful<br>चंचल |
| ५२८ | हतबल | helpless<br>विवश |
| ५२९ | अविचारी | thoughtless / careless / imprudent / reckless<br>अविचारी / लापरवाह |
| ५३० | संभ्रमित | confused / confounded / indecisive<br>दुविधा में होना |
| ५३१ | निषेध नोंदवणे | to take objection<br>विरोध जताना |
| ५३२ | ते संगर, ती संगरे / संगरं<br>संगरा-, संगरां- | war<br>संग्राम / युद्ध |
| ५३३ | विस्फारणे | to expand / to widen<br>फैलाना / बड़ा करना |
| | डोळे विस्फारून | with eyes widened in astonishment<br>आँखें फाड़ कर |
| ५३४ | रक्ताळून | covered with blood<br>खून से लथपथ |

| | | |
|---|---|---|
| ५३५ | थिजणे | to freeze<br>जम जाना |
| ५३६ | नेमस्त | moderate / temperate<br>मध्यम / संतुलित |
| ५३७ | सात्त्विक | virtuous / pure / honest<br>सात्विक / शुद्ध |
| ५३८ | ती गुंडी, त्या गुंड्या<br>गुंडी-, गुंड्यां- | button<br>बटन |
| ५३९ | तो पंतोजी, ते -<br>पंतोजी-, पंतोजीं- | a (preacher) teacher (used sarcastically in present times)<br>मास्टर जी |
| ५४० | मवाळ | moderate / temperate<br>मध्यम / संतुलित |
| ५४१ | ऊठसूट | every now and then / at the drop of a hat<br>उठते बैठते / कभी भी / हर समय / जब देखो तब |
| ५४२ | कुरूप | ugly<br>बदसूरत / भद्दा |
| ५४३ | तो वळ, ते -<br>वळा-, वळां- | welt / a shortlived mark of a hurt<br>मार का निशान |
| ५४४ | ते (डोळ्यांवरील) झापड,<br>ती झापडे / झापडं<br>झापडा-, झापडां- | blinkers / a pair of small leather screens put on the side of a horse's eyes<br>अँधेरी / घोड़े की आँखों पर डालने का पर्दा |
| ५४५ | तो घाणा, ते घाणे<br>घाण्या-, घाण्यां- | a wooden crusher of oil seeds attached to a bull<br>(बैल का) कोल्हू |
| ५४६ | फसवा | a trap to cheat and mislead / deceptive / tricky / fishy<br>जाल |
| ५४७ | गाडून टाकणे | to bury / to suppress<br>गाड़ना / दबाना |
| ५४८ | ती हिकमत, त्या हिकमती<br>हिकमती-, हिकमतीं- | tactic / trick<br>तरकीब / होशियारी |
| ५४९ | पावलागणिक | at every step<br>कदम कदम पर |

पाठ ८

| | | |
|---|---|---|
| ५५० | खादाड | gluttonous<br>खाऊ / पेटू |
| ५५१ | उचंबळणे | to surge<br>उमड़ना |
| ५५२ | तो पारवा, ते पारवे<br>पारव्या-, पारव्यां- | pigeon<br>कबूतर |
| ५५३ | ती पागोळी, त्या पागोळ्या<br>पागोळी-, पागोळ्यां- | stream of rain descending from rooftops or trees<br>छत या पेड़ से फिसल कर गिरने वाली बारिश की बूँदें |
| ५५४ | ते बीळ, ती बिळे / बिळं<br>बिळा-, बिळां- | hole / burrow<br>बिल |
| ५५५ | डफ्फर | stupid / duffer<br>मूर्ख |
| ५५६ | लोकां सांगे ब्रह्मज्ञान,<br>आपण कोरडे पाषाण | one who does not practice what he preaches<br>जो खुद सही ढंग से कार्य नहीं करता लेकिन दूसरों को उपदेश देता है| |
| ५५७ | आले देवाजीच्या मना<br>तेथे कुणाचे चालेना | man proposes God disposes<br>भगवान की इच्छा के आगे मनुष्य बेबस है| |
| ५५८ | अडली गाय फटके खाय | if you are stuck, then people take advantage of you<br>यदि आप फँस गए हैं, तो लोग आपका फायदा उठाते हैं| |
| ५५९ | नळी फुंकली सोनारे इकडून<br>तिकडे गेले वारे | sermon falling on deaf ears<br>कान पर जूं ना रेंगना |
| ५६० | तो छंद, ते -<br>छंदा-, छंदां- | hobby / metre<br>शौक / छंद |
| ५६१ | तो जाच, ते -<br>जाचा-, जाचां- | torture / ill-treatment / oppression<br>जुल्म / अत्याचार |
| ५६२ | ते साचलेपण<br>साचलेपणा- | unwanted accumulation / saturation<br>जमाव / पक जाना / उकता जाना / संपृक्तता |
| ५६३ | नियम झुगारून देणे | to ignore / break rules<br>नियम की अवज्ञा करना |

पाठ ८

५६४ तो मुक्तछंद, ते -
मुक्तछंदा-, मुक्तछंदां-
free verse
मुक्त छंद

५६५ गच्च
tight
कस के

५६६ ते विजन, ती विजने / विजनं
विजना-, विजनां-
desolation
वीराना / तन्हाई

५६७ डकवणे
to paste / to stick
चिपकाना

५६८ कैकदा
(how) many times
जाने कितनी बार

५६९ मातीमोल
valueless
मिट्टी के दाम

५७० तो गाळ, ते -
गाळा-, गाळां-
deposit / sediment / silt
तलछट / गाद

५७१ तो लगदा, ते लगदे
लगद्या-, लगद्यां-
mash / papier-mache / pulp
कुट्टी

५७२ ती दुलई, त्या दुलया
दुलई-, दुलयां-
quilt / duvet
रज़ाई

५७३ ते जावळ, ती जावळे / जावळं
जावळा-, जावळां-
hair of a newborn baby
नवजात शिशु के बाल

५७४ कुजणे
to rot / to decay
सड़ना

५७५ नाक मुरडणे
to sneer at
नाक सिकुड़ना

## पाठ ९ | CHAPTER 9

५७६ तो संस्कार, ते –
संस्कारा-, संस्कारां-
cultural values
संस्कार

५७७ निषिद्ध
prohibited / forbidden
निषिद्ध / वर्जित

५७८ वर्ज्य
taboo / forbidden
वर्जित

| | | |
|---|---|---|
| ५७९ | ती वागणूक, त्या वागणुकी<br>वागणुकी-, वागणुकीं- | behaviour<br>बर्ताव / सुलूक |
| ५८० | हमखास | definitely<br>निश्चित रूप से / यकीनन |
| ५८१ | तो धबका, ते धबके<br>धबक्या-, धबक्यां- | blow / bash / whack<br>जोर का आघात |
| ५८२ | ती रीतभात, त्या रितीभाती<br>रितीभाती-, रितीभातीं- | manners / etiquettes<br>शिष्टाचार / रीति-रिवाज / दस्तूर |
| ५८३ | ती राक्षसवेळ, त्या राक्षसवेळा<br>राक्षसवेळे-, राक्षसवेळां- | the scary dark time of dusk<br>सूर्यास्त और रात के बीच का समय<br>जब अँधेरा डरावना होने लगता है |
| ५८४ | दात विचकणे | to grin making fun of someone's<br>helplessness / to sneer / to frighten<br>किसी की बेबसी पर या किसी का मजाक<br>उड़ाते हुए बत्तीसी दिखाना / ड़राना |
| ५८५ | ठाकून ठोकून | repeated beatings / to try to discipline /<br>punish using the rod unsparingly /<br>to scrutinise to ascertain<br>ठोक ठोक कर / ठोक बजा कर / परख कर |
| ५८६ | ती लटपट, त्या लटपटी<br>लटपटी-, लटपटीं- | arduous efforts<br>पुरजोर कोशिश / पापड़ बेलना |
| ५८७ | तिखटमीठ लावणे | to exaggerate<br>बढ़ा चढ़ा कर बोलना |
| ५८८ | ती उलटतपासणी, त्या<br>उलटतपासण्या<br>उलटतपासणी-, उलटतपासण्यां- | interrogation / cross questioning /<br>cross examination<br>पूछताछ / प्रतिपरीक्षण / जाँच |
| ५८९ | खाण तशी माती अन्<br>कापूस तशा वाती | like father like son<br>जैसा बीज वैसी फसल |
| ५९० | धाक घालणे | to instill fear<br>डर बिठाना |
| ५९१ | उडदामाजी काळे गोरे,<br>निवडतील काय निवडणारे! | how to choose when everyone /<br>everything is the same!<br>जब सब एक जैसे हैं, तो चुननेवाले क्या चुनेंगे! |
| ५९२ | यथा राजा तथा प्रजा | as is the king so are the subjects<br>जैसा राजा वैसी प्रजा |

| | | |
|---|---|---|
| ५९३ | ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या बाभळी | those living together know each other well.<br>एक ही गांव के लोग एक-दूसरे को अच्छी तरह से पहचानते हैं। |
| ५९४ | सगळे एकाच माळेचे मणी असणे | all are same / all belong to the same tribe<br>एक ही थाली के चट्टेबट्टे |
| ५९५ | घरोघरी मातीच्या चुली | all households are the same (face the same problems)<br>घर घर की कहानी |
| ५९६ | तो पगडा, ते पगडे<br>पगड्या-, पगड्यां- | influence / hold<br>प्रभुत्व / प्रभाव |
| ५९७ | -च्या कसोटीवर घासून पाहणे | to test someone on a criterion<br>किसी को किसी कसौटी पर परखना |
| ५९८ | ती पुष्टी, त्या पुष्ट्या<br>पुष्टी-, पुष्ट्यां- | confirmation / affirmation / endorsement / support<br>पुष्टि / समर्थन |
| ५९९ | शिक्का बसणे | to be stamped as/ to be labeled as / to be regarded as<br>किसी पर किसी चीज की मुहर लगना |
| ६०० | शिक्का मारणे | to stamp as / to label as / to regard someone as / to take someone as<br>मुहर लगाना / अंकित करना |
| ६०१ | पापणी लवणे / फडफडणे | flickering of eye-lid which is regarded as a sign of good or bad omen<br>आँख फड़कना |
| ६०२ | ती उल्का, त्या –<br>उल्के-, उल्कां- | meteor<br>टूटा हुआ तारा |
| ६०३ | तीन तिघाडा काम बिघाडा | having a third person leads to trouble<br>तीन तिगाड़ा काम बिगाड़ा |
| ६०४ | तो भारद्वाज, ते -<br>भारद्वाजा-, भारद्वाजां- | crow-pheasant / lark<br>भारद्वाज / भरत पक्षी |
| ६०५ | हुप्प | sullen<br>रूठा हुआ |
| ६०६ | नावे ठेवणे | to abuse / to give someone a bad name<br>बुरा भला कहना |

| | | |
|---|---|---|
| ६०७ | अन्न टाकणे | to waste food<br>खाना जाया करना |
| ६०८ | ते पसायदान<br>पसायदाना- | prayer written by Saint Dnyaneshwar at the end of his scripture 'Dnyaneshwari'<br>संत ज्ञानेश्वर द्वारा लिखित ज्ञानेश्वरी के अंत में लिखी हुई प्रार्थना<br>prayer seeking divine blessings for collective good<br>सबके भले के लिए प्रार्थना |
| ६०९ | चूळ भरणे | to rinse the mouth<br>मुँह खंगालना |
| ६१० | ते खरकटे / खरकटं, ती खरकटी<br>खरकट्या-, खरकट्यां- | left-overs / fallen and soiled / defiled food<br>खाते हुए गिरा हुआ या बर्तन में बचा हुआ / छोड़ा हुआ खाना |
| | खरकटे (भांडे) | the vessel with few left overs that is kept for washing<br>धोने के लिए पड़े बर्तन जिन में कुछ खाना चिपका हुआ होता है |
| ६११ | उष्टा | soiled / defiled food<br>जूठा |
| ६१२ | तो संस्कृतिसंगम<br>संस्कृतिसंगमा- | confluence of cultures<br>संस्कृति संगम |
| ६१३ | ते परदेशगमन, ती परदेशगमने / परदेशगमनं<br>परदेशगमना- | going abroad<br>परदेस जाना |
| ६१४ | आंतरसांस्कृतिक | intercultural<br>अंतरसांस्कृतिक |
| ६१५ | प्रश्न भेडसावणे | to be haunted or distressed or confronted by some problem or question<br>प्रश्न / समस्या सताना |
| ६१६ | भ्रम ठरणे | to realise one's wrong assumption<br>अंदाजा गलत साबित होना |
| ६१७ | अडचणीत टाकणे | to put in a dilemma or an uncomfortable or disadvantageous position<br>अड़चन में डाल देना |

| | | |
|---|---|---|
| ६१८ | तो चमू<br>चमू- | team / contingent / squad<br>समूह / दल / टुकड़ी |
| ६१९ | बावचळून | bewildered / confounded<br>चकरा कर |
| ६२० | वरमून | ashamed / cooled down<br>शरमा कर / शांत हो कर |
| ६२१ | पदरी निराशा येणे | disappointment befalling on oneself<br>निराशा झेलना |
| ६२२ | ते पादत्राण, ती पादत्राणे / पादत्राणं<br>पादत्राणा-, पादत्राणां- | footwear<br>जूते, चप्पल आदि |
| ६२३ | प्रस्थापित होणे | to get established<br>प्रस्थापित होना / प्रवर्तित होना |
| ६२४ | ती खासियत, त्या खासियती<br>खासियती-, खासियतीं- | speciality<br>विशेषता |
| ६२५ | तो परवचा, ते परवचे<br>परवच्या-, परवच्यां- | evening recitation<br>शाम के समय बच्चों से करवाया जाने वाला पठन |
| ६२६ | ती फक्की, त्या फक्क्या (मारणे)<br>फक्की-, फक्क्यां- | mouthful / bite / morsel<br>फाँकी (मारना) |
| ६२७ | तो एकेरी उल्लेख, ते -<br>उल्लेखा-, उल्लेखां- | disrespect due to not using the respectful form<br>सम्मानजनक उल्लेख नहीं करने के कारण अनादर |
| ६२८ | संस्कारी / सुसंस्कारी / सुसंस्कारित | well-behaved / well-mannered / cultured<br>संस्कारी |
| ६२९ | असुंदर | ugly<br>कुरूप |

## पाठ १० | CHAPTER 10

| | | |
|---|---|---|
| ६३० | तो पाणसाप, ते -<br>पाणसापा-, पाणसापां- | water snake<br>पानी में रहने वाला साँप |
| ६३१ | ती जलसंपदा<br>जलसंपदे- | water resources<br>जल संसाधन |
| ६३२ | तो पाणबुड्या, ते पाणबुडे<br>पाणबुड्या-, पाणबुड्यां- | diver<br>गोताखोर |

पाठ ९

| | | |
|---|---|---|
| ६३३ | तो पाणकोंबडा, ते पाणकोंबडे<br>पाणकोंबड्या-, पाणकोंबड्यां- | water cock<br>पनकुकरा |
| ६३४ | ते जलपान<br>जलपाना- | refreshments<br>जलपान / अल्पाहार / नाश्ता |
| ६३५ | ते पाणकणीस, ती पाणकणसे / पाणकणसं<br>पाणकणसा-, पाणकणसां- | elephant grass / bulrush<br>हाथी घास |
| ६३६ | ते जलोत्सारण<br>जलोत्सारणा- | water drainage<br>जलनिकास |
| ६३७ | ती जलक्रीडा, त्या -<br>जलक्रीडे-, जलक्रीडां- | water sports<br>पानी के खेल |
| ६३८ | ते जलसंधारण<br>जलसंधारणा- | water conservation<br>जल संरक्षण |
| ६३९ | ती पाणपोई, त्या पाणपोया<br>पाणपोई-, पाणपोयां- | public facility for free drinking water<br>पेयजल की व्यवस्था |
| ६४० | ते पाणगवत<br>पाणगवता- | water grass<br>पानी की घास |
| ६४१ | ती जलसमाधी, त्या जलसमाध्या<br>जलसमाधी-, जलसमाध्यां- | drowned<br>जलसमाधि |
| ६४२ | पाणक्या, ते पाणके<br>पाणक्या-, पाणक्यां- | person carrying / supplying water to homes<br>घरों में पानी उपलब्ध कराने वाला |
| ६४३ | पाणउतारा करणे | to humiliate<br>अपमानित करना |
| ६४४ | ते जलचक्र<br>जलचक्रा- | water cycle<br>जल चक्र |
| ६४५ | ते जलयान, ती जलयानं / जलयाने<br>जलयाना-, जलयानां- | water vehicle<br>जलयान / जलवाहन |
| ६४६ | तो पाणवठा, ते पाणवठे<br>पाणवठ्या-, पाणवठ्यां- | bank of river / water-place<br>पनघट |
| ६४७ | तो पाणपक्षी, ते -<br>पाणपक्ष्या-, पाणपक्ष्यां- | water bird<br>जलपक्षी |
| ६४८ | तो जलनिधी<br>जलनिधी- | sea / ocean<br>समुद्र / सागर |

| | | |
|---|---|---|
| ६४९ | ती पाणबुडी, त्या पाणबुड्या<br>पाणबुडी-, पाणबुड्यां- | submarine<br>पनडुब्बी |
| ६५० | ती पाणकळा<br>पाणकळे- | rainy season (rare literary usage)<br>बारिश का मौसम (कम, साहित्यिक प्रयोग) |
| ६५१ | ते जलावरण, ती जलावरणं / जलावरणे<br>जलावरणा-, जलावरणां- | hydrosphere<br>जलमंडल |
| ६५२ | तो जलचर, ते –<br>जलचरा-, जलचरां- | aquatic animals<br>जलचर / पानी के जीव |
| ६५३ | ते जलतरण<br>जलतरणा- | swimming<br>तैराकी |
| ६५४ | तो जलाशय, ते -<br>जलाशया-, जलाशयां- | reservoir<br>जलाशय / कुंड / तालाब |
| ६५५ | ती पाणशेंग, त्या पाणशेंगा<br>पाणशेंगे-, पाणशेंगां- | water-pod / jocose term for fish (rare literary usage)<br>मछली के लिए विनोदी शब्द (कम, साहित्यिक प्रयोग) |
| ६५६ | ती पाणवनस्पती, त्या -<br>पाणवनस्पती-, पाणवनस्पतीं- | aquatic plants<br>जलवनस्पति |
| ६५७ | तो पाणघोडा, ते पाणघोडे<br>पाणघोड्या-, पाणघोड्यां- | hippopotamus<br>दरियाई घोड़ा |
| ६५८ | ती पाणचक्की, त्या पाणचक्क्या<br>पाणचक्की-, पाणचक्क्यां- | water mill<br>पानी की चक्की |
| ६५९ | पाणलोट | watershed / catchment area<br>वाटरशेड / जलग्रहण क्षेत्र |
| ६६० | ती जलविद्युत<br>जलविद्युते- | hydro-electric power<br>जलविद्युत (ऊर्जा) |
| ६६१ | तो जलविहार<br>जलविहारा- | water sport / ride<br>जल विहार / क्रीडा |
| ६६२ | वाहणे | to flow<br>बहना |
| ६६३ | साचणे | to get accumulated<br>पानी जमना |

पाठ १०

| | | |
|---|---|---|
| ६६४ | हिंदकळणे | to flow over the brim<br>छलकना |
| ६६५ | गळणे | to leak<br>रिसना / छेद से निकलना |
| ६६६ | झिरपणे | to seep<br>रिस कर गीला होना |
| ६६७ | तुंबणे | to clog / to get blocked (the flow of gutter-water / traffic etc.)<br>बहाव या प्रवाह किसी कारण अटक जाना (गन्दगी / ट्रॅफिक इ॰) |
| ६६८ | विसळणे | to rinse<br>खँगालना |
| ६६९ | फवारणे | to spray<br>छिड़कना (फुहार) |
| ६७० | बुचकळणे | to dip<br>सतह पर डुबोना |
| ६७१ | पाझरणे | to trickle / to relent<br>रिसना / पिघलना |
| ६७२ | कोसळणे | to collapse / to pour (rain) / to fall heavily<br>गिरना / बरसना |
| ६७३ | न्हाणे | to bathe<br>नहाना |
| ६७४ | शिंपडणे | to sprinkle<br>छिड़कना (बूँदें) |
| ६७५ | ठिबकणे | to drip<br>टपकना |
| ६७६ | साठणे | to get accumulated<br>जमा होना |
| | साठवणे | to accumulate<br>जमा करना |
| ६७७ | उसळणे | to bounce / to spring up / to gush<br>उछलना |

६७८ जिरणे
to get absorbed / to soak / to sink into / to get digested / to subside / to be humbled / to be humiliated
सोख लिया जाना / पचना / मुँह की खाना

६७९ जिरवणे
to cause to absorb / to digest / to be subsided / to humble / to humiliate / to make someone feel small
सोखना / पचाना / नीचा दिखाना

६८० बरसणे
to pour / to pelt down
बरसना

६८१ खंगाळणे
to rinse (rare usage)
खँगालना (कम प्रयोग)

६८२ गाळणे
to strain / to sieve / to filter / to leave out / to omit
छानना / हटाना / छोड़ देना

६८३ आटणे
to dry up
सूख जाना / सिकुड़ जाना / कम होना

६८४ ती ओसाडी, त्या ओसाड्या
ओसाडी-, ओसाड्यां-
desolate / barren land
बंजर / उजाड़ / वीरान जगह

६८५ ठोक्याठोक्याचे तांब्याचे हंडे
large open-mouthed copper vessels with spots (due to hammering)
बड़े मुँह वाले धातू के बर्तन (ठुकाई की वजह से जिस पर निशान हों)

तो हंडा, ते हंडे
हंड्या-, हंड्यां-
large open-mouthed metal vessel
बड़े मुँह वाला धातू का बर्तन

६८६ तो टिपूस, ते -
टिपुसा-, टिपुसां-
droplet / a small drop
छोटी बूंद

६८७ ते डबके / डबकं, ती डबकी
डबक्या-, डबक्यां-
puddle
डबरा / पानी का छोटा जमाव

६८८ अंधुकशी
dim / obscure / blurred
फीकी / अस्पष्ट / धुंधली

६८९ ती घागर, त्या घागरी
घागरी-, घागरीं-
earthen pot for storage of water
गागर

६९० वळणावळणांनी
in a curved way / with twists and turns
अलग अलग मोड़ से

| | | |
|---|---|---|
| ६९१ | तो पिंपळ, ते -<br>पिंपळा-, पिंपळां- | peepal tree<br>पीपल |
| ६९२ | तो घाट, ते घाट<br>घाटा-, घाटां- | flight of stairs leading down to a river / a mountain pass<br>घाट / पहाड़ी रास्ता |
| ६९३ | ते पाताळ, ती पाताळे / पाताळं<br>पाताळा-, पाताळां- | underworld<br>पाताल |
| ६९४ | ते अरण्य, ती अरण्ये / अरण्यं<br>अरण्या-, अरण्यां- | jungle<br>अरण्य / जंगल |
| ६९५ | तो तलाव, ते -<br>तलावा-, तलावां- | lake<br>तालाब |
| ६९६ | तो ओढा, ते ओढे<br>ओढ्या-, ओढ्यां- | stream<br>नाला |
| ६९७ | ती जीवनदायिनी, त्या -<br>जीवनदायिनी-, जीवनदायिन्यां- | (river as) life giver<br>जीवनदायिनी (नदी) |
| ६९८ | तो घोष, ते -<br>घोषा-, घोषां- | proclamation / loud incantation<br>घोष |
| ६९९ | घटकाभर | for a while<br>घड़ी भर |
| | ती घटका, त्या -<br>घटके- घटकां- | an outdated unit of time / a period of 24 minutes<br>२४ मिनट का समय नापने का पुराना मापक |
| ७०० | तो विसावा<br>विसाव्या- | rest<br>आराम |
| ७०१ | तो संगम, ते-<br>संगमा-, संगमां- | confluence<br>संगम |
| ७०२ | ते तीर्थक्षेत्र, ती तीर्थक्षेत्रे<br>तीर्थक्षेत्रा-, तीर्थक्षेत्रां- | place of pilgrimage<br>तीर्थ क्षेत्र |
| ७०३ | तो झंझावात, ते -<br>झंझावाता-, झंझावातां- | storm / hurricane<br>तूफान |
| ७०४ | उजाड | desolate<br>बंजर |
| ७०५ | वजा होणे | to get reduced<br>घटना / कम होना |

| | | |
|---|---|---|
| ७०६ | फारकत होणे | to separate<br>जुदा होना |
| ७०७ | ती ढांग, त्या ढांगा<br>ढांगे-, ढांगां- | leg<br>टाँग |
| ७०८ | नेत्रदीपक | spectacular<br>भव्य / शानदार |
| ७०९ | तो कोयता, ते कोयते<br>कोयत्या-, कोयत्यां- | scythe / sickle<br>हँसिया / दरांति |
| ७१० | ती गोळाबेरीज, त्या गोळाबेरजा<br>गोळाबेरजे-, गोळाबेरजां- | grand total<br>कुल योग |
| ७११ | आपला वाटा उचलणे | to take one's share<br>अपना हिस्सा लेना |
| ७१२ | पूर्वाश्रमीचे | former<br>जो पहले था व आज बदल गया है |
| ७१३ | तुटक | fragmentary / broken / curt / abrupt<br>खंडित / अलग / रूखा |
| ७१४ | ती खुंटी, त्या खुंट्या<br>खुंटी-, खुंट्यां- | hook<br>खूँटी |
| ७१५ | उखडणे | to get angry<br>गुस्सा होना |
| ७१६ | डोळे वटारणे | to widen eyes with anger<br>गुस्से से आँखें बड़ी करना |
| ७१७ | तिरसटणे | to be irritable<br>चिड़चिड़ा होना |
| ७१८ | ते तळे / तळं, ती तळी<br>तळ्या-, तळ्यां- | pond<br>छोटा तालाब |
| ७१९ | बिथरणे | to lose one's temper<br>गुस्से से होश खोना |
| ७२० | उंबरे झिजवणे | to make repeated futile trips<br>बार-बार निरर्थक / व्यर्थ चक्कर लगाना |
| ७२१ | चेहऱ्याचा रंग बदलणे | changing of the colour of face (according to mood)<br>चेहरे का रंग बदल जाना |

| | | |
|---|---|---|
| ७२२ | भकास | empty<br>खाली |
| ७२३ | निव्वळ | mere<br>सिर्फ |
| ७२४ | ते स्थित्यंतर, ती स्थित्यंतरे<br>स्थित्यंतरा-, स्थित्यंतरां- | change of situation / paradigm shift<br>परिवर्तन / बदलाव |
| ७२५ | तो उलगडा<br>उलगड्या- | revelation / unravelling<br>रहस्योद्घाटन / सुलझाना |
| ७२६ | सदरहू (शासकीय भाषा) | aforementioned (official usage)<br>पूर्वकथित / पूर्वोल्लिखित (शासकीय भाषा) |
| ७२७ | ते सरण, ती सरणे / सरणं<br>सरणा-, सरणां- | pyre<br>चिता |
| ७२८ | भिरभिरणे | to flutter about / wander<br>मंडराना / भटकना |
| ७२९ | तो आवाका<br>आवाक्या- | range / scope / extent<br>विस्तार / पहुँच / फैलाव |
| ७३० | तो उदरनिर्वाह<br>उदरनिर्वाहा- | subsistence / livelihood<br>जीवन निर्वाह / जीविका |
| ७३१ | खर्चिक | spendthrift / expensive<br>खर्चीला |
| ७३२ | एकदिलाने | together / unitedly / harmoniously<br>मिलजुल कर / एक हो कर |
| ७३३ | ते ब्रीदवाक्य, ती ब्रीदवाक्ये / ब्रीदवाक्यं<br>ब्रीदवाक्या-, ब्रीदवाक्यां- | motto<br>आदर्श (वाक्य) |
| ७३४ | 'सुजलाम् सुफलाम्' | rich, fertile land / prosperous / abundance<br>'सुजलाम् सुफलाम्' / हराभरा / खुशहाल / समृद्ध |
| ७३५ | आढावा घेणे | review / survey<br>जायजा लेना / किये हुए कामों का विवरण |
| ७३६ | हट्टाला पेटणे | to be stubborn / unrelenting<br>ज़िद पर अड़ना / हठ करना |
| ७३७ | बाह्या वर सरकावणे | to roll up one's sleeves<br>कमर कसना |

७३८ स्तब्ध — still / dumbfounded
शांत / निश्चल / स्तब्ध

७३९ ऋण फेडणे — to pay debts
कर्ज चुकाना

७४० ती कुदळ, त्या कुदळी — a small axe
कुदळी-, कुदळीं- — कुदाल

७४१ सरसावणे — to get ready / come forward
आगे आना

७४२ टुमणे लावणे — to be annoyingly persistent in asking for something
किसी चीज की रट लगाना

७४३ ते जाजम, ती जाजमे / जाजमं — bedspread
जाजमा-, जाजमां- — जाजम / चादर

७४४ कोंडाळे करणे — to gather around
ते कोंडाळे / कोंडाळं, ती कोंडाळी — इर्दगिर्द जमा होना
कोंडाळ्या-, कोंडाळ्यां-

७४५ चारी खणणे — to dig a canal
नहर खोदना

७४६ ती रोपवाटिका, त्या – — garden / nursery
रोपवाटिके-, रोपवाटिकां- — बगीचा / नर्सरी

७४७ तो धबधबा, ते धबधबे — waterfall
धबधब्या-, धबधब्यां- — जलप्रपात

७४८ ती उपाययोजना, त्या – — remedy / measures / steps
उपाययोजने-, उपाययोजनां- — उपाय / कार्यवाही

## Marathi Textbook for Level 5

- Creative exercises, tests, glossary and answer key
- An integrated communicative approach
- Systematic and effective learning of the language
- For young and adult learners
- For classroom study as well as for self learners
- Language skills: Understanding, speaking, reading, writing Marathi

## The set contains:

1. A Textbook
2. A Workbook
3. Entire content with audios and audio-visuals available online
   https://mu.ac.in/mymarathi5

**Visit us:** www.rmvs.marathi.gov.in


मुंबई विद्यापीठ
UNIVERSITY OF MUMBAI

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI

9 789354 075919

**Price:** Rs. 1250 | 25 USD | 20 EUR